म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3202

# छद माझा आगळा



REFBK-0020282

संपादिका –
डॉ. सरोजिनी बाबर

संदर्भ निबंध [लोकसाहित्याविषयी
(१९२५)]
३२०८
२०२८२
२१५।८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ३२०८ / २०२८२ / २१५।८८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# छंद माझा आगळा

# छंद माझा आगळा

(लेखसंग्रह)

संपादिका

डॉ. सरोजिनी बाबर

REFBK-0020282

महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला, पुष्प २६ वे

**प्रथम आवृत्ती**

१२ मार्च १९८६

■

**प्रकाशक**

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या वतीने महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती.

■

© सर्व हक्क लोकसाहित्य समितीच्या स्वाधीन

■

**मुद्रक**

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय, वाई ( जि. सातारा )
आणि
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.

■

**चित्रकार**

श्री. ग. ना. जाधव

■

**मूल्य**

रु. ३५-००

# महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती

**अध्यक्ष**

डॉ. सरोजिनी बाबर

**सभासद**

प्रा. वामनराव चोरघडे

प्रा. यू. म. पठाण

सौ. शैलजा राजे

श्री. बाजीराव पाटील

श्री. नामदेव ढसाळ

श्री. आत्माराम राठोड

श्री. रो. वो. अल्वा, संचालक
शासन मुद्रण आणि लेखन सामग्री, संचालनालय, मुंबई

**सचिव**

शिक्षण उपसंचालक, पुणे

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| प्रास्ताविक | ... | ... | ... नऊ |
| स्वगत | ... | ... | ... अकरा |
| जगता जगता जे कळले तेच मी शब्दात मांडले | प्रा. वामन चोरघडे | ... | १ |
| एक अमोल ठेवा | सौ. अनसूया लिमये | ... | २२ |
| लोककथांचं विश्व | सौ. शरदिनी मोहिते | ... | ३४ |
| जिवंत भावनांचं अध्ययन | डॉ. सविता जाजोदिया | ... | ४२ |
| कथाकथन | डॉ. सरोजिनी बाबर | ... | ५२ |
| मऱ्हाटी लोकसंस्कृती | डॉ. यू. म. पठाण | ... | ६२ |
| वेगळ्या धाटणीचं पण माझ्या आवडीचं | सौ. शैलजा राजे | ... | ७० |
| अशी सुरंगा राहते रेलून | प्रा. डॉ. सुमन पाटील | ... | ८८ |
| आदिवासींचा संकेत | डॉ. भाऊ मांडवकर | ... | ९८ |
| मैत्री आणि विश्वास | प्रा. आशा मुंडले | ... | १०६ |

| | | | |
|---|---|---|---|
| माझा मुक्त संवाद | डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे | ... | ११८ |
| हस्तकला | श्रीमती कमल काळे | ... | १३१ |
| लोककला | श्री. अ. दि. कोकड | ... | १४१ |
| संस्कार | सौ. पुष्पा जोशी | ... | १५५ |
| लोकसंगीत | डॉ. विमल चोरघडे (केळकर) | ... | १६१ |
| मेरी शोध कहानी | सौ. मालती शर्मा | ... | १७४ |
| शासकीय मुद्रणालये व लोकसाहित्य समितीची देखणी प्रकाशने | श्री. स. आ. सप्रे | ... | १८४ |

# प्रास्ताविक

लोकसाहित्य समितीच्या वतीने परवाच्या सप्टेंबर १९८५ मध्ये "मी आणि लोकसाहित्य" या विषयावर एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. पुणे विद्यापीठाच्या ज्ञानविस्तार विभागाचे संचालक डॉ. भालचंद्र फडके यांच्या अध्यक्षतेखाली हा परिसंवाद चारपाच बैठकांमध्ये पार पडला. त्यावेळी लोक-साहित्याच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक नामवंतांना निमंत्रित केले होते. तेव्हा त्या संदर्भात विविध विषयांवरील जे निबंध त्यावेळी वाचण्यात आले तेच आता "छंद माझा आगळा" या शीर्षकाखाली प्रकाशित होत आहेत.

महाराष्ट्राच्या सर्वसामान्य लोकांच्यामध्ये—जनसामान्यांच्यामध्ये—लोकसाहि-त्याच्या संकलनाच्या व अभ्यासाच्या निमित्ताने वावरताना आलेले अनुभव या लोकसाहित्यकारांनी मोठ्या जिव्हाळ्याने येथे ग्रथित केलेले आहेत.

लोकसाहित्य समितीचे एक आद्यप्रवर्तक व त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी असा एक परिसंवाद घेण्यासाठी आम्हाला वेळो-वेळी सुचविलेले होते. या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या मंडळींना कोणकोणत्या प्रसंगांना कसकसे तोंड द्यावे लागले व त्यातून आपल्या जीवनाला एक परीचा वेगळा आकार कसकसा येत गेला याची या निमित्ताने येथे नोंद झालेली

आहे. त्यामुळे हे निबंधात्मक लेखन सर्वांच्या काळजाचा ठाव तर घेईलच पण पुष्कळसे घेण्याजोगे असे सांगून जाईल यात शंका नाही.

महाराष्ट्राच्या रौप्य महोत्सवी वर्षातील हे प्रकाशन या कार्यक्षेत्रातील संशोधकांना व अभ्यासकांना संदर्भग्रंथ म्हणून विशेष उपयोगी पडेल ही खात्री आहे.

या ग्रंथासाठी हातभार लावणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक अभार !

पुणे,

१२ मार्च १९८६.

सरोजिनी बाबर

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती

## स्वगत

तसं पाहिलं तर लोकसाहित्यविषयक असा आमचा एखादा ग्रंथ बघून कुणाला बरं वाटतं अगर कुणाच्या मनात काहीपण येतं ही गोष्ट खरी आहे. पण म्हणून आम्ही कधी त्या एकी काथ्याकुट करीत बसलोय असं होतच नाही. तयार झालेलं पुस्तक आपल्या मनानं लोकांच्या हाती गेल्यावर असेल लायकी तर नाव काढील नाहीतर बोळून घेईल या कल्पनेनं त्याचा नाद सोडून देत नव्यानं हाती घेतलेल्या पुस्तकाच्या विचारात आम्ही रंगलाल होऊन जातो. मग कुणाला काही वाटो बापडं !

मागं एकदा या संदर्भात फार मजा आली. लेखकांच्या एका मेळाव्यात आम्ही पुष्कळजण लोणावळ्याच्या पैस शिवारात घातलेल्या मंडपाखाली बसलोवतो. त्यावेळी नुकताच तयार झालेला 'एक होता राजा' हा आमच्या लोकसाहित्य समितीचा ग्रंथ रुबाबात आमच्या हातात होता. आकारानं जाडजूड, वरती चित्रकार दलालांचं रंगीत सुंदर देखणं चित्र आणि अंतरंगात पुरुष मंडळींच्या मुखी रुळलेल्या कथांचा न् गीतांचा सचित्र आविष्कार! तर हा सगळा डामडौल बघून आमचे माडगूळकर आण्णा (ग. दि. मा.) मला आपल्या

शेजारी बसवून घेत व मोठ्या ऐटीनं पुस्तकाला कुरवाळीत म्हणाले कसे, ‘दिवाणसाब, तुमचा रुबाब लई दांडगा ! ग्रंथ एकदम नामी झालाय ! सरकार दरबारी तुमच्या शब्दाला किंमत मोट्ठी! आमच्या हातून असलं काम होणे नाही. करा सही न् द्या बघू चट्‌किनी ही प्रत आम्हाला बिनबोभाट!’ ... तर ते ऐकून एकच प्रत जवळ होती म्हणून ती त्यांच्याकडून परत घेत मी पण बोलून गेले, “तुम्हाला रुबाब दिसतो आण्णा, पण हाडाची काडं होतात एकेक ग्रंथ तयार करताना! ठाऊक आहे ना किती कष्ट वेचावे लागतात ते? मग?” आणिक बाई तो ग्रंथ डोळ्याचं पातं लवतंय न लवतंय तोच या हातातून त्या हातात न् त्या हातातून ह्या हातात जात जात अवचितच कुठं पसार झाला हरी जाणे!...

आमच्या लोकसाहित्य विषयक प्रत्येक ग्रंथाची अशीच वाट लागते न् मग पुष्कळदा बघता बघता ग्रंथ चटणीसारखा संपून जातो ही वस्तुस्थिती आहे. एक तर किंमत कमी. चित्रं भरपूर. मजकूर वाचनीय. सजावट आकर्षक. मुखपृष्ठ काळजाचा ठाव घेणारं. कागद उत्तम. टाईप चांगला. छपाई देखणी. आणखीन् दुसरं सांगायचं म्हणजे पारंपारिक लोक संस्कृतीची नव्यानं ओळख करून घ्यायचं साधन आपण होऊन हाती आलेलं! मग कशाला कोण विलंब करील?

त्यातून हे असलं प्रकाशन पडलं सरकारी. म्हणजे ‘सरकारच्यावतीनं एवढं चांगलं पुस्तक तयार होतं?’ ही चौकशी धा धावून होतेली! त्या कारणानं ‘तुमची चंगळ आहे’ असला अभिप्राय वारंवार आमच्या कानावर येतेला न् आम्ही पण ‘होय. आहे खरं तसं.’ अशी वेळ मारून नेलेली!

वास्तविक असला ग्रंथ तयार करायचा म्हणजे भारी कष्टाचं न् जिकीरीचं काम. त्यातून या विषयाची आम्हाला जेवढी चाड न् निकड त्यातला गंधही हाताखालच्या माणसांला नसावा, या वस्तुस्थितीचं दुर्दैव आमच्या वाट्याला आलेलं! त्या कारणानं अक्षरशः ढोर मेहनत ज्याला म्हणतात त्यातच आम्हाला बुडून जायला झालेलं!

ओळखीच्या लोकांना जाऊन भेटा, कार्यकर्त्यांना पत्र लिहा, अधिकाऱ्यांपुढं विनवण्या करा, लोकसाहित्य ज्यांच्या जवळ आहे त्यांना एकदा सोडून दहादा भेटून त्यांच्या मिनतवाऱ्या करा, सरकार दरबारी जाऊन घेतली मेहनत पटवून द्या, शासकीय मुद्रणालयात जाऊन तिथल्या पदाधिकाऱ्यांशी वाटाघाटी करा, चित्रकाराच्या घरी वारंवार खेट्या घाला, छपाई सुरू झाल्यावर अनेकदा प्रुफं वाचा, किंमत ठरविण्यासाठी वाद घाला, विक्रीच्या व्यवस्थेत लक्ष द्या असली कितीक कामं वेळखाऊ अशी तर त्यातच डुंबत रहा ही वस्तुस्थिती. त्यातून लोकसाहित्य समितीसाठी सरकारी अंदाजपत्रकात फार थोडी ठराविक रक्कम मान्य झालेली न् भ्रमंतीचा खर्च तर अमाप होतेला! म्हणून कुठं माघार घेऊन होतं काय? नाही बा! या विषयाची आम्हाला एवढी मनस्वी आवड निवड तर अडचणींवर मात करीत सारं काही सोसायचा जणु आम्ही विडा उचललेला न् मनावर घेत काम रेटायचंच म्हटलेलं! ..

आमचा वावर समाजकारणात, राजकारणात. तशात आमदारकी, खासदारकी आमच्याकडे चालून आलेली. तशी सरकारी यंत्रणा न् शिक्षण खातं माहीत झालेलं. खेरीज हे काम बिन पगारी पत्करल्याकारणानं लोकांना आमच्या कष्टाची जाणीव झालेली. म्हणून आजवर गेलं सारं निभावून तर म्हटलं या कामात रमताना, लोकसाहित्य जमा करताना, कुणाचं कसं कुणाचं कसं जमून गेलं त्यातला करावा विचार. केली चौकशी. धाडली पत्रं. लावलं यातल्या जाणकारांना लिहायला. म्हटलं, साधा स्वतःशीच आपला सुखसंवाद न् मांडा कथा कथन. तर त्यातलाच हा वानवळा इथं ग्रथित झालाय.

पण सांगायचं म्हणजे खरंच भारी जिकीरीचं हे काम. आता आमचंच सांगते म्हणजे तुमच्या लक्षात येईल काय ते.

आमच्या गावाकडच्या घरी सगळी माणसं घरात वावरणार ती लोकसाहित्याची बाळ घुटी ल्यावी त्या झोकात. 'काखेत कळसा न् गावाला वळसा' असल्या म्हणी जोकीत. "इथंच हाई पण दिसत

न्हाई" असं बजावीत. "न्हवं इंद्र, न्हवं चंद्र, शाई जाळीचा मासा, वेड्यानं घातलं दुमान शाण्याला पडला फासा. (टोळ) असली कोडी टाकीत. "तर काय गंमत झाली गा" अशा झोकात गोष्टींचं पेव उघडीत आणिक झालंच तर,

**माझ्या अंगणी उभी तुळस मालन**
**हिच्या सैंवरा येती कृष्ण देवजी चालून**

असल्या ओव्या गाऊन अद्भुताच्या जगात प्रवेश करीत. तर आम्ही तिकडं गेलो की, याच भावसागरात मनसोक्त डुंबणार, तिथंच भान विसरून रमणार हे जसं ठरलेलंच म्हणावं हं! पण हे सगळं कसं? पैस अंगणाची खराट्यानं झाडलोट करीत. गोठ्यातलं शेण काढीत. जनावरांना वैरणकाडी घालीत. थोरल्या बायकांच्या दळपाला हात लावीत. उभ्यानं ताकाचा डेरा घुसळीत. मोटभर शेणाच्या गौऱ्या थापीत. उभं कडवी घरदार सारवीत. वाकळेला टाका शिवीत. बाबाला तंबाखूच्या चिलमीवर चुलीतला विस्तव आणून ठेवीत. बारक्या पोरासोरांना खेळवीत. अंगणात शेणसडा टाकून कणा रांगोळी घालीत. म्हणजे सांगायचं असं की, चारीचिच खाऊन पिऊन कंबर मोडस्तोवर दोन्ही दोन्ही हातांनी कामधाम उचलीत हं! एरव्ही रिकामटेकडं बसायला सवड कुठली कुणाला?

अशीच एकदा गंमत झाली. आम्हाला गव्हाची खीर खायची लहर आली. तर आमची मामी बसली उखळावर. गहू ओलवून घेतले न् आमच्या हातात मुसळ देऊन वरून घाव घाला म्हणाली! बापरे! मामीचं कांडणं फार दणक्याचं! प्रत्येक घावासरशी 'हँ ऽऽ' करणार न् ताल धरल्यागत मुसळ उचलीत झेलणार ऐटीनं! आम्हाला तसली सवय कुठली? पण गीतं हवीत तर हे केलंच पाहिजे ना? मुकाट्यानं मुसळ उचललं न् घातले घाव ती सांगेल तसे तर हाताला फोड आले! तशी ती गुणगुणली –

**लाडक्या लेकीला काम सांगावं लाडाचं**
**तालीवारीच्या तोलाचं**

मग काय? आम्ही ती ओवी घेतली टिपून. आणखीन् सांग म्हणाले. तर ती बोलली हसून, 'पोत्यानं घ्या म्हणं!' म्हणजे? तिच्याजवळ रग्गड रग्गड गीतं होती. हवी तेवढी ती लिहून घ्या म्हणीत होती. तिचं तोंड भरारा वाजत होतं. पण आमचेच हात दमले ना टिपून घेताना? इतक्या भराभर लिहून घ्यायची सवय नको? बरं एकदा सांगितला शब्द ती पुन्हा बोलणार नाही! 'कान फुटले काय?' म्हणणार? त्यामुळं आमची फट्फजिती झालीच म्हणा न् मग ती पण बोललीच म्हणा –

**पैली माजी ववी वविला काळा दोरा**
**लिवणाराचा हात गोरा राजबिंडा**

मग काय? आम्हाला पण हे कवतिक रग्गड रग्गड काही सांगून जाणार? ... न् मग हात मोडले तरी चालेल पण लिहून घेईन तर राहीन या ईर्षेनं आम्ही देखील वही भरून लिहून घेणारच! अशावेळी मामी मग बोलून जाणार खुशीनं –

**पोथी पुस्तकाचं बाई मांडीला झालं वज्जं**
**माझ्या तू बाळराजा हाये गिन्यानी हुरदं तुजं**

**पोथी पुस्तक वाचताना बाई कानाचा डूल हालं**
**माझा त्यो बाळराज सये कागदासंगं बोलं**

आणिक आमची पण ब्रह्मानंदी टाळी लागणार! आम्ही कागदासंगं बोलतोय ही कल्पनाच किती सुंदर!

आमच्या घरी वडीलधाऱ्यांचा दबदबा मोठा. त्यांचा देवदेवही चांगलाच उपसाभरीचा. त्यामुळं घरी असलं की, दंडबाह्या दुखस्तोवर सहाणेवर चंदनाचं खोड घाशीत लहानगी वाटीभर गंध उगाळावा लागायचा. अशा वेळी आज्जा पूजेला बसल्यावर आज्जी हाटकून म्हणायची –

**सपान पडचीला ग मला पंढरी गेल्यावानी**
**वलं ग माजं केस न् चंद्रभागंत न्हाल्यावानी**

तशी मग आज्जा देवावर गंध शिंपडत न् स्वतःला कपाळावर टिळा लावीत सांगायचा, "जाऊया म्हणं यंदाला, करूया पंढरी !..." आणिक ही पण पुन्हा बोलायची –

**पंढरीला जाया यंदा न्हवतं माजं मन**
**सावळ्या इठ्ठलानं चिठ्ठ्या पाठविल्या दोन**

त्यासरशी आज्ज्याचे पण ओठ हलायचे, "संत म्हंतो संताला तुमच्या गावचं नाव काय ? आमच्या गावचं नाव अलंकापुरी. पालखी महाद्वारी. जरीचं निशान भाडभाड करी..." आणि मग दोघेही खद-खदून हसत अशा प्रेमानं एकमेकांकडे पहायचे की, बोलायचं काम नाही !

इकडे तोवर वही पेन्सिल शोधून आम्ही येस्तोवर दोघांचंही तोंड गप्प झालेलं असायचं! पूजा आटोपून आज्जा 'भागवत' वाचीत बसायचा न् आज्जी कापसाच्या फुलवाती वळीत पुढ्यात कापूस घेऊन सोप्यात येऊन खांबाला टेकून बसलेली असायची.

त्यामुळं पुन्हा ओवी बोल म्हटलं की ती खेकसायची, "जवाच्या तवा! आता काय?"... आणिक मग तिच्या मिंत्या करून करून बेजार व्हायला झालं तरी ती पुन्हा म्हणून तोंड उघडणारच नाही तर!... तिच्याकडून ह्या एक दोन ओव्या टिपून घ्यायला मला तब्बल एक आठवडा लागला !... तर सांगायचं म्हणजे या लोकांच्या भारी म्हणजे भारीच विनवण्या कराव्या लागतात! अक्षरशः कधी कधी पाया देखील पडावं लागतं तेव्हा कुठं चार ओळी हाती येतात!

लोकांचं काय जातं 'तुमची चंगळ आहे' म्हणायला हो ? इथं आमचं आम्हाला ठाऊक किती वणवणावं लागतं व किती आजीजी पण करावी लागते ती ? ... तर काय ?

मागं एकदा पुण्यात घडलेली गोष्ट सांगते. त्यावेळी मी मुंबई विधानसभेची सभासद होते. सेशन नसेल तेव्हा लोकसाहित्य

मिळवायची खटपट कायम चालू असायची. तर एक दिवस अशीच एक बाई कुठल्याशा शेतावरून आलेली. तिच्या डोक्यावर शेणकुटांचा भरगच्च हाराडेरा. तर आमच्या दाराशी ती आल्यावर मी काय म्हटलं तिला की, "ओव्या येत असतील तर सांग." तशी ती डोळे मोठ्ठे करून माझ्यावर ओरडली, "आणिक हे कोण विकील? माझा बा?... ओव्या बोलत बसल्यावर सासू ठोकील का ऱ्हाईल वो?"

क्षणभर मला चक्रावल्यागत झालं. एकटक त्या बाईकडे पहात मी विचारलं, "या पाटीचे पैसे किती?" त्यासरशी ती बाई किंचाळली, "एवढ्या गोऱ्या घिऊन काय करशील?" "घरात चूल आहे. बंब आहे." मी पण ठणकावून उत्तर दिलं न् मग "तेरा" रुपयांवर हा सौदा ठरला! ती बाई दाराशी बसली. सगळी शेणकुटं पैसे देऊन मी घरात आणली तशी माझी आई ओरडली, "एवढी कशाला?" आणिक तिनं मला अशी फैलावर घेतली की, काय सांगू? त्या बाईचं व आईचंही असं झक्कास जुंपलं की, ती बाई मला एकही ओवी न देता रागारागानं निघूनही गेली ना?...

होता होता मग मावळ मुलखातल्या एका शेतावर तिची माझी भेट झाली तेव्हा तिनं दिल्या शब्दाची आठवण ठेवीत एक ओवी सांगितली—

**भरल्या बाजारात बापलेकाची उम्मयीत**
**जन बोलती दिवानात पट्टी पिकली इनामात**

किती सुंदर हा आशय न् सुरावट पण किती नामी! तब्बल तास दोन तास तिथं काढीत मी ती सुरावट गळ्यात उतरवली न् घरी आले. अशानं असं आहे असं बोलत आईच्या कानावर ती सुरावट घातली. त्यावेळी तिनं अलाबला घेत माझा मुका घेतला न् मग पुढं केव्हाही ती बाई शेणकुटं घेऊन आली तर ती विकत घेत तिच्याकडून एका वहीत माझ्या बहिणीकडून ती सांगेल त्या ओव्या तिनं टिपून घेतल्या!... तर अशी गंमत आमच्या संकलनाची हं!

आमच्या ह्या संकलनाच्या उद्योगातून परिचयात आलेलं कुणीही सुटलं नाही पुढं पुढं ! ना. दादासाहेब कन्नमवार मुख्य मंत्री असताना न् ना. भाऊसाहेब हिरे महसूल मंत्री असताना लक्षात ठेवून माझ्यासाठी त्यांच्या भागातील लोकगीतं स्वतःच्या अक्षरात टिपून घेऊन आले ना ? तीच गोष्ट ना. यशवंतराव चव्हाणांचीही ! एखाद्या लहान मुलाला अमुक एक खाऊ लागतो म्हणावं त्याच्या आईनं, तशी भाषा ह्या मंडळींनी माझ्याएकी केली म्हणून आमचं हे संकलन बाळसं धरू शकलं ही वस्तुस्थिती आहे !

'तुझं हे वेड अजब आहे !' म्हणून माझी टिंगल करणाऱ्या सग्यासोयऱ्यांनी आमची देखणी पुस्तकं बघून आपण होऊन लोकगीतं पाठवायचा मग सपाटा लावला ! एवढंच नाहीतर ज्यांनी ज्यांनी गीतं दिली त्यांच्या त्यांच्या नावावर ती पुस्तकात छापून आलेली बघून ऐटी मारताना अनेकांनी अशी पुस्तकं राजीखुशीनं विकतही घेतली !... आहे की नाही म्हणजे ?

'लोकगीतं वाचायची नसतात तर ती गायची असतात' असं आम्हाला साने गुरुजींनी बजावल्या कारणानं आम्ही ती गायली देखील इथं तिथं पोटभर. पण आमची ही ओळख दुनियेला झाली ती आकाशवाणीवरून आम्ही लोकगीतं सादर केली त्याकारणानं ! पहिल्या पहिल्यांदा आम्ही लोकगीतं गातो हे खरं न वाटणारांनी आमच्या घरी येऊन आमच्याकडे नखशिखांत पहायला न् आमचेकडून ती गीतं म्हणून घ्यायला सुरुवात केली तशी हसून हसून मुरकुंडी वळायची वेळ आली ना ?

खरंच, ज्यांच्यामुळं लोकगीतांची सुरावट आमच्या गळ्यात खेळली त्यांचे उपकार किती म्हणावेत देवा ?

मला आठवतं, एकदा एका एकतारीवाल्याकडून मला एक गौळण शिकायची होती. तर त्यानं चांगले दहा पंधरा दिवस खाल्ले ती शिकावयाला ! रोज दुपारी बाराच्या ठोक्याला तो येणार. ताजी भाकरी

भाजी खाणार. तांब्याभर पाणी पिणार न् मग एकतारी हातात घेऊन अंगणात बसून शिकवणार. कृष्ण देवाचं कवतिक सांगताना त्याचा गळा खुलायचा. चेहरा उमलायचा. एकतारी घुमायची. 'माझं सगुण गुणाचं तान्हं, बाळ दिसतं गोजीरवाणं' एवढी एकच ओळ तो आळवून आळवून चिपळयांच्या ठेक्यावर असा म्हणायचा की, त्यातले बारकावे लक्षात घेताना आमची भंवेरी उडून जावी!

तर एकेक अशी गंमत. सांगावी तेवढी थोडी. बोलावी तेवढी कमीच अशी!

तेव्हा सांगायचं म्हणजे अशी जिथं म्हणून मिळतील ती सारी लोक-गीतं, कहाण्या, कोडी, उखाणे, म्हणी हे सगळं भांडवल लोकसाहित्य समितीच्या प्रकाशनात जाऊन बसलं. पुस्तकं सजली. अनेकांचे हात-भार लागले. एकेक ग्रंथ तयार करायला दोन दोन तीन तीन वर्षं अपार मेहनत घ्यावी लागली. तशी म्हटलं यातलं कोणतं एक खरं खरं लोकांला कळूं दे.

लोकसाहित्य कुणा एकाच्या मालकीचं नाही. ते सर्वांचं. पिढ्या न् पिढ्यांचं. समाज मनानं घातलेला असा तो एक जबरदस्त हुंकार आहे. स्वतःच्या समाधानासाठी लोकांनी केलेलं ते एक प्रभावी स्वगत आहे.

या साहित्यामुळं जनलोकांचे कुळाचार समजतात. संस्कृती उमगते. मनोगत कळतं. पारंपारिक भावभावनांचा उलगडा होतो आणि मुख्य म्हणजे वर्षानुवर्षं त्याच उमेदीनं टिकून रहाण्यासाठी या भावना-विष्कारानं व्यक्त केलेलं भाषासौष्ठवही लक्षात येतं.

डॉ. सरोजिनी बाबर

म. राज्य ग्रं. संग्रहालय ठाणे
दा. क्र 3206
20212
21418
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# जगता जगता जे कळले तेच मी शब्दात मांडले

प्रा. वामनराव चोरघडे

जाणते लोक असे सांगतात की आधी भाषा निर्माण होते, काही काळ लोटतो तेव्हा त्या भाषेचे व्याकरण तयार होते. हा काळ किती लोटल्यावर व्याकरण तयार होते हे निश्चितपणे मला तरी सांगता येत नाही. आणि कोणी सांगणारा असेल तर तोही अनुमानानेच सांगणार. विष्णुसहस्रनामामध्ये देवकीनंदन असे श्री. विष्णूचे एक नाव आहे. विष्णुसहस्रनामावर विनोबांनी जे चिंतन केले त्यात ते म्हणतात, 'देवकी हा शब्द अगोदरच अस्तित्वात होता आणि प्रचलित शब्दच विष्णूसहस्रनामात आला आहे. देवकी म्हणजे भक्ती.' लोकसाहित्याची व्याख्या तंतोतंतपणे करता येत नाही. ती या अशा प्रकारच्या अडचणीमुळेच !

शिवाय अभ्यास करून आपले ज्ञान वाढवायचे अशा हेतूने मी लोकसाहित्य वाचलेच नाही. माझे बोलणे, वागणे ज्या कुठल्या वचनानुसार झाले ती वचने, ते शब्द माझ्या आईवडिलांच्या, माझ्या सग्यासोयऱ्यांच्या, ज्या समाजात मी वावरलो त्या समाजाच्या; कृतीत,

उक्तीत, होते. मला त्यात नवीन काहीच नव्हते. मग मी लोकसाहित्यात शिरलो कसा ? तेवढेच स्पष्ट करण्यासाठी या शीर्षकातील ‘मी’चा संबंध यायचा आहे.

मला बाळपणापासूनच लोकसाहित्याची जाण होती काय ? नव्हती. लोकसाहित्य कसे निर्माण झाले? या साहित्याचे वारसदार कोण असतात? लोकसाहित्य आणि लोककला यांचे मूल्यांकन कसे केले जाते ? कसे केले जावे ? ... यापैकी कशाचीच जाण मला नव्हती. जी जाण आली ती अभावातून, ज्या वातावरणात मी वाढलो, खेळलो, तिथून दूर गेल्या-नंतरच! मला त्याचे मूल्य थोडे थोडे कळले. आई जोपर्यंत जवळ असते, तोपर्यंत बालकाला तिच्या प्रेमाचे मोल कळतच नाही. तिच्यापासून दूर गेल्यानंतर त्याला आईची जी आठवण होते ती तीव्र तर असतेच शिवाय सखोल व अधिक व्यापक असते.

पुढे शिकायचे, शिकल्यानंतरच घरी तोंड दाखवायचे, अशा काहीशा दुबळ्या संकल्पाने वयाच्या नवव्या वर्षी मी घर व माझे गाव सोडले. आग-गाडीच्या प्रवासाने पुरते दोन तासही घेतले नाहीत अन् मला घरादाराची तीव्रतेने आठवण येऊन डोळे झरू लागले. परक्या ठिकाणी गेल्या गेल्या प्रेम म्हणजे काय, स्नेह म्हणजे काय, वात्सल्य म्हणजे काय, ही जाणीव शब्द-कोश न पाहताच झाली. नागरी भाषेचा सराव करताना माझी मूळची भाषा चांगली असे वाटू लागले. नव्या भावना आत्मसात करताना मूळ भावनांचे मोल कळू लागले. प्रयत्नपूर्वक नवे शिकत असताना जुने आपले जरतारी पदर दाखवीत समोर येऊ लागले. आणि मग वरील तिन्ही प्रश्न मला सतावू लागले

आईने अपत्यासाठी रांधलेली पेज अमृताहून कशी गोड असते हे कळले.
 भुकेने तळमळत असताना पाठीवरून मायेचा हात फिरविल्याबरोबर

पोट कसे भरते हे देखील कळले. त्या क्षणापासून परंपरेची अस्मिता माझ्यात जागी झाली.

लोकसाहित्य कोण निर्माण करते? ते साहित्य कुणाएकाचे नसते म्हणून ते अपौरुषेय असते असे म्हटले की, मूळ प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. कुठल्या तरी संस्कृत नाटकात कुणीतरी प्रश्न विचारला की, राज्य कोण करते तेव्हा उत्तर मिळाले की, रस्ता राज्य करतो! लोकसाहित्य वातावरणातून निर्माण होते असे मानले तरी ते वातावरण कसे हा प्रश्न राहतोच.

या प्रश्नाचे मला आलेले प्रत्यंतर मी कुठेतरी शब्दित केले आहे. या प्रत्यंतराची कल्पना देण्याचा प्रयत्न करतो.

माझ्या आईने मला लोकवाङमयाची गोडी लावली आणि तिनेच मला लोककवीची भूमिका समजावून दिली. ज्या प्रसंगाने मला हे कळून चुकले तो प्रसंग मनोरंजक वाटेल म्हणून मी येथे देणार आहे. तथापि तो देताना ओघानेच माझ्याबद्दल किंवा माझ्या नातेवाईकांसंबंधी वाचकांना काही वाचावे लागेल तेव्हा ते माझ्यावर आत्मस्तुतीचा आरोप न करता मला क्षमा करतील अशी आशा आहे.

**घडलेला प्रसंग असा**

१९३६ साली बी.ए.ची परीक्षा पास झाल्यानंतर मी माझे मूळ गाव नरखेड येथे न जाता नागपूरासच थांबलो. आम्ही दोघेच भाऊ व दोघेही नागपूरलाच असल्यामुळे आईची इच्छा अशी की, वडील बंधूंना नोकरीमुळे शक्य नसले तरी मी निदान नरखेडला जावे. तिची प्रकृती बरेच दिवसांपासून कामचलाऊ झाली असल्यामुळे एवढीशीही मानसिक आणि शारीरिक अस्वस्थता तिच्याने सहन करवत नसे आणि घरच्या गरिबीमुळे घरकाम तर तिला बरेच करावे लागे. तशातच मी येत नाही असे माझे पत्र गेलेले. तिला सहाजिकच वाईट वाटले व तिने मला एक

पत्र पाठविले. त्यात तिने जे लिहिले व जसे लिहिले ते वाचून मला लोकसाहित्याच्या निर्मात्याची भूमिका स्पष्ट कळली. ते पत्र त्यातला अनावश्यक भाग गाळून मी देत आहे. पत्र अगदीच लहान होते. अशुद्धे सुधारली आहेत.

**श्री सांब प्रसन्न**

नरखेड
३०-५-३६

चि. बापू भैय्यास, आईचा कल्याण इच्छित आशीर्वाद,

पत्र लिहिण्यास कारण की, मला या दीड वर्षात पाठीच्या रोगाने शोकसागरात बुडविले आहे. अशातही मी पोटाकडे पाहून आपले मन समाधान केले... तुम्ही दोघेही मला शोक सागरातून काढू शकाल असे जाणून लिहिले आहे.

तुझी आई

पुढे मला उद्देशून तिने चार ओळीची एक कविता लिहिली आहे. ती मी येथे दिली असती, पण एक तर संकोच वाटतो म्हणून आणि दुसरे ती आवश्यक नाही म्हणून टाळतो. परंतु त्या कवितेत माझ्या अशिक्षित आईने जे दोन-चार शब्द वापरले ते तिच्या संस्कारितेची साक्ष देतात. 'आत्मज', 'वपु', 'वार्धक्य' हे शब्द तिला जे आले ते तिच्या कुळाच्या देणगीने हे उघड आहे. कारण बालविवाह आणि कुळाची रीत यामुळे पुस्तक तिच्या नजरेत पडले नाही. आणि 'ज्ञानेश्वरी', 'शिवलीलामृत' आणि 'तुळसी महात्म्य' याशिवाय तिला काही वाचता येत नव्हते.

तिचे ते पत्र येताच मी घाबरलो. याचे कारण असे की, विहिरीतून पाणी ओढताना तिच्या मानेखाली रक्त आवळल्यामुळे पाठीवर एक

गोळा उठलेला आहे. तो दुखत नसला तरी बेलफळाएवडा मोठा आहे. आणि तो तिथे बरेच दिवसांपासून होताही. मला अशी भीती पडली की, तिचे हे पाठीचे दुखणे वाढले असावे आणि पोटाकडे पाहून म्हणजे गरिबीमुळे ती ते सहन करीत असावी! मी लगेच गावाला गेलो. पोचताच पहिला प्रश्न अर्थातच तिला तिच्या दुखण्याबद्दलच विचारला. ती म्हणाली, "माझ्या पाठीला काय झालं आहे असं?" "म्हणजे? मग तू पत्रात लिहिलंस ते?" असे मी म्हणताच ती हसली व म्हणाली, "म्हणे लेखक झालास व पुस्तक लिहिलेस! माझं पत्र तर समजत नाही!"

मी घोटाळ्यात पडलो आणि आपल्याशीच विचार करू लागलो. थोड्या वेळाने माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला आणि माझा आईबद्दल आदर दुणावला. सुमारे दीड वर्षापूर्वी माझे मामा म्हणजे आईचा आवडता पाठचा भाऊ, दिवंगत झाले होते. ते तिचे "पाठीचे दुखणे" आणि तशातही "पोटाकडे पाहून" म्हणजे आम्ही जी तिच्या पोटची मुले यांच्याकडे पाहून ती समाधान मानून घेत होती.

पाठ आणि पोट यांचे अलंकारिक अर्थ येथे अध्याहृत आहेत. कमीत कमी वाक्यात जास्तीत जास्त अर्थ सुचविण्याची ही योजकता! तिच्या भावनेचा उमाळा व तिची शब्द योजना ही दोन्हीही तिच्या वरील पत्रात दिसून येतात. आणि आटोपशीरपणा हा तर काव्यगुण समजतात. जे लोकवाङमय हजारो लोकांचे मनोरंजन करू शकते ते असेच असले पाहिजे याबद्दल माझी खात्री झाली. मला तिने लोकवाङमयाची गोडी लाविली त्याचे मर्म झाले तरी हेच असावे!

जे सांगावयाचे ते सांगून संपले. परंतु ओघानेच आणखी एक प्रसंग आठवला. तो अनाठायी होणार नाही असे वाटते.

माझ्या वडील बंधूंच्या लग्नाबद्दल मी एकदा माझ्याहून वडील असलेल्या अशिक्षित बहिणीला तिच्या सासरी पत्र पाठवून विचारले. त्याला

तिने आपल्या अर्धवट व अशुद्ध भाषेत उत्तर दिले. त्या पत्रातले एक वाक्य खालीलप्रमाणे आहे :

"मुलगी जरी सुरेख नसली तरी आपण सर्व बहीणभावंडे किंवा आई बाप यांच्यात शोभेल अशी हवी. आपण सर्व असे आहोत की, भाजी जरी घेऊ तरी पाव आण्याच्या ठिकाणी दोन पैसे गेले तरी हरकत नाही पण चांगली घेऊ. तर ही वस्तू म्हणजे वंशपरंपरेची"....

हा दृष्टान्त देखील मोठा सुंदर, सूचक आणि योग्य आहे नाही का ?

हा प्रसंग आणि त्यामुळे आलेला अनुभव माझ्याच घरचा आहे. माझी आई लोकसाहित्य निर्माण करणारी नाही हे मला माहित आहे. दैनंदिन जीवनाच्या क्रियाप्रतिक्रियातून मनात जे काही येते ते बोलून दाखविताना विचारपूर्वक शब्दरचना ज्यांना अवगत होते, त्यांच्याकडूनच साहित्याची निर्मिती होत असावी.

लोकसाहित्याची जोपासना कशी होते ? या साहित्याला कोणी वारसदार असतात काय ? वारसाने मिळालेले मूलधन आपल्या कमाईची भर घालून वाढविणे, हे खरे महत्त्वाचे ! त्या दृष्टीनेही माझ्या आयुष्यातील एक दुसरा प्रसंग थोडक्यात सांगतो. या प्रसंगाचाही मी कुठे तरी उल्लेख केल्याचे आठवते.

एकेकाळी आम्ही शेतकरी होतो. आजोबा, वडील सर्व शेती करीत. घरी त्यावेळी धान्याची पोती भरलेली असत. हिवाळ्यात कापसाची शेते तोडीवर आली म्हणजे मजुरीच्या बायका कापसाचे गठ्ठे आणीत व सायंकाळी आमच्या अंगणात जमत. घरी मणाचा तराजू लागे. आजोबा जवळ बसत. नोकर कापूस मोजत असे आणि कुणा बाईचा किती कापूस झाला हे टिपून ठेवण्याचे काम माझ्याकडे येई.

कागद पेन्सिल घेऊन, माझे मराठी दुसरीचे ज्ञान मी त्या कागदावर उतरवीत असे. मला किती अभिमाने वाटे! सर्व मजूरणींकडे, नोकरांकडे, माझ्या लहान भावाला कडेवर घेऊन खांबाशी उभ्या असलेल्या माझ्या काकीकडे मी ऐटीत नजर फेकीत असे. माझे इवलेसे ज्ञान त्यावेळी किती उपयोगाचे, असे मला वाटायचे. आज माझ्या पुष्कळ परीक्षा पास झाल्या आहेत, पण माझ्या ज्ञानाचा उपयोग त्या वेळेइतकाही माझ्या घरच्या मंडळींना होत नाही! मोठे सुखाचे दिवस होते ते!

त्यावेळी आमचे आजोबा म्हणजे आम्हाला सर्वज्ञ वाटत. आणि ते आमच्यावर कितीही रागावले तरी आम्ही त्यांच्यावर प्रेमच करीत असू. ते शेतावर जायला निघाले की, आम्ही मागे लागत असू. त्यांनी मारले तर रडत असू. मग ते आम्हाला घेऊन जात. शिवारात तुरीच्या, पावटयाच्या, मुगाच्या, शेंगा मनसोक्त खायला मिळत. मधून मधून आजोबा विचारीत, "कंटाळला का रे पोरांनो? येतात बेटे मागे लागून आणि मग चेहरे होतात पाच जोडे मारल्या सारखे लाल!"

आजच्या व्याख्येत सांगायचे तर त्यांच्यावर भाषेचे आणि सभ्यतेचेही संस्कार मुळीच झाले नव्हते. पण त्यांनी जितक्या लोकांचे भले केले तेवढयांची मोजदाद ठेवण्याचीही आज आमच्यात पात्रता राहिली नाही!

एकदा शेतात असताना त्यांनी आम्हाला एक उखाणा घातला. ते म्हणाले, "कोणता मास्तर शिकवितो रे तुम्हाला? वळीराम जागोबा का? पाहतो त्याची अक्कल! सांगा बरं माझा उखाणा."

आमच्या मास्तराची अक्कल पाहावयाची! आज शिक्षण शास्त्राची चार-दोन बुके वाचल्यावर असे वाटते की, किती महान तत्त्व त्यांच्या त्या बोलण्यात साठविले होते.

त्यावेळी मास्तर श्रीमंत असत अशातला भाग नाही. खेड्यातले मास्तर, नऊ रुपये पगार, मास्तरीण देखील पिवळे गावरानी लुगडे नेसत असे. मास्तराच्या घरी कोणी पाहुणे आले की, आमच्याच घरून लोणचे, लाल भोपळ्याची फोड, सतरंजी, दुधाची लोटी भरून जात असे. मास्तर कधी मागत नसत. पण मास्तरांच्या घरी पाव्हणे आले आणि आमच्याकडून सामान गेले नाही तर आजोबा म्हणत, "आपले पाहुणे विमुख गेले" भंगिणीलाही आमच्या लहानपणी आम्हाला "काकी" असे संबोधावे लागत असे आणि महालक्ष्मीच्या सणाची आंबिल तिला द्यावी लागे.

तर आजोबा म्हणाले, "या रे कारट्यांनो! सांगा हा उखाणा" आणि त्यांनी उखाणा घातला.

पूर्वी शिक्षकाचा उल्लेख आडनावाने न होता नाव व वडिलांचे नावच घेतले जाई. आता आतापर्यंत हा रिवाज आमच्याकडे होता. माझे प्राथमिक शाळेत नाव वामन कृष्णाजी असेच होते.

**'चार पायाचा म्हणे तीन पायास, दो पायाचा कुठं गेला?**
**बत्तीस शिंगाचा हल्या मेला त्यास भाजून खाया गेला.'**

आधी पुष्कळ विचार केला. भूवर्णनाचे पुस्तक आठवले. बत्तीस शिंगाच्या रेड्याची माहिती कुठेच नव्हती. दादाच्या सहावीच्या बुकात गेंड्या बिड्याची चित्रे होती. पण बत्तीस शिंगाचा रेडा जगाच्या कोणत्या भागावर असेल?

आजोबा तागाची दोरी वळत होते. त्यांचे दोन आटे भरेपर्यंत वेळ मिळाला आणि त्यांनी विचारले, "जमतं का रे? थोवाडे पाहा लेकांची! शाळेत जातात बेटे! आणि हा वळीराम जागोबा पण नुसती पुस्तकंच वाचवून घेतो आजकाल असं दिसतं. शिकवीत नाही रांडीचा!"

आजोबा शिव्या द्यायला लागले की, खुशीत आहेत असे आम्ही समजत असू. आम्ही त्यांना उखाण्याची फोड विचारली. त्यांनी चार-दोन आणखी शिव्या दिल्या, माझा लहान भाऊ त्यांच्या जरा जवळ होता. त्याचा त्यांनी गालगुच्चा घेतला (चांगले दिसत असे ते कारटे त्या वेळी !) आणि उखाण्याची फोड केली.

"बेटयांनो, इतके वेळा शेतात येता. आपल्या बापाच्या इतमानाने शेंगा खाता पण कधी खळयात मात्र येत नाही. अरे, एकदा असं झालं, खळयात वाघ आला. रात्रीची वेळ, जेवण रात्र संपत आली होती. आपला गडी कोंडया जागलीला यायचाच होता, वाघाने खळयातली चाहूल घेतली आणि त्याने (तो चार पायांचा) तिव्याला (तीन पायांचा) [ (१) हल्या–हेला, रेडा. (२) खळे–शेतात हिवाळयामध्ये धान्य मळायला, बैल बांधायला, शेताचे सामान, कणसे इत्यादि ठेवायला तयार केलेली जागा. तेथे नोकर जागलीला असतो. प्रत्येक शेतात खळे असतेच. (३) तिवा–एका लांब फळीला तीन उंच उंच पाय लावतात. आणि तसला स्टँड धान्य उडविण्याच्या उपयोगी पडतो. वारा सुटला म्हणजे शेतकरी त्यावर उभा राहतो. धान्य उडवितो. भुसा वेगळा होतो आणि खाली नितळ सोन्यासारख्या धान्याची रास पडते.] विचारले, 'तिव्या, तिव्या, दोन पायांचा (म्हणजे माणूस) कोठे गेला रे? सांग, मी त्याला खायला आलो आहे. मला भूक लागली आहे.'

तिव्याने विचार केला, "कोंडयाला जर वाघोबा गट्ट करील, तर मग माझ्यावर उभे राहून धान्य कोण उडवील? गव्हाचे सोने माझ्या पायापाशी कोण टाकील? गाणे कोण म्हणेल? मला नवतीचे धान्य कसे पाहायला मिळेल? वाघाला परत लावले पाहिजे. पण मला ना हात ना शक्ती! मी कसा वाघोबाला पिटाळू? त्याला शब्दाचीच दहशत घातली पाहिजे."

'तुम्ही ओंब्या पाहिल्या आहेत ना? कारे वांडी (माझ्या धाकटचा भावाचे आजोबांनी ठेवलेले खास नाव) पाहिल्या किनई ओंब्या? त्या ओंब्यांना पुष्कळ शिंगे असतात ना वर डोक्यावर! ती शिंगे तिव्याला आठवली. आणि तिव्याने दिली थाप! 'वाघोबा, वाघोबा, अरे, थांब-तोस काय कोंडचा गेलाय बत्तीस शिंगाचा रेडा भाजून खायला, पळ पळ! तुला तर हंडीतच शिजवील'.

वाघाला वाटले, दोन शिंगाचा रेडा मला कधी कधी दाद देत नाही मग बत्तीस शिंगाचा रेडा कुठे? आणि त्याला भाजून खाणारा कोंडचा, म्हणजे भरलेच दिवस आमचे! वाघ म्हणाला, 'तिव्या सांगू नकोस रे, कोंडचाला मी आलो होतो म्हणून! हा वघ मी पळतो.' वाघ आल्या पावली परत गेला . . .

असा आहे हा उखाणा, समजला? एवढेही सांगता येत नाही बेटचांना ! जा, पळा. दे रे यांना थोडचा शेंगा, भाजून खाऊ दे."

कोंडचा ही गोष्ट ऐकत होता. त्याला वाटले, आजोबांनी वाघाशी आपले नाव जोडले, आपले आजोबा किती छान. त्यांनी जो उखाणा सांगितला त्यात आमच्या खळचाचे नाव, खळचातला तिवा, आम्हाला त्यावेळी सारे खरे वाटले आणि आम्ही त्या तिव्याकडे मोठचा आदर-भावाने पाहू लागलो. आम्हाला हे कळत होते की, तो तिवा लाकडाचा. त्याला कोठे बोलता येणार? पण तरीही का असे झाले कुणास ठाऊक? पण जेव्हा जेव्हा मी शेतात जाई तेव्हा तो तिवा मी नीट पुसत असे. तो वाकडा तिकडा असला तर सरळ करीत असे आणि 'केवढा हा प्रताप याचा की, याने वाघाला पळवले' असे माझे मन म्हणे !

तिव्याचेच काय पण खळचातल्या कणसांच्या ढोल्या, विहिरीजवळ ठेव-लेल्या बैलांच्या पाणी प्यावयाच्या ढोणी, नांगर, वखर सगळचांबद्दल काही ना काही गोष्टी सांगून किंवा उखाणे घालून त्यांनी आमच्या

मनावर असा एक विलक्षण संस्कार करून ठेवला होता की, या वस्तू निर्जीव असल्या तरी मोठ्या प्रतापी आहेत, मोठ्या कनवाळू आहेत, आणि या आसपास असल्या व आम्ही या खळ्यात रात्री एकटे जरी असलो तरी या वस्तू आमचे रक्षण करतील. केवढा धिवसा वाटे !

हा संस्कार चांगला होता की वाईट कोण जाणे, पण पुढे पंधरा वर्षाचा झाल्यावर कधी कधी रात्री जागलीला जावे लागे. त्या वेळी माझ्या मनाला भीतीचा लवलेशही शिवत नसे आणि मी मळ्यावर चांगला डाराडूर झोप घेई.

यच्चयावत सर्व वस्तूंबद्दल सद्भाव निर्माण झाला तर मला वाटते भीती कमी व्हायला व धिवसा वाढायला हरकत नसावी. दोन्ही मानसिक अवस्था आहेत. आम्हाला त्या वेळी फक्त आजोबांचीच भीती वाटे. पण तिचे स्वरूप वेगळे होते. आमच्या मनाची कोणतीही हौस त्यांनी कधी अपुरी ठेवली नाही. त्यांचा मार देखील खाण्याची कधी कधी खरोखरच मनापासून इच्छा होई. कारण त्यानंतर ते आम्हाला पेर-कंडाच्या गाड्या करून देत, आमच्या बरोबर पतंग उडवू लागत. आणि या आनंदाची किंमत फारच अल्प द्यावी लागे, एक दोन रपाटे पाठीत!

वर उद्धृत केलेला उखाणा त्यांचा स्वतःचा खात्रीने नसेल. कारण तो पुष्कळांना ठाऊक होता. पण आम्हाला सांगून, आमच्यात मिसळून, असले वाङमय ते जगवीत व त्यात भर घालीत. कदाचित त्यांची अशीही इच्छा असेल की, आम्ही त्यांच्याकडे आलेला हा लोकवाङमयाचा वारसा नीट संभाळावा व हे साहित्याचे मूलधन जगवावे, पोसावे, वाढवावे !

माझ्या स्वतःच्या प्रत्यंतरास आलेले हे दोन प्रसंग,

"लोकांचे, लोकांसाठी, लोकनिर्मिती यात जे बसते ते लोकसाहित्य" अशा ढोबळ व्याख्येपेक्षाही मला तरी लोकसाहित्याच्या धर्माचा आणि

त्या साहित्याची वारसदारी करणाऱ्या माणसाच्या मनोभूमिकेचा मागोवा घेता आला.

सुटसुटीत चांगल्या भावना, कल्पनांच्या, देवाण घेवाणीच्या या प्रकारात लोकसाहित्याच्या, लोककलेच्या, मूल्यांकनाची काही व्यवस्था समाजात असते काय? मी अर्थशास्त्राचा विद्यार्थी. गरजेची वस्तू निर्माण झाली की, तिच्या किमान मागणीचे सातत्य उपभोक्त्याला जपावे लागते, तरच वस्तूचे उत्पादन होऊ शकते. लोककलेची गरज आणि तिचा विकास यांच्यासाठी समाजात कोणती चाल रूढ होती याचा मागोवा माझ्याच आयुष्यात घडलेल्या पुन: एका घटनेने घेत आहे.

इतके दिवसांनी, येईन येईन करता करता अखेर आज आजोबा माझ्या घरी येऊन दाखल झाले. आम्हाला मनापासून आनंद झाला. म्हाताऱ्या माणसांच्या आगमनाचा आनंद नव्यानेच लग्न झालेल्या जोडप्यांना होत नाही असे दाखविले की, ते जोडपे फार सुखी आहे असे अनुमान काढण्याची लेखकांनी एक नवीन रूढी पाडली आहे. पण तसे आम्हाला काहीच वाटले नाही. त्याला विशेष असे कारणही होते. मी आजोबांचा लहानपणापासूनचा लाडका. शिवाय त्यांच्या सर्व विक्षिप्तपणात सामील व्हायला मी सदाच तयार असे. एकदा ते सायंकाळी शेतातून येत होते. रस्त्यात त्यांना एक वाघरु आडवे आले. त्यांच्या हाती छत्री होती, ती त्यांनी भप्प करून उघडली. वाघरु पळून गेले. तेव्हापासून ते घरातील सर्व मंडळींना बाहेर जाताना छत्री घेऊन जायला सांगत. मी त्यांचीच छत्री या निमित्ताने पळवून भर दुपारी वाघरु शोधायला जात असे. अशा त्यांच्या मनासारख्या केलेल्या कितीतरी गोष्टींनी मी मोठा कर्तबगार पुरुष होऊन त्यांच्या घराण्याचे नाव राखीन असे अनुमान त्यांनी बोलून दाखविले होते. सबब स्वत:च्या पायावर उभे राहून थाटलेला संसार पाहावयास ते आल्याने मला आनंद होणे स्वाभाविक होते.

त्यांची आम्ही स्वतंत्र व्यवस्था लावून दिली. त्यांच्या खोलीत सर्व सुखसोयी करून दिल्या, स्प्रिंगचा लोखंडी नवा पलंग, त्यावर मऊ मोठी नवीन गादी, इ. सर्व अगदी चोख होते. दिवसभर गप्पागोष्टी झाल्या. माझ्या पत्नीचा परकेपणा पार गेला आणि आजोबांची कळी खुलायला कसलाही प्रयत्नही वा प्रत्यवाय राहिला नाही.

पहिला दिवस त्यांनी शहराचा परिचय करून घेण्यात घालविला. सडका वगैरे व्यवस्थित आणि स्वच्छ असल्याने सडकेवर भिंतीशी लघुशंकेला बसतानाही त्यांना संकोच वाटला व तो वारंवार त्यांनी कटाक्षाने बोलून दाखविला.

दुसरे दिवशी ते उठले सकाळी आणि मला एकदम म्हणाले, "तो तुझा पलंग की काय आहे तो फेक रे बाबा माझ्या खोलीतून ! मला तो नको ?"

"का ? किती मऊ आणि हलकं वाटतं त्यावर आजोबा !"

"तुला मऊ वाटत असेल तर तू आपला दोन्ही पलंगांवर झोप. मला नको. लेकाचा तो मला श्वासही घेऊ देत नाही. सारखा ओरडत असतो. कड देखील परतण्याची चोरी होते तिथे ! एकदम ओरडतो. पंधरादा माणूस जागा होतो. ढेकणांचाही इतका त्रास होत नाही माणसाला. फेक बाबा तो !"

आणि त्या दिवशी आमचे पहिले काम म्हणजे त्यांच्या खोलीतून पलंग काढणे हेच झाले !

माझी फिरतीची नोकरी असल्याने मी शेजारच्या खेड्यावर गेलो होतो. त्या दिवशी ते गड्याबरोबर स्वतःच बाजारात गेले त्यांनी शोधून, धुंडून, पत्ता लावून एक खाट विकत आणली. आमचे घर सडकेवरच होते. त्यांनी ती खाट बाहेर ठेवली. अडीच-तीन शेर

नारळाच्या दोरीचा बिंडा व एक नारळ तिच्यावर ठेवून दिला आणि दिवसातील सर्व वेळ ओसरीतील झोपाळ्यावर बसून काढला.

मी सायंकाळी परत आलो, तेव्हा मला त्या खाटेचे प्रयोजन कळले.

" मग काय ! सकाळपासून कुणीच मिळालं नाही खाट विणायला ?"

" नाही. "

" काय रे राम्या ?" मी शिपायाला खडसाविले, "आणलं का नाही कुणाला शोधून ? "

" शोधायचं कशाला रे ? इथल्या लोकांना डोळे नाहीत का ही खाट दिसण्या इतके ? चार-दोन आले होते, पैसे मागत होते रांडीचे ! आणि म्हणे, आमचे इतर काम आटोपून आमच्या सवडीने करून देऊ. बारा आणे द्या म्हणे ! "

" मग ! दिले का नाही आजोबा ? पैशाचं काय ? गरज आपली आहे. त्यांनी फार मागितलेही नाहीत पैसे ! "

" म्हणजे ? खाट विणण्याचे पैसे का द्यावे लागतात तुमच्याकडे ? मग का रे, तुमच्याकडे कोणी सहज येऊन बसलं तर तेही पैसे मागतात का ? आणि का गे येऽऽ पोरी, (तिला उद्देशून) तू याला चांगली शेकून, खरपूस, फुगलेली गरम पोळी करून वाढतेस त्याचेही पैसे मागतेस का याला ? सुग्रण पदार्थ केला की, तूही पैसे देत असशील नाही रे ? अरेच्चा, वदललं वाटतं सारं जग ?"

त्यांची एकंदर दृष्टी माझ्या ध्यानात आली. आणि गेली आठ-दहा वर्षे मी ज्या जगाला विसरलो होतो ते जग माझ्या डोळ्यासमोर उभे राहिले. अखेर मला लहानपणी जशी ओबड धोबड पटाडी खाट विणता येत होती, तशी आठवून आठवून तीन-चार तासात मी त्यांना ती खाट

विणून दिली! पण तेवढ्या अवधीत माझे सबंध बालजीवन व खेड्यातील संस्कारांचे वातावरण, त्यातील रम्य चित्रे, माझ्यासमोर तरळू लागली. त्याच जीवनाचा इथेही प्रत्यय यावा अशी आजोबांची अपेक्षा होती.

त्या वेळचे मला आठवते. आमच्या खेड्यात खाट विणण्याचा असा रिवाज होता की, सुताराने खाट आणून अंगणात ठेवावयाची. सोन-तागाची शंभर हात दोरी विणून तिचे बंडल त्या खाटेवर आपण ठेवून द्यायचे. एक नारळ ठेवायचा. रस्त्याने जो कोणी मनुष्य जाईल त्याने खाट विणता येत असल्यास तिथे थांबावे, कुणाला न पुसता, न विचा-रता खाट विणावी आणि नारळ उचलून चालू लागावे! ओळखीचा असला आणि घरात ललकारी दिली तर दोन पानांचा विडा मिळे, चार-दोन गोड गोष्टी होत. कुणी एखादा चांगला विणणारा पाहण्यात किंवा ऐकण्यात आला असला तर त्याच्या संबंधी दोन स्तुतिपर शब्द बोलले जात. तो कलावंत तरुण असला तर त्याची कला वाढावी म्हणून सद्भाव प्रदर्शन आणि निरोप. तो अनुपस्थित कलावंत जिथे कुठे असेल तिथे त्याच्या कानी हे शब्द वाऱ्याच्या वाहनावर बसून जातील ही श्रद्धा! नाही तरी कलेचा निर्माता अज्ञात अशा भूमिभागावरील परोक्ष स्तुतीचीच वांछा करीत आलेला आहे. पैशाने त्याची हौस पुरली नाही. वैभवाने त्याचे मन निवले नाही. कधी तरी कुणी तरी मी जे निर्माण केले आहे ते पाहील, वाचील, शुभ उद्गार काढील आणि त्याने माझे तृप्त मन शांत होईल. भोळ्या समजुतीने बोलावयाचे तर असे किती तरी कलावंत आकाशात तारे होऊन चमचमत असतील! असल्या धन्योद्गारांनी निवून आपल्या अंतःकरणाची शीतल सुषमा पसरवीत असतील!

खाट विणून मिळालेला नारळ आणि मनाच्या सद्भावांनी दिलेला विडा याची किंमत आजच्या जगाने मोजली तर ती दोन-तीन आण्यां-पेक्षा जास्त भरणार नाही. आणि एवढ्या पैशाच्या तुकड्यात कुणी

भला शब्द उच्चारलेला आढळणार पण नाही. 'मी याला पैसे दिले, याने माझे काम केले' अशी भाषा वापरली जाणार असेल तर किती कलावंत कलेचा हव्यास लावून घेतील कुणास ठाऊक ? आणि जीवनाचा सर्वच आनद पैशांनी मोजता आला तर मग ? . . .

तर मग माझ्या बाळपणी त्या खेड्यात आमच्या शेजारी राहात असलेल्या सगुणेला आम्ही किती पैसे द्यावे ? तिने अनेकदा आमच्या हृदयाचे रांजण भरले. त्याच्या मोबदल्यात रांजण भरून जरी पैसे दिले तरी ती ऐकायची नाही. आज ती कुठे असेल कुणास ठाऊक ! यावेळी काय करीत असेल अशी मनाला जरी तळमळ लावून घेतली तरी आजच्या सर्व सुधारलेल्या साधनांनी माझी जिज्ञासा निर्वेधपणे पुरी होण्याचा संभव नाही. पण त्या वेळी ? . . .

कुंडीतून जपून वाढविलेले कर्दळीचे झाड, उंच वांध्याचे हिरव्या लांब पानांनी आकाशाकडे उजळ माथ्याने पाहणारे, जीवनरस शेंड्यांना येऊन वाऱ्याच्या स्पर्शाने लहरीला आला असलेला, अशी सगुणा बाहेर यायची. सकाळी अंगणी वासरू हंबरते, पोपट साद घालतो तशी ती येऊन आईला हाक मारायची. आमचे अंगण सडा घालून स्वच्छ केलेले असायचे व मध्यभागी रांगोळीचे डावले ठेवून आई इतर कामाला लागलेली असायची. आणि तांदूळ पसरले की, चिमण्या येतात तशी सगुणा तिथे येऊन गुणगुणत प्रसन्न मनाने आपल्या नाजुकशा चिमटीत रांगोळी घेऊन रेघ काढायची. रोज एक नवीन रांगोळी, रोज नवीन कलाकुसर. कोण तिला सांगत होते हे सारे ? कशासाठी करीत होती ती हे सर्व ? आणि आजूबाजूच्या पंचवीस घरातील वायकांना देखील सगुणाच्या चिमटीसारखी रेघही जेव्हा सरळ काढता येत नसे त्यावेळी ती लहानशी चिटुकली पोर. . . .अहाहा ! काय पण थाट तिचा ? डोळे कसे टपोर मोत्यांचे पाणी घेऊन आलेले ! मुखावर तृप्तीची कांती आणि ज्या जगाने आजवर आपली स्तुती केली, त्याबद्दल कृतज्ञता ! . . . अशी

भरलेली नजर ती सहज कुणाकडेही लावत असे...आज ते सगळे आठवते व मन हुरहुरते ! ...

कधी आठवणी मनात खुपतात पण ती खुपरीही सुखद वाटते. विचार करतो आहे की, इथे सत्यकथन करीत असताही तिचे नाव सांगावे की नाही ? कारण त्याची किंमत कुणाला कशी चुकवावी लागेल याचा आजच्या जगात नेम राहिलेला नाही. हे जग श्रावणाच्या रात्री सारखे, आप्त स्वकीयांनी आपल्या प्रिय माणसाजवळ असावे अशी ओढ लावणारे. एक विश्वकुटुंब असते तर ह्या श्रावण रात्रीच्या गोष्टीही जशाच्या तशा सांगायला संकोच वाटला नसता. सगुणाचे ठीक आहे. ती लहान होती, सुंदर रांगोळ्या व रंगीबेरंगी फुलांचे जोडे गुंफून कलेची साधना करीत होती आणि तिचे लग्न तिच्याजोग्या एखाद्या हुषार मुलाशी व्हावे म्हणून आम्ही सर्वच सारख्या जिव्हाळ्याने काळजी करू शकत होतो. पण तिच्या नावाचा उच्चार ! ... जिच्या बरोबर श्रावणाच्या रात्रीच्या रात्री नुसत्या झोपाळ्यांवर ... आकाश पाळण्यावर झुलण्यात घालविल्या ! ...

स्त्रियांच्या श्रावण जागणीच्या रात्री ! कुठे मंगळागौर, कुठे काजळतीज, कुठे डोहाळ दिवस. हौसेला, इच्छेला, आकांक्षेला ओढ्यासारखा पूर आलेला. आसमंती सर्वच हिरवे तृणांकुर ! मनात नव्या भावना अंकुरित झालेल्या, जुन्या नव्या झालेल्या, वहराला आलेल्या, चांदण्या सारख्या लुकलुक करणाऱ्या ! जमिनीवर वस्तीच करावीशी वाटत नाही त्या वेळी घरे अपुरी ठेंगणी वाटतात. श्रावणांच्या ढगांची उशी करून झोपावेसे वाटते. साधी संगीताची तान कुणी छेडली तरी बाहेर यावेसे वाटते. अशा वेळी गावचे कलावंत पुढे सरसावतात. उंच उंच पाळणे झाडाच्या फांद्यांना बांधून त्यांचे दोर फुलमाळांनी सजवायचे. एखाद दुसरी चार पावले टेकू शकतील अशी पाटी आधाराला घ्यायची, तिच्यावरही गावच्या सुताराने आपली कुसर चार-दोन रेघांनी चित्रित

केलेली असायची. आणि मग अशा पाळण्याचे ते दोर चार हातांनी धरायचे आणि आपल्या गतीने झोपाळ्याला गती देऊन, उंच अंतराळी इतके उंच की चार मैलांवरचे गाव दिसले पाहिजे! शेजारच्या गावातील दीपमालेचा दिवा दिसला पाहिजे! आबाल वृद्धांनी आपली वये विसरायची! कोण स्त्री ?... कोण पुरुष ?...

अशा प्रफुल्ल रात्रीच्या त्या आठवणी दोन हातातील बांगडया विलवरांची किणकिण, झोपाळ्याच्या उंच खाली होण्याने वर खाली होणाऱ्या हृदय फुलांच्या पाकळ्या! अशा हालत, अशा बोलत, अशा मान टाकून आधाराला येत! एकदा उंच जायचे, आपल्या गतीने खाली यायचे, धरतीच्या स्वभावाने! पळभरच! आणि डोळ्यांनी पाहायला जग नुरे! विचार करायला तर्क नुरे! सगळ्या मनाच्या पक्षाच्या भराऱ्या, पंखांची फडफड आणि असा सोसाटा! सर्व निमून जायचे!

यापेक्षा आणखी स्पष्ट रीतीने ही आठवण शब्दित तरी कशी करायची? चंद्राची शीतल सांद्र सुषमा, शुक्राच्या चांदणीचा गार गार शिडकावा, चिमणीची नाजुक चिवचिव, चंडोलाचे हृद्‌बोल हे जितके मुठीत गवसता येतील तितपत या स्मृती शब्दित करावयाच्या आणि तितपतच ती स्मृती धुक्यासारखी मनी तरळू द्यायची. ती जे काही बोलली असेल, जशी काय हरवली असेल, ज्या दृष्टीने तिने पाहिले असेल, ते बोल, तो हरीख, ती दृष्टी, आपल्या मनीच साठवायची. अगदी गुपचूप! न सांगता, न बोलता!

रात्रीचे दोन वाजले होते. झोके घेऊन गात्रे शिणली होती. अशा वेळी आळसावल्या मनाने तिने केलेली...

**'माळिणीचा माळी, माळी गेला पुण्या**
**केळीला आल्या फण्या'...**

या ओवीची आठवण ! त्या वेळी जो जीव कालवला, जसे मन खळखळले, जो अनुभव, कुणास ठाऊक कधी पुसला जाईल तो, आणि आज किती किंमत देऊन ती सबंध जीवनकला सर्वांनी झोपाळे वांधण्याची, सर्वांनी झोके घेण्याची, मनाचे धागेदोरे गुंफण्याची कला–साध्य करता येईल ती ! आज तर श्रावणाच्या रात्री दोन वाजता या समोरच्या घड्याळाचा काटा मनावर ठाण् ठाण् करून घाव घालतो आणि यंत्राची ठक् ठक् सुरू असते !

त्या जगाने कोणत्या रीतीने लोककलांची जोपासना केली होती कुणास ठाऊक ! पण त्या वेळी सर्व कला फुलत, फळत आणि त्याचा सर्व समाजाला उपयोग होई. जे जे आपल्याला जमले, नित्य कर्मातून विशेष अवगत झाले, ते ते आपल्यासाठी नाही, सर्वांसाठी आहे. आपण एकट्यानेच ते उपयोजिले 'तर' कदाचित ते साचलेल्या पाण्यासारखे तुंबेल आणि नाश पावेल, ही विलक्षण श्रद्धा त्या जगाने टिकविली होती. साधी पत्रावळीची गोष्ट जरी घेतली तरी मोहा-पळसाची हिरवी पाने ओसरीवर ठेवली जात आणि जो जो जोडण्याची कला जाणत असे तो तो एरव्ही रुतणाऱ्या चोयट्या घेऊन पाने सांधीत असे. पानाला पान जोडून असा घाट बनवी, असा आकार आणि, चोयट्यांची रांगोळी अशी खुलवी की जेवणाऱ्याने दोन घास जास्त खावेत आणि जोडणाऱ्याच्या कलेची स्तुती करावी.

तसाच साप चावण्याचा तो रोमान्स ! मंत्रातंत्रांनी सापाचे विष उतरत नाही हे खरे आहे, पण आमच्या गावी अशी श्रद्धा होती की, ज्याला म्हणून सापाचा मंत्र येत असेल त्याच्या मंत्राने विष उतरलेच पाहिजे ! साप चावला असेल त्या घरच्या मंडळींनी 'पान लागले,' 'पान लागले' असा हाकारा द्यावा. ज्या मांत्रिकाला हाकारा ऐकू जाईल त्याने हातचा घास टाकून उठलेच पाहिजे, असेल त्या स्थितीत धावलेच पाहिजे ! पंचवीस, पंचवीस मांत्रिक जमत. त्यांच्या मंत्राच्या घोषाने,

एकसंघ शब्दांनी सर्व वातावरण दुमदुमून जाई. जो मांत्रिक त्यावेळी तिथे धावणार नाही त्याचा मंत्र नि:सत्त्व व्हायचा! अशी कल्पना, अशी श्रद्धा! त्यामुळे, ही विनामूल्य धडपड, धावपळ, समाज जीवनात आपल्या कलेची साखर घालून ते मधुर करण्याचा प्रयत्न! जाईला जेवढी फुले येतील तेवढी तिने स्वत:साठीच ठेवता कामा नये. वसंताचे आगमन झाले की, कोकिळाने आपली कला माधुरी ओतूनच द्यायला हवी. आकाशात ढग भरून आले की, मयूर राजाने आपला पिसारा पसरून हजारो डोळ्यांनी आपल्या मनीचा आनंद व्यक्त करीत साद दिली पाहिजे. सगुणेला रांगोळी काढता येते मग ती तिने काढलीच पाहिजे! मग गोमय संमार्जित अंगण कुणाचेही असो. मला अमुक एक कला येत आहे तिचा मी उपयोग केलाच पाहिजे, मग तो कुणा कारणाने असो...त्याचा मोबदला जो काय मिळेल तो खण् खण् ऐकू येणार नाही हे खरे, पण तो जाणवत असे, आणि तो असा जाणवायचा की, जणू चंद्रोदयापूर्वी शीतल वायुलहरी सर्व तप्तांना शांत करणारी उदासीन असलेल्यांच्या मुखावर हास्य फुलविणारी!

त्या जगात दिवसभर कुणाच्या खाटेचा सांगाडा अभद्रपणे दारी कधी पडून राहिला नाही. कुणाचे नितळ अंगण रांगोळीच्या कुंकवावाचून भोंडे अभद्र राहिले नाही.

आणि आज कुणाचे घर पेटत जरी असेल तरी लोक जे जागचे हालतात त्यात तमासगीर किंवा अन्योद्देशीच जास्त! कुणाचे घरी मृत्यूची स्वारी झाली तरी पैशाशिवाय पान उचलीत नाहीत!

म्हणूनच आमच्या आजोबांना भीती पडली आहे की, त्यांच्या सूनबाईला त्यांनी जर त्यांच्या दातांनी चावेल अशी मऊ, लुसलुसीत ताजी पोळी करून मागितली तर ती त्यांना पैसेच मागेल व त्यांच्या गळी मग एक घासही उतरायचा नाही!

तो माळी कुठे गेला कुणास ठाऊक, माळीण मात्र केळीच्या फण्या तोडून त्याची सारखी वाट पाहत आहे. तो आज येईल...आता येईल... उद्या येईल ! . . .

लोकसाहित्याच्या निर्मितीची, त्याच्या वारसदारीची आणि त्याच्या संवर्धन जोपासण्याची कळा ही अशी ! मी माझ्या परीने ती सांगितली. कुणाचे काही वाचल्यानंतर सांगितली असे मुतराम नाही. मी असाच वाढलो, असाच जगलो. जगता जगता जे कळले तेच मी शब्दात मांडले. 'कळणे' हा शब्द मोठा मजेदार आहे. त्यात २/३ कळ असते. ती कळ सोसण्याची तयारी असली तर जगणे, जोपासणे कळते, उमजते, सुखी वाटते ! ...

# एक अमोल ठेवा

*सौ. अनसूया लिमये*

**मंजुळ ओवीने भारावून टाकले–**

लोकसाहित्याकडे माझं प्रथम लक्ष गेलं ते शालेय जीवनातच. पहाटेच्या वेळी लहान गावातून फिरायला बाहेर पडलं म्हणजे जात्यावर गाईली जाणारी मंजुळ ओवीगीते ऐकू यायची. त्यांची चाल, सूर, आवर्तनं– मध्येच "बाई ग", "सखे ग", अशा शब्दांनी जमवून घेतलेला छंद हे सर्व ऐकलं म्हणजे कान तिकडे लागायचे. मन प्रसन्न व्हायचं. क्षणभर रस्त्यातच थांबून ते सूर ऐकत राहावे असं वाटायचं. आणि मग थोडा वेळ थांबून ऐकू लागले की, त्या गीतातील सुंदर आशयदेखील हृदयाला स्पर्श करून जायचा. अनेकदा ओव्यांमधील उपमा अलंकार इतके लोभस वाटत की, या ओव्या रचणारी आणि गाणारी स्त्री ही एखाद्या खेड्यामधील निरक्षर, अशिक्षित स्त्री असेल यावर विश्वासच बसू नये! ..

**बया बया म्हणू किती  बया साखरेचं पोतं**
**येता जाताना लुटलं  नाही होईना ग रीतं**

 रांगडं जीवन जगणाऱ्या स्त्रीनं आईच्या प्रेमाला साखरेच्या पोत्याची

उपमा दिली. पण साखरेचं पोतं केव्हा तरी रिकामं होतंच. आईची माया मात्र इतकी अगाध की, कितीही लुटा ती संपतच नाही !

**पिता माझा वड        बया माझी करवंद**
**काशीला ग जाते        वाट दोन्ही झाडांच्या मधून**

पित्याला विशाल छाया देणाऱ्या वटवृक्षाची उपमा, तर आईला गोड दुधाळ फळं देणाऱ्या करवंदाच्या झाडाची उपमा! किती सार्थ! एखाद्या साहित्यिकालाही लाजवील अशी ही उपमा.

या भावनोत्कट ओव्यांबरोबर क्वचित एखादी निरागस पण खटचाळ विनोदाची ओवी देखील कानावर पडायची.

**चंचाळ नारीची        हिची नजर चळली**
**माझ्या बंधूला देखून        डाळ दुधात वैरीली**

आणि कधीतरी सीतेच्या वनवासाची कथा ऐकून व्यथित झालेली स्त्री गात असे –

**सीता ग वनवासी        दगडाची केली उशी**
**येवढ्या वनामधी        बाई झोप आली कशी**

म्हणजे उपमा अलंकारांबरोबर भक्तीरस, हास्यरस, शोकरस हे साहित्यातील गुण देखील या ओव्यांमधून आढळून येत.

ओवीगीते ऐकण्याची संधी आली म्हणजे खरोखरच मी भारावून जात असे.

**फेरावरचं चऱ्हाट–**

श्रावण महिना आला म्हणजे खेळा बागडायला आसुसलेल्या लेकीसुनांना अगदी पर्वणीच वाटते. पुण्याला नव्या पेठेतून हिंडतांना नागपंचमीच्या

आधी पंधरा दिवसांपासून मराठमोळ्या स्त्रियांचे फेर रस्त्यात, वस्तीत, रात्री सुरू होत. पंचमीच्या सणाला लेकी माहेरी आलेल्या. सुना कधी नव्हेसं बाहेर पडून खेळायला मिळते म्हणून आनंदलेल्या. पण त्यांची ती गाण्यांची लांबड, तेच तेच शब्द पुन्हा पुन्हा गायलेले ऐकून मला वाटे "काय हे चऱ्हाट लावलंय ? सारखं तेच तेच!"

बाळाईचा भाऊ मुळारी जातो आणि तिला माहेरी आणतो तेव्हा–

**एक वन वलांडिलं दुसऱ्या वनाला लागली**
**दुसरं वन वलांडिलं तिसऱ्या वनाला लागली. . .**

अशी पाच वनं ओलांडण्यापर्यंत जायचं आणि मग पुन्हा जे शब्द बाळाई आपल्या आईला बोलते, तेच भावाला, बापाला, बहिणीला... पुन्हा चऱ्हाट सुरू ! . . .

**अग अग माझे आई अग अग माझे आई**
**मला नेसायला काही मला नेसायला काही. . .**

तेच सूर आणि तेच शब्द. कंटाळा कसा येत नाही या बायांना ? पण त्या साऱ्याजणी तरुण, मोठ्या, सगळ्याचजणी फेरात आणि गाण्यात अगदी तल्लीन होऊन जात. काळवेळाचं देखील त्यांना भान राहात नसे. जणू वर्षाचं कोंडलेलं जीवन दूर सारून आता त्या मुक्तपणे आनंद उपभोगत होत्या. मला त्यांचं हसू येई आणि कीवही येई.

**समाजाशी समरस झाले आणि लोकसाहित्याचं महत्त्व समजलं–**

पण समाजाशी मी अधिकाधिक समरस होऊ लागले ती माझ्या कॉलेजच्या जीवनात. इंग्रजी ऑनर्स घेऊन बी. ए. झाले. पण मग ओढ लागली समाजकार्याची. गांधीजींनी राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी तरुणांना, महिलांना, दिलेली हाक कानात घुमू लागली. एम.ए.साठी समाजशास्त्र

 विषय घ्यायचा म्हणून मी मुंबईला गेले. मुंबईचा खर्च भागवायला

3202
2/5/86

पाहिजे म्हणून नोकरी धरली. योगायोगाने मला लेबर ऑफिसमध्ये लेडी इन्व्हेस्टीगेटरची नोकरी मिळाली. त्यावेळी काँग्रेसचे मंत्रीमंडळ होते म्हणून मीही सरकारी नोकरी स्वीकारली. माझ्या अगोदरपासून त्या कामात आणखी दोन स्त्रिया होत्या. कामगारांच्या जीवनाच्या विविध पहाण्या आम्हाला कराव्या लागत असत. त्या निमित्ताने कामगारांचे जीवन मला जवळून पहायला मिळाले. ही नोकरी लक्षात घेऊन मला मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापक डॉ. धुर्ये यांनी माझ्या प्रबंधाला "मुंबई कामगारांची जनन समस्या" हा विषय घ्यायला सांगितला. मला असा अर्थशास्त्रीय विषय नको होता. पण शेवटी त्यांच्या आग्रहामुळे व कामगार जीवनाचा अभ्यास होईल म्हणून मी तो पत्करला. एक हजार कुटुंबांची सामाजिक-आर्थिक पहाणी मला करायची होती. नोकरीच्या पहाणीबरोबर हेही काम सुरू केले.

पण याच काळात दुर्गाताई भागवतांच्या सहवासामुळे मला लोकसाहित्याची गोडी निर्माण झाली. समाजशास्त्राची पुस्तकं वाचताना, प्रत्यक्ष जीवनाचा अभ्यास करताना, लोकसाहित्याचं समाजजीवनातील स्थान मला समजू लागले आणि कामगारांच्या चाळी-चाळीतून हिंडताना हेही एक काम सुरू झाले. किंबहुना अर्थशास्त्रीय विषयापेक्षा या कामात मला अधिक रस वाटू लागला. मी कामगार स्त्रियांकडून ओव्या, फेराची गाणी, लग्नाची गाणी, गोष्टी जमा करू लागले. मुंबईत राहणारा, औद्योगिक क्षेत्रात काम करणारा, कामगार त्याच्या जवळ लोकसाहित्य कुठलं असणार? असा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण होईल. पण हे कामगार कुटुंब मुंबईत येऊन काम करीत असलं तरी ते महाराष्ट्राच्या कुठल्या ना कुठल्या भागातून आलेलं होतं. त्या कामगारांचे मुंबईतील जीवन गिरण्यातील यंत्राशी बांधलं गेलेलं असलं तरी त्यांची पार्श्वभूमी, त्यांची संस्कृती, ही कुठल्या तरी ग्रामीण भागातून आलेली होती. ती त्यांच्या जीवनात खोल रूजून गेलेली होती. ज्या ठिकाणी

तो पूर्वी राहात होता त्या ठिकाणी त्याची थोडीफार जमीन होती. त्याचे आईवडील किंवा कदाचित बायकोदेखील त्या जमिनीवर बांधलेल्या झोपडीत रहात होती. तो कामगार वर्षातून एकदा रजा घेऊन आपल्या गावी येऊन राहायचा. जुना ऋणानुबंध कायम ठेवायचा.

मी घरोघर जाऊन स्त्री पुरुषांना विचारीत असे, "तुम्हाला तुमची खेड्यातील जुनी गाणी येतात का? ओव्या, लग्नातील गाणी, फेरातील गाणी?" पहिल्यांदा उत्तर मिळे, "आता आम्हाला काय आठवणार ताई?" पण मग गप्पा मारीत त्यांना बोलतं केलं म्हणजे एखाद्या ठिकाणी बाई गाणी सांगू लागे. मी ती उतरवून घेत असे. गेल्या दोन तीनशे वर्षातील गीते, कथा हे लोकवाङमय स्त्रियांकडून अधिक मिळते. कारण पुरुष लवकर अक्षरवाङमयाकडे वळला, स्त्री मात्र निरक्षरच राहिली! आपली पारंपारिक संस्कृती जपत राहिली. मग कुणीतरी म्हणे, "ताई, ते जात्यावर बसलं तरच सुचतं बघा." त्या असं म्हणाल्या की, मी त्यांना जात्यावर दळायला बसायला सांगे. त्याकाळात युद्ध परिस्थिती होती. कामगारांचे अनेक गिरण्यांतून संप चालू होते. महागाई वाढत होती. विशेषतः मागासवर्गात, हरिजन समाजात, वाढते दारिद्रच दिसून येत होते. मग मी पुष्कळदा दोन तीन शेर ज्वारी घेऊन जाई. पुष्कळ घरातून जाती होती. मग जात्यावर दळायला बसून एखादी स्त्री गाणी सांगू लागली की, ती रंगात येई व मग माझे पण काम होई. एखाद्या स्त्रीजवळ तर सात-आठ दिवस सांगता येईल इतका गाण्यांचा साठा असायचा. चारपाच महिन्यात मी अक्षरशः हजारो गाणी व ओव्या जमा केल्या. प्रथम काही विशिष्ट शब्दांचा अर्थ, संकलपना माझ्या लक्षात येत नसे. विचारले की, प्रथम मान वेळावणं, हसणं चाले आणि मग कुणीतरी बाई अर्थ समजावून सांगे. मध्येच आमची बदली सुरतेला झाली आणि माझं काम खंडित झालं.

याच काळात मी मुंबई विद्यापीठाच्या जर्नलमध्ये " महाराष्ट्रातील जात्यावरील ओव्या " या विषयावर इंग्रजीत दोन लेख लिहिले. जर्नल इंग्रजीत निघे. त्यामुळे ओव्यांचेही मला भाषांतर करावे लागे.

नंतर मी पुण्यास आले. टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशनमधून बी. टी. झाले व त्याच कॉलेजमध्ये असिस्टंट लेक्चरर म्हणून कामाला लागले. १९४१ ते १९४६ या वर्षात महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या त्रैमासिकात " महाराष्ट्रातील जानपद ओवी " या विषयावर माझे ६–७ लेख प्रसिद्ध झाले. याबाबत श्री. के. नारायण काळे यांनी मला प्रोत्साहन दिले.

**स्वातंत्र्य आंदोलनाने जीवनाची दिशाच बदलली–**

१९४२ ला ८ ऑगस्टचा 'चले जाव' ठराव पास झाला तेव्हा माझ्या कॉलेजमधील नोकरीला दोनच महिने झाले होते. पण माझे मन आता राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनाकडे झेप घेत होते. म्हणून मी दहा ऑगस्टला नोकरीचा राजीनामा देऊन स्वातंत्र्य आंदोलनात उडी घेतली. वर्षभर कारावासही भोगला. आणि बाहेर आल्यावर राष्ट्र सेवादलाची सर्व-वेळ स्वयंसेवक म्हणून कामाला लागले. त्याकाळात राष्ट्र सेवादलाच्या शाखा गावोगावी उत्स्फूर्तपणे सुरू झाल्या होत्या, फोफावत होत्या. महाराष्ट्राची स्त्री संघटक म्हणून मला सर्व जिल्ह्यातून हिंडावे लागे. खेडयापाडयांतून हिंडताना सेवादलाचे काम संपवून वेळ झाली म्हणजे मी लोकसाहित्य गोळा करण्याचे काम चालू ठेवी. पण आता या कामाला क्वचितच वेळ मिळे. स्वातंत्र्य आंदोलनामुळे माझे प्रबंधाचे काम अर्धवट राहिले तसेच माझे लोकसाहित्याच्या संशोधनाचे कामही मागे पडले. पण त्याचा संपर्क अजिबात तुटला असे कधीच झाले नाही.

**लोकसाहित्यावरील वाङमयाचा अभ्यास–**

मी तुरुंगात जाण्यापूर्वीच साने गुरुजींचे 'स्त्री जीवन' हे पुस्तक प्रकाशित झाले होते. त्यामध्ये गुरुजींनी त्यांच्या कुटुंबातील व परिसरातील स्त्रियांकडून मिळालेली गीते प्रसिद्ध केली होती. हे वाङमय

बरेचसे वरच्या वर्गातील स्त्रियांकडून मिळालेले होते. त्यावर गुरुजींचा साहित्यिक हात फिरला होता. संशोधनापेक्षा साहित्य म्हणूनच त्या पुस्तकाकडे पहाणे अधिक योग्य होते.

दुर्गाताई भागवत यांनीही या क्षेत्रात जोमाने कार्य चालू केले होते. त्यांचेशी माझी चर्चा वारंवार होई. त्यांचे मार्गदर्शन मिळे. त्या मला पुष्कळ लिहायला सांगत. पण माझा इतर व्याप वाढत होता. त्यांचे 'लोक-साहित्याची रूपरेषा' हे पुस्तक मी अभ्यासले. डॉ. कमलाबाई देशपांडे, चिं. ग. कर्वे, डॉ. सरोजिनी बाबर, श्रीमती मालती दांडेकर अशा अनेक स्त्रिया या क्षेत्रात संकलनाचे काम करीत होत्या. डॉ. बाबर संकलना-बरोबरच मूळ चालीमध्ये उत्तमप्रकारे त्या ओव्या गाऊनपण दाखवीत.

महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या राज्य लोकसाहित्य समितीवरही मी एक सभासद म्हणून काही वर्षे काम केले. त्या काळात तीन प्रकाशने निघाली. त्यातही लेख लिहिले.

याच सुमारास लोकसाहित्याचे महत्त्व विचारवंतांना व साहित्यिकांना समजू लागले. परकीय मिशनऱ्यांनी प्रथम पुढे आणलेल्या या विषयावरील अभ्यास वाढत होता. महाराष्ट्र साहित्य परिषद, इतिहास संशोधन मंडळ, इ. संस्थांनी पुष्कळ वाङमय प्रकाशित केले. मौज, सत्यकथा, साधना या नियतकालिकांतूनही बरेचसे लेख प्रकाशित झाले. माझेही लेख त्यामध्ये होते.

माझ्या राजकीय सामाजिक जीवनात कधीकधी अधिक संकलनाची किंवा अभ्यासाची संधी मला मिळाली. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात गुजराथी समाजावर आमचा राग नाही हे व्यक्त करण्याकरिता त्यांच्या महागुजराथ आंदोलनातही आपला वाटा उचलावा म्हणून एस. एम्. जोशींच्या सांगण्याप्रमाणे मी एक स्त्रियांची तुकडी घेऊन अहमदाबादला
 महागुजराथचा सत्याग्रह केला. मला पावणेदोन महिने साबरमती

तुरुंगात रहावे लागले. गरबा नृत्य करण्यात आणि गाणी म्हणण्यात आमच्यापेक्षा गुजराथी स्त्रिया अधिक कुशल व उत्साही होत्या. तुरुंगात नृत्य आणि गाणी चालत. आम्ही मराठी स्त्रियापण त्यांचेबरोबर गरबा खेळू लागलो. त्यांच्या लोकवाङ्मयाची काही गाणी मी ऐकली व लिहूनही घेतली. मराठी लोकवाङ्मयातील संकल्पनांशी अगदी मिळती जुळती अशीच ती गाणी मला आढळली. एका गीताची कथा मला आठवते. खेडयात दुष्काळ पडला व विहिरीला पाणी नाही. लोक हवालदिल झाले. मग पूर्वीच्या श्रद्धांप्रमाणे कुणालातरी बळी दिला पाहिजे असा विचार साऱ्यांनी केला. पाटलाच्या घरी पुरुष कारभारी सर्व कामात दंग. मग कोणती सून बळी द्यायची? 'मोठी सून तर घरदाराची लक्ष्मी', 'मधली सून लेकूरवाळी' म्हणून नव्या धाकटया सुनेला बळी द्यायचे ठरले. ती विहिरीत उभी राहते. मग वर्णन...तिच्या घोटयाला पाणी लागले . . . तिच्या गुडघ्याला पाणी लागले . . . कमरेपर्यंत पाणी वर आले . . . खांद्यापर्यंत . . . मग ती पूर्ण बुडाली . . . मग गावाला पाणी मिळाले. पाण्यासाठी बळी देण्याची गीतातील हीच कल्पना मराठी लोकवाङ्मयातही मला समान अशी आढळली!

**पुणे विद्यापीठाची बहि:शाल व्याख्याने–**

पुणे विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण मंडळात एक व्याख्याती म्हणून मी गेली तीस वर्षे काम करीत आहे. माझ्या विषयात एक विषय "मराठी लोकगीते" हा आहे. या विषयावर व्याख्याने देण्यास आतापर्यंत मी अनेक गावी जाऊन आले. काही गावांमधून मुक्काम करून अधिक साहित्यही जमा केले. धुळयातील ट्रेनिंग कॉलेजचे विद्यार्थीही मोठया संख्येने व्याख्यानाला जमतात. त्यांनी आपापल्या गावी असे काम करावे अशी मी सूचना केली व त्यांनीही ती मानली. रायगड जिल्ह्यातील स्त्रियांनी मला पुष्कळ बायांची गाणी मिळवून दिली.

**आदिवासीही मागे नाहीत–**

माझ्या सार्वजनिक कामाच्या क्षेत्रात मला वेळ मिळाला तर लोकसाहित्याचा सांधा जरूर जमू शकतो. गरीब, मागास, समाजातच माझे काम अधिक. इथे या संकलनाचे कामही अधिक महत्त्वाचे असे मला वाटते. माझे बरेचसे संकलन अधिकतर मागासलेल्या चांभार, महार, मांग या समाजातील स्त्रियांकडून मिळालेले आहे. काही वर्षांपूर्वी नेरळला कोतवालवाडी ट्रस्टतर्फे चालणाऱ्या कामाशी संपर्क आला. कातकरी समाजाच्या एका सणाला रात्री गावोगावचे आदिवासी एकत्र जमत. रात्रभर त्यांचे नृत्य, गाणी, कथा, सवालजबाव हे कार्यक्रम चालत. एका वर्षी संपूर्ण रात्र मी त्यांच्या कार्यक्रमाला जागले. निरक्षर असलेल्या व इतर समाजापासून दूर राहिलेल्या या आदिवासी लोकांच्यामध्ये काही प्रतिभावान असे आहेत की, पौराणिक कथावाङ्मयातील कितीतरी गोष्टी श्राव्य रूपाने चालत आलेल्या त्यांच्या तोंडपाठ आहेत. 'महाभारताच्या अमुक श्लोकात कुणाचा उल्लेख आहे', 'अश्वमेध यज्ञासाठी सोडलेल्या घोड्याच्या मस्तकावर कोणता रंगाचा मणी होता' असे प्रश्न सवालजबाबच्या कार्यक्रमात ते विचारीत.

आजही ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यात प्रामुख्याने मल्हार कोळी समाजात काम करताना त्यांची नृत्ये, गाणी, शेणाने सारवलेल्या कुडाच्या भिंतीवर तांदुळाच्या भिजलेल्या पिठाने चितारलेली रांगोळी 'चौक' या गोष्टी मी जवळून पहाते आहे. ते डोंगर कुशीतल्या, निसर्गाशी एकरूप असलेल्या या समाजात कलेची अभिरूची किती आहे याचे प्रत्यंतर मला मिळते आहे.

**लोकसाहित्यातील भावविश्व, वर्णनशैली व शब्दसमृद्धी–**

ओवी वाङ्मयातील उपमा अलंकाराने मी स्तंभित झाले. तसंच त्यातील भावविश्व पाहून मला फार आनंद वाटला. प्रतिभा ही गोष्ट शिक्षण घेतल्यानंतरच माणसाला मिळते असे नाही. प्रतिभा ही

जन्मजात, जातीवंत देणगी आहे. ज्याला ती मिळते तो किंवा ती शिकली नाही तरी त्यांच्या जीवनात तिचे दर्शन घडते, शिक्षणाने झिलई मिळते व शास्त्रीय पंडित वाङ्मयात ती बसवता येते इतकेच.

**आंब्याचा आमरस तळहाता माझ्या रस**
**पाठीच्या माझ्या बंधु माया उगच लावलीस**

ही ओवी गाते आहे सासरी गेलेली बहीण. आमरस खाताना भावाला तो फार आवडतो म्हणून त्याची आठवण होऊन तो बहिणीला खाववत नाही !

**धनसंपत्तीला कुणी पुसंना मालाला**
**किती महिने झाले तुझ्या कडेच्या लालाला**

या गीतातून कुठल्याही मौल्यवान संपत्तीपेक्षा पोटच्या लेकराची ओढ किती मोठी आहे हे ती स्त्री अतीशय सुंदररीत्या सूचित करते.

**मायलेकींचं गुज गुज बोलाया झाली रात**
**मावळाया गेली चांदणी सोप्या आड**

माहेरी आलेली मुलगी आपल्या आईला आपलं साठलेलं सुख दुःख रात्री निवांतपणे सांगायला सुरुवात करते ते पहाट होईपर्यंत ! म्हणजे चांदणी मावळेपर्यंत ते चालू राहते. हे सर्व पूर्वीचं माणुसकीचं, भावनांचं, विश्व पाहिलं की, मनात येतं आज हे सारं कुठं गेलं ?

फेरावरील गाण्यातून भावविश्व किंवा उपमा अलंकार दिसले नाहीत तरी मला त्यातली वर्णनशैली, शब्दसामुग्री, कथात्मकता, या गोष्टी दिसल्या तेव्हा त्यांचेही महत्त्व जाणता आले. फेरावरल्या गीतात बाळाई न्हायला बसते तेव्हा–

**घेतला पिवळा पितांबर घेतला करगती शेला**
**घेतली मदमाका चोळी**

असे शेलके शब्द समृद्धीदर्शक आहेत.

गरीव घरच्या सासू सुनांचं भांडण होते तेव्हा–

सुनबाई बसली धुनसून
सासू उठली दणकून
ठाल्याटुल्याजी वेचिल्या
हिनं कांडिल्या कुटील्या
हिनं दळिलं मळिलं
हिनं भाकरी रांधिल्या . . .

या गीतातील समर्पक शब्द घराच्या दारिद्र्याचं रूप समर्थपणे रंगवितात.

माझ्या ओवी गीतांच्या संग्रहामध्ये पौराणिक ओव्यांचा, कौटुंबिक ओव्यांचा, एकमेकांवरील प्रेमाचा, क्वचित राग-द्वेषाचा आविष्कार दिसून येतो. शेतकरी जीवन हे महाराष्ट्राचे वैशिष्टच. त्यामुळे शेतजीवनावरील साहित्य पुष्कळच.

माळ्याने केला मळा बंधूनं केल्या केळी
पलाणीला सीताफळी उंच गेली नारळी

हे माणसाच्या व्यवसायाचं चित्र, पण सुधारणा आल्याबरोबर आगीनगाडी, गिरणी, कॅन्टीन, यावरील गाणी सुरू झाली !

देवावरील गीतं पाहिली म्हणजे त्यात देवांच्या भक्तीपेक्षा मनुष्याला येणाऱ्या सामूहिक अनुभवांच्या पातळीवर देवांना बसवून मगच आपल्या कल्पना रंगविलेल्या दिसतात.

रुक्मिणी, सत्यभामा ह्या श्रीकृष्णाच्या दोन लाडक्या स्त्रिया, राधा ही लाडकी मैत्रीण. तुळस ही कृष्णाच्या सहवासात सतत. या कल्पनांवर

आधारित गीतांतून रुक्मिणी सत्यभामा ह्या तुळशीचा कसा मत्सर करतात हे दिसून येते.

**रुक्मीण सत्यभामा दोघी भांडती परसदारी**
**देवा श्रीकृष्णाची तुळसी धाकलीनं प्रीत नेली सारी**
**रुकमीण बोलं देवा पिरतीची कोण**
**काय सांगू रुक्मिणी माझ्या तुळसीचे गुण**

असं आहे हे सोज्वळ, साधं, सुंदर, भावविश्व. त्यात कपट नाही. कुटिलपणा नाही. राग, मत्सर, प्रेम जे असेल ते सारं सारं सरळ.

लोकसाहित्याचं स्थान समाज अभ्यासात जे आहे ते आढळ आहे. यापुढे लोकसाहित्याची जागा पंडिती किंवा प्रचारी वाङमयाने घेतल्याने ते कदाचित निर्माण होणार नाही. पण पूर्वीच्या त्या काळातलं जीवन चितारणारं हे वाङमय हा आपला एक अमोल ठेवा आहे असंच त्याचं महत्त्व मी मानते.

# लोककथांचं विश्व

सौ. शरदिनी मोहिते

लोकसाहित्याशी माझी ओळख झाली, ती मी अगदी लहान असताना. पण हे खूप उशीरा समजलं. म्हणजे ही ओळख नकळत झाली. आता असंही म्हणता येईल, सहजासहजी झाली.

तसं पाहिलं तर आपल्या भागातील जवळजवळ प्रत्येकाशी आपण अक्षरशः पाळण्यात असल्यापासूनच लोकसाहित्यानं जवळीक साधलेली असते. आपल्याला त्याची जाण तेव्हा असणं अशक्यच. कारण पाळण्यात मंदमंद झोके घेत ऐकलेले हळुवार, गोड, वत्सल, आवाजातले पाळणे ही ती पहिली ओळख! आणि ही ओळख त्या चिमुकल्या वयात टिकाऊ तरी कितपत असायची? ओझरतीच. जाता जाता झालेली ओळख ती! एवढं मात्र खरं की, इवलेसे आयुष्य असतानाही जिवाला ती अंगाई सुखद वाटलेली असते.

नंतरच्या वयात मग परंपरागत बडबड गीतं हा मोठाच विरंगुळा होऊन राहिलेला असतो. त्यानंतर "चांदोमामा चांदोमामा भागलास का?" अत्यंत प्रिय होऊन जातं. चांदोमामा, लिंबोणीचं झाड, मामाचा

चिरेबंदी वाडा, या गोष्टी कानावरून जातात. डोळ्यांना प्रत्यक्ष दिसतो तो चांदोमामा. बाकी गोष्टी डोळ्यांसमोर आणून त्यांची कल्पना करणं शक्यही नसतं आणि त्याची तशी आवश्यकताही नसते...

या नंतर मग "एक होता कावळा, एक होती चिमणी" यांची संगत लाभत जाते. खरं म्हणजे इथून पुढे होत जाणारी ओळख आठवणीत रहायला सुरुवात होते. "कावळ्याचं घर शेणाचं, चिमणीचं घर मेणाचं" हे सारं आपण त्या बालवयात जसं, ज्या स्वरूपात ऐकलेलं असतं, तसंच, अगदी त्याच स्वरुपात आजतागायत आठवत राहिलेलं असतं, त्यात त्याच्या टिकाऊपणाची साक्ष पटण्याला प्रत्यवाय नसावा...

आपण सर्वांनीच कावळ्याच्या आणि चिमणीच्या घराची गोष्ट ऐकली आणि मनात नोंदूनही ठेवली. कावळ्याचं घर शेणाचं म्हणताना "शी!" ही आपली तेव्हाची प्रतिक्रिया पुसटपणे कुठेतरी अस्तित्वात असते. ही गोष्ट ऐकताना बालमनाला या साध्याशा गोष्टीचीही केवढी उत्सुकता वाटलेली होती. आपण काही तरी फार महत्वाचं ऐकतो आहोत असं वाटत राहिलं होतं. आणि किंचित भावना अशीही की, फक्त आपल्यालाच ही प्रचंड महत्वाची बाब सांगितली जाते आहे!... इतिहास घडवणाऱ्याला एखाद्या मोठ्या घटनेचं महत्व या घर शेणाचं असण्याला आणि ते वाहून जाण्याला, तसंच मेणाच्या घराच्या टिकाऊ-पणाला आपण दिलेलं होतं.

आज जलप्रलयाचं चलच्चित्र पहाताना कुठे तरी वाटून जातं की, धोधो पाऊस पडायचा, महापूर यायचे आणि त्यात घरं वाहून जायची. ही परंपरा तशी ऐतिहासिकच. मोठाल्या संस्कृत्या नाही का पाण्यात बुडून गेल्या?... कावळ्या चिमणीची ही गोष्ट बाराव्या शतकात सारंग पंडिताच्या धानाईनं श्री चक्रधरांच्या तोंडून ऐकली तेव्हा तिचीही प्रतिक्रिया आपल्या सारखीच झाली असेल का? "चिऊताई चिऊताई

दाऽऽर उघड" असं आपण तेव्हा म्हणालो, आपल्या घरातल्या छोटुल्यांना असंच अगदी सूर काढून सांगितलं आणि त्यांनीही आपल्या बोबड्या बोलात ही गोष्ट सांगताना तसाच सूर लावला तेव्हा तो ऐकून आपण धन्य झालो! असंच काही तेव्हाही घडत होतं का? चक्रधरांनी धानाईला गोष्ट सांगितली. चक्रधर मूळचे गुजरातचे. त्यांनी इथली सर्व आवड निवड व ठळक गोष्टी लोकांमधे फिरत असतानाच आत्मसात केल्या. अगदी सहज त्यांनी ही गोष्ट धानाईला सांगितली. त्याचप्रमाणे त्याच काळात लहानाचे मोठे होत असणाऱ्या आळंदीच्या चार भावंडानाही कोणी सांगितली असेल का? अशक्य नाही.

आई वडिलांनी देहत्याग केला त्या अगोदरच्या शिशुवयात या भावंडांनी देखील ही गोष्ट ऐकली असण्याची शक्यता आहे. अशावेळी हे आणि असेच काही विचार मनात आल्याशिवाय रहात नाहीत.

माझं असंच आहे पहिल्यापासून. गोष्ट या कानानं ऐकली आणि त्या कानानं सोडून दिली असं कधी झालंच नाही. बालपणी जेव्हा ज्या लोककथा ऐकण्यात आल्या तेव्हा त्यांच्याबद्दल त्या वयातही मी विचार करत रहात असे...

त्यावेळी मला आवडलेल्या आणखी गोष्टीत विहिरीच्या पाण्यात पडलेल्या आपल्या प्रतिबिंबाला फसणाऱ्या सिंहाची गोष्ट होती. सिंहाच्या गुहेकडे जाणाऱ्या पाऊल खुणांच्या दाटीत एकही परतीच्या ठशाची खूण न दिसल्याने सावधानपणाचा विचार करणाऱ्या कोल्ह्याची गोष्ट होती. वाळूक खाणाऱ्या कोल्ह्याची गोष्ट होती. करकोचा आणि कोल्हा यांच्या थाळीतल्या खिरीच्या जेवणाची गोष्ट होती. त्याचप्रमाणे मातीच्या भांड्यात चोचीने खडे टाकून भांड्याच्या तळाशी गेलेली पाण्याची पातळी उंचावणाऱ्या कावळ्याची गोष्ट होती.

माकडाचे काळीज मागणाऱ्या मगराचीही गोष्ट होती....अशा किती किती गोष्टी मला आवडायच्या. त्यातली एकेक गोष्ट ऐकताना माझ्या नजरे समोर सारं वातावरण उभं रहायचं, जंगल रहायचं, राजवाडा उभा रहायचा, डोंगर, दऱ्या, समुद्र, तळी, नद्या, त्यातून वावरणारी आपल्या कथेतील पात्रं उभी रहायची! गोष्टीत घडणाऱ्या घटना जणू माझ्या नजरेपुढं घडत जायच्या. मी तिथेच कुठेतरी एखाद्या कोपऱ्यात उभी राहून सारं पहाते आहे असं वाटायचं. मला त्या त्या गोष्टीतल्या अनेक घटकांपैकी आपणही एक आहोत असं वाटायचं. मला त्या घटनांची, त्या वातावरणाची, इतकी गोडी वाटायची की, त्या गोडीचं वर्णन करणं कठीण.

राजे, आवडत्या राण्या, नावडत्या राण्या, राजपुत्र, राजकन्या, कधी कधी संतान विहीनता, स्वयंवराचे पण, घोडे, त्या घोड्यांवरून मारल्या गेलेल्या मजला, सात समुद्र, सात डोंगर, गुहा, रत्नं, माणिक, हिरे, सुवर्ण मोहरा, राजहंस, मोत्यांचा चारा, अश्रूंचे मोती, राक्षस, भुते, चेटकिणी, अप्राप्य वस्तू, दिव्य फुले, गुप्तधन, त्याला राखत बसलेले विषारी साप, अजगर, कुठल्यातरी पक्ष्यात किंवा एखाद्या वस्तूच्या, प्राण्याच्या अंतरंगात एखाद्याचा प्राण असणे, कोणाजवळ दिव्य सामर्थ्य असणे, मंत्र तंत्र, जादु टोणे, उडत्या सतरंज्या, उडते घोडे, साधूंचे शाप उःशाप, कोणाजवळ तरी अतर्क्य सामर्थ्य असणे, बोलणारे गोष्टी सांगणारे पशु पक्षी, पशुपक्ष्यांशी बोलणारे मानव, सागर पर्यटन, वादळे, सागराने नौका गिळंकृत करणे, कथानायकाला किंवा नायिकेला कुठल्या तरी अनोळख्या प्रदेशाच्या किनाऱ्यावर नेऊन सोडणे, अशावेळी रावाचा रंक तरी करणे किंवा रंकाचा राव तरी करणे, हत्तीने माळ घातल्यावर राजपद मिळणे या आणि यासारख्या अशाच कितीतरी गोष्टींचं मला पहिल्यापासूनच आकर्षण! मला या साऱ्या गोष्टी आत्मीय वाटतात. या गोष्टींचा विचार करणं आवडतं. यातल्या गुप्त, सुप्त, सत्य, घटनांचा वेध घ्यायला आवडतं, एवढंच नाही, तर अशा शक्याशक्यतेवर, सत्यावर,

आधारलेल्या अशाच अद्‌भुतरम्य वातावरणात मिसळलेल्या संपूर्णतया स्वतःच्या कथा निर्माण करायलाही आवडतं... माझ्या स्वतःच्या किती तरी कथा लोककथा म्हणून गणल्या गेल्या!... यासंबंधी प्रत्यक्ष भेटीत अगर पत्रातूनही विचारणा होत गेली. सुरुवातीच्या काळात मला राग यायचा. कथा माझ्याच आहेत हे मी बाणेदारपणे सांगत असे. अजूनही क्वचित सांगते. पण मला कधी कधी वाटतं की, स्वतःच्या कथांना लोककथांची पदवी जर मिळू लागली तर त्याहून अधिक काय हवं ?...

अशा कथांमधे मला रस वाटतो ही गोष्ट फार हेटाळणीची होते. पोरकटपणाचा शिक्का माथी बसतो. मग काही दिवस हे आकर्षण दूर सारण्याचा मी प्रयत्न करते. परंतु त्यात मला यश येत नाही. स्वतःच्या भागात असताना आमच्या देशातल्या कथा मिळतील तेव्हा त्या मी टिपून ठेवतेच. शिवाय इतर प्रांतातल्या, इतर भाषांमधल्या, इतर देशांमधल्या, लोककथाही वाचते. त्यावर विचार करते, अभ्यास करते. निरनिराळ्या भागात सापडणाऱ्या कथांमधल्या साम्यांचा, तसंच वैशिष्ट्यांचाही अभ्यास करते.

माझी ही आवड खूप जुनी हे तर सांगितलंच आहे. मला आठवतं. लहानपणी शाळेला लागणाऱ्या मोठ्या सुटीत, विशेषतः उन्हाळ्यात, आम्ही सर्वजण पुण्याहून आमच्या गावी वागणीला जात असू. वागणीला गेल्यावर बराचसा काळ आमचे नातेवाईक व आमच्या अण्णांचे स्नेही यांच्याकडे जाण्यात, त्यांना भेटण्यात जात असे. खेळणे, पोहणे, हेही कार्यक्रम असायचे. आमच्या मामांचा वाडा मोठा. मोठा म्हणजे बुलंद, चिरेबंदी, ऐश्वर्यशाली असा नव्हे हं! साधासाच पण मोठा. सावंतांच्या त्या एकाच वाड्यात अनेक सावंत रहात होते. सारे मामाच. कोणी सख्खे, कोणी चुलत, तर कोणी त्याहूनही पुढचे चुलत चुलत!... मला एकदा पत्ता लागला की, त्या वाड्यातल्याच एका घरात माझ्या आईच्या चुलतीचा जावई रहातो, आणि तो छान छान गोष्टी सांगतो. मग

त्यांच्याकडून गोष्टी ऐकणे आणि ऐकता ऐकता त्या वहीत टिपून ठेवणे हा माझा अतिशय आवडता उद्योग झाला. तो विचारा पाव्हणा दिवसभर शेतात काम करून दमून यायचा. पण तो आलाय याचा सुगावा लागायचा अवकाश, की त्याला मी काही सुचून देत नसे. तोही आपल्याला इतक्या अगत्यानं विचारून आपल्याला पूर्वीपासून माहीत असलेल्या गोष्टींची आस्थेवाईकपणे चौकशी केली जाते आहे, या गोष्टीमुळे खूष व्हायचा आणि गोष्टी सांगायचा. लांबच लांब गोष्ट असली तर ती हप्त्या हप्त्यानं सांगितली जायची. जशी ऐकायला मिळेल तशी ती माझ्या वहीत उतरून बसायची. हे सगळं लिहिणं कंदिलाच्या प्रकाशात व्हायचं !...

रात्री झोपल्यावर मग हे प्राणी, या चित्रविचित्र घटना, नाग, राक्षस, सारे सारे स्वप्नात यायचे आणि मी कधी कधी घाबरून ओरडत उठायची !... या गोष्टीचीही चेष्टा व्हायची. पण गोष्टी ऐकायचं काही मी सोडलं नाही !...

माझ्या चुलत्यांनीही कितीतरी गोष्टी मला सांगितल्या. त्यांना स्वतःला गोष्टी वगैरे आवडत. कोणी काय ऐकलं अगर वाचलं हे जाणून घेण्याची आणि आपण काय ऐकलं अगर वाचलं हे सांगण्याची त्यांना उत्सुकता असायची. कधी आम्ही "च" ची भाषा वापरली तर तिची गोम ओळखून "च" च्या भाषेतच बोलायला सुरुवात करीत असू. सावंतवाड्यातून कोणती गोष्ट ऐकून आलीस म्हणून विचारणा करून मन लावून ती गोष्ट ऐकत आणि ती "छान आहे" म्हणत. पुढे बोलत, "ऐक आता" त्या गोष्टीपेक्षाही चांगली गोष्ट सांगतो. आणि उत्कृष्ट गोष्ट ऐकवत. काही गोष्टी त्यांनी आमची "च"ची भाषा वापरूनही सांगितल्या.

हा क्रम लहानपणापुरता मर्यादित राहिला नाही. पुढेही चालू राहिला. लोकसाहित्यातली कितीतरी अनमोल कथारत्नं मला मिळत

गेली. नुसती गावाकडच्या सुटीतच नाही तर पुण्यात आमच्या वाड्यात रहाणाऱ्या स्त्रियांकडून, माझ्या मैत्रिणीच्या आईकडून, आजीकडून, कधी कुठं अण्णांबरोबर किंवा आक्काबरोबर कुठल्या गावी गेलं तर तिथंही !

त्याचप्रमाणे लग्नानंतर सांगलीला गेल्यावरही कथा मिळाल्या. काही उत्कृष्ट कथा मला माझ्याकडे स्वयंपाक करणाऱ्या बाईंनी सांगितल्या. ग्वाल्हेर संस्थानात बाईचा नवरा काम करायचा. बाईचा सुखी आणि संपन्न संसार तिकडे झालेला. पुनः ग्रहदशा फिरली. नवऱ्याच्या सेवा निवृत्तीनंतर त्या सांगलीला आल्या. जास्त कमी खर्चाची सवय लागलेली. ती सांभाळता येईना असा उद्योग नवऱ्याला मिळेना. बाई लागल्या मग इकडे तिकडे स्वयंपाकपाणी करायला. त्यांनी संस्थानी ऐश्वर्य ऐकवलंच, पण तिकडच्या भागात ऐकलेल्या उत्कृष्ट लोककथाही सांगितल्या, त्याचप्रमाणे आमच्या कॉलनीत आमच्या शेजारी रहाणाऱ्या शंभरीला टेकलेल्या, एका आजींनीही कितीतरी कथा सांगितल्या. आमच्या कॉलनीत याच आजी नव्हे तर आणखी किती तरी आज्ज्या होत्या. त्यांनीही माझी आवड पुरवली. काही मोलकरणींजवळ, दारावर येणाऱ्या माळणी मळेकरणींजवळही कथा मिळाल्या. एका मळेकरणीनं एकदा गोष्ट सांगता सांगता मला सांगितलं, की तुम्ही रहाता त्या भागात स्मशान होतं. रात्र पडल्यावर कितीतरी भुतं इकडेतिकडे संचार करतात. सांज पडल्यावर मुलांना घेऊन इकडे तिकडे जात जाऊ नका ... बाईंनी ओळख करून दिली म्हणून नाही, पण सहज वाटलं म्हणून एक खरोखरीचं भूत एका उन्हाळ्यात मध्यरात्री मला भेटायला आमच्या परसात आलं होतं ! ...

लोककथांची मला आवड. पण म्हणून मी कथाच मिळवल्या असं नाही. जात्यावरच्या ओव्या, फेराची गाणी, झिम्म्याची गाणी, फुगड्यांचे उखाणे, नाव घेण्याचे उखाणे, कोडी घालणारे उखाणे, धनगरी ओव्या, वासुदेवाची गाणी असं विविध प्रकारचं लोकसाहित्य विपुल प्रमाणात

मिळवलं आहे. हे सर्व देणाऱ्यात धनगर, वासुदेव, काम करणाऱ्या बाया, ओळखीच्या वृद्धा यांच्याप्रमाणेच माझी आई, माझ्या माम्या, माझ्या काक्या, माझ्या मामे वहिणी, आईच्या किती तरी चुलत मावस बहिणी अशा किती तरी आप्त स्त्रियांचा समावेश आहे. गाणी म्हटल्यावर गाण्यांच्या चाली, ताल, उच्चार करताना निरनिराळ्या शब्दांवर देण्याचे विशिष्ट आघात या गोष्टी आल्याच. एकेक चाल अशी गोड की, काय सांगावे? काही चाली खड्या देखील !... ते एक वेगळचं विश्व. पण एकूण पद्यातच माझं मन जरा कमीच रमतं.

माझी पहिली आवड कथांची. कथांमधल्या नाट्यांची. त्यातल्या स्वप्नील वातावरणाची. कथांच्या अदभुतामागे अदृश्य रूपाने उभ्या ठाकणाऱ्या सत्याचा मागोवा घेण्याची. त्या विलोभनीय विश्वात रमण्याची.

माझ्या अभ्यासाचे म्हणून जे काही विषय मी मानलेत त्यांचं वाचन मनन मी करत असतेच. त्या अभ्यासाची माझी दिशा, माझी पद्धत, ही माझी माझीच आहे.

ती इतर विद्वानांच्या पद्धतीला, दृष्टीकोणाला धरून नसणार! नाहीच! हे उघड आहे. माझं बौद्धिक समाधान होईल अशा रीतीनं माझा माझ्या विषयांचा अभ्यास चालू असतो. पण अभ्यासाचे विषय जरी आवडत असले तरी खरे रमवणारे विषय वेगळेच. त्यातला प्रमुख आवडीचा विषय लोककथा.

लोककथांच विश्व मला इतकं आवडतं, इतक मानवतं, की प्रत्यक्षातलं विश्व मला कधी कधी नको नको वाटतं !

# जिवंत भावनांचं अध्ययन

डॉ. सविता जाजोदिया

लोकसाहित्याकडे मी वळले ती १९५२-५३ साली. आणि त्याचे श्रेय आहे प्रा. श्री. म. माटे यांना. त्यांनी सुचविल्यावरून या विषयावर लेखन करायला मी सुरुवात केली. त्यानंतर प्रबंध लेखनासाठी लोकसाहित्याच्या तौलनिक अभ्यासाचा विषय मी घेतला. तो प्रा. न. र. फाटक यांच्या सल्ल्यावरून ! लोकसाहित्याची तशी मला लहानपणापासून आवड होती. त्यास मुख्य कारण म्हणजे आमच्या घरातलं वातावरण. कोणतंही कार्य असो, घरात लोकगीतं गायिली जायची. निवांतपणी आईदेखील लोकगीतं गायची. ही लोकगीतं जमवायचा छंद अगोदर जडला. या छंदातूनच पुढे त्या गीतांतील भाव भावनांकडे लक्ष वेधलं गेलं आणि अध्ययन कार्य हाती घेतलं. त्यावेळेपर्यंत लोकसाहित्याच्या तौलनिक अभ्यासाकडे फारसे कुणाचे लक्ष गेलेले नव्हते. तेव्हा तौलनिक अभ्यास करून अन्य प्रांतातील लोकसाहित्य व संस्कृतीची माहिती पुढे आणावी या हेतूने मी मराठी व राजस्थानी लोकगीतांच्या तौलनिक अभ्यासाचा विषय संशोधनासाठी घेतला. आणि जसजसे अध्ययन करू लागले तसतशी त्यात अधिकाधिक रंगून जाऊ लागले. एखादं साम्य स्थळ

आढळलं तर ते का व कसं आलं, त्याचं मूळ कुठवर मागे नेता येतं, याचा मागोवा घेण्यात गोडी वाटू लागली. तसंच वेगळेपण आढळलं तर ते का आहे, त्या वेगळेपणावर कशाचा परिणाम आहे, याचा शोध घेण्यात, विचार करण्यात, स्वारस्य वाटू लागलं.

हे अध्ययन करताना त्यावेळी एक गोष्ट मला जाणवली होती की, महाराष्ट्राच्या मानाने गुजरात, राजस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश, येथील लोकसाहित्य खूप समृद्ध आहे. तोपर्यंत महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीची स्थापना झालेली नव्हती. मराठीत मोजकीच पुस्तकं लोकसाहित्यावर प्रसिद्ध झालेली होती. काही अपवाद वगळता बहुतेक लेखकांचं लोकसाहित्य संकलन करण्याकडे अधिक लक्ष होतं. त्यामानाने त्यांचं विवेचन करण्याकडे कमी लक्ष होतं. राजस्थानात मला लोकसाहित्याच्या संशोधनकार्याला वाहून घेतलेले, त्यावर सातत्याने संशोधनात्मक लेखन करणारे, अनेक विद्वान आढळले.

लोकसाहित्याला वाहून घेतलेली व नियमितपणे प्रसिद्ध होणारी मासिकं आढळली. लोकसाहित्याच्या संशोधनासाठी असणाऱ्या संस्था आढळल्या. त्यावेळी जाणवलेली ही उणीव पुढे भरून निघाली हे सांगायला नकोच. महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीने वेगवेगळे विषय घेऊन त्यावरचं लोकसाहित्य जमवून ते प्रसिद्ध करण्याचं महत्त्वाचं कार्य केलं. श्रेय अर्थातच डॉ. सरोजिनी बाबर यांना आहे.

अध्ययनासाठी गीतं जमवताना जे काही बरे वाईट अनुभव आले, त्यातला एक अविस्मरणीय आहे. राजस्थानी लोकगीतांसाठी मला कुणीतरी एका गृहस्थांचा पत्ता दिला. त्या गृहस्थांना लोकगीतांची विलक्षण आवड होती. असंख्य लोकगीतं त्यांनी जमवली होती. लोकगीतांचा हा ठेवा जतन व्हावा याची त्यांच्या मनाला तळमळही होती! तौलनिक अभ्यास होत असल्याचं कळल्यावर त्यांना खूप आनंद झाला. शक्य असतं तर त्यांनी मला खूप मदत केली असती. पण राजस्थानच्या एका

आडवळणी वाळवंटी गावात त्यांचं वास्तव्य होतं. घरात खाणारी तोंडं बरीच. तुटपुंज्या मिळकतीत दोन वेळचं पोटभर जेवण मिळायची मारामार. परिस्थितीने त्या गृहस्थांना हतवल करून टाकलं होतं. मी जेव्हा त्यांना लोकगीतांसाठी विचारलं तेव्हा त्यांनी स्वहस्तानं मोठ-मोठ्या अक्षरात एकेक लोकगीत लिहून काढलं आणि पाच रुपयाला एक याप्रमाणे ती लोकगीतं मला विकली! खरं म्हणजे लोकांची ही ठेव. लोकांचा त्यावर हक्क. पैसे घेण्याचा आपल्याला अधिकार नाही याची त्यांना जाणीव होती. पैसे घेताना त्यांना मरणप्राय दुःख झालं होतं. त्यांचे डोळे भरून आले होते. पण परिस्थितीनं गांजल्यानं त्यांनी लोकगीतांचंच भांडवल केलं होतं!

राजस्थानी लोकसाहित्याच्या तौलनिक अध्ययनाचे क्षेत्र पुढे विस्तृत करून मी अन्य प्रांतातील लोकसाहित्याचाही अभ्यास केला. अन्य प्रांतातही लोकसाहित्यावर खूप कार्य होत आहे. अनेक लेख, मासिकं संग्रह, प्रसिद्ध होत आहेत. या संग्रहांपैकी काही संग्रह शास्त्रीय दृष्टचा लोकगीतांचा अभ्यास करून लिहिलेले आहेत तर काही भावुक पद्धतीने लोकगीतांवर लेख लिहून तयार केलेले आहेत. काही संग्रह, जी गाणी मिळाली तशी ती जमवून, तयार केलेले आहेत. या संग्रहात सार कमी असले तरी या निमित्ताने का होईना लोकसाहित्याच्या संकलनाकडे जिज्ञासूंचे लक्ष वेधले जाऊ लागले हे काही कमी नव्हे. मात्र या संग्रहातील लोकगीतं खरीच लोकगीतं आहेत की, नुसती लोकप्रिय प्रचलित गाणी आहेत हे डोळसपणे तपासण्याकडे नवोदित लेखकांचे सोडाच पण त्या भाषेतल्या लोकसाहित्यज्ञांनी देखील फारसे लक्ष दिलेले दिसत नाही. त्यामुळे लोकगीतांच्या संग्रहात अनेकदा अलीकडच्या काळातील अनेक गाण्यांचा समावेश झालेला आढळतो, काही वेळा तर प्रसिद्ध गाणं वा कविता, त्याची भाषा थोडी विकृत करून, त्याला ग्रामीण बोलीचं स्वरूप देऊन लोकगीत म्हणून खपवलेलं आढळत! लोकगीतांच्या संकलनाचे कार्य

नीट व्हायला हवे. म्हणजे ती गीतं कालौघात नष्ट न होता जतन करून ठेवता येतील.

या ठिकाणी एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो की, एखादं लोकगीत खरंच लोकगीत आहे की, लोकप्रिय गीत आहे हे कसं पडताळून पहायचं ? लोकसाहित्य हे गंगेसारखं आहे. मुख्य प्रवाहाला अनेक प्रवाह येऊन मिळत असले तरी गंगा ती गंगाच राहते. तिचे नाव बदलत नाही, की मूळ प्रवाह बदलत नाही. लोकगीतांचेही तसेच आहे. कालप्रवाहात त्यांच्यात अनेक नवनवीन विषयांचा समावेश होत जातो. वेळेनुसार व गाणाऱ्याच्या कुवतीनुसार भाषेतही बदल होत जातो. काही प्राचीन शब्द सोडल्यास बहुधा अलिकडच्या काळातील ग्रामीण बोली आढळते. आणि तरी ती लोकगीतं म्हणूनच ओळखली जातात ! लोकगीत कधीही जुने नसते की नवे नसते. ते रानातील वृक्षासारखे असते. भूतकाळाच्या जमिनीत त्याची पाळंमुळं खोलवर रूजलेली असतात, पण त्याला सतत नवी पालवी व फुलं येत असतात. असे असताना या गीताचा अस्सलपणा कसा ठरवायचा? ते गीत ऐकणाऱ्याच्या विश्वासावर, त्याच्या बौद्धिक पातळीवर, ज्या परिसरात त्याने ते गीत ऐकवले म्हणजे खेड्यापाड्यात दूर आडवळणी गावात वा ज्या प्रसंगी ऐकवले त्यावर, त्या गीताच्या भाषेवर, त्या गीतात अभिव्यक्त झालेल्या भावनेवर, कल्पनेवर, विचारांवर, त्या गीताच्या लोकप्रिय प्रसारावर, ते गीत गाणाऱ्या लोकांच्या जातीवर, कशावर अस्सलपणा ठरवायचा? कोणते निकष खरेपणा ठरविण्यासाठी लावायचे? मौखिक साहित्य पिढ्यान्‌पिढ्या लोकांचं व लोकांसाठीच असल्यानं त्याचा तोंडवळा एकच न राहता बदलत जातो. वरचा बाह्य भाग बाजूला सारून मूळ ठेवण शोधण्याचे काम अतिशय कठीण आहे. यासाठी प्राचीन वाङमयात काही संदर्भ सापडतात का ते बघावे लागते. राजस्थानात जैन मुनींनी आपल्या वाङमयात कवितेची चाल देताना अमुक लोकगीताची चाल असे नमूद केलेले असल्याने कित्येक लोकगीतांचा प्राचीनपणा व अस्सलपणा पडताळून बघता आलेला

आहे. अशा प्रकारचे संशोधन सर्वच भाषांच्या बाबतीत करता येईल असे ठामपणे म्हणता येत नसले तरी तसा प्रयत्न करून पाहणे शक्य आहे.

जी गोष्ट लोकगीतांची तीच लोककथांची ! एका विद्वानांनी आमच्या नॅशनल बुक ट्रस्ट या संस्थेसाठी लोकसाहित्य व संस्कृतीवरचं एक पुस्तक लिहिलं. त्यात काही लोककथा देण्यासाठी मी त्यांना सांगितलं आणि त्याच्या पाशी लोककथा आहेत का म्हणून विचारलं तर त्यांनी चक्क सांगितलं की "तयार करून देतो!" मागणी तसा पुरवठा करण्यासाठी माल तयार करण्यासारखा हा प्रकार होता. लोककथांचे काही ठराविक ठोकताळे घेऊन लोककथा तयार करायचं व त्यात थोडाफार बदल करून वेगवेगळ्या देशाच्या लोककथा म्हणून त्या प्रसिद्ध करायचं काम त्यांनी अनेकदा केलेलं होतं! संग्रहाची पानं भरायची आहेत तेव्हा कुठलीही कथा उचला नि द्या त्या प्रांताच्या, देशाच्या, नावावर खपवून असा प्रकार लोककथांच्या बाबतीत खूप आढळतो. ती खरंच लोककथा आहे की नाही हे कोणाला कळणार व कोण तपासणार? अशा लोककथा तयार करायला वेळ लागत नाही व अशा संग्रहांचे उदंड पीक सर्वत्र आढळते. यावर काहीतरी उपाय व्हायला पाहिजे.

चालीरीती, सण, उत्सव, वगैरेंवर जे लेख प्रसिद्ध केले जातात त्यातही फक्त माहिती, त्यांचे वर्णन अधिक आढळते. पण विशिष्ट सण किंवा प्रथा असल्यास त्याची परंपरा काय, तो कसा रूढ झाला, त्याचे सांस्कृतिक महत्त्व काय, सामाजिक परिणाम काय याचे विवेचन केलेले फार कमी आढळते. भावुकपणे, काव्यमय शब्दांत उत्सवांचे, सणांचे वर्णन केले की, झाले! हे वर्णन, ही माहिती देखील हवी असते. त्याचेही वेगळें महत्त्व आहे. पण लोकसाहित्याच्या अध्ययनातली ही पहिली पायरी झाली. गीतांचा, कथांचा, माहितीचा संग्रह करण्यापासून अध्ययनाला सुरुवात होते. तो झाल्यावर मग पुढच्या पायरीकडे वळावे लागते. त्यांच्या

अस्सलपणाचा चौकसपणे शोध घ्यावा लागतो. त्यानंतर त्यांचे विवेचनात्मिक अध्ययन करता येते आणि तेही झाल्यावर मग त्यांची अन्य प्रांतातील लोकसाहित्याची तुलना करून निष्कर्ष काढता येतात.

ही सर्व क्रियाप्रक्रिया करण्याइतका वेळ, त्यासाठी हवी असलेली साधने, चिकित्सक दृष्टी हे फार थोड्या लोकसाहित्यज्ञांकडे असते. त्यातही जे अधिक खोलवर जाऊन गहन अध्ययन करतात त्यांच्या लेखनावर लोकसाहित्याविषयक पाश्चात्य ग्रंथांचा अधिक परिणाम दिसून येतो. एखादा सिद्धान्त मांडायचा असला, काही नवीन प्रतिपादन करायचे असले तर त्यास आधार म्हणून बहुधा पाश्चात्य लोकसाहित्यज्ञांच्या ग्रंथाकडे सर्वजण वळतात! पण हे काय? आम्ही स्वतंत्रपणे एखादा नवीन सिद्धान्त प्रतिपादन करू शकत नाही का? पाश्चात्यांनी जे काही लिहिलं त्यास वेदवाक्य समजून, त्यांच्या सिद्धान्तांचे निकष लावून आपले लोकसाहित्य तपासण्यात, किंबहुना त्या निकषावर आपले जे लोकसाहित्य खरे उतरत नाही ते लोकसाहित्यच नव्हे असे मानून, त्यांनी लोकसाहित्याचे जे विभाग पाडले त्याप्रमाणे आपल्या लोकसाहित्याचे विभाग करण्यात व त्या विभागांबाहेरचे आपले लोकसाहित्य लोकप्रिय साहित्य म्हणून बाजूला सारण्याकडे या विद्वानांची वृत्ती दिसून येते. आपले लोकसाहित्य त्यांच्यापेक्षा वेगळ्या वातावरणात जन्मलेले! मूळ मानवी भाव भावना सर्वत्र समान असल्याने त्यांच्या व आपल्या लोकसाहित्यात साम्य आढळले तरी धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक, भौगोलिक अशा अनेक गोष्टींचा मानवाच्या आचारविचारांवर, त्यांच्या भाषेवर परिणाम होत असतो व तो त्याच्या लोकसाहित्यातूनही व्यक्त होत असतो. देशोदेशीच्या वा प्रांतोप्रांतीच्या लोकसाहित्यात वेगळेपण आढळण्याचे कारण ते हेच! या ठिकाणी एक लक्षात घेतले पाहिजे की, लोकसाहित्यातील बराच मोठा भाग व्यापक स्वरूपाचा असतो व काही भाग स्थानिक स्वरूपाचा असतो. व्यापक स्वरूपाच्या भागाचे इतरत्र असलेल्या लोकसाहित्याशी साम्य आढळून येते. फरक आढळतो तो

स्थानीक स्वरूपाच्या भागात. हा स्थानिक स्वरूपाचा भाग प्रत्येक ठिकाणच्या लोकसाहित्यात आढळतो. व्यापक भागाच्या अध्ययनासाठी असलेले निकष या स्थानिक भागाला लावणे योग्य नव्हे.

पाश्चात्यांच्या विचारांचा आधार घेतल्याने विद्वान म्हणून लौकिक मिळतो खरा. पण तसे करताना आपल्या भारतीय परंपरेकडे दुर्लक्ष होते. आपल्या शेजारच्या प्रांतातील, भारताच्या अन्य प्रांतातील लोकसाहित्याचा अभ्यास करण्याकडे लक्ष सुद्धा जात नाही. लोकसाहित्यविषयक नवीन सिद्धान्त प्रतिपादन करावयाचे झाल्यास पाश्चात्य विद्वानांबरोबरच आपण आपल्या भारतीय विद्वानांची मते व सिद्धान्त लक्षात घ्यायला काय हरकत आहे ?

अन्य प्रांतांतील लोकसाहित्याचा तौलनिक अभ्यास केल्याने बरीच महत्त्वाची व मनोरंजक माहिती हाती लागून अनेक गोष्टींची तर्कसंगत परंपरा शोधता येते. कित्येक सण, उत्सव, चालीरीती, का, कशा व कुठून आल्या, त्यांचे प्राचीन स्वरूप कसे बदलत गेले व हल्ली त्यांचे काय स्वरूप आहे, मुळात एकच असलेली एखादी प्रथा वेगवेगळ्या ठिकाणी कोणकोणत्या स्वरूपात प्रचलित आहे, हे शोधून त्यांचे प्राचीनत्व ठरवता येते. एखादी लोककथा कसकशा कोणकोणत्या ठिकाणी पसरत गेली हे पाहिल्यास त्या लोककथेचा अस्सलपणा समजतो. तसेच लोकगीताची भाषा वेगळी असली तरी आशयाचे दृष्टीने इतरत्रही ते आढळल्यास त्या लोकगीताचा खरेपणा ठरवता येतो. अशा प्रकारे लोकसाहित्यात लोकांनी तयार करून खपवून दिलेल्या साहित्याचा फाफटपसारा उडवून खऱ्या लोकसाहित्याचे दाणे वेचण्यास तौलनिक अभ्यासाचा बराच उपयोग होण्यासारखा आहे. वेगवेगळ्या प्रांतांतील लोकांचे पाऊस पाण्याविषयीचे अडाखे, शकुन अपशकुनांच्या कल्पना, त्यांच्या जादूटोण्याविषयीच्या समजुती, त्यांची श्रद्धास्थानं, बरेवाईट अनुभव आणि म्हणींच्या स्वरूपात मोजक्या शब्दात ते व्यक्त करायचे कौशल्य हे सर्व पाहिल्यास त्यात बरेच साम्य आढळते. म्हणींची भाषा वेगळी पण तथ्य तेच. सर्वांच्या

मनाला व बुद्धीला जाऊन भिडणारी लोकनृत्यं पाहिली तर हालचालींवर, हावभावांवर तिथल्या भौगोलिक वातावरणाचा परिणाम झालेला दिसून येतो. गीतांच्या स्वरांवर त्या प्रदेशाच्या हवामानाचा परिणाम झालेला आढळतो. हे सर्व जाणून घेणं अतिशय मनोरंजक आहे.

लोकसाहित्याचे क्षेत्र अत्यंत व्यापक आहे. प्राचीन असंस्कृत अभिव्यक्तीपासून ते सुशिक्षित शिष्टसंमत साहित्याच्या सीमेपर्यंत पोचणाऱ्या समस्त अभिव्यक्तींचा लोकसाहित्यात अंतर्भाव होतो. लोकसाहित्याची व्याप्ती इतकी विस्तृत असल्याने त्याच्या सुसंबद्ध अध्ययनाचे व त्या अध्ययनाला शास्त्रीय स्वरूप देण्याचे प्रयत्न सर्व भाषांमध्ये होत आहेत. त्यासाठी अनेक विद्वानांनी अनेक दृष्टिकोनातून त्यांचे अध्ययन केले आहे. तसेच अनेक संप्रदायही या अध्ययनात निर्माण झाले आहेत. लोकसाहित्याच्या अध्ययनाला शास्त्रीय स्वरूप देण्यासाठी हे ठीक आहे. पण या सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकसाहित्याचा संबंध मानवी मनाशी, मानवी जीवनाशी असल्याने, मानवी जीवनाचे ते प्रतिबिंब असल्याने, त्याचा अभ्यास स्थितप्रज्ञपणे, तटस्थ वृत्तीने, शास्त्रशुद्ध पद्धतीने विशिष्ट मर्यादेपर्यंतच करता येतो. लोकसाहित्य समजून घ्यायचं तर त्यासाठी संवेदनशील मन हवं. या अथांग महासागरातील मौक्तिकं वेचायची तर त्यासाठी अगोदर त्यात खोल अवगाहन करायला हवं. मग हाती आलेल्या शिंपल्यांतून मोती काढून त्यांची वर्गवारी, प्रत, अस्सलपणा वगैरे सारं ठरवायचं.

एखादं लोकगीत ऐकताना त्यातील भावनांशी एकरूप झालं नाही तर त्यातील पुनरावृत्ती कंटाळवाणी वाटेल. गाणाऱ्याचे सूर शास्त्रोक्त तालासुरात नसल्याने ते कानाला गोड वाटणार नाहीत आणि ऐकणारा जर रंगला नाही तर ऐकवणाराही त्यात रंगून जाणार नाही. आमच्याकडे साफसफाई करायला एक हरिजन बाई येते. एकदा लग्नातील गाण्याचा विषय निघाला तर लगेच ती खाली जमिनीवर बसली, आपल्या

जवळच्या पत्र्याच्या डब्यावर तिने ठेका धरला, आणि लग्नाच्या वेळची काही गाणी तिने गाऊन दाखवली. ठराविक उपमा, नातेवाईकांचे उल्लेख, पुनरावृत्ती सारं काही त्या गीतांमध्ये होतं. पण तन्मयतेने ती गात होती आणि मीही त्यात रंगून गेले. एक तास कुठे निघून गेला कळलंच नाही. बाहेरच्या कुणा माणसाने जर त्यावेळी बघितलं असतं तर "ही शिकलेली बाई हे काय अडाणी लोकांचं ऐकत बसली आहे आणि त्यात रंगून जाण्यासारखं एवढं काय आहे?" म्हटलं असतं आणि याचा त्याला कधी उलगडा झाला नसता.

या लोकसाहित्याच्या अभ्यासाचा हल्लीच्या वर्तमानकाळात काय फायदा? विकासाच्या या अणुयुगात ज्ञानाच्या, विविध शास्त्रांच्या कक्षा अंतरिक्षापर्यंत विस्तारल्या असताना, नव्या आशा आकांक्षा, नवे ज्ञान, नवे मार्ग, नव्या अभिव्यक्ती इत्यादींवर लक्ष केंद्रित करण्याची प्रगतीसाठी नितांत गरज असताना प्राचीन कालाची रंग फिके पडलेली शिळी चित्रे दाखवण्यात काय अर्थ? असा आक्षेप लोकसाहित्याच्या अध्ययनावर घेतला जातो. पण अधिक खोलवर विचार करता दिसून येईल की, लोकसाहित्यातील भूतकालाच्या सरल, स्वाभाविक अभिव्यक्तीत आपल्याला मानवी मनाशी संबंधित सार्वकालीन भावभावनांचा अपार निधी गवसतो, तसेच संस्कृतीचेही दर्शन घडते. आजचा मानव निव्वळ ऐतिहासिक दृष्टीने भूतकालाशी निगडीत नाही. मानवाचा इतिहास फक्त स्थापत्यकलेत, शिल्पकलेत नसून अभिव्यक्तींच्या मौखिक परंपरेतही साठवलेला आहे. ही मौखिक परंपरा म्हणजेच लोकसाहित्य. ही काही खूप लांबची, अत्यंत प्राचीन वस्तू नव्हे. ते आम्ही सर्वांमध्ये अस्तित्वात असलेलं सत्य आहे. ते आमच्यात जिवंत आहे. तो काही एक निर्जीव विषय नव्हे तर सजीव विषय आहे. त्याचं स्वतंत्र अस्तित्व आहे. लोकांच्या जीवनाइतकाच लोकसाहित्याचा विस्तार आहे. लोक, लोकांची भूमी व भौतिक जीवन, तसेच त्या लोकांची संस्कृती या तिन्हींचा लोकसाहित्याशी संबंध आहे.



मानवी मनाशी संबंधित प्रत्येक गोष्ट, मानवी मनाची सर्व स्पंदनं,

लोकसाहित्यात आहेत. त्या स्पंदनांची योग्य ती दखल घेऊनच या विषयाचा अभ्यास झाला पाहिजे. लोकसाहित्याचं अध्ययन म्हणजे निव्वळ प्राचीन अवशिष्ट रूढींचं अध्ययन नव्हे तर जिवंत लोकभावनांचं, लोकांच्या अभिव्यक्तींचं, तसंच त्यांच्या गतिशील जीवनाचं अध्ययन होय. हे अध्ययन मनापासून करायला मला फार आवडतं. मी त्यात स्वतःला हरवून बसते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# कथाकथन

## डॉ. सरोजिनी बाबर

वेळ प्रसंगी आमच्या घरातील सगळीच माणसं कोड्यात नाहीतर शेलक्या म्हणींच्या वापरात बोलायची, त्यामुळं असलं बोलणं आमच्या अंगवळणी पडलेलं. त्यातून भल्या पहाटेला दळताना अगर सवडीअंती लहान बाळाला खेळवताना आमच्या घरातल्या बायका कणगीच्या तोंडातून दाणे घसरावेत अशा थाटानं गीतं बोलायच्या ते पण आमच्या ओळखीतलं. झालंच तर संध्याकाळी सोप्यात नाहीतर अंगणातल्या चांदण्यात बसून आजी आजोबा मस्त मस्त कहाण्या सांगायचे तर त्या पण आम्हाला ठाऊक. खेळ गाण्यातील उखाण्यांचा न् नवऱ्याचं नाव घेतात त्या उखाण्यांचा पण सराव झालेला. परंतु या सगळ्या बोली-चालीला लोकसाहित्य म्हणतात हे कुठं आम्हाला माहीत होतं?

त्यामुळं मी चांगल्या प्रकारे बी. ए. पास झाल्यानंतर साहित्य सम्राट तात्यासाहेब केळकरांचं "यशोदा चिंतामणी" पारितोषिक स्वीकार-ताना साने गुरुजींनी जेव्हा मला "लोकसाहित्य गोळा करीत जा" असं म्हटलं न् त्या पाठोपाठच "ज्या समाजात आपण जन्माला येतो त्या

समाजाचं ऋण या साहित्याची जुळवाजुळव करून व ते लोकांच्या पुढं ठेवणं साधून फेडलंच पाहिजे" अशी गळ घातली तेव्हा मात्र फार कोड्यात पडल्यागत झालं. त्यांना नेमकं काय म्हणायचंय तेच कळेना! म्हणून मी कावरीबावरी झाले तेव्हा गु. म. म. दत्तो वामन पोतदारांनी खुलासा केला, "तुझ्या आईला विचार. तिला ओव्या येतात. उखाणे येतात. कोडी येतात. कधी कधी कहाणी पण सांगता येते. ह्यालाच लोकसाहित्य म्हणायचं. ही पिढ्या न् पिढ्यांची वानगी. आईनं लेकीला न् लेकीनं तिच्या लेकीला शिकवावी अशा झोकातली. तुला ते येतंय. लक्षात घे. जा कुठं कुठं न् विचार. ती मंडळी सांगतील ते घे लिहून. वायकांच्या तोंडी असलेल्या ओव्या म्हणजे वेद."

तशी मी त्यांना घाई गर्दीनं विचारलं,

**"उगवत्या नारायणा आदी उगव माज्या दारी**
**माज्या त्या बाळासंगं दुधा तुपाची कर न्ह्यारी**

असली ओवी आमची मावशी दळताना गाते. तुम्ही यालाच लोकगीत म्हणता?"

"अलबत्! ही ओवी केवढा तरी अर्थ घेऊन आलीय. सोलून घ्या ही कल्पना. पहा काय सांगते. एक आई सूर्य देवाला आपल्या बाळाबरोबर न्याहारी करायला ये म्हणतेय! म्हणजे तिनं बाळाला नकळत सूर्याचं तेज ल्यायला शिकवलं न् त्यायोगे हात जोडीत देव देव केला. एवढंच नाहीतर सकाळच्या प्रहरी दारी येणाऱ्या सूर्याला खाऊ पण दिला त्याचं बाळरूप बघून! समजलं?" गुरुजींच्या या बोलण्यामुळं भारावून जायला झालं. म्हणून मग त्यांनी आणखीन पुष्कळ ओव्या अशा उकलून दाखवल्या. त्यामुळं मी ह्या ब्रह्मानंदात स्वतःचं भान हरपून बसले!... आणि मग तेव्हापासून लोकसाहित्यानं माझ्याशी जवळीक साधीत या भावविश्वात मला झोकून दिली...

लोकसाहित्य म्हणजे पिढ्या न् पिढ्यांच्या लोकांचं मनोगत. दिलखुलासपणे ते व्यक्त करणारी गंगोत्री. जनसामान्यांचं मानसिक आंदोलन दर्शविणारा लख्ख बिलोरी आरसा. समाज मनाचं अंतरंग सांगणारं भावगीत. अद्‌भुताला गवसणी घालीत होणाऱ्या शेलक्या पण वेचक कल्पनांचा होणारा आविष्कार. तुझं माझं करीत न वसता राजासारखं आपणा सर्वांचं मानणारा. पिढ्या न् पिढ्यांच्या भावनाविष्काराचा विश्वकोश. जन्मोजन्मीच्या भाव भावनांना हात घालीत काळजाची पकड घेणारा अक्षर वाङमयाचा प्रतिनिधी. तालासुरांच्या साथीनं देवादिकांना आळविणारा स्वरविलास. कुळाचारांची शिपण करीत सण उत्सवांमधील आनंदोत्सव साजरा करायला शिकविणारा मार्गदर्शक. सर्व सामान्यांच्या भाषेचा ठसा उमटवीत स्वतःशीच सुखसंवाद साधायला शिकविणारा प्राध्यापक. श्रवण पठणाच्या मांदियाळीत कुणालापण आपलंसं करीत जिंकणारा जिवाभावाचा मित्र. म्हणून लोकसाहित्याशी जवळीक साधीत असताना मला या विविध परीच्या स्नेहबंधाचा ठावठिकाणा लागला. त्यातलं कोणतं एक समजावून घेत असताना मी नित्य नियमानं म्हणावं असं नवीन नवीन शिकत गेले ... त्यामुळं साहजिकच गावोगावच्या, घरोघरीच्या, लोकसाहित्यकारांशी माझा परिचय होऊ शकला. अठरा विश्वे दारिद्र्य नांदत असलेल्या घरात देखील मला इंद्रसभेतलं वैभव पहाता आलं !... वरवर साधी भादी दिसणारी माणसं मनानं किती मोठी असतात आणि कल्पनेनं किती श्रीमंत ठरतात त्यातला अंदाज मला घेता आला.

साधी लहान मुलांच्या खेळण्यापाळण्याचीच गोष्ट घेऊया. लाकडी रंगीत पाळणा आणि जिनगराकडून तयार करून आणलेला राघू-मैनांचा झगमगीत खेळणा हं! घरोघरी आढळून येणारी ही हौसमौज. पण लोकगीतांनी तिचीच हकीकत कशी सांगितलीय बघा—

पालख पाळणा मोत्यांचा खेळणा
जोजविते आत माझा लाडका चिमणा

शिपांचा मळा बाई स्वातोनं शिवला
मोती मोती टिपून तुझ्या छताला गुंफला

सागर सांडूनी माणिक धुंडूनी
चंद्रसूर्य जडविले इवल्याशा गगनी

हत्तीणी दातांचा, शिसवीच्या लाकडाचा, हा पाळणा. तर त्या पाळण्यावर राघू मैनांसकट चंद्र सूर्यांचे दिवे देखील टांगलेत आणिक त्यासाठी शिपांचे मळे तर टिपलेतच पण सागर देखील पालथा घातलाय ना देवा? किती सुंदर म्हणावी ही कल्पना? जे प्रत्यक्षात शक्य नाही ते कल्पनेत असं घोळवायचं न् मग राया इंद्राच्या घरचा डामडौल उपभोगायचा! मनाला त्यामुळं केवढी शांती मिळते न् काळीज देखील किती सुखावतं? खरंच, असलं बोलणं ही खेडयापाडयांतील मंडळी कुठं बरं शिकत असतील? त्यांचा सगळा वेळ शेतीवाडीत उघडया मैदानावर जातेला. ऊन वाऱ्याशी न् पावसापाण्याशी त्यांची गाठभेट. ना पैस घर बसायला ना जवळ रग्गड पैसा अडका हौस मौज करायला. पण बोलणं कसं झक्कास! तुम्ही आम्ही तडातापडीनं घेण्याजोगं!...

मध्यंतरी मी आमच्या शेतावर गेलेली. तिथं आमचे काका आजोबा भेटलेले. भलं दांडगं लख्ख मुंडासं डोईवर न् अंगभर पैरण अंगावर. हातात मखमली चंची न् तोंडात पानाचा विडा. कानात भिकबाळी न् हातात चांदीचं कडं असा त्यांचा थाट. तर ते आपले बसलेले गवताच्या भाऱ्याला टेकून. तशी मी विचारलं, "काका आजोबा, आजी कुठाय गा?" म्हणताना हसून त्यांनी बोलणं केलं, "अग पोरी, मी हुतो मळयात. सपान पडलं खळयात न् नवरत्नांचा हार कोलापूरच्या अंबाबाईच्या गळयात!"

भले शाबास ! काकू आजी कोल्हापूरला अंगुपती गेलीय हे सांगायचा केवढा थाटमाट म्हणावा ? आम्हाला नाही येत असलं बोलायला. अंहं ! शुचतच नाही तर येणार कोठून ? म्हणून तर लोकसाहित्याचं मला अप्रूप ! थोडक्या शब्दात केवढा तरी आशय भरणारं हे बोलणं खरंच मस्त मस्त वाटतं.

आमची सुंदी काकू त्यातलीच. घरात फुटका मणी का नसेना अंगावर घालायला न् धडकं वस्त्र का नसेना नेसायला पण बोलणार दाबून हं ! घर चंद्रमौळी साधं भादं. वादळ वाऱ्यानं घाईला आलेलं. कौलारू. पण हिची भाषा राजमहालाला देखील मागं सारेल अशी नखऱ्याची ! . . .

" चांदीचं घंगाळ आंघोळीला. चंदनाचा पाट बसायला. जरीकाठी धोतर नेसायला. सहाण येवल्याची. खोड बडोद्याचं. केशरी गंध लावायला. गंगा भागीरथीचं पाणी शिवपूजेला. चांदीची ताटवाटी जेवायला. आंबे मोहराचा भात, वर केशरी वरण दाट. ताट विल्वरी. डबा माहुलीचा. डब्या गजनीच्या. कात कोकणचा. चुना भोकरचा. पान रामटेकचं. जायपत्री जळगावची. लवंग विजापूरची. चिकणी सुपारी सोलापूरची. लाल गादी मुंबईची. लोड साताऱ्याचे. उशा किनखापाच्या पुण्याच्या. पलंग मोराचा कराडचा. हिऱ्यामाणकांच्या झुंवरांचा लकलकाट न् × × × रावांच्या जिवावर झाला हळदी कुंकवाचा गजर दाट ! "

आहे त्यात आपण सुखी आहोत हे सांगताना ही सुंदीकाकू कुठं कुठं जाऊन ठेपलीय बघा आमच्या काकांचा रुबाब सांगताना ? गावशीव तरी हिनं ओलांडलीय का कधी माहेर गावातच तर ? पण हिला ही गावं त्यांच्या वैशिष्ट्यांसह आठवलीच कशी मी म्हणते ? छे ! आमची अक्कल अशी नाहीच मुळी चालणार !... सुंदीकाकूच्या लक्षात असले लांबलचक उखाणे फार म्हणजे फारच. म्हणून तर मी गुळाला माशी चिटकावी तशी तिच्या मागं मागं रहाते एकसारखी

आणिक तिच्या तोंडातून जे जे म्हणून वाहेर पडेल ते ते कागदावर पेरीत जाते अगदी हावऱ्या सारखी! उखाणा घ्यायचा नसला तरी त्यातला इतिहास, भूगोल, नातीगोती, ठावठिकाणे सगळं सगळं कळावं म्हणून! आमच्या वाचनात कुठं असलं काही आलेलं नसतं म्हणूनही!

आता एक गंमत वघा हं! आमची मंजुळाआत्या वाडीवरच्या शेतात रहाणारी. तिचं बोलणं तर एकदम नामी. परवा आमच्याकडे 'चल चार दिवस' म्हटलं तर वोलली कशी, "आधी गोल गोल, मग लाल लाल, मग थैय्यम थैय्या!" आहे की नाही? आम्हाला काहीच उमगलं नाही तशी ती बोलली, "उखळ, मुसळ न् मिरची असा यातला आरथ. चटणी करायचीय. मग यीन सवडीनं." वा रे वा! किती गंमत म्हणावी ही? तिचं बोलणं नेहमी कोड्यातलंच असं! आम्ही लेखक तर ती म्हणाली, "पांढरं वावर, काळं बी, चतुर म्हणतो पेरीन मी!" कागद, शाई न् लेखन कला यांचा किती सुंदर म्हणावा हा मेळावा! फार छान. आम्ही तर भुलूनच जातो बाई ह्या कोड्यांची उत्तर शोधताना! कधी माहीतच नाही तर? एकमेकांच्या बुद्धीची चाचणी घ्यायची ही रीत केवढी घेण्याजोगी? शहाण्याला देखील पेच पडतो तर? खरं ना? म्हणून तर मग असली कोडी गोळा करताना माझा मनमोर झक्कासपैकी हालतो डुलतो न् मी स्वतःला बाजीराव समजते! ..

शाळा कॉलेजात मी एवढी शिकले खरी पण हे व्यावहारिक शिक्षण मोठं तोलामोलाचं. त्यामुळं ह्या साध्या सुध्या लोकांना अक्षर ओळख करून द्यावी न् आपण त्यांच्या पायाशी बसून असलं काळीज खेचून घेणारं शिकत रहावं यातला आनंद माझा मला लखलाभ होतो.

अद्‌भुताला गवसणी घालीत कुणी कुणाशी कसं वागावं यातला वारकावा कळावा म्हणून आमच्या थोरल्या मामांनी सांगितलेली कहाणी मी अगदी जिवापाड जपून ठेवली आहे. आम्हा लहान मुलांना नीट 

वळण लागावं म्हणून रोज ते अशा गोष्टी सांगायचे. तर त्यातल्या एका गोष्टीचं त्यांना भलतं अप्रूप !" आपण सर्वांनी नीट वागावं, देव आपली परीक्षा घेतो" हे आपलं म्हणणं पटवून देताना ते सांगायचे ती कहाणी अशी--

काय झालेलं की, एका गावात एक लई गरीबाचं पोरगं. ना आई ना बाप. ना घर ना दार. पांघरायला आभाळ न् निजायला धरणी. तर एक दिवस त्याला लागली लई म्हणजे लई भूक. म्हणताना तो गेला असाच एका हाटेलापाशी. लागला गयावया करायला. एक कोप च्या दे म्हणाला. पण हाटेलवाल्यानं "पैसे आहेत का ?" म्हणून विचारलं. हा "न्हाईत" बोलला. "मग चहा मिळणार नाही" अशी भाषा हाटेलवाल्यानं केली. काय ? तर ह्या पोरानं मग एक युगत काढली. रस्त्याच्या कडेकडेनं फिरला. तशी खडूचा एक तुकडा मिळाला. त्या तुकड्यानं त्यानं त्या हाटेलाच्या भिंतीवर मोर काढला. मोर काढला न् तीन टाळ्या वाजवल्या. त्यासरशी तो मोर साजिवंत होत न् थुई थुई नाचत उठून खाली आला! मोराला बघायला ही गर्दी जमली. पैशाचा पाऊस पडला जसा!

होता होता मग रोजच असं घडत गेलं. एक कप चहाच्या पायी त्या पोरानं ही कसरत मांडली. पण एक दिवस त्या हाटेलवाल्याच्या मनात पाप आलं. आपुनबी मोर नाचीवला तर लई पैका मिळंल म्हटला न् त्यो पोरगा यायच्या आत स्वत्ताच टाळ्या वाजविल्या. तशी मोर उठला. पण नाचेना! ही टाळी ओळखीचीच नाही म्हटला न् परत निजला. तशी त्या हाटेलवाल्यानं त्याला वक्‌दिशी लाथ घातली. तरीबी मोर ऐकेना. म्हणताना मग हयेनं त्येची मानगूट धरून पिरगळली न् शिव्या मोजल्या! त्यासरशी रक्ताची कारंजी उसळली जशी न् सारं हाटेल त्या रक्तानं रंगलं म्हणावं! तेवढ्यात त्यो पोरगा धावत आला. "काय रं मोरा?"
 म्हटला न् झाला प्रकार बघून हाडबडला. चट्‌किनी त्येनं तिथलं कुडचाभर

पाणी त्या मोरावर शिंपडलं तशी मोरानं टाकलेली मान उचलली. मोर भिंतीवरून उतरून खाली आला.

त्या दिवसापासून त्यो मोर पुढं, त्याच्या मागून ते पोरगं न् त्यांच्या पाठोपाठ पाय फुटलेला सगळा पैसा अडका कुठं गेला देवाला ठावं ? तुमाला कोण कुठं दिसलं तर कळवा म्हणं! . . .

आपण कुणाच्या पैशाअडक्यावर मन घालू नये हे शिकविणारी ही कथा जिवाला अशी चटका लावून जाते की, काय सांगावं ?

थोरपणी जेव्हा मी या गोष्टीचा इकडं तिकडं तपास लावला तेव्हा कळलं की, ही गोष्ट कमी अधिक फरकानं जगभर सांगितली जातेय त्या त्या भागाची पार्श्वभूमी घेत ! तिच्यातला चटका सगळीकडंच सांगणाराला न् ऐकणाराला भुलवून सोडतोय.

तर लोकसाहित्याची ही अशी गंमत, अशी भूल भुलावण. अशी शिकवण. म्हणून मला त्या एकीची गोडी दांडगी. त्यामुळे मी कुठं का जाईना कुणी असलं वडीलधारं भेटलं की, तिथं माझा मनमोर रमलाच म्हणावा. मग भले मला बायकांच्यासंगं दळण कांडण करायला लागूं दे, शेण थापायला सांगूं दे अगर उभंकडवं घर सारवायला सांगूदेत. माझी एका पायावर तयारी झालीच म्हणा !

कधी कधी या लोकांची मनधरणी एवढी करावी लागते न् त्यांच्या कलानं इतकं घ्यावं लागतं की खरं सांगायचं तर वेळेचं भान उरतच नाही ! . . . आणिक सांगायचं म्हणजे ते ठेवून पण चालत नाही अशातली गत होऊन बसते. ही माणसं माझ्याशी गोष्टी करायला त्यांच्या कामातून मोकळी होतील तेव्हाची गोष्ट ना ?

ही मंडळी तशी कामाची. त्यामुळं त्यांची सवड महत्वाची ठरते न् मग तास न् तास ताटकळत बसावं लागलं तरी वाहवा अगर "उद्याला

बघू म्हणं ! ... परवाला या म्हणं ! " .... असली बोलणी झाली तरी पण वाहवाच !

लोकसाहित्याचं हे असं आहे. ज्यांच्याजवळ त्याचा साठा असतो त्या लोकांचा न् आपला एकदा का सूर जमला की, मग त्यांच्या आमच्या सारखे श्रीमंत आम्हीच ! तेव्हा असल्या आमच्या आप्तेष्टात आलेल्या मंडळींशी होतेल्या सुख संवादात कसा वेळ जातो न् किती वेळ आपण कुठं असतो हे कळावं कसं ? आणि ते कळायची गरज तरी काय मी म्हणते ? आपला जीव सदाशिव ! मग कुणी काही म्हणो बापडं !

आणखी एक महत्त्वाचं सांगते. या लोकगीतांच्या संदर्भात जर कुणाशी ओळख झाली तर ती जरूर टिकून राहते. कुणी कुणाला फारसं विसरत नाही. माझीच एक गंमत सांगते म्हणजे त्यातलं काय ते लक्षात येईल.

मी दिल्लीला राज्यसभेच्या सेशनसाठी गेलेले होते तेव्हाची गोष्ट.

काय झालेलं की, पहिल्या पहिल्यांदा ओळखीतलं कुणी नाही कुणी बरोबर असायचं. नॉर्थ अॅवेन्यूत आम्ही रहायचे. तशी एक दिवस मी विचार केला की, आता आपण एकटें जाऊया. रस्ता ठाऊक झालाय. म्हणून तिथल्या पोलिस रक्षकाकडून टॅक्सी मागवली. पार्लमेंटच्या मुख्य दरवाजाशी ही टॅक्सी आली आणि मी निघाले. "नॉर्थ अॅवेन्यू" एवढंच त्या ड्रायव्हरला बोलले न् संगं घेतलेले कागदपत्र नीट लावीत बसले.

पण घटकाभरानं पहातेय तर तो ड्रायव्हर वरचेवर मागं वळून बघतोय आणिक टॅक्सी निराळ्याच अशा जनपथच्या मार्गानं निघालीय !... बापरे ! पोटात धस्स झालं...हा माणूस मला कुठं घेऊन जातोय ? जीव उडून गेला न् मग खासदारकीच्या रुबाबात मी ओरडले, "नॉर्थ अॅवेन्यू चलो भाई ! " तसा तो माणूस मागं वळून माझ्याकडे पहात हसला न्

त्यानं आपली गाडी भरधाव वेगानं पुढंच नेली! आता काय करायचं? उडाली भंबेरी न् काय? उगाचच जवळ पैसे किती आहेत, अंगावर दागिने किती आहेत, यातली चाचपणी केली न् आता काय धडगत नाही अशा विचारानं "नॉर्थ ॲवेन्यू चलोऽऽऽ" चा एकसारखा गजर लावला...

होता होता मग त्या माणसानं बऱ्याच वेळानं एकदाची नॉर्थ ॲवेन्यूत टॅक्सी आणली न् खाड्‌दिशी दार उघडीत तो समोर उभा राहिला! तशी न घाबरता मी हिंदीतून विचारलं, "पैसे किती द्यायचे?" त्या सरशी तो तीन ताड नऊ माड हसला न् बोलला, "ओळखलं नाहीत?" त्याचं पंजाबी ढंगातलं हिंदी कानावर पडताच मी ओरडले, "तू कोण?' त्यासरशी तो हसला न् म्हणाला, "जयपाल! तुमच्या गाण्याला ढोलक वाजवलावता मी मुंबईत!...आपण सरोजिनी ना?"

शाबास! एवढं कळलं मात्र न् जो काय आनंद झालाय ते कसं सांगू? मुंबईत मी आमदार असताना अखिल भारतीय लोकसंगीत सभेत मी लोकगीतं गायले असताना हा तिथं आलेला. त्यानं ढोलकं वाजवलेला. हे सारं आठवलं तशी ब्रह्मानंदी टाळी लागली न् मग "एक कलाकार दुसऱ्या कलाकाराकडून पैसे घेतो का कधी?" या वाक्यावर जोर देऊन त्यानं मला एका अलिशान हॉटेलात नेऊन कॅनॉट सर्कलच्या तिथं कॉफी घेताना अशा गोष्टी केल्या की, माझं पण भान पार हरपून गेलं!... तर आमची अशी गंमत! काय सांगू न् किती बोलू हो? हे कथाकथनच लई लांबड लावणारं नाही?

# मऱ्हाटी लोकसंस्कृती

डॉ. यू. म. पठाण

लहानपणी सोलापूर जिल्ह्याच्या करमाळ्याला, माझ्या आजोळी, मी जात असे. त्यावेळी आमच्या आजोबांच्या जिनिंग फॅक्टरीत येणाऱ्या खेडूत स्त्रिया सायंकाळच्या वेळी अंमळ विसावत, जेवत आणि पुन्हा काम करण्यापूर्वी काही गीतं म्हणत. ही गीतं मला फार आवडत असत. या गीतांच्या चालीही फार वेगळ्या असत. त्यातला अर्थ त्यावेळी मला फारसा कळत नसे पण त्यातले स्वर मात्र माझ्या मनाचा ठाव घेत. ही गीतं म्हणजे करमाळ्याच्या परिसरातील लोकगीतं होती. करमाळ्याच्या देवीसंबंधीची ती लोकगीतं होती.

आमच्या जिनमध्ये बल्या सुतारही काम करीत असे. तो अगदी आमच्या घरच्यासारखाच होता. दिवसभर मी त्याच्या अंगाखांद्यावर खेळे. बल्याप्रमाणेच आणखी एक व्यक्ती आमच्या घरी सतत वावरे. ही व्यक्ती म्हणजे बन्सी यादव. बल्याप्रमाणंच बन्सीच्याही अंगाखांद्यावर मी खेळत असे. बल्या छानपैकी गात असे. तो मेळेही चालवीत असे. बल्याला कितीतरी लोकगीतं तोंडपाठ होती. लोकगीतातली लय

त्याच्या स्वरांनी बरोबर पकडली होती. बल्यानं गायिलेली ही लोकगीतं माझ्या कानांवर सतत पडत असत. त्यांच्या चालीतली, लयीतली, माधुरी मी आकंठ प्राशन करीत असे. रात्री एकदा का बल्याची ही मैफल जमली की, ती तासन् तास चाले. त्याच्या अंगावर हाताचा कोपर टेकून मी त्याची ती लोकगीतं ऐकत बसत असे.

त्यावेळी बन्सी मला करमाळ्याच्या परिसरातल्या अदभुतरम्य गोष्टी सांगत असे. तिथल्या देवीच्या, तिथल्या पीरांच्या, हसायच्या नि रडायच्या. बन्सीजवळ एवढ्या गोष्टींचा साठा तरी कुठून आला हा प्रश्न माझ्या बालमनाला त्यावेळी पडत असे. तसा तो आजही पडतो. बन्सीच्या या गोष्टींची भाषा मोठी खटकेबाज, परिणामकारक असायची. संवाद तर असे असत की, जणू तो सारा प्रसंग समोरच घडतो आहे, असं वाटावं! लोकभाषेतल्या साऱ्या लकबी, सारी शब्दकळा, सारं वाक्प्रचारवैभवं बन्सीच्या त्या कथा कथनात असायची. कथेचा ओघ तर इतका विलक्षण गतिमान असायचा की, बन्सीजवळ सतत त्या गोष्टीच तास न् तास ऐकत बसावं असं वाटायचं. सारी मुलं आपली जागा सोडून कुठंही जायला मुळी तयारच नसायची. मी देखील. बन्सीच्या या गोष्टींनी माझ्या मनाला वेध लावला. बन्सीच्या या गोष्टी म्हणजेच करमाळ्याच्या परिसरातल्या लोककथा होत्या. आज बल्या तर या जगात नाही. पण बन्सीला आज तुम्ही भेटलात तर, विस्मृतीनं घेरलं असतानाही बन्सीच्या वाणीतील लोकभाषेचं सुढाळ तेज, अनोखं लावण्य, तुमच्या प्रत्ययाला आल्यावाचून राहणार नाही.

त्यानंतर माझ्या आयुष्यातला बराचसा काळ सातारा, कऱ्हाडच्या परिसरात गेला. अण्णासाहेब बाबर आणि माझे वडील, त्यांना आम्ही "रावसाहेब" म्हणत असू, यांची फार जुनी दोस्ती. अण्णा घरी आले की, रावसाहेबांबरोबर तास न् तास त्यांचं बोलणं चाले. आम्हा मुलांचाही अण्णांना भारी लळा. मग आम्हाला ते कधी कधी गोष्टी सांगत.

काही उखाणे, आहाणे, सांगत. ते ऐकून आम्ही सारे हरकून जात असू. अण्णांची निवेदनाची शैली अस्सल लोकभाषेची होती.

लोकसाहित्याचे हे संस्कार नकळत माझ्यावर बालपणीच होत गेले. माझ्या वडिलांना, रावसाहेबांनाही, लोकसाहित्याची फार आवड होती. ते सरकारी अधिकारी होते. त्यामुळे त्यांना अनेकदा फिरतीवर जावे लागत असे. ज्या ज्या गावी ते जात, त्या त्या गावच्या दैवतांची, पीरांची ते माहिती घेत. त्यासंबंधीच्या दंतकथा मिळवीत. या गोष्टींमध्ये थोडी स्वतःचीही भर घालून ते कधी कधी आम्हाला गोष्टी सांगत असत. त्यांनी घातलेल्या या भरीमुळे त्या लोककथा व दंतकथा अधिक रंजक वाटत.

आम्ही धुळ्याला असताना देवचंदमामा आणि रतन (रतन सुपडू चिते) हे आमचे दोन्ही शिपाई मोठे गोष्टी वेल्हाळ होते. ते दिवे लागणी-नंतर अहिराणीत आम्हा मुलांना खानदेशातल्या लोककथा सांगायचे. कधी कधी वन्सीनं सांगितलेल्या करमाळच्याच्या दंतकथांमध्ये आणि देवचंद-मामांच्या अहिराणी लोककथांमध्ये सारखेच प्रसंग यायचे. सारख्याच व्यक्ती यायच्या. आणि मग वाटायचे की, देवचंदमामांनी तर या गोष्टी वन्सीला सांगितल्या नाहीत? वेगवेगळ्या प्रदेशांतल्या लोककथांमधल्या समान कल्पनासंबंधीची नाती गोती आणि त्यांच्यामधली अन्तःसूत्रे, धागे, माझ्या मनात नकळत विणले जाऊ लागले ते असे.

नोकरीच्या निमित्तानं वडिलांना अलिबाग, जंजीरामुरुड, पेण, पनवेल, महाडलाही राहावं लागलं. सुट्यात आम्ही त्यांच्या बरोबर राहात असू. फिरतीवरही त्यांच्याबरोबर जात असू. या फिरतीत किती तरी मंदिरं, मशिदी, दर्गे, तीर्थस्थानं, प्राचीन ऐतिहासिक वास्तू आम्ही पाहायचो. त्यांच्यासंबंधीच्या दंतकथा ऐकायचो. त्यामुळे या साऱ्याच स्थळासंबंधीच्या लोककथा सांगणाऱ्या लोकांना रावसाहेब मुद्दाम बोलावून घेत व आम्ही त्या गोष्टी ऐकत बसत असू. त्यानंतर वर्षामागून वर्षे गेली, मी

एम.ए. झालो. प्राध्यापक झालो. संशोधन करू लागलो. हस्तलिखितांच्या शोधार्थ गावोगावी भ्रमन्ती सुरू झाली. बार्शीजवळ श्रीपत पिंपरी गाव महानुभवांचा "मार्ग" असून त्यांच्याजवळ बरीच महत्त्वाची हस्तलिखितं आहेत असं कळलं म्हणून श्रीपत पिंपरीला गेलो.

महानुभाव महंतांची गाठभेट झाली पण पोथ्या मिळाल्या नाहीत. जवळच कव्हे गाव होतं. तिथं काही पोथ्या आहेत असं बार्शीच्या घळके गुरूजींनी सांगितलं. मला ते तिथं घेऊनही गेले. तिथं एका चर्मकार गृहस्थांच्या घरी आम्ही गेलो. त्यांच्याकडे एक महत्त्वाची महानुभाव पोथी असल्याचं आम्हाला कळलं होतं. त्यांना आम्ही भेटल्यावर मोठी अपूर्वाई वाटली. आपल्याजवळ पोथी आहे पण ती "तुम्ही वाचू नका" तिच्यात महाभारताबद्दल काही वेगळंच लिहिलंय" असं ते म्हणत होते. त्यांनी ती पोथी दिली आणि तिच्यात खरोखरीच महाभारताच्या कथेत बराच बदल केलेली कथा सांगितली होती! भीम जाळल्याचा एक कथा प्रसंगही त्यांनी त्या पोथीतून वाचून दाखवला. "कैकाय" ची एक वेगळीच लोककथा त्या पोथीत होती. जैनांच्या पद्मपुराणाप्रमाणं महानुभावांचं वेगळं महाभारत असावं या विचाराची बीजं त्यावेळी माझ्या मनात पेरली. मग मी त्या पोथीच्या म्हणजे नवरसनारायण नावाच्या महानुभाव कवीच्या "शल्यपर्वा"च्या, अनेक पोथ्या मिळवल्या नि १९६१–६२ साली ते संपादून प्रसिद्ध केलं. प्रचलित लोककथांतून महाभारत व रामायण ह्या महाकाव्यांनी किती वेगवेगळी रूपं घेतली होती, याचा प्रत्यय त्यामुळे मला आला व लोकसाहित्याच्या अभ्यासाची एक नवी दिशा गवसली. ही दिशा गवसायला मराठवाड्यातील लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. ना. गो. नांदापूरकर देखील कारणीभूत झाले. डॉ. नांदापूरकर उस्मानिया विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख होते. त्याना आम्ही सोलापूरच्या दयानंद कॉलेजात व्याख्यानासाठी बोलाविलं होतं. त्यांनी त्यावेळी व्याख्यानासाठी विषय निवडला होता, "मराठवाड्यातील लोकसाहित्य." मराठवाड्यातल्या लोककथा, लोकगीतं यासारख्या

अस्सल लोकसाहित्याचा महाप्रवाह नांदापूरकरांच्या वाणीतून धो धो वाहात होता. मराठवाड्यातल्या अजिंठा वेरुळचं शिल्पसौंदर्य मी न्याहाळलं. पण तिथल्या लोकसाहित्याच्या अपूर्व सौंदर्यविश्वाचं हे दर्शन मात्र डोळे दिपवून टाकणारं होतं. त्यात एक आगळी अपूर्वाई होती. मी या सौंदर्यविश्वाकडे मनोमन आकर्षित झालो होतो. पण सोलापूरला राहून मला मराठवाड्यातल्या या विश्वात प्रवेश मिळणार तरी कसा, याची चुटपूट माझ्या मनाला लागून राहिली होती. परंतु नियतीनं माझी ही इच्छाही लगोलग पूर्ण केली. अगदी आकस्मिकपणे.

१९५८ साली मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली आणि माझी या विद्यापीठाच्या मराठी विभागात १९५९ साली नियुक्ती झाली. १९६० साली जानेवारीत मी विद्यापीठात रूजू झालो. आणि हस्तलिखितांचं नि लोककथा, लोकगीतं, दंतकथा, यासारख्या अस्सल मराठवाडी" लोकसाहित्याचं ते अनोखं सौंदर्यविश्व मला तिथं गवसलं. गावोगावी हस्तलिखितं मिळविण्यासाठी मी पायपीट करीत असे. त्यावेळी गावकऱ्यांनी हे साहित्य आणि लोकसाहित्य देताना "घेशील किती दो करांनी" अशी अक्षरशः माझी अवस्था केली. मराठवाड्यातलं गाव न् गाव संशोधनविषयक ठरू शकतो, याची जाणीव मला झाली. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, म. म. दत्तो वामन पोतदार आणि समर्थभक्त शंकरराव देव यांनी मराठवाड्यात हस्तलिखितं मिळविण्यासाठी सतत "येरझारा" का केला याचं रहस्य उलगडू लागलं. त्यांच्या दैनंदिनीच्या नोंदी मला वाट दाखवू लागल्या. मग अंबड गोंदीचा परिसर तानाजी देशमुखाची लोककथा सांगू लागला. मस्त्योदारी देवीची लोकगीतं गाऊ लागला. तुळजापूरचा परिसर तुळजाभवानीची कथागीतं वाचू लागला. संपादण्यांमध्ये मला वासुदेव, गोंधळी, भराडी, भाट ही मंडळी भेटू लागली. केवळ संपादण्यांतच नव्हे तर ती प्रत्यक्षच मराठवाड्यातल्या खेडोपाड्यांतही सतत दिसू लागली. कंधार नि केजचा परिसर सूफी संतांच्या लोककथा, दंतकथा, आख्यायिका सांगू लागला. जितूरजवळचा निमगिरीचा डोंगर

जैनांच्या लोककथा सांगू लागला. अजिंठ्याच्या परिसरात अहिराणी लोकगीतं उपलब्ध होऊ लागली. पैठणचा परिसर गजगीतं गाऊ लागला. मराठवाड्यातल्या लोकगीतांचे "मराठीचा मोहोर" सारखे काही संग्रह डॉ. नांदापूरकरांनी संपादून प्रसिद्ध केले होते. मराठवाड्यातल्या लोककथांचा संग्रह अद्यापि प्रसिद्ध झाला नव्हता. तो संपादून प्रसिद्ध करावा, असं मला वाटलं आणि मग त्याचा ध्यासच लागला. मराठवाड्यातल्या माझ्या अनेक विद्यार्थ्यांनी मला या कार्यात मन:पूर्वक साहाय्य केलं. त्यांच्या लोककथांचा संग्रह मी मराठवाडा विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण मंडळाच्या वतीनं १९६३ साली संपादून प्रसिद्ध केला. मराठवाड्यातील मराठी लोकसाहित्याचा आलेख रेखाटून या लोककथांविषयीची एक विस्तृत रसास्वादक प्रस्तावनाही मी या पुस्तकासाठी लिहिली होती. या लोककथांच्या संग्राहकांत प्रा. गजमल माळी, प्रा. हरिहर मातेकर, प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी, डॉ. प्र. न. देशपांडे, प्रा. सुखराम हिवराळे, श्री. भगवान भटकर इ. कितीतरी लोकसाहित्याचे जाणकार अभ्यासक होते.

मराठवाड्यातल्या परभणी जिल्ह्यातील हिंगोलीच्या परिसरात अनेक फिरस्त्या जमाती आहेत. त्यांचं लोकसाहित्य विपुल व संपन्न आहे. याची कल्पना आल्यावर माझे एक विद्यार्थी श्री. शरद व्यवहारे यांना मी "हिंगोली तालुक्यातील लोकसाहित्याचा अभ्यास" हा विषय प्रबंधासाठी दिला आणि चारपाच वर्षांच्या परिश्रमांनी त्यांनी हा प्रबंध चांगल्या रीतीनं पूर्ण केला. त्यात त्यांनी या जमातींच्या लोककथा, लोकगीतं आख्यायिका याप्रमाणेच त्यांच्या भाषेचा व संस्कृतीचाही अभ्यास केला.

महानुभाव साहित्य हाही माझ्या आवडीचा, संशोधनाचा विषय. सांकेतिक लिप्यांत दडलेलं महानुभावांचं साहित्य संपादून प्रसिद्ध करण्यात माझं मन बराच काळ रमलं. गोपाळदासकृत "शुकदेवचरित्र", नवरसनारायणाचं "शल्यपर्व", डिंभकवीचं "ऋद्धिपुरमाहात्म्य", पैठणचा "वृद्धाचार", "दर्शन प्रकाश–" इ. ग्रंथ संपादून मी प्रसिद्ध केले होते. पण

त्याचबरोबर महानुभाव मठांमध्ये स्त्रिया ज्या ओव्या गात असत, त्यांनीही माझं लक्ष वेधलं. महानुभावांचं हे लोकसाहित्य अत्यंत महत्त्वाचं असल्यानं, त्याचा परिचय मी "महानुभाव साहित्य संशोधन" या ग्रंथाच्या पहिल्या खंडात करून दिला. असं महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या संप्रदायांच्या अनुयायात विखुरलेलं लोकसाहित्यही शोधायला व प्रसिद्ध करायला हवं.

या अध्ययनक्षेत्राकडे अभ्यासकांचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न मला "महानुभावांचं लोकसाहित्य" या लेखाद्वारे करायचा होता. या दृष्टीनं मी आणखी एक प्रयत्न केला.

महानुभाव संतसाहित्याप्रमाणं अन्य संप्रदायांच्या संतसाहित्यातही लोकसाहित्याचे व लोककलांचे अन्तःस्त्रोत प्रवाहित झाले आहेत, याचा प्रत्यय मला संतांचं भारुड साहित्य वाचताना आला. संत हे एका अर्थानं लोकसाहित्यकारच असावेत, असंही मला तीव्रतेनं जाणवलं. "संतसाहित्य चिंतन" यासारख्या माझ्या ग्रंथातून मी याविषयी विवेचन केले आहे.

मराठवाड्यातल्या या लोकसाहित्यातून मराठवाड्याची बोलीही प्रकट झाली आहे. ही गोष्ट डॉ. नांदापूरकरांनी आपल्या एका ग्रंथाच्या प्रस्तावनेत सूचित केली होती. परभणीच्या परिसरातील विशिष्ट प्रकारचा हेल, "करायलेत" "जायलेत" यासारखी संयुक्त क्रियापदांची रूपं, "मांगल", "चेव" सारखा वैशिष्ट्यपूर्ण शब्दसंग्रह, देखणे वाक्प्रचार, यादवकालीन बोलीचं मराठवाडी बोलीनं केलेलं जतन, या सर्वच गोष्टींमुळे मराठवाड्याच्या लोकसाहित्याचा भाषिक अभ्यास केल्यास त्यामुळे मराठीवाडी बोलीवर प्रकाश पडेल व प्रमाण मराठीशी तिचा असलेला अनुबंध स्पष्ट होईल या हेतूनं मी आणखी एक संशोधन प्रकल्प माझे एक विद्यार्थी प्रा. हरिहर मातेकर यांना दिला. हा प्रकल्प अद्यापि पूर्ण व्हावयाचा आहे.

आदिवासी व फिरस्त्या जातीजमातींच्या लोकसाहित्यातून त्यांची

संस्कृती वैशिष्ट्येही प्रकट होतात. माझे विद्यार्थी प्रा. मोतीराज राठोड

यांच्या "बंजारा संस्कृती" आणि डॉ. सुदाम जाधव यांच्या "भिल्ल जीवन आणि संस्कृती" या ग्रंथाच्या प्रस्तावनांतून मी या अध्ययन-क्षेत्राकडे अभ्यासकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागात लोककथा, लोकगीतं, दंतकथा, आख्यायिका, आहाणे, उखाणे विखुरले आहेत. त्यांचे संकलन, संपादन होणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीनं डॉ. सरोजिनी बाबर यांच्या सुयोग्य मार्गदर्शनाने आजवर विपुल ग्रंथसंपदा प्रकाशित केली. या समितीचा सदस्य या नात्यानं मलाही या कार्याला हातभार लावता आला याचं मला अत्यंत समाधान वाटतं. या संशोधन-प्रकल्पांमुळं व ग्रंथांमुळं मऱ्हाटी लोकसंस्कृतीची कितीतरी दालनं उजळून निघतील असा मला विश्वास वाटतो.

## वेगळ्या धाटणीचं पण माझ्या आवडीचं

सौ. शैलजा राजे

माणूस वाढत असतो तो काही एका ठराविक संस्काराने. तेव्हा संस्कारातूनच संस्कृती निर्माण झाली की, संस्कृतीतून संस्कार याचा शोध घेऊ म्हटलं तर तसं कठीणच! पण माणसाची ही संस्कृती त्याच्यावर झालेल्या संस्कारातून निर्माण होत असावी. माणूस घडत असतो तो अशा संस्कारात्मक संस्कृतीमुळं!

पूर्वी संस्कार, संस्कृती हे शब्द असे वरचेवर ऐकू येत नव्हते. पण न ऐकताही त्याचे खोलवर झालेले परिणाम पहायला मिळत होते. आज हे शब्द तसे सवंग झाले आहेत आणि त्यांचं मूळ रूप मात्र हरवलं आहे.

आज आम्ही चार सहा जणी एकत्र जमलो म्हणजे बोलतो. ही बोलणी असतात सरदारी संस्काराची. ही फ्लॅट संस्कारात वाढलेली, ही सर्व सामान्यांच्या संगतीत वाढलेली, आणि ऐकता ऐकता माझ्या मनात येतं, "मी कुठं वाढलेली?" माझं अवघं बालपण तर मुंबईच्या चाळीतून गेलेलं. ब्राम्हणांच्या चाळीत आमचं एक मांसाहाराचं खाणं सोडलं तर सर्व वागणं तसंच असून आम्हाला कधी जागा मिळाली नाही. आमचं रहाणं मराठी, चौकळशी, पाचकळशी भण्डारी, सोनार अशी बिऱ्हाडं

असलेल्या चाळीतच! म्हटलं तर एकोप्यानं रहाणं आणि म्हटलं तर प्रत्येकाचं काही खास वेगळेपण! सणवार तेच, पण साजरं करणं वेगळं. शितला सप्तमीला आईनं केलेली नारळाची सांदणी, आळूची वडी, आंब्याचं लोणचं सारं या घरी, त्या घरी, पोचवताना मला कंटाळा यायचा. मी आईला म्हणायची, "सगळ्यांना कशाला द्यायला हवं?" आई हसायची न् तिच्या लकबीनं एक ओवी ऐकवायची—

**भाईबंध सारे राहिले ग परगावी**
**शेजारणीबाई पहिली हाक तुला हरी**

त्यावेळी त्या ओवीचा अर्थ नीटसा ध्यानी यायचा नाही. पण आता एखाद्या प्रसंगी चटकन घराची घण्टी वाजवली जाते त्यावेळी त्या ओवीचा नुसताच अर्थ नाही तर अन्वयही समजतो, स्पष्ट होतो.

शेजारी बापू नावाचा एक मुलगा रहायचा. भारी खोडसाळ! आम्हा मुलांच्या खोड्या काढण्यात त्याला मोठा आनंद! आम्ही मुली रडलो की, तो टाळ्या वाजवायचा. त्याची आई अडाणीच होती. आईच्या दोन इयत्ता शिकण्याचं तिला केवढं कौतुक! अडाणी पण मोठ्या मनाची. आपल्या मुलाचा स्वभाव ओळखून असणारी. तिचं बोलणं मिठ्ठास, पिठल्याला बेसन म्हणणारी. एकदा "आमच्याकडे बेसन केलाय" असं म्हणून मला खायला ओढून नेणारी न् बेसनाच्या लाडवाच्या लालचीनं मी जाणारी! ते तिखटजाळ पिठलं पाहून नाका डोळ्यातून अनेक कारणानं पाणी गाळणारी मी मला अजून आठवतेय. ती बापूची आई आमच्या आयांना बापुडवाणी होऊन म्हणायची—

**काय करू बाई पूत माझा नवसाचा**
**खोडीलपणा त्याचा सर्‍या झाला तरसाचा**

यावर कुणी तरी एखादी तिला उत्तर द्यायची–

**कशाला खंतावशी मैतरणी शेजारणी**
**ल्हान बाळीयाचं मन गंगेचं ग जसं पाणी**

हे असे सवाल जबाब त्या वयात कितीतरी ऐकायला मिळाले आहेत. त्यावेळी त्यातला भावार्थ कळत नव्हता. पण आता वाढत्या, कलत्या वयानं कितीतरी गोष्टी शिकवल्या. मनावर त्यांचा कधी आणि कसा परिणाम झाला हे कळलंसुद्धा नाही.

श्रावणात त्या सगळ्याजणींचं कसलं ना कसलं व्रत असायचं. पण त्यांचा एक नेम कधी चुकायचा नाही. सगळी कामंधामं आटोपली की, निवडणाला सगळ्याजणी आपापली सुपं घेऊन नारळा माडांच्या सावलीत बसायच्या. दृष्ट लागावी असं एकेकीचं अंगण! त्यात तुळशीचा माडा असायलाच हवा. आंघोळ झाली की, तिला हळदीकुंकू वहायचं, पूजा करायची आणि त्यातली प्रत्येक जण तुळशीच्या कानात सांगायची,

**" आई तुळशीमाते सांगते तुझ्या कानी,**
**जन्मभरी माझी सांभाल अहेवलेणी."**

आज ते आठवलं की, माझं मलाच नवल वाटतं. त्यांच्यापैकी कितीतरी जणींनी रात्री आपल्या पतीच्या हातचा खरपूस मार खाल्लेला असायचा. पोरांना दाराबाहेर ठेवून त्या बंद दारामागे पतीचं हे प्रेमाचं देणं त्या घेत असायच्या!... पण सकाळी चेहरा कसा प्रसन्न! न्हाऊन माखून तुळशीची पूजा! कुणी दिली असेल त्यांना ही शक्ती? ही सहनशीलता? हे प्रेम? आज आमच्या तीळ तोकडा का तीळ वाकडा या वृत्तीला हे सारं समजणं सुद्धा कठीण! मग आचरणं कुठलं? आता तर हे असं सहन करणं हेच पाप ठरायचं! एक मूर्खपणा व्हायचा!

दुपारी दारात निवडणं टिपणं करणाऱ्या त्या सकाळची नळावरची कुरबूर विसरलेल्या असायच्या. एकमेकींची सुख दु:ख विचारली जायची. अडीअडचणींची देवघेव व्हायची. कुणाची सून धुसपूस करीत असली तर शेजारीण हक्कानं वजावायची,

**मायेचं घर तुझं राहिलं कोसावर**
**सखूबाई इथं वागणं बैजवार**

त्यावेळचे त्यांचे शब्द कानावर पडत होते. अर्थ कळत नव्हता, पण ऐकून ऐकून मनावर ठसत होते. श्रावण, भाद्रपद, आश्विन हे सणांच्या धामधुमीचे महिने. कुणाकडे नवरात्र असायचं, अवधी चाळ आरतीला जायची. गणपती पासून आरतीला सुरवात व्हायची ती " अंबा बैसली घटावरी हो " इथपर्यंत! पुष्कळ आरत्या त्यावेळी पाठ होत्या. ऐकून ऐकून हे स्त्रियांचं लोकवाङ्मय असंच कर्णोपकर्णीच पाठ होत गेलं. जात्यावरच्या ओव्या तर कितीजणी तिथल्या तिथं रचून म्हणत. त्यातली एक आज आठवतेय–

**जात्यातलं पीठ जसं बायलीचं जिणं**
**पीठ पडे भुरुभुरु खुटा करी कुरूकुरू**

पीठ भुरुभुरु पडतं. पण हातातला खुंटा उगाचच कुरुकूर करतो! बाई काय भोगायचं ते भोगते, पण तरीही तिचं आयुष्य ज्याच्या हाती तो उगाचच कुरकूर करतो असाच अर्थ याचा घ्यायचा का?

चैत्र वैशाख वाळवणाचे दिवस! दारात वाळवण घातलेलं. कुणाचं रांगतं धावतं पोर ते वाळवण तुडवतं, उडवतं, अशावेळी एक शेजारीण दुसरीला सांगते–

**शेजारणीबाई सांभाळ तुझं वाळवण**
**अंजीबाईचा ग तान्हा करील माती मिसळण**

मातीत मिसळण करणारा तान्हा आणखी तिसरीचाच असतो. पण त्याचा राग नाही, सांगणारीच्या शब्दात कौतुक आणि वाळवणारीच्या शब्दातही कौतुकच! कारण सखी शेजारणीच्या या सूचनेवर ती म्हणते—

**अंजीच्या तान्ह्याहून मोलाचं का वाळवणं**
**संभाळ त्या सानुल्याला चटचटे वर ऊन**

हे असं प्रेम, हा जिव्हाळा, आता अप्राप्यच होत चाललाय. शेजारणीला सांगताना एकजण म्हणते—

**शेजारणीबाई एका दारानं दोघी वागू**
**अंगणी खेळताती तुझी मैना माझा राघू**

याहीपेक्षा आणखी एक कौतुकाची ओवी गाताना मी ऐकलीय. आपल्या दोन मुली न् एक मुलगा यांच्या संदर्भात आई म्हणते—

**शकूबाई सुमाबाई दोन बाजूंला तुळशी**
**तान्हा ग बाळ माझा मध्ये केवडा डुलशी**

मुलीच्या विपुल केशसंभाराचे कौतुक गाताना आई गाते—

**मोठमोठे केस माझ्या हातात माईना**
**लाडकी लेक माझी लिंबावाचूनी न्हाईना**

**मोठेमोठे केस खाली भुईला टेकले**
**न्हाण्यासाठी तिला बापे चौरंग आणीले**

**केवड्या काचऱ्याचा सुगंध गेला दूरवरी**
**ओल्या केसांची लेक उभी राही ओटीवरी**

लेकीच्या कौतुकाच्या या अशा किती ओव्या मी ऐकल्या आहेत. पण नुसतंच कौतुक नाही, त्याबरोबर तिला शिस्तीची शिकवणही

असायची. भांड्याचा आवाज झाला की, तिला दटावणी मिळायची –

**हंड्यावरी ताट नको करू नाद असा**
**मायेच्या घरीचा चालवी ग बाई वसा**

आणि मग आई म्हणते, काम कसं करावं तर जशी रांगोळीची रेघ! वाकडी तिकडी नाही. सुरेख. सरळ.

नुसत्या कामातच ही शिकवण नसायची. आपली लेक देखणी आहे याची जाणीव असलेली आई म्हणायची –

**देखणं ग रूप तुझं निवतील माझे डोळे**
**वाटेचा वाटसरू मान त्याची पुन्हा वळे**

**जाहल्या तिन्हीसांजा नको येऊ ओटीवरी**
**कुणा पाटलाचा घोडा येईजाई वाटेवरी**

अशी भीती वाटणारी आई लेकीला बजावते –

**तालेवार घरी जरी बापयानं दिलं**
**नको घेऊ बोल काय माऊलीनं दिलं**

लेकीला शिकवणारी, लेकीवर प्रेम करणारी आई, सुनेबद्दलही सार्थ अभिमानानं म्हणते–

**लेक पाजी पाणी सून गंगेवरी उभी**
**पोर नाही आली झाली संसाराची लोभी**
**पोर परक्याचं धन कशी देऊ तिला हाक**
**लाडके सूनबाई तुला माझी आहे भाक**

या आणि अशा ओव्या ऐकता ऐकता मी मोठी होत होते. मुलीपेक्षा मुलाचा घरावर अधिक हक्क ! म्हणून ती म्हणायची –

जाहल्या तिन्हासांजा ही ग लक्षुमीची वेळ
लाडके सूनबाई दिव्यामधी तेल घाल

लक्ष्मी आली घरा दारावरी मारी धक्का
मधू रे बाळा माझ्या उभा राही ज्येष्ठ लेका

लक्षुमी आली घरी आली पांगळच्या पायाची
तिनं ग बोली केली नाही परत जायाची

लक्ष्मी आली घरा कुठं देऊ मी जानोसा
आता ग उतरली माझ्या चुलीच्या आणोसा

लक्ष्मीला चुलीच्या आणोसात उतरवून घेतली. अन्न हे परब्रम्ह हेच यातून ती शिकवत होती.

मग नातवंडं झाली. त्यांची तर कोण अपूर्वाई ! त्यांना निजवताना अलगद एकेक ओवी बाहेर यायची–

माळचाच्या मळचामधी येसबंध ग कवळा
तान्हीया बाळाच्या दृष्ट झाली जावळा

माळचाच्या मळचामधी येसबंधाला आला गोंडा
तान्हीया बाळाच्या दृष्ट झाली गोऱ्या तोंडा

रहाणं तीन खोल्यांमध्ये पण गाण्यात रुवाब केवढा ! माहेरी गेलं की म्हणावं –

चार घोडे दवडले लेकीला ग आणायला
पुरणाचे हण्डे उतरले वाटायला

लेकीला मूळ गेला भाऊ नाही तरी भाचा
मोहन ग बाळ माझा जरीच्या पोषाखाचा

गाण्यांचं, ओव्यांचं भाण्डार अमाप! त्यावेळी त्याचं मोल वाटत नव्हतं. पण आता एकेक शब्द उरीकपाटी जतन ठेवावासा वाटतो. त्यातला अर्थ उमजतो.

गाण्यासारखंच गोष्टींचं भाण्डार! एकेक गोष्ट लाख मोलाची " मेला वर भरलं घर " ही कथा ऐकताना त्यावेळी बाळमन रमून जायचं! आता त्यातलं गुपित कळतं! राजाची लेक दैवयोगानं एका वाड्यात अडकते. तिथं एक प्रेत असतं. तरण्याबाण्ड देखण्या राजपुत्राचं! उशाशी चिठ्ठी असते, तुपाचा हण्डा असतो. त्याच्या पावलांना एवढं तूप घासलं तर तो जिवंत होणार असतो. राजकन्या निष्काम निर्लोप वृत्तीनं तेवढं तूप घासते. तहान भूक विसरते! वाटीभर तूप रहातं न् बरोबर असलेली दासी, तिचा डोळा चुकवून घसाघसा ते तूप संपवते. राजपुत्र उठतो. हातातली माळ त्या दासीच्या गळ्यात घालतो. राजकन्या निस्वार्थ वृत्तीनं त्या दोघांची सेवा करीतच असते. आणि अखेर तिच्या त्या सेवेचं फळ तिला मिळतं. राजपुत्राला सत्य काय ते समजतं! खूप मोठी आहे ही गोष्ट! ऐकताना भान हरपून जावं अशी. पण गोष्ट संपली की, आईनं म्हणावं,

" ऐकलंत ना सारं? आपण जे चांगलं काम करू, त्याचं फळ देव आपल्याला देतोच. देवाजवळ न्याय असतो. "

ही तिची शिकवण जन्मभर पुरलीय. तशीच ती बेलाराणीची गोष्ट! जिद्दीची! दुष्टपणाला शिक्षा होतेच हे सांगणारी!

या तिच्या गोष्टी मुलांना जमतील तशा सांगाव्या म्हणून मी आकाशवाणीवर सांगितल्या. पण या लोककथा. यांचा लेखक कोण? ना तिला माहीत ना मला? तिची कोंबडा पहाटेच का आरवतो हे सांगणारी " कुकुचकू " ही कथा मी आकाशवाणीवर दिली. सांगायला बोलवलं,

पण गाडं लेखकाबर आडलं! किती दिवस घोळ पडला होता? आई माझ्याकडे आली होती. मी म्हणाले, " तुझं नाव देते ! "

आई म्हणाली, " वेडी का काय तू ? अग ती मला माझ्या आईनं सांगितलेली. पण तीही तिला अशीच कुणी तरी सांगितलेली. अशा या जुन्या गोष्टी सांगत सांगत आलेल्या ! त्यांना कोण लिहितंय ग ? "

तिनं तिच्या शब्दात किती सहज या लोकवाङमयाची व्याख्या करून टाकली!

या अशा गोष्टी, गाणी, ऐकत ऐकत मी मोठी होत होते. आता जीव चुटपुटतो. वाटतं आईकडून सारं पुन्हापुन्हा म्हणून का नाही घेतलं? लिहून का नाही ठेवलं? आता सारी भिस्त्रण आठवणींच्यावर! आईच्या अंगावर दागिना फारसा नसायचाच. त्याची तिला खंतही नव्हती. म्हणतात त्याकाळी म्हणजे जवळ जवळ ऐंशी वर्षांपूर्वी आजोबांनी आईला तीन हजाराचे दागिने घातले होते. पितळेच्या लहान परातीत जेमतेम मावणारा तीस तोळ्यांचा नुसता चंद्रहारच होता. त्याबद्दल तिला कुणी विचारलं की, ती उत्तर द्यायची,

**सरी ठुशी चंद्रहार हवा कशाला ग सोस**
**एकाहून एक लेक माझे मला खरं ग भूषण**

अशी ही लोकगीतांची श्रीमंती शब्दांची, मनाची. तिथं अपपर भाव नाही. गरिबीची खंत नाही. श्रीमंतीचा हेवा नाही. एक गरीब बहीण दुसऱ्या श्रीमंत बहिणीला म्हणते. :–

**सखे साजणीबाई नको तुझा दावू झोक**
**तुझा चंद्रहार पदराखाली झाक**

**माझ्या ग कडेवर तान्हा माझा हसतो**
**आभाळीचा चांद जसा अंगणी डोलतो**

या साऱ्या ओव्या सही न् सही तिच्याच शब्दातल्या. त्या जुन्याच! कदाचित तिनं त्यांना थोडा स्वत:चा साज चढवलाही असेल! मला माहीत नाही.

तिच्या गोष्टी ऐकायला आवडायच्या. तिची ती "उघडा, उघडा दार" ही गोष्ट जन्मभर लक्षात राहिलीय.

लोकसाहित्य हे खास एका विचारसरणीनंच गोवलेलं आहे. सामाजिक ऋण, सामाजिक नीती, यांना हे बांधलेलं आहे. एवढं असूनही ते रुक्ष नाही. सामाजिक बांधीलकीचा बाद न घालता, त्याचं अवडंबर न मानता ते सहज सोप्या भाषेत, अगदी सामान्यांना समजेल असं आहे. आणि आपल्या रसाळतेनं ते नकळत सामाजिक बांधीलकी, समाजऋण, नीती या सर्वांचं मनन करायला लावणारं आहे. आम्हा स्त्रियांना "उघडा उघडा दार" ही कथा खूप काही सांगणारी आहे. ती इथं सांगण्याचा मोह मला आवरत नाही. कथा अशी आहे :–

'एक गाव होतं, तिथं दोन कुटुंबं रहात होती. दोन्ही घरात सारखीच माणसं! एक सासू, एक सून आणि एक मुलगा म्हणजे आईचा लेक, आणि सुनेचा नवरा. एका घरातली सून सालस, प्रेमळ, आपल्या सासूवर जीव असणारी. सासूसाठी धडपडणारी. कोणतीही गोष्ट सासूला विचारून करणारी. सैपाक करायला लागली तरी विचारणार, "सासूबाई, एवढं मीठ घालू? सासूबाई तेल किती घालू?...पाण्याला जाऊ?"

असा सासूवर जीव, लोभ आणि एक दिवस तिची सासू मरून गेली. सून धाय मोकलून रडली. खाईना, पिईना, नवऱ्यानं आणली एक लाकडी बाहूली करून! म्हणाला, "घे ही तुझी सासू! पण रडणं भेकणं थांबव!"

सुनेनं सैपाक घरात पाट मांडला. त्यावर ती लाकडी सासू ठेवली.

मग पावलास सासूला विचारणं सुरू झालं. गावातले लोक हसायचे. म्हणायचे, "हिला वेड लागलं, हिचं संसारात लक्ष नाही!"

सून म्हणायची, "असं का बोलता आया बहिणींनो? सासूबाईंना विचारल्याशिवाय मी कोणतीही गोष्ट करीत नाही."

तिचं बोलणं ऐकून वायका आणखीनच हसायच्या, "ही नक्कीच वेडी झालीय!" म्हणायच्या.

नवऱ्यालाही गावातील माणसं चिथवायची. चिडवायची. अखेर एक दिवस तो तावातावानं घरी आला. चिडलेला, संतापलेला, बोल बोल बोलला. वायकोला मार मार मारली आणि दिली तिला हाकलून! सून रडरड रडली. सासूची ती लाकडी प्रतिमा कडेवर घेतली. म्हणाली, "सासूबाई, ह्यांनी हाकलली, मारली. पण माझं काय चुकलं हो?"

बाहुलीनं नकारार्थी मान हालवली. (बहुधा तिचा तसा समज झाला असावा)

"सासूबाई, मी कुठं जाऊ? माहेरी नाही जाणार. तुम्हाला घेऊन माहेरी कशी जाऊ? लोक म्हणतील, लेकानं आईला घरातून हाकलली! त्यांना वाईटपणा कसा देऊ?"

रडत रडत स्वत:शीच बडबडत ती वाट चालत होती. चालता चालता काळोख पडायला लागला. जंगल लागलं. भ्यायली आणि एका झाडावर जाऊन बसली. रात्री त्याच झाडाखाली चार चोर येऊन बसले. त्यांनी कुठून कुठून चोरलेली संपत्ती आणली होती. आपापसात वाटण्या करीत होते.

झाडावर बसलेल्या सुनेला तेवढ्यात लागली डुलकी. हातातली सासू निसटली न् पडली धपकन् खाली चोरांच्या पुढ्यात. चोर घाबरले, म्हणाले, "इथं या झाडावर भूत दिसतंय पळा! पळा!"

घावरलेले चोर सगळं तिथंचं टाकून पळून गेले. ही सून पहाटे जागी झाली. पहाते तर सासू नाही! सासूबाई ऽ सासूबाई ऽ ऽ करीत भरभर खाली उतरली. बघते तर सासूबाई मध्ये, भोवती सोनं नाणं! पाहून आनंदली. त्या लाकडी सासूचे पाय धरले. म्हणाली, "सासूबाई, ही तुमचीच कृपा, आधी ह्यांना सारं देते. मग आपण कुठंही जाऊ! चालेल?"

सासूला घेतली काखेत. सगळं गोळा केलं. झुंजूमुंजू झालं होतं तोच घराशी आली, नवऱ्याचं दार बंद होतं. म्हणाली, "उघडा उघडा दार, माझ्या डोईला झाला भार!"

नवऱ्यानं दार उघडलं. बघतो तर बायको धन दौलत घेऊन उभी! मानानं घरात घेतली. जाऊ नको म्हणाला.

सून म्हणाली, "सगळं सासूबाईच्यामुळे झालं. त्यांनी दिलं." बातमी गावात पसरली. त्या दुसऱ्या घरातली सून होती खाष्ट! दुष्ट सासूला उपाशी ठेवायची. कामं करून घ्यायची. तिला हे कळलं. आली हिच्या-कडे सारं पोटात शिरून विचारून घेतलं. ही भाबडी, सगळं सांगितलं. झाडाचा पत्ता सुद्धा तिला सांगितला. ती विचार करीत राहिली. तिची सासू जिवंत होती. काय करावं? सासू मेल्याशिवाय लाकडी सासू कशी करायची?

मग एक दिवस घेतला धोंडा आणि घातला सासूच्या डोक्यात! सासू मेली. रडली, भेकली. नवऱ्याला म्हणाली, "आणा आपल्यालाही लाकडी बाहुली करून!"

नवरा बायकोच्या मुठीत. आणली करून बाहुली या सुनेपेक्षा सुबक! मग एक दिवस म्हणाली, "मारा, मला ह्या घरातून हाकलून, सकाळी घेऊन येते सोनं नाणं!"

नवऱ्यानं खोटी खोटी मारली. ही खोटी खोटी रडली. झपाझपा चालत त्या झाडाशी आली. झाडावर चढली. बसली चोरांची वाट बघत! चोर खाली येऊन बसले. हिनं दिली बाहुली खाली फेकून! चोर म्हणाले, "अरे, इथे कुणीतरी सवकलंय? मागच्यावेळी घाबरलो. पळून गेलो. दुसऱ्या दिवशी आलो तर जागी काहीच नव्हतं ! मध्ये पंधरा दिवस गेले. आपलं सुरळीत काम होत होतं. आज पुन्हा कुणीतरी मुद्दाम ही लाकडी बाहुली टाकलीय बघा! . . . ही बघा!"

एकजण झपाझपा झाडावर चढला. पाहिलं तर एक बाई! तिला सगळं विचारलं. घाबरलेल्या तिनं खरंखरं काय ते सांगितलं. चोरांनी नाक कापलं न् सोडली गावात. रात्रीचीच परत आली. दारावर धक्के देत बोलली, "उघडा उघडा दार, माझ्या नाकाला लागली धार!"

नवऱ्यानं दार उघडलं. नाक कापलेली बायको समोर! मुकाटचानं आत घेतली. कारण तोही या नाटकात सामील!

अशी ही गोष्ट! रंगवून सांगता येणारी आणि सांगता सांगता शिकवणारी. आजच्या वृद्धाश्रमाच्या जमान्यात थट्टा होणारी. पण तरीही समाजाला समज देणारी.

अशा कितीतरी या लोककथा. प्रत्येक लोककथेचं वेगळं वैशिष्टच! वेगळं धन! माणूस सवयीचा गुलाम बनतो. म्हणून माणसानं चांगल्या सवयी लावून घ्याव्यात असं सांगणारी, तीही अशीच मनोवेधक. अजून आठवणारी!

एक विद्वान ब्राम्हण होता. त्याला एकच मुलगा. हुषार एकपाठी. ब्राम्हणाची इच्छा त्यानं आपल्या सारखंच विद्वान पंडीत व्हावं. तो मुलाला शिकवायचा. मुलगा शिकायचा. हुषारच होता. लागलीच सगळं पाठ व्हायचं. पण एक सवय होती. सारा अभ्यास लोळून लोळून

करायचा! एकच मुलगा. लाडाकोडाचा. बाप मनात म्हणायचा, "लोळू दे ना? पण सारं शिकतोय चटाचटा."

शिकता शिकता मुलगा सगळं शिकला. मोठा झाला. ब्राम्हणाला वाटलं, त्याला आता राजदरबारी रुजू करावं. त्यानं मुलाला दरबारात नेलं. म्हणाला, "महाराज, हा माझा मुलगा, विद्वान पंडित झालाय. साऱ्या ऋचा पाठ आहेत?"

राजा ज्ञानाची कदर करणारा होता. त्यानं ब्राम्हणाला आसन दिलं. मुलाची परीक्षा घेण्यासाठी आपल्या दरबाराचे विद्वान, महर्षी, पंडित बोलावले. ते मुलाला प्रश्न विचारीत, पण मुलगा मख्ख उभा! एक शब्द तोंडातून निघत नव्हता. सारं पाहून ब्राम्हण चिडला, त्यानं रागारागानं मुलाला लाथ मारली. मुलगा आडवा पडला न् काय आश्चर्य! घडाघडा सारं बोलायला लागला! मुलगा विद्वान आहे हे पटलं, पण...

राजानं थोडीशी बिदागी दिली न् रवानगी केली. ब्राम्हणाचे कष्ट, तपश्चर्या, सारं फुकट गेलं. आपण वेळीच मुलाला शिस्त लावली असती तर? पण आता काय? बैल गेला न् झोपा केला.

अशा प्रकारच्या अनेक गोष्टी ऐकत ऐकतच मी मोठी झाले. नकळत मनावर संस्कार होत गेले, ते इतके दृढ खोलवर ठसले गेले की, पुसता पुसले नाहीत. या निमित्तानं त्यांची उजळणी झाली एवढंच. प्रत्येक सणा-मागची कहाणी, कारणपरंपरा आपल्या या लोकसाहित्यात सामावली आहे. आमच्या पूर्वजांनी ही मौखिक संपदा जतन केली. सर्वसामान्य माणसांना ती सांगितली. त्यांच्यापर्यंत पोचवली. त्यातून एक आगळी भारतीय थोर पारंपारिक संस्कृती निर्माण झाली.

आमच्या लोकवाङमयाचे पैलू तरी किती? मुलींना भोंडल्याची गाणी शिकवता शिकवता आणखीही बरचसं काही शिकवलं जात होतं. आता शाळेतून शारीरिक शिक्षण हा खास विषय शिकवला जातो. त्यातून शिस्त,

सामुदायिक जीवन यांची ओळख होते म्हणे! पण आमच्या फुगड्या, आमचा झिम्मा, पिंगा, कोंबडा, बस फुगडी, किती प्रकार असे आहेत की, खेळता खेळता हे सारं उमगतं. मुली एकमेकींना उखाणे घालतात. कोडी घालतात, सामान्य ज्ञान वाढवून घेतात. "वर आकाश, खाली आकाश, मध्ये पाणी" याचं उत्तर नारळ असं चटकनं मिळायचं तिथंच!

विहिरीच्या रहाटाचा उखाणाही असाच सामान्य ज्ञान वाढवणारा

**"गडगड बोलतो ढग नव्हे**
**सरसर चालतो साप नव्हे**
**पाणी देतो पाऊस नव्हे**
**गळ्यात जानवं ब्राम्हण नव्हे"**

मला आठवतंय याचं उत्तर किती वेळ आम्हाला आलं नव्हतं. आणि जेव्हा समजलं तेव्हा गावातल्या घराच्या "विहीरीवरचा रहाट" आठवला. त्याचं एवढं बारीक वर्णन कुणी केलं? या प्रश्नाला आईजवळ, आजीजवळ, उत्तर नव्हतं.

मुलाला समजायला लागलं, गोष्ट सांग म्हणायला लागलं की, पहिली त्याच्या कानावर पडते ती चिऊकाऊची गोष्ट! एक होती चिऊ, एक होता काऊ. काऊचं घर शेणाचं, चिऊचं घर मेणाचं. मग आला मोठ्ठा पाऊस! काऊचं घरं गेलं वाहून. तो आला चिऊकडे! चिऊताई चिऊताई, दार उघड!

त्याच्या या विनंतीला चिऊ एकेक उत्तर देते. बाळाची आंघोळ, बाळाची काजळ तीट, बाळाचं दूध, बाळाची झोप, बाळाची सारी कामं आवरल्यावरच ती काऊला दार उघडते. पावसात भिजणाऱ्या काऊला चटकन दार न उघडणाऱ्या चिऊताईचा त्यावेळी किती राग यायचा! आणि मग गोष्ट संपल्यावर त्या नतदृष्ट काऊला चिऊताईनं दारच

उघडायला नको होतं, असं वाटायचं! ती चिऊ-काऊची गोष्ट ऐकता ऐकता किती पिढ्या मोठ्या झाल्या असतील याला सीमाच नाही. आणि तरीही त्या अगदी साध्या वाटणाऱ्या गोष्टीतला आनंद आणि तिची गोडी, काही बाळमनावरून जात नाही. यालाच अक्षरवाङ्मय म्हणायला काय हरकत असावी?

हे लोकसाहित्य किती वर्षांपासून चालत आलंय याचा शोध घेणं किती कठीण आहे याचा अनुभव अभ्यासकांना आलाच असेल. भाषा किती साधी, आशय किती मोठा! तिन्हीसांजेला, दिवेलागणीला, बाळाला कडेवर घेऊन, "अडगुलं मडगुलं, सोन्याचं कडबुलं, रुप्याचा वाळा, तान्ह्या बाळा तीट लावू" असं म्हणणारी आजी, आई, ताई, यांना त्या शब्दातून जो आनंद मिळतो तो अवर्णनीय असतो.

मधल्या काही काळात या लोकसाहित्याचा अंत होतोय की काय अशी धास्ती काही विद्वानांना वाटत होती. परंतु महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती-बरोबरच लोकसाहित्य समितीची स्थापना झाली आणि आपलं अवघं जीवन त्या लोकसाहित्यात झोकून देणाऱ्या डॉक्टर सरोजिनी बाबरांच्या सारख्या अध्यक्षा समितीला मिळाल्या. आकाशवाणीवरून त्यांनी या लोकसाहित्याची जाग पुन्हा समाजाला आणून दिली आणि त्याच्या अभ्यासाला अनेकांनी पुन्हा सुरवात केली.

त्या अभ्यासकांची ती जाण जरी माझ्यापाशी नसली तरी त्या लोक-साहित्यातलं कोवळं देखणेपण मला जाणवतं. त्या ओव्या, ती झिम्मा फुगडीची गाणी, ते मैत्रिणींना उखाणे घालणं, सारं आठवलं की, मनात आनंदाचे कारंजे उडतात. ते कोवळं निरागस बाळपण आठवतं आणि समोर असणाऱ्या एखाद्या सखीला उखाणा घालावासा वाटतो.

**घमघम घमाटा विषाचा काटा**
**सोन्याची देऊळ रुप्याच्या घण्टा**

मला माहीत आहे याचं उत्तर चटकन कुणाला देता येणार नाही. कारण ती सारी नारळी फणशीची झाडंच आता नाहीशी झालीत. या उखाण्यातचं उत्तर "फणस". अशीच एखादी माझ्यासारखी आजी, काकू, मामी यांच्यात वाढलेली देऊ शकेल. त्यासाठी भोवती आठदहा आते मामे चुलत भावंडांचा मेळावा हवा. मग अशा सवाल जवाबांना जी चढत्या कमानीत रंगत येते ती औरच !

गौरगणपती घरात आलेले. अंगण ओले झालेलं आणि त्या ओल्या अंगणात फुगड्या खेळता खेळता एकमेकींच्या उखाळ्यापाखाळ्या उखाण्यातून काढण्याचा आनंद आगळा. हा आनंद मी बालपणी लुटला आहे. आम्ही खेळत असावं, मोठ्या बायका दारात बसलेल्या असाव्या आणि आमच्या या धिंगाण्यात त्यांनी भाग घेता घेता नवीनवी गाणी ऐकवावी. आणि ती ऐकताना आम्ही खदखदा हसावं! कारण ती गाणीच तशी असायची. एखादी म्हणायची –

**गौरी गौरी छान जसं केवड्याचं पान**
**म्हाताऱ्या बोवाची भलतीच शान**

यावर दुसरीनं म्हणावं –

**सावळी ग सावळी दारीची जांभळी**
**नवऱ्याला दारीची वेलच कवळी**

यातला अर्थ काही उमगायचा नाही. पण एवढं कळायचं की, दोघी-जणी एकमेकींला चिमटे घेताहेत !

लोकसाहित्य हे असंच सर्वच दृष्टीनं आगळं ! ते कधी मायेनं ओथंबून आलेलं असतं, तर कधी हे असं मनाला झोंबणारं असतं. कारण ते असतं सर्वसामान्यांचं ! कोळी, कुणबी, माळी, शेतकरी, लोहार, सोनार या सर्वांच्या जीवनाचं प्रतिबिंब त्यांच्या त्यांच्या बोलीभाषेत या लोक-साहित्यात गोवलेलं आहे.

असलं काहीतरी वेगळ्या धाटणीचं, पण मला आवडणारं असं ऐकता ऐकता मी मोठी होत होते. त्यावेळच्या समाज रचनेप्रमाणे आम्हाला गाण्यातून, ओव्यातून, शिकवलं गेलं. ती व्रतं, ते सण, त्या, रांगोळ्या, ते सारं आता आठवणीतून पुसट पुसट होत गेलंय पण तरीही कधी ओव्या आठवल्या, ती गाणी आठवली, ते खेळ आठवले, की वाटतं आईचा प्रेमळ हात पाठीवरून फिरतोय! ... त्या मायेनं जीव वेडा होतो. अशा वेळी लोकसाहित्यानं दिलेली ही बहुमोल देणगी जतन करायला हवी, एवढंच समजतं.

# अशी सुरंगा राहते रेलून

प्रा. डॉ. सुमन पाटील

बीजाचे मातीशी नाते तशा प्रकारचे माझ्यातल्या "मी"चे लोकसाहित्याशी नाते आहे. लोकसाहित्याने "मी"ला आकार आला. संस्कारातील सहजता लोकसाहित्यातील अनेक ओव्यांनी, म्हणींनी, कथांनी, चुटक्यांनी प्राप्त करून दिली. संपन्न मनोवृत्तीमुळे मनाला प्रसन्नता लाभली आणि त्यामुळेच आयुष्याच्या सुरुवातीलाच लाभलेली भैरवी आयुष्यभर मला आनंदाने गाता आली. हे असे लोकसाहित्याच्या पाळामुळांनी वेढलेले जीवन जगताना अंगणातील तुळस वेल्हाळपण मिरवीत राहिली.

**गडन मी ग केली इंद्रसभेची पद्मिनी**
**माझ्या ग अंगणात तुळशीबाई वृंदावनी**

**सकाळी उठूनी मला अवचित लाभ झाला**
**दशरथ बाई पुत्र राम मुखाला माझ्या आला**

अशा या ओव्या गात गात उजाडणारी पहाट ही घरीदारी आनंदाचे
 वरदान देणारी ठरली. जे जे मनाला आनंद देणारे, सुंदर, पवित्र,

सोज्वळ तिथं तिथं ईश्वरी अधिष्ठान असतं ही अध्यात्माची मर्म गर्भातली ठेव अधिक दृढमूल झाली

"संस्कृतिके चार अध्याय" या रामधारीसिंह दिनकर यांच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिताना पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात, "संसारभर में जो भी सर्वोत्तम बाते जानी या कही गयी है, उनसे अपने आपको परिचित करना संस्कृति है। संस्कृति शारीरिक या मानसिक शक्तियोंका प्रशिक्षण, दृढीकरण या विकास अथवा उससे उत्पन्न अवस्था है।" लोकसाहित्याच्या आपल्यावर होणाऱ्या संस्कारामुळे ही गोष्ट सहज साध्य झाली. व्यक्तिगत जीवनातील आनंद आणि सामाजिक जीवनातील आनंद हे परस्पर विरोधी नसून परस्पर पोषक आहेत याची जाण लोकसाहित्याने जीवनाच्या उषःकालीच प्राप्त करून दिली.

**समोर सोप्यामंदी कुणी ठेविला जांभ पेला**
**माझ्या बाळाचा मैतर बाळा शेजीचा दूध प्याला**

**तुझा माझा हा मैत्रपणा मैत्रपणाला काय देऊ**
**एक लवंग दोघी खाऊ सखये बाई**

**वाट नि वैयलं शेत आल्या गेल्यांला देते पेंडी**
**राजस माझ्या बंधू तुझी पिकूं दे सव्वाखंडी**

ही गाणी ऐकत ऐकत मोठ्या होणाऱ्या ग्रामीण जीवनातील, कृषी संस्कृतीतील, आम्ही महिला आपुलकीचे, जिव्हाळ्याचे, मैत्रीचे, सचोटीचे संस्कार सहजतेने आत्मसात करीत, दिल्या घेतल्या शब्दांच्या शपथा न घालताही उदात्त भावना स्वीकारीत, आत्मविकास साधीतच मोठ्या झालो.

**अखेर माझे जीवन म्हणजे माझे कळणे**
**तिमिरही माझा दिवा ही माझा माझे जळणे**

ही ताकीद लोकसाहित्याच्या सततच्या सहवासाने प्राप्त झाली. त्यामुळेच मनाचे कढ मनातच मागे सारीत, विकारांवर मात करीत, विचारांची कास धरून पांडुरंगाशी संधान बांधणे मनाला सहज साध्य करता आले.

पंढरी मी ग जाते उभी राहिले धर्मशाळं
पांडुरंग विचारीतो कवा आलीस लेकीबाळं
पंढरपुरामंदी माझं माहेर साजणी
देव विठ्ठल शिवी चोळी हरिनामाची गजयिनी
सीताला वनवास ती का सांगती येलोयेली
रामाच्या रंगम्हाली न्हाई सीतानं सुखं खाल्ली
मंदोदरी ती काय म्हणी सीताबाई तू माझे भैनी
रावणाचं राज्य चल खाऊया दोघीजणी
सीताबाई ती काय म्हणी मंदोदरी तू माझे काशी
माझ्या रामाच्या राज्यामंदी तुझ्यासारख्या माझ्या दासी

या ओव्यातून सुख-दुःख, मान-अपमान, उपहास, सन्मान यातील सीमारेषा उकलत गेल्याने मन तृप्त होत राहिले.

स्वप्नाळुवृत्ती, मागल्या जपण्याचे सोलीव सुखाचं स्वप्न, काव्यात्म आनंद, विभोर भाववृत्ती, समारंभप्रियता, स्वीकारलेल्या आयुष्याक्रमावरील अनन्य निष्ठा, लोकसाहित्याने माझ्या व्यक्तिमत्वात क्षणाक्षणाने विकसित केली.

नाचार संसारात गेले सुईच्या येजातून
ते ग निघून कवा गेलं बाळ माझीच्या राज्यातनं
दुबळं माझं घर नाही दुबळा माझा नूर
 समोर अंगणात पाणी पन्हाळी तुळशीवर

जात्या तू ईसवरा कोण्या डोंगरीचा ऋषी
आई नि भैनीवाणी हुरदं उकलीते तुझ्यापाशी
बंधुजी पावणा शेजी म्हणती आला आला
राजस माझा बंधू चांद वाड्यात उगवला

यासारख्या ओव्या गात गात आयुष्याची उभी चढण चढताना जो प्रत्ययकारी आनंद मनाला सामर्थ्य देत राहिला तो केवळ माझा आणि माझाच आनंद आहे. या जाणीवेने आयुष्याला आशयगर्भ प्राप्त झाला.

सतत कष्ट करीत असताना कधी कातावलेपण, वैतागलेपण, जाणवलं नाही असे नाही. पण ती अवस्था फार काळ टिकली नाही एवढे मात्र खरे. लहानपणी काम सांगताना आई, आजी, कधी ओव्या म्हणून, कधी सांगून, आळस कंटाळा घालवून, श्रमाला सामोरं जायला भाग पाडीत असायच्या, त्याचा हा परिणाम असावा.

दिवस उगवला किरणं फेकीत झपाझपा
राजस माझी बाळ ऊठ चांदणी लोट सोपा
लाडक्या लेकीला तिला लाडाचं काम सांगा
राजस बाळाईला देवपूजेला पाणी मागा
काम ग करीताना पाची बोटांची पडली मिठी
माझ्या ग बयाचं दूद खेळतं मनगटी
माज्या अंगाचा अंगलोट सया बघती न्याहाळूनी
बापबयाच्या जिवावरी हुता परान खेळूनी

यासारख्या ओव्यांनी हुरूप यायचा. कष्टाची कितीही कामं करावी लागली तरी मनाला मरगळ वाटायची नाही.

लोकसाहित्यानं आणखी एक सर्वात मोठी देणगी मला दिली ती खेळकरपणाची. गंभीर-गंभीर प्रसंगात सुद्धा फार काळ स्वतःशी कुढत

राहणं, मनात खंतावले असले तरी स्वतःचंच दुःख गोंजारत, कुरवाळत राहणं कधी जमलं नाही. पण—

**वाईट बोलशील नाही तुझ्या मी बोलाची**
**पित्या माझ्या दौलतीची वाकी उत्तम वेलाची**
**पाप्याच्या पितरा कसं पापाचं बोललास**
**राळ्याच्या कणीवानी माझ्या नेतरी लागलास**

असं म्हटलं की, अपमान गिळला जायचा.

**सुंदर नारीचं चित्त नाही थाऱ्यावरी**
**तीन चिपट्या दळान दळी खडया दुपारी**
**म्हणे सख्याना माझा अटोप झालाय भारी**
**पाणी आणा ग तांब्याभर तवा तापलाय चुलीवरी**

घरात कामाचा रगाडा पडला की, माझी आजी हटकून हे सगळं बडबडायची आणि मग हसता हसता कामाला गती यायची. उपास-तापास जमत नाहीत, तर करू नये हे लहान वयात कळत नव्हतं. आपणही ते सगळं संयमानं करू शकतो हे दाखवायची हौस आणि दिवसभर जी गंमत उडायची ती काय सांगावी? हटकून कुणीतरी ती चुटक्याची आठवण करायची—

**आज माझा फराळ नऊ नाराळ**
**बत्तीस केळं चार सीताफळं**
**तीन शिळ्या भाकरी वर मेथीची भाजी**
**तिकंडनं आलं दाजी त्यांना मी लाजी**
**आणि उपाशीच निजी**

मग जो आनंद व्हायचा तो प्रत्येकवेळी ताजा टवटवीत असायचा!

स्वतःकडं तटस्थवृत्तीनं बघणं आणि विनोद करण ही एक अवघड वृत्ती लोकसाहित्यामुळं माझ्या व्यक्तिमत्वाला प्राप्त झाली. कुणाची

खोड काढावयाची, मिस्किल टोमणा द्यायचा तर परतफेड घ्यायची तयारी पाहिजे!

**सुपाएवढा कानाच्या गुंजवाणी डोळ्याच्या**
**तुडवशील माझा पाय**
**नकट्या नाकाची चपट्या डोईची**
**कोण 'तुडवतंय् तुझा पाय'**
**ऐक रे कुंपणावरच्या सरणोबता**
**काय ऐकतेस माणकाबाई**

तू तरी उगाच उगाच त्या पोराच्या नादाला लागावं काय?

हा संवाद मग नेमका म्हणून दाखवायचा आणि हसायचंच हसायचं. गंमत येते. लहानपणी दारातला केर काढायला जरा आळस केला की, हटकून कुणीतरी म्हणावं –

'घरादाराला लागली घाण आत नांदती गोरीपान!' तुझं तसं म्हणावं तर दुसरी म्हणायची 'सुमाचा रंग की ग पान कळा?' आणि मग क्षणभर वाईट वाटायचं, कधी कधी आजी गंमत करायची.

**जावई वजिराचं त्याचं घोडं ग बाभळीला**
**सुमाक्का बाळाईला न्ह्याला आलाय वाघळीला**

माझ्या दिसण्याची ही चेष्टा मोठी धम्माल उडवून द्यायची आणि मग निदान चांगलं असावं तरी म्हणून अंतरंगाच्या नाना कळा आत्मसात करण्यात मन गुंतून पडायचं!

'लोकसाहित्य आणि मी' याचा सर्वात मोठा ऋणानुबंधनिसर्ग-प्रेमाचा. झाडंझुडपं, डोंगर, सागर, वेलीफुलं, धरती, आभाळ हे सगळे सवंगडी वर्षाकाळी हिरवा कंच शालू नेसून, हिरवा पाचू लेवून, वेणीत मरवा घालून धरती नटली की, होणारा अनामिक आनंद ओव्या गाऊन

एखाद्या तिन्हिसांजेला व्यक्त करताना जे तृप्तपण लाभते ती खरी, तीच खरी, लोकसाहित्याची देणगी.

**तिन्ही सांजा झाल्या दारी दोडकी फुलयीली**
**माझ्या ग अंगणात आई लक्षुमी डोलयीली**

**पडितो पाऊस ईजबाईचा चाबूक**
**धरतरी बाईवरी नवरी निघाली बारियीक**

**पडतो पाऊस चिमणीबाईचा गलबला**
**धरतीबाईचा कंत आला**

**सुताराच्या मेटावरी टिपणीबाईचं माह्यार**
**राजस माझा बाळ माझा मुराळी झाला स्वार**

**पाऊस लागुलायी कुरीबाईला धाडा चिठ्ठी**
**सोन्याचा चाबुयीकू दीर दाजीच्या पाठी**

**चुडयाचे माझे हात कुरीबाईच्या चाडयावरी**
**बंधुची नदयिरु भैना बाईच्या पेऱ्यावरी**

उन्हाळ्याने तापलेल्या जमिनीवर वळवाचे काळेकुट्ट ढग कोसळून गेले की, धरती हिरवं चीट नेसते. त्यावेळी हिरव्या रंगाच्या अनेक छटा जमिनीवर उमटतात. पुढे रोहिणीच्या पेऱ्याला शेतात नेलेल्या कुरीचं नाव काशी ठेवलं जातं. भारतीय संस्कृतीत काशीविश्वेश्वराला असलेलं पावित्र्य या कुरीला प्राप्त होते, त्यापेक्षा अडाणी बायाबापड्या आईला काशी म्हणतात. कुरीला मातेप्रमाणे काशी संबोधले जाते ! मातेला मुलांच्या संगोपनाची चिंता तशी या कुरीलाही असते, अशी शेतकरणींची कल्पना. धरती ती नवरी, वळीव पाऊस तो नवरदेव, त्याच्या कोसळण्यानं लोकांना अचानक आलेल्या नवरदेवामुळं गोंधळ घालावासा वाटतो. पण जमीन मात्र आपला कांत आला गलबला करू नका असे सांगते. लगीन वेळेला वीज करवली होऊन ढगाढगात मिरवते. करवलीचे

मिरवणे किती सुंदर काचनेणं साकार झालं ! पाऊस पडतो तेव्हा त्याच्यावर विजेचा बारीक चाबुक चमकत जातो आणि जमिनीवर कुरी नवरी मिरवत जाते, अशा मीलनाच्या कल्पनेनं पाऊस, वीज, कुरी आणि धरतरी जिवंत केली जाते. पाऊस सुरू झाला की, कुरीच्या माहेरी म्हणजे सुताराच्या मेटावर राजस बंधु किंवा पुत्र मुराळी म्हणून धाडला जातो. कुरीबाईला निरोपाची चिठ्ठी पोचते. सोन्याचा चाबूक दोर दाजीच्या खांद्यावर शोभतो, चुडयाचे हात कुरीच्या चाडयावर उठून दिसतात. बंधुची नजर वहिणीच्या पेऱ्यावर असते. घरात भलं थोरलं चौघींच्या ओढणीचं जातं घरघरू लागतं नि रयताचं भलं थोरलं घर नांदतं राहतं! कुटुंब जीवनातील हे काव्य, समृद्धी, स्वास्थ्य, सुरक्षितता लोकविद्यापीठातून मिळालेल्या या लोकसाहित्याच्या संस्कारातून अनंतकाळ जोपासली गेली आहे.

मानवी नात्यातलं भव्य उदात्तपण सतत वाहतं आहे. निरपेक्ष माया करण्याचं तत्त्वज्ञान या लोकसाहित्यानं अनंत काळापासून जोपासलं आहे. सद्‌गुणी असणं हीच सद्‌गुणी माणसाची किंमत असते. बाजारी किंमतीची त्याला गरज नसते. यातील ध्येयवाद पुस्तकी ज्ञानाचा, संस्कार न झालेल्या या समाजाला लोकसाहित्यातून मिळाला.

**उभ्या गल्लीनं मी का जाते खडा हालंना जमिनीचा**
**बया माझ्या त्या मालनीचा वेल शीतल जाईचा**

**दुबळी गडन ती का असूं दे माझी मला**
**तिच्या रांजणाचं पाणी माझ्या हुईल गरजेला**

**तुझ्या नि जिवासाठी जीव माझा ह्यो भिरोभिरी**
**माझ्या तू गडनी एक इळाची घाल फेरी**

**पेटला डोंगर आग लागली तणाला**
**बया माझीला किती सांगू वाटं अवघड मनाला**

यासारख्या ओव्यातून सामान्य जनजीवनातील रूढ व्यवहारात सुरळीतपणा राखणारा संस्कार आपसूक घडत राहतो. हे आज प्रौढ वयात तीव्रतेनं जाणवल्याखेरीज राहात नाही.

सण, व्रतं, वैकल्यं, लग्न समारंभ यातून वावरताना लोकसाहित्यानं मनाला जो आल्हाद दिला तो अनुभूतीचाच विषय. रसिकत्वच जणु लोकसाहित्यातील या दालनामुळं समृद्ध झालं.

**उठ उठ माळीदादा बैलं जूप न्हाटाला**
**बैलं जूप न्हाटाला पाणी जाऊं दे पाटाला**
**पाणी जाऊं दे पाटाला नारळीच्या देठाला**
**नारळीची पाच पानं गवराईच्या ववशाला**
**गवराईचा ववसा फुलानं डळमळी**
**फुलानं डळमळी ग उदानं परमळी**

दरवर्षी श्रावण सुरू झाला की, ही गाणी मनात पिंगा घालत राहतात. नकळत ओठावर शब्द खेळत राहतात. गवराईचा ववसा आणि गणपती यांच्याशी नातं आता राहिलं नाही तरी काव्यमय भावनांनी मन भारून जातं. लोकसंस्कृतीच्या क्षितिजाची कक्षा उंचावते आणि नितळ आनंद मनातून ओसंडत राहतो.

**काळी कुळकुळी मांजरी दारी कृष्णाताचा खेळ**
**खेळत खेळत बाई झाली मध्यान रातरं**
**राही कवाड उघड न्हाई मी कवाड उघडायची**
**तुमच्या अंगावरचा शेला कोणा वालंबीला दिला**
**न्हाई मी वालंबीला दिला**
**बाळपणीचा मैतर त्येच्या लगनाला दिला . . .**

तालवद्ध असं हे गीत गाताना त्यातलं काव्यसौंदर्य आणि पुरता अर्थही पूर्वी उलगडला नव्हता. पण झिम्म्याला गती देणारं हे गाणं भिगरीसारखं

घुमतं आणि आम्हाला घुमवत राहतं तेव्हा भादवा साजरा झाल्याचं पुरतं समाधान मनात दाटून यायचं ते आजही तसंच जाणवतं आहे !

तर असं हे लोकसाहित्याचं विविधरंगी इंद्रधनुष्य लोकजीवनाच्या अवकाशावर लोकक्षितिजावर तरळतं आहे. त्यावर मी सुरंगा होऊन अशी डौलानं रेलून राहिले आहे. म्हणून म्हणावंसं वाटतं –

**रंग रंग हे भिनती जमती**
**मीच होतसे इंद्र धनू**
**अन् तुझ्या जिवाच्या अवकाशावर**
**अशी सुरंगा राहते रेलून**

# आदिवासींचा संकेत

डॉ. भाऊ मांडवकर

माझ्या लेखनाला प्रसिद्धीचा पहिला स्पर्श लोकसाहित्यापासून झाला. माझ्या लहानपणी माझे पहिले लेखन एका लोककथित उखाण्याच्या रूपाने प्रसिद्ध झाले. मराठी पाचवी-सहावीत असताना बालवाङमय वाचण्याचा छंद वाढला. खेळगडी, आनंद, मुलांचे मासिक ही मासिके आम्ही वाचू लागलो. मालवणचे पारुजी नारायण मिसाळ यांनी चालविलेले 'बालसन्मित्र' मुलांना अगदी जवळचे वाटे. कारण लहान मुलांचे लेखन 'बालसन्मित्रा'त आवर्जून प्रकाशित केले जाई. इ. स. १९४५–४६ च्या दरम्यान 'बालसन्मित्रा'त माझा पहिला उखाणा प्रसिद्ध झाला. त्यावेळी मी मराठी सहावीत शिकत असेन. तो उखाणा असा होता–

**इकडून गेली उगोमुगी**
**तिकडून आली गालफुगी**

ह्या वऱ्हाडी उखाण्याचे उत्तर होते, 'विहिरीतून पाणी ओढणारी मोट.' टाक्यात पाणी ओतून ती निमुळत्या अंगाने चुपचाप विहिरीत

जाते आणि वर येते ती चांगली टुंब फुगून ! मोटनाड्यांचा पलिता–समदुर यांचा आवाज करीत !

'बालसन्मित्रा'ने आम्हाला असे लहानपणी लेखक केले ! सरोजिनी बाबर, यू. म. पठाण, वा. मा. हराळे अशी नावे त्यावेळी 'बालसन्मित्रा'तून प्रकाशात आली. यू. म. पठाण, सरोजिनी बाबर यांना मी त्यावेळेपासून नावाने ओळखू लागलो. यवतमाळ जिल्ह्यातल्या कळंबसारख्या चिटुकल्या गावात गरीब शेतकरी कुटुंबातल्या माझ्यासारख्या घरातून पहिल्यांदाच शिकलेल्या पोराचे हे लहानसे लिखाण प्रसिद्ध होताच गावभरच्या अक्षरमित्रांना माझे मोठे कौतुक वाटले. लोकवाङमयातून लेखक झालो ही गोष्ट त्यामुळेच मी आयुष्यात विसरू शकत नाही. 'बालसन्मित्र' अशा तऱ्हेचे लिखाण प्रसिद्ध करी. ते मी वाचत असे. वाचता वाचताच लिहू लागलो. पारुजी नारायण मिसाळ यांनी आमचे मनभरून कौतुक करणारी पत्रे लिहिली. त्या आठवणी मनात वागवून लग्न झाल्यावर अमरावतीला प्राध्यापक असताना १९६० सालच्या शेवटी मालवणला मिसाळ गुरुजींच्या घरी गेलो. त्यांच्या फाटक्या घराची वाताहात पाहिली. गुरुजी नव्हते. त्यांचा एक मुलगा या जगात राहिला होता व तोही आजारीच होता. अमरावतीला परतल्यावर काही दिवसातच कळले की, मिसाळ गुरुजींच्या घरातला तो शेवटचा दुवाही संपला ! लोकसाहित्याचे पहिले पाठ देणारे एक गुरुगृह संपल्याचे मनस्वी दुःख मला त्यावेळी झाले.

१९४५–४६ च्या दरम्यान व त्यानंतर लोकसाहित्य संकलनाचा एक छंद मला जडला. परिणाम असा झाला की, विदर्भाच्या उपेक्षित मानल्या गेलेल्या यवतमाळ भागातील शेकडो लोकओव्या, लोकगीते, लोककथा, संकलित करून ठेवल्या. त्याच वह्यांच्या भांडवलावर माझ्या लोकसाहित्य-संशोधनाचा, लोकसाहित्य-लेखनाचा, इमला अजूनही उभा आहे, हे कबूल करताना मला आनंद वाटतो.

मराठी ५ ते ७ या वर्गात मी शिकत होतो त्यावेळी लोकसाहित्य गोळा करण्याकरिता मला माझ्या आईचा फार उपयोग झाला. ती अनेक सणोत्सवांमध्ये भाग घेऊन उत्साहाने लोकगीते गाई. दिवाळी, दसरा, माही-पौर्णिमा, नागपंचमी आदी सणोत्सवप्रसंगी ती व तिच्या मैत्रिणी आमच्या अंगणात जमून सुरस आवाजात लोकगीते गात. ती गीते मी लिहून घेई. कधीकधी तर त्या त्या लोकगीतांच्या कृती करण्यासाठी माझ्या वयाच्या मुलींमध्ये मी चक्क मिसळून जाई! त्यापायी मुलेमुली मला 'हांडुन्या' म्हणून चिडवीत. 'बायकांत पुरुष लांबोडा' असा त्या वऱ्हाडी शब्दाचा अर्थ आहे. लोकसाहित्य संकलनाच्या हव्यासापायी मी ती टीका सहन करी. माझी वहिनी माझ्याच वयाची वा थोडी मोठी असेल, तिच्या सोबत मी फुगड्या, झिम्मा असे खेळ खेळून तिच्या तोंडची लोकगीते ऐकून लिहून घेई. या वृत्तीमुळेच मला वऱ्हाडातल्या लोक-साहित्यामधील वारकावे टिपण्याची सवय झाली. महादेवाची गाणी, नागपंचमीच्या 'वाळचा' वा 'अरवळचा', दिवाळीची गाणी, गुरांवरील गीते, माही-पौर्णिमेची गाणी इ. लोकसाहित्य मी अशा प्रकारे बाया-बापड्यांमध्ये मिसळून गोळा केले.

'पाण्याला गेली गोरी, तिची कंबर ढिली' यासारखी रसीली लोक-गीते मला घरा शेजारच्या जागोमामा नंदुरकर यांच्याकडून मिळाली असली तरी त्यासाठी मला त्या लहान वयात मोठे मोल द्यावे लागले. या माझ्या मानलेल्या मामाकडे एक ढोलकं होतं. जागोमामा खड्या आवाजात लोकगीते गात असे. चोळच्याच्या झडत्या जोराजोराने म्हण-ताना त्याच्यात आणि माझ्या वडिलात स्पर्धा चालत असे. या मामाला ढोलकी वाजवणे, दंडारीत गाणे बजावणे करणे, गणगौळणी म्हणणे अशा गोष्टींचा शौक होता. या शौकापायी रात्ररात्र जागण्यात त्याला रस होता. मात्र त्याची एक खोड होती. तो कधी कधी गांजाची चिलीम ओढीत असे. आम्हाला त्यातले फारसे कळत नसले तरी एकदा त्याने गांजाची पुडी आणण्याकरिता मला पाठवले. आम्ही ती दुकानातून

आणून दिली. काय झाले, कोण जाणे, पण त्या दिवशी मामाला ती चिलीम चढली व मामा खूपच बेताल वडबडू लागले...! छाती वडवू लागले...! आरडाओरडा करीत धावू लागले...! लोक जमले. वघे गंमत पाहत असताना तमाम लोकांना उद्देशून त्या धुंदीत मामांनी भंडाफोड केला, 'मला या पोरानं आणून दिलेली भांग चढली!'... झाले, लोकांचा समज मीच त्याला ती जबरीने दिली असा झाला. खरे तर त्या धुंदीत बरळणाऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करायला हवे असते. पण तेवढा पाचपेच अडाणी जनता थोडीच ठेवणार आहे? लोकांनी मलाच वेठीस धरले. आईला ते कळले तर तिने मला बेदम मार दिला. मी कळवळलो. दुसऱ्या दिवसांपासून मामांची साथ, त्यांचे घर वर्ज्य करण्याचे ठरविले तर मामांनीच घरी येऊन क्षमायाचना केली, 'भाऊराव, माझ्यामुळे तुला बाईनं मारलं. आजपासून गांजा ओढीन तर शपथ!' त्या दिवसापासून मामा निर्व्यसनी झाले आणि मला त्यांच्या जवळच्या लोकगीतांचे भांडार खुले झाले. मामा पुढे साधू झाले तरीही मला लोकगीते ऐकवण्याचा क्रम त्यांनी अनेक वर्षे सुरू ठेवला.

यवतमाळचे कवी पांडुरंग श्रावण गोरे यांचे 'वऱ्हाडी लोकगीते' हे पुस्तक माझ्या वाचनात फार आधी आले होते. मी जमवलेल्या लोक ओव्या आणि त्या पुस्तकातील ओव्या यांची छाननी मी केली. गोरे यांनी जमविलेल्या ओव्यांपेक्षा अधिक आणि वेगळ्या ओव्या मी जमविल्याचा आनंद या निमित्ताने उपभोगला. पांडुरंग श्रावण गोरे हे लोकांमधील साहित्यिक व्यक्तिमत्व होते व ते मला आवडले होते. लोकसाहित्याचा त्यांचा गाढा अभ्यास होता. लोकसाहित्यावरचे त्यांचे लेखन मी वाचले होते. त्याचा परिणाम म्हणूनच की काय, १९५७ च्या जूनमध्ये यवतमाळच्या अमोलकचंद महाविद्यालयात मराठीचा प्राध्यापक झाल्यावर लोकसाहित्यावरची व्याख्याने गावोगाव देण्याचा सपाटा मी सुरू केला! गणेशोत्सव, शारदोत्सव, स्नेहसंमेलने व इतर कार्यक्रमात 

ग्रंथालय ठाणे
ग्रं. क्र. 3208
20222
२१५।८६

व्याख्याता म्हणून मला बोलावले, तो मी, तेव्हापासून तो आजपर्यंत लोकसाहित्याचा विषय प्रथम सुचवतो व कार्यक्रम घेणारांनी तो मान्य केला तर त्यावरच बोलतो. माझी ही तपस्या सुरू ठेवण्यानं मला सतत समाधान लाभत आले आहे अशी या विषयावरची व्याख्याने गेल्या २८ वर्षांत किती दिली त्यांची नोंद मी ठेवलेली नाही. पण ती संख्या काही शेकड्यांच्या घरात निश्चितच गेली असेल, याची खात्री आहे.

इ. स. १९५७ ते १९६४ या काळात कोलाम या अतिमागास आदिमांच्या संशोधनात रमलो असताना त्यांची व इतर आदिवासींची लोकगीते, म्हणी, लोककथा आणि शब्द गोळा करण्याचा छंद जडला. या द्राविडी भाषिकांचे लोकसाहित्य मिळविणे जिकिरीचे व अडचणीचे होते. ते काम करताना एक वेगळी जिद्द बाळगून त्या कामाला कित्येक वर्षे वाहून घेतले. दीर्घकाळ लोटूनही कोलामांची लोकगीते फारच कमी मिळवता आली. त्यांच्या सणोत्सवांची माहिती मिळवून, त्यांच्या पारंपारिक सणोत्सवांत जातीने उपस्थित राहून व भाग घेऊन, त्यांच्यासारखे वागूनच काम साधून घ्यावे लागले. कोलामांच्या 'गावबांधणी' सारख्या उत्सवात एकदा त्यांच्या आखीव वस्तीत शिरले तर १८–२० तासांनीच बाहेर पडायला मिळते! अर्थात् ही दिव्ये करण्याच्या तयारीमुळेच त्यांचे लोकसंगीत, लोकनृत्ये, वाद्ये, लोककला, लोकगीते यांचा अभ्यास जवळून करण्याची संधी मला लाभली हे नाकारता येत नाही.

कोलामांच्या गावबांधणी उत्सवात नियम पाळण्यात एक किरकोळ चूक मजकडून झाल्याने मार खाण्याचा प्रसंग मजवर आला होता. सुदैवाने दुभाषी मित्रामुळे निभावून नेता आले. अशाच एका उत्सवात कोलामांचा मित्र या नात्याने मद्यप्राशनात सहभागी होण्याचा मला आग्रह झाला. मी मद्य घेत नसल्याची माझी अडचण सांगितली. पण ती मंडळी आग्रह सोडीनात! शेवटी त्यांना मद्याच्या भरात येऊ देऊन मी मात्र मद्य घेण्याचे नाटक केले व पाणी आणि मद्य यांच्या पेल्यांची अदलाबदल करून प्रसंग पार पाडला.

गडचिरोली जिल्ह्यातील माडिया गोंडाच्यामध्ये शोकाची कळा मुळीच नसते. उलट, मोठमोठ्याने ढोल वाजवीत जल्लोष करून प्रेतयात्रा काढतात! ती मिरवणूक शोकापेक्षा हर्षवत खाणाखुणांचे दर्शन घडविते! परंतु हे बारकावे माहीत नसल्याने एकदा त्यांच्या प्रेतयात्रेत अचानक उपस्थित होताच कसे वागावे हे मला मुळीच कळले नाही व मी मक्ख बसून राहिलो! तेव्हा त्या सोहोळ्यातील एका आदिम पुरुषाने माझा दंड धरून मला त्या प्रेतयात्रेत सामील केले. मी त्यांच्यासोबत नाचू उडू लागण्याचा प्रयत्न केला. आपल्या कार्यक्रमात, नाचगाण्यात, पाहुण्यांनी सुद्धा भाग घेतला पाहिजे हा आदिवासींचा संकेत आहे! त्या प्रेतयात्रेत मी कसावसा का होईना, नाचलो, वागडलो, याचा भरपूर आनंद त्या वस्तीतल्या माडिया स्त्री पुरुषांना झाला! . . .

कोलाम, गोंड गोवारी, परधान, माडिया, कोरकू या व अशा आदि- वासींच्या अभ्यासाच्या वेडातून विदर्भ आणि आंध्र प्रदेशाच्या निबिड अरण्यातून भटकण्याचे योग आले. नरबळी देणारे मानव, समूह जीवनात क्वचित असे या आदिमात आढळू शकतात. पण त्यांच्या त्या देव गुहांमध्ये जाण्याचा प्रसंग एकदाच आला. डोळ्यांवर पट्टी बांधून एकदा त्यांनी अंधारात आत सोडले व पुनः तसेच बाहेर आणून सोडले! . . तो भाग कोणता ते कळायला मार्ग नव्हता आणि नाही ! अर्थात असे प्रकार क्वचित घडतात व तेही देवभोळ्या, श्रद्धेपायी, अंधभक्तीपायी ही वास्तवता नाकारता येत नाही. वस्तर-गडचिरोली मध्यातल्या अबुजमाळ परिसराचा पर्याप्त भाग अजूनही आपल्या परिचयाच्या कक्षेत आलेला नाही. हीच स्थिती आदिलावाद जिल्ह्याच्या उत्तनूर तालुक्याच्या काही भागाबाबत आहे. भाषा, विश्वास, आत्मीय दुभाषी यांच्या मदतीने मला अशा कठीण भागात मधूनमधून जाता आले. अजूनही असा काही अज्ञात आदिम-भाग शोध संशोधनाची वाट पहात आहे.

१९७०-७१च्या दरम्यान महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीचा सदस्य होण्याचा योग आला. या समितीत काम करताना डॉ. सरोजिनी बाबर 

यांचे मार्गदर्शन लाभत गेले. लोकसाहित्य शब्दकोशाचे महत्वाचे कार्य आमच्या समितीने त्यावेळी पार पाडले, ही बाब नेहमीच स्मरणात राहील.

नागपूर विद्यापीठाच्या मराठी अभ्यासक्रमात पदव्युत्तर स्तरावर लोकसाहित्याचे अध्ययन व अध्यापन सुरू करण्याचे महत्त्वाचे काम १९५७ च्या दरम्यान माझे मित्र डॉ. रु. पा. पांजणकर, डॉ. यू. म. पठाण व डॉ. दा. गो. बोरसे यांच्या सहकार्याने मी करू शकलो. नागपूर विद्यापीठ या संदर्भात पहिले ठरले. नव्याने सुरू झालेल्या अमरावती विद्यापीठातही लोकसाहित्याचे अध्ययन–अध्यापन आम्ही हिरीरीने सुरू ठेवले आहे. ह्या विषयाचे महत्त्व कमी करून त्याच्या अध्ययन–अध्यापनाकडे कानाडोळा करण्याच्या कारवाया प्रतिगाम्यांकडून कधीमधी सुरू असतात. पण मधूनच डोके वर काढणाऱ्या अशा अपप्रवृत्तींना आम्ही वेळीच आळा घालण्यात सतर्क असतो.

१९८१ च्या लाड स्मारक व्याख्यानमालेत नागपूर आकाशवाणीवरून मी दोन व्याख्याने दिली. अध्यक्ष. डॉ. प्रभाकर मांडे होते. व्याख्यानाचा विषय होता–'मराठी लोकसाहित्याला विदर्भाचे योगदान'. त्यापूर्वी एका सायंकाळी माझ्या अमरावतीच्या घरी नागपूर आकाशवाणीचे संचालक अचानक आले आणि त्यांनी या कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. मी या सन्मानाची अपेक्षा केली नव्हती किंवा त्यापूर्वी त्याबद्दलची कोणतीही कल्पना नव्हती. विनाशर्त ते निमंत्रण आनंदाच्या भरात मला स्वीकारायला हवे होते. पण स्वाभावानुसार मी अटी घातल्या, "मी केवळ भाषणापुरती हस्तलिखित प्रत तयार न करता या विषयावर एक प्रबंध लिहीन, व्याख्याने देताना मी तो फक्त आधाराला घेऊन बोलेन. वाचणार नाही. वेळेचे बंधन मी पाळणार नाही." माझ्या अटी मान्य झाल्या. नागपूर विद्यापीठाच्या दीक्षान्त भवनात मी माझ्या या अटींना अनुसरून दोनदोन, तीनतीन, तास बोललो. वाचून मुळीच दाखविले नाही. त्यावेळी माझे समकालीन प्राध्यापक व साहित्यिक मित्र,

बरेच हजर होते. मला गाता येते असा माझा लौकिक कधीच नव्हता आणि नाही. पण ह्या व्याख्यानांच्या दोन्ही दिवशी वेगवेगळी वऱ्हाडी लोकगीते मी अक्षरशः गाऊन दाखविली! . . .तेव्हा या सर्वांनीच आश्चर्य व्यक्त केले. प्रा. श्री. मा. कुलकर्णी भाषणे संपल्यावर म्हणाले, 'तुमचे हे लोकगीत गायनाचे अंग आम्हाला माहीत नव्हते'! . . .

दा. क्र. 3206 20212 2/5/86

# मैत्री आणि विश्वास

प्रा. आशा मुंडले

मी प्रथम फील्ड वर्कला गेले तो दिवस मला अजून आठवतो. कल्याणला गाडी बदलून मी नागपूरकडे निघाले. त्यापूर्वी कधीही तो भाग मी पाहिला नव्हता. अमरावतीला मुक्काम ठेवून आसपासच्या भागातली वऱ्हाडी बोली नोंदवून घेणे हे होतं माझं उद्दिष्ट. स्वतंत्रपणे खेडेगावात जाऊन तिथल्या लोकांत मिसळणं, त्यांची बोली शिकणं, त्यांच्या जीवनाचा अभ्यास करणं हे मला वाटतं होतं, एक हवंहवंसं साहस! भाषा शास्त्रातली पदवी मी नुकतीच घेतली होती. वऱ्हाडी बोली ऐकून तिची नोंद करणं, प्रमाण मराठीपेक्षा तिचं व्याकरण नेमकं कुठे वेगळं आहे याचा विचार करणं, हे आपल्याला जमेल का नाही याची चिंता मला नव्हती. माझं सगळं ग्रामीण आणि आदिवासींबद्दलचं प्रेम हे पुस्तकी परिचयातून निर्माण झालेलं असल्यानं स्वतःचं शहरी जीवन विसरून काही दिवस उत्कट समरसतेने ग्रामीण भागात रहायला मिळेल याचाच मला विलक्षण आनंद झाला होता. . . . श्वास घेण्यासाठी हवा सुद्धा जास्त खुली आहे, असं शेतात पोचल्यावर वाटतं होतं!

वऱ्हाडी बोली, कोरकू, कालटु–ही कोलटा लोकांची भाषा, (ज्याला सरकारी कागदपत्रात निहाली किंवा नहाली म्हणतात), खडिया, सोरा, या स्वतंत्र भाषा, भिली आणि वारली जव्हारच्या कोळी समाजाची बोली, या मराठीशी बरीच सरमिसळ झालेल्या भाषा यांचा अभ्यास करण्याची संधी मला नंतर ओघाओघाने मिळाली. परंतु पहिल्या फील्डट्रिपची गंमत काही वेगळीच.

अर्थात व्याकरण हा माझ्या अभ्यासाचा केंद्रबिंदु असल्याने साहित्या-कडे माझं लक्ष त्यामानाने कमी होतं. या सर्वांच्या गोष्टी आणि गाणी या मी प्रामुख्याने भाषेच्या अभ्यासाला साधनरूप म्हणून वापरल्या आणि स्वाभाविकच पद्यापेक्षा गद्य निवेदनांकडे माझं लक्ष अधिक राहिलं. कारण गाणी रचताना कुठल्याही भाषेत शब्दरचना, निवड, याबाबत व्याकरणाशी थोडी जास्त मोकळीक घेतली जाते. आणि बरीच वर्षे चालत आलेल्या गाण्यांची भाषा अनेकदा प्रचलित भाषेपेक्षा बरीच जुनी असू शकते. चालत आलेल्या गोष्टींबद्दलही हे काही प्रमाणात खरं आहे. अगदी प्रमाण मराठीत सुद्धा 'कोणे एके काळी' सारखे शब्दप्रयोग आपण फक्त कथातूनच वापरतो. 'इवला इवला' सारखे लडिवाळ शब्द कवितातून येतात तितक्या सहजतेने बोलताना तोंडात येत नाहीत.

आज हा लेख लिहिताना त्यामुळे माझी थोडी अडचण झाली आहे. गाण्याचा भावार्थ, ते कोणत्या गावात किती तारखेला कुणाकडून ऐकलं हा तपशील माझ्याजवळ असला तरी जसंच्या तसं अवतरण देणं मला कठीण जाईल. कारण मी केलेलं सर्व काम हे कोणत्या ना कोणत्या नोकरीत असताना केलं आणि सगळ्या टेक्स्टच्या मूळ प्रती त्या त्या निरनिराळ्या ऑफिसातून आहेत. म्हणून मी असं ठरवलं आहे की, साहित्यातलं सौंदर्य माझ्या नेहमीच्या भाषेतच मांडावं. मात्र ज्यांना त्या विशिष्ट भाषांचा अधिक सखोल अभ्यास करायचा असेल त्यांना माझ्याकडून मूळ संदर्भ उपलब्ध होऊ शकतील.

माझा ज्यांचा परिचय झाला त्या त्या भाषा परंपरेने फक्त मौखिक, अगदी अलीकडे लिपिबद्ध झालेल्या. आणि त्याही बहुधा संशोधनाच्या सोईसाठी. कोणत्या उच्चारासाठी कोणते देवनागरी अक्षर वा चिन्ह वापरता येईल यासंबंधी तपशिलात गेले की, अनेक गुंतागुंती आढळतात. शिवाय जिथे पूर्वी मिशनरी काम करत होते तिथे यापैकी काही गोष्टी, गाणी, रोमन लिपीतून पहायला मिळाली. !

या सगळ्या भाषांचा अभ्यास करताना मी जो काळ घालवला ते दिवस माझ्या आयुष्यातले सोनेरी दिवस होते. त्या त्या समूहाचे वेगळे स्वतंत्र अस्तित्व, त्यांच्या जीवनपद्धतीचा वेगळा ठसा मनावर उमटतो ना उमटतो तोच एका विशाल भारतीय परंपरेशी असलेले त्यांचे लागेबांधेही उलगडायला लागायचे. भारतीयच काय पण असंख्य मानव जातीला जोडणारेही भावनात्मक दुवे विशेषतः प्रणय गीतांतून सापडतात. माणसाची ही मूळ एकात्मता अधिक विलोभनीय का वेगळेपणाचा वहुरंगी, बहुढंगी नोकझोक अधिक मनोज्ञ ते मला अजूनही ठरवता आलं नाही. पण एक मात्र खरं की, रानावनात आडबाजूला फुललेल्या रानफुलाचं सौंदर्य मुद्दाम जोपासलेल्या कलमी गुलाबांशी सहज स्पर्धा करतं. साधा लहान मुलींच्या खेळांचा भाग घ्या. फुगडी हा खेळ भिली, वारली दोन्हीकडे आढळला. पण कोलटा मुली तो खेळत नाहीत. फुगडी जिथे खेळतात तिथे उखाणे घालण्याचीही पद्धती आढळली. पुष्कळदा हे उखाणे चतुर मुली तिथल्या तिथे रचतात. लोकसाहित्याचा जन्म पहायला मिळतो. तर बऱ्याच वेळा हे उखाणे परंपरेने चालत आलेलेही आढळून येतात.

तोरण माळच्या भिल्ल कन्या फुगडी खेळताना म्हणत होत्या की, माझ्या परकराचा गोल गोल घेर पूर्ण चंद्रासारखा आहे ! गुजराती भाषेचाही प्रभाव इथल्या बोलीवर आढळतो. कोसबाड जवळच्या पाड्यातल्या वारली मुलींचे एक आवडते गाणे आहे, मैत्रीबद्दलचे.

'आपण दोघी मैत्रीणींनी एक शेवंतीचं रोप लावलं. त्या रोपाला दोघींनी पाणी दिलं. रोप वाढलं. कळी आली.' अशा अर्थाचं. नवीन गाणं चटकन तोंडात बसावं, पाठ होऊन जावं या दृष्टीनं या सगळ्यांच्याच गाण्यात पुनरावृत्ती बरीच असते. घोळवून घोळवून अक्डकडवं सगळ्यांनी म्हणायचं आणि एखादीने मधली कडवी सांगायची असेही करतात. केवळ स्मरणशक्तीच्या जोरावर या पिढीतून त्या पिढीकडे हा खजिना बिनबोभाट पोचवला जातो. अलीकडे त्या काळानुसार बदलही होताना दिसतात. उदाहरणार्थ वारलींच्या चित्रकलेत ज्याप्रमाणे विमान वगैरेही भिंतीवर काढलेलं दिसतं, त्याप्रमाणे गाण्यातून मी डोंगरावर दूर दूर फिरेन याबरोबरच सायकलवरून दूर दूर फिरेन असंही असतं'. गाण्याचा बाज आणि संगीताची सुरावट मात्र जुनीच रहाते. अर्थात जिथे शक्य आहे तिथे हिंदी सिनेमातल्या गाण्यांची आवड वाढते आहे. मला भाषा शिकवणारा कोरकू मुलगा 'दो हन्सोका जोडा' अगदी छान म्हणायचा.

कोणताही खेळ खेळताना राज्य कुणावर हे ठरवायला आपण चकतो. चकवताना 'अरिंग, मिरींग, लवंगा तिरींग'सारखी गाणी असतात. असली गाणी कमी अधिक फरकानं मला सर्व भाषांत सापडली.

मुलांपाठोपाठ विचार करूया तरुणांचा. शृंगार हा एकंदरीतच आदिवासी जीवनाचा, त्यातल्या मुक्तपणे आनंद लुटण्याच्या वृत्तीचा, आधारस्तंभ. शहरी माणसं प्रेमात पडली की, सिनेमाला जाऊन पडद्यावरच्या नायक-नायिकांची द्वंद्वगीतं ऐकताना परकाया प्रवेशाचा आनंद मिळवतात. पण आदिवासींचा प्रणय जास्त नैसर्गिक आहे. स्वतः गाणे, जोडीने नाचणे, पावा वाजवणे, फुलांचा शृंगार करणे, एकांतात भटकणे ह्या गोष्टींना तिथे समाज मान्यता आहे. तरुण-तरुणी प्रेमात पडल्या तर 'काय हा अनाचार ?' असं न वाटता जे घडायचं तेच घडतंय अशीच या समाजाची धारणा असते. त्यामुळे गाण्यातून व्यक्त होणाऱ्या भावना मधुर आणि स्पष्ट आहेत. यातला दुर्दैवाचा भाग असा की

जसजसा या समूहांचा 'शहरी' जीवनाशी आणि मुख्य भारतीय परंपरेशी संपर्क वाढतो आहे तसतसा हा निर्भय स्वयंनिर्णय कमी होऊन 'सुधारणा' या नावाखाली पालकांची इच्छा मुलीवर लादणे, पैशाची न परवडणारी देवाण घेवाण, त्यातून कर्ज आणि सावकारी पाश, बालविवाह, लग्नानंतर नवरा नापसंत असला तरी बळजबरीने सासरी नांदवण्याचा प्रयत्न, सोडचिठ्ठी अवघड करून ठेवणं, हे प्रकार सुरू होतात. थोडेबहुत शालेय शिक्षण झालेल्या वारली मुली, कोरकू मुली, यांच्याशी याबाबत बोललो की, मन विषण्ण होतं. मुलगा झाला पाहिजे हा आग्रह, मुलगी झाली तर छळ हा प्रकारही या 'सुधारणे'तच मोडतो.

धार्णी या मेळघाटातील गावाजवळच्या देहेंडा या खेड्यातली कोरकू नववधू म्हणते, "उन्हाळ्यात आकाशातून चार थेंब पाऊस पडला की, अंगणात पोचायच्या आतच वाळून जातो. सासरी आल्यावर माहेरच्या आठवणीने डोळे किंचित ओलसर झाले तरी ते अश्रु सुद्धा गालावर पोचायच्या आतच सुकतात! कारण मनामधे नवऱ्याच्या प्रेमाची ऊब (धग) असते!" अखिल भारतीय हुंडाबळी छापाच्या सासुरवाशिणींपेक्षा ही कल्पना किती रसरशीत आणि उमेदीची वाटते. माहेरची आठवण येऊन ढसढसा रडण्यातूनही कितीतरी उत्तम ओव्या निर्माण झाल्या आहेतच. पण त्यातल्या साहित्य गुणांपेक्षा त्यातलं दुःखच मला बेचैन करून गेलं. "मऊ धुळीत काटाही नसावा तशी सावलीतली माहेरची वाट आणि फुफाट्यात चालावं तशी सासरची वाट" म्हणणारी वऱ्हाडी ग्रामवधू वास्तविक भौगोलिक दृष्ट्या कोरकूंपासून अगदी हाकेच्या अंतरावर राहणारी. पण तिच्या मनाची स्पंदनं किती वेगळी!

लग्नाच्या निमित्ताने होणाऱ्या गाण्यातून विनोदही असतो. वऱ्हाडीमध्ये एका जावयाची थट्टा करताना म्हटलं आहे की, तो होता साधाभोळा. स्कूटर, सायकल दिली तरी भातावर गूळ वाढला नाही म्हणून रुसलाच! कवि देवीदास सोटे यांच्या एका कवितेत हा प्रसंग बहारदारीने

मांडला आहे. पण त्याचे मूळ लोकगीतात आहे स्वतःच्याच पडदा पद्धतीची थट्टा करणारी एक कथा मला मध्यप्रदेशाच्या निमाडी बोलीत आढळली. त्यातली नववधू घुंगट घेऊन पतीसह जत्रेला निघालेली. जत्रेत ती चुकू नये म्हणून नवरा बजावतो की, आज मी नवा काळा कोट घातलाय तर त्या कोटा पाठोपाठ रहा. वेंधळेपणा करू नकोस. पण जत्रेतल्या गर्दीत व्हायचं तेच होतं. तो पुढेपुढे जात तमाशा पहायला थांबतो. ती प्रथम बावरते पण मग निर्धाराने एका काळ्या कोट-वाल्याच्या मागेमागे जात रहाते. जत्रा संपून घरी परतल्यावर एकच गोंधळ उडतो! दुसऱ्या काळ्या कोटवाल्याची बायको म्हणते, "ही कोण सवत आणलीत जत्रेतून?" तर ही विचारी घाबरून म्हणते, "तुमच्या कोटा मागोमाग येत राहिले पण हे खेडं, हे घर, ही माणसं तर वेगळीच आहेत. मला कुठं आणलंत तुम्ही? आपल्या घरी चला."

ज्या स्त्रियांनी ही गोष्ट मला सांगितली त्या अगदी खळखळून हसत-होत्या, "कारोक कोट भूलजो मत" म्हणत होत्या.

आता मला वाटतं की, ह्या सर्व अपरिचित समाजात मिसळताना माझ्या आयुष्याचा जो काळ गेला ते माझ्या आयुष्यातले सोनेरी दिवस होते. सकाळपासून झपाटल्यासारखं व्हायचं. काहीतरी खायचं. टेप-रेकॉर्डर, वही, छत्री, घ्यायची की, पायपीट सुरू! पण! त्यावेळी कॅसेट रेकॉर्डर नव्हते. पोर्टेबल मशीन चांगलंच वजनदार होतं. "बुटोवा" कंपनीचं. पुढे पुढे गावातली माणसं त्याला गमतीने माझा हट्टी मुलगा म्हणायला लागली. कारण मी किती दमले तरी टेपरेकॉर्डर मी माझ्याच काखोटीला ठेवायची ना? टोंग्या बुढ्ढा सांगून पहायचा, "उतर की त्याला कडेवरून." पण मला धीर व्हायचा नाही. कुणाच्या हाती दिला, खाली पडला, तर कामच ठप्प होईल.

मी वऱ्हाडी भागात गेले तेव्हा अपरिचयाने प्रथम फार गंमत आली. मी एका तिठ्यावर बसमधून उतरले आणि चालत गावात गेले. "माणसं 

कुठे आहेत ?" "मान्सं कोनी नाईत अथं" "गावात माणसंच नाहीत ?" "नाहीत." बऱ्याच वेळाने पत्ता लागला की, मान्सं म्हणजे वऱ्हाडीत फक्त पुरुष. ते होते शेतावर. गावात उरल्या होत्या लक्ष्म्या (वायका) आणि लेकरं (मुलं). परीटी (कापूस) वेचताना कंबर कशी मोडून येते, पुढे वाजारात गेल्यावर मापतोल करताना दलाल कसा फसवतो, कापसाचे पैसे हातात आले की, ते सगळे कसे खर्च होतात, हे सारे बायका मोकळेपणे सांगायच्या आणि घरी आले की, दिव्यापुढे बसून वही पुन्हा वाचत माझी जुळवाजुळव चालायची की पराटी म्हणजे कापूस, गूम म्हणजे गूळ, पोर्यी म्हणजे पोळी ! . . .

कोलटा भाषेच्यावेळी तर फारच मजा. 'बिडी राजा दाना'. . .अशी सुरुवात होऊन गोष्ट सुरू झाली की अशा वेगाने धावायची की, वाक्य सुरू कुठे होतं आणि संपतं कुठे समजेना ! बिडी (क) म्हणजे एक, राजा म्हणजे राजा. दाना म्हणजे होता, एक होता राजा . . . मला गोष्टी सांगणारा टोंग्या बुढा दातपडका होता. पुन्हा तीच ओळ म्हणा म्हटलं की, रागाला यायचा. बरं त्याला मशीनची भीती वाटायची ! त्यामुळे हाताने लिहून घ्यावं लागायचं. त्यांच्या गोष्टीमध्ये राजे, सरदार, देव, राक्षस यांची लयलूट ! कथेमधे स्वप्नात झाड दिसतं कसं ? तर चांदीकोन, शोनो, डांगो, आमरुती पाला. म्हणजे चांदीचे पुष्प घोष, सोन्याच्या फांद्या, अमृताची पानं (असलेलं).

कोरकू आणि कोलटा दोघांचाही श्रेष्ठ पुरुष रावण. मेल्यावर माणसे "लांका पिया" म्हणजे लंकेला जातात. त्याचा पुत्र म्येगनादो हा अगदी हीरो. इंद्राचा पाडाव करणारा. जित आणि जेते यांच्या इतिहासात फार फरक पडतो, तो असा. आपल्याला हे तसं माहीत आहे म्हणा. ब्रिटिशांना ते साम्राज्याचे उत्तम आधारस्तंभ वाटायचे पण स्वतः आपल्याला ते जुलमी शत्रू. नागरी भागातून पीछेहाट होत गेलेल्या अनेक आदिवासींच्या गोष्टी-
 तून, गाण्यातून आपण पूर्वी मोठ्या भूभागावर राज्य करीत होतो असे

उल्लेख येतात. एक म्हातारा तर म्हणाला की, विदर्भ कन्या दमयंतीचं ज्या कुरुप, हात आखूड असलेल्या नलराजाशी पुन्हा स्वयंवर झालं तो आमच्यापैकीच होता म्हणून! पण त्याला दुजोरा मिळाला नाही. कारण गावात तोच सर्वात म्हातारा होता आणि तरुण पिढीला ती गोष्ट माहीतच नव्हती!

आज ज्याला आपण प्रमुख भारतीय परंपरा-संस्कृतीचा मुख्य प्रवाह –म्हणतो (रॉबर्ट रेडफील्डच्या शब्दात ग्रेट ट्रॅडिशन) तिचा इतिहास रक्तरंजित आहे याची आठवण मला वाटतं नव्या शिक्षित पिढीनं ठेवली तर सहिष्णुता, मनाचा व्यापकपणा, वाढेल.

गोष्टी राजांच्या, शिकारींच्या, लढायांच्या सांगितल्या. तरी त्याचं प्रत्यक्ष जीवन किती कष्टमय होतं! एका वेळी त्यांच्यात जेवताना मला समजलं की, भात आणि डाळ म्हणजे अगदी चैन. एरवी नुसता भात, मीठ, तिखट. कधी कधी चवीला भातावर काळ्या मुंग्या तोंडी लावणं म्हणून मिसळायच्या! . . . मी सुद्धा त्या मुंग्यांनी चव आणलेला भात खाल्ला! छोट्या डबक्यातून साठलेले मासे, छोटे खेकडे खायचे. तर त्यात हाडाचा कचकोलच जास्त. पॉपलेट पण चवीचवीने खाणारी मी विसाव्या शतकात रहाणारी. आपल्यासारखीच चालती बोलती माणसं,. कशा स्थितीत राहतात, त्यांच्या आर्थिक दुर्दशेला आपण किती प्रमाणात जबाबदार आहोत, नव्या जगात समर्थपणे वावरायला उभयपक्षी काय केलं पाहिजे, याच्या जाणीवेसाठी तरी हा अभ्यास अनेकांनी करावा असं मला वाटतं. निदान मी तरी या माणसांमुळे खूप शिकले. माणसाच्या गरजा किती कमी होऊ शकतात, हे त्यांच्यामुळंच माझ्या लक्षात आलं! माझ्या मुक्कामापासून जवळचं मोठंसं गाव ३२ मैल दूर होतं. माझा साबण संपल्यावर मीही त्या बायकांसारखे मातीने स्वच्छ केस धुतले!... त्या मातीला रिठ्यासारखा फेस यायचा.

आणि या सर्वातून खळाळून वाहणारा त्यांचा जगण्याचा उत्साह आणि देवावर, जादू टोण्यावर, मंत्र तंत्रावर, भुताखेतांवर अतूट श्रद्धा. कोलटांचे देव म्हणजे लाकडाचे ओंडके. जंगलात झाडाखाली ठेवलेले. पण श्रद्धा रोज निष्ठेने अथर्वशीर्ष म्हणणाऱ्या पंडिता इतकीच गाढी. लोकसाहित्याच्या परिचयामुळे "आपली विशिष्ट जीवनपद्धती" "तीच तेवढी उच्च संस्कृती आणि इतर तेवढे अज्ञानी, मागास, अप्रगत, हा भ्रम जसा दूर होतो तसा आदिवासी किंवा ग्रामीण माणूस तेवढा साधा-भोळा, निष्पाप, क्रौर्याचा लेशही नसलेला, हा भ्रमही दूर होतो.

शिवाय प्रत्येक समूहाच्या अंतर्गत असणारी सत्ता व्यवस्था इतक्या गुंतागुंतीची असते की, काही विचारू नका. रानडुकराची शिकार केल्यावर कोणी कोणता भाग घ्यायचा, किती वाटा घ्यायचा, हे जसं शिस्तीनं ठरवलं जातं आणि पाळलं जातं त्याचप्रमाणे मी मला भाषा शिकवणाऱ्याला दिलेले पैसेही टोळीच्या प्रमुखाकरवी आपापसात वाटले जायचे! एकाला वेळ नसला तर दुसरा माणूस हजर व्हायचा.

कुठे कामाला जायचं, कोणी जायचं, याच्या वाटाघाटी काही विशिष्ट पुढारी मंडळी करायची. बाकीचे निमूट ऐकायचे. बाहेरच्या उग्र जीवनकलहात टिकाव धरून राहायला त्यांची कडवी सामाजिक शिस्त उपयोगी पडायची. मला आपली भाषा शिकवावी का नाही यावर प्रथम त्या लोकांनी माझ्या अपरोक्ष बराच खल केला आणि मगच काम पुढे सरकलं. यातून हाती आलेली काही गीतं पहा :—

आमची कोलटा जमातीची खंडिता म्हणते, "अग सवती, तू जर माझा प्रियकर चोरलास तर मी वाघ होऊन तुला कच्ची खाईन!" भांड-णाच्या ओघात एक कोरकू पत्नी म्हणते, "अरे प्रेतासारख्या तोंडाच्या (नवऱ्या)," (देज–एरे मुआर) म्हणजे थोडक्यात सांगायचं तर अरे मुड्या.!

आपल्या प्रियकरावर आढाक झालेली दुसरी स्त्री वांझ व्हावी, मरावी म्हणून किती तरी मंत्र आहेत !

पण खुषीने मनोमीलन होऊन रंगणाऱ्या प्रणयाची गीतं मात्र बहारदार आहेत. कोलटा युवक प्रियेच्या गर्द काळ्या रंगाची, तिच्या जाडसर ओठांची, स्तुती करतो. देशकाल परिस्थितीनुसार सौंदर्य कल्पनाही वेगळ्या. "तुझ्या उंचीच्या बरोबर मध्यावर तुझी कंबर आहे" हे वांध्याचे वर्णन वाचून विठोबाच्या मूर्तीची आठवण येते.

प्रियकराने केलेला पराक्रम, वाघाची किंवा माणसाची शिकार पाहून खूष होणाऱ्या सारी युवतींचीही शृंगारगीते आहेत.

लोकसंस्कृतीच्या अभ्यासासाठी अक्षरशः रानोमाळ भटकताना, त्यांच्याबरोबर नाचता गाताना, मोहाच्या दारू चाखून पहाताना, मला जे मिळालं ते मी फार मौल्यवान समजते. माणूस तेवढा एक, त्याच्या भावनाही एकच, हे जसं समजलं तसंच हेही समजलं की, दुर्दैवाने सध्या या समूहांशी जे वरवरचं नातं आहे ते शोषणाचं आहे. त्यामुळे परस्परांबद्दल अविश्वास, संशय, भीती, तुच्छता फार आहे.

त्यातून कित्येकदा गमती होतात. तर कधीकधी धोरणे चुकीची ठरवली जाऊन नुकसानही होते. स्वतःच्या पोटावर पाय आणणाऱ्या बेकायदा जंगलतोडीत मजूर म्हणून कधी आदिवासीही भाग घेतात.

शाळांमधे शिकवताना आदिवासी भाषांचे स्थान काय असावे हा प्रश्न या नुकसानाचे उत्तम उदाहरण होईल. पण अशा गंभीर विषयाची सांगोपांग चर्चा करणे हा या लेखाचा हेतू नाही. एवढंच वाटतं की, या समूहांच्या संलग्न वस्त्यांतून खरं म्हणजे एकाहून जास्त भाषा वापरल्या जातात तेव्हा शाळांमधूही मुलांना या भाषांची थोडी कल्पना द्यावी. केवळ दुराग्रहाने असं समजू नये की, परस्पर संवाद वाढवायचा एकमेव

मार्ग म्हणजे "त्यानी" "आपली" मराठी भाषा शिकावी! मनाच्या बंद खिडक्या उघडण्याचे मोठे साधन म्हणजे अनोळखी भाषा शिकणे. त्या अनुभवाचा लाभ मराठी बोलणाऱ्या मुलांनाही द्यावा. त्यांच्या शेजाऱ्यांची भाषा शिकवून कदाचित शोषणाचे संबंधही त्यातून पुढेमागे बदलतील. माणसाला जाणण्याचे साधन म्हणजे त्यांच्याशी संवाद.

मला वाटतं एक गंमतीचा अनुभव सांगून हा लेख पूर्ण करावा.

बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव-जामोद विभागातले सोनबल्ली हे गाव. अक्षरशः टेकाडावर वसलेलं. पायी चालत तिथे टेपरेकॉर्डर सहित पोचले. तोपर्यंत त्यानी ही वस्तू पाहिली नव्हती. त्याला ते रेडिगो (रेडिओ) म्हणाले. म्हणून प्रथम तो मी कसा चालतो याचे प्रात्यक्षिक दाखवले. पण आपला आवाज त्यात कैद होतो, याची भीती उत्पन्न झाली.!

"तुमचं नाव काय? (न्ये जुमु नाना?)" या प्रश्नाला उत्तर पुरुषांकडून यायचं, "शंकर," बाईकडून उत्तर यायचं, "पार्वती." वास्तविक या निहालांमध्ये अशी नावे नाहीतच. समजा एखाद्याचं असेलही पण एका गावात सगळेच शंकर? आणि सगळ्याच पार्वती?

काही दिवसांनी मैत्री आणि विश्वास वाढल्यावर समजलं की, जीपमधून येऊन रेस्ट हाऊसमध्ये उतरलेली मी म्हणजे त्यांनी पाहिलेली पहिली "सरकारी साहेब स्त्री." तेव्हा त्यांच्या म्होरक्याने त्यांना सांगितलं की, मी मिलिटरीत भरती करणारा साहेब असणार किंवा चोर पकडणारा पोलीस साहेब. म्हणून कोणीही खरं नाव सांगू नये. म्होरक्याचा शब्द त्यानी मानला. ही गोष्ट १९६२ सालातली आहे.

आपल्याला एकाच देशाचे नागरिक बंधुभगिनी म्हणून राहण्यासाठी अजून किती वाट चालायची आहे याची कल्पना मला त्या प्रसंगाने आली. तशी ती हजारो पुस्तकं वाचून आली नसती.

लोकसंस्कृतींच्या अभ्यासासाठी केलेले श्रम आणि खर्च केलेला वेळ हा माझ्या आयुष्यातला सोनेरी काळ होता यात शंका नाही. आतासुद्धा क्वचित वेळ मिळाला की, मी त्या मुलखात परत जाते. अगदी अलिकडे गेले तेव्हा माझा जुना परिचित तरुण म्हातारा होऊन नातीला खेळवत बसला होता, "बाई, अजून जीपमधेच हिंडतेस का? तुला नवरा नाही करायचा का?" असं म्हणाला.

"माझीही मुलं मोठी झालीत व मला एक नातही आहे," असं सांगितल्यावर त्याला खूप बरं वरं वाटलं. एकमेकांबरोबर आम्ही चहा प्यायलो. "आता इकडे या रहायला म्हातारपणी. माझ्या घरी निवांत रहा. मी तुम्हाला पुष्कळ गोष्टी, गाणी सांगीन" तो म्हणाला. पाहू कधी जमतं ते. पण निर्माण झालेला हा विश्वास आणि ही आपुलकी ही खरी मोठी कमाई.

# माझा मुक्त संवाद

डॉ. अनिल सहस्रबुद्धे

त्या दिवशी पाचपट्टचाला मुक्काम पडला. पहाटेचं उठून पट्टा पहायला निघायचं. पट्टा म्हणजे पट्टागड. श्री शिवछत्रपतींच्या वास्तव्यानं पुनित झालेला, रणमस्तखानाचा पाडाव करून महाराजांनी पट्टागडावर आपला श्रांत देह जरा विश्रांत केलेला, असा हा विश्रामगड! मी आपलं पाचदहा विद्यार्थ्यांना घेऊन गड भटकून यायचं ठरविलेलं. पोपट डगळ्याच्या घरी उतरलो. पोपट डगळा महादेव कोळी. तिथल्या म्हातारीनं मोठ्या आनंदानं वालाचं कालवण ( आमटी ) अन् भात रांधला. फुरकून जेवलो. जेवताना सहज म्हणालो, "काय ग आई, तुला लई कष्टाचं काम?"

"अरं भाऊ, इठं समदां डोक्याचा काम! वैरण म्हणू नकू काडी म्हणु नकू समदा डोक्याना वाहून नियाचा." आई म्हणाली. मी हसलो. तिला समजेना.



"आरं ऽ मास्तर भाऊ, गवताली जायाचं त पक भारं डोक्याना

वाहून आणावा लागाताय. हासायची गोट नही भाऊ!" म्हातारीला माझं हसणं आवडलं नसावं.

"हे सारं तुम्ही डोक्यावर वाहता?" मी तिला समाधान वाटावं म्हणून म्हणालो.

"त मंग गाडी जाताय कुठं?" तिनं डोळे विस्फारीत, कपाळाला आठ्या घालीत, सांगितलं.

डोंगरदऱ्यात राहणारे हे आदिवासी श्रमजीवी बांधव डोक्याचं दुसरं कोणतं काम करणार?

रात्री मारुतीच्या देवळात आमची झोपण्याची सोय झाली. एक घोंगडं आंथरायला, एक पांघरायला. मारुतीच्या देवळात हळूहळू घराघरातली पुरुष मंडळी जमत होती. घोंगडं, चादर, शाल पांघरून येत होती. मारुतीच्या समोर, धुणी भोवती, या मंडळींनी जागा पकडावी, कोणी लुटकावं, कोणी पांघरून बसावं. हळूच गप्पा सुरू झाल्या आणि मग त्यातच अर्जुना खोकला गोष्ट सांगू लागला. "राजपुत्र मुंगताची करामत" गोष्टीत सगळेच रंगले. गोष्ट संपेना. गोष्टीतून गोष्ट दुसरी, तिसरी. . . मध्यरात्र उलटली तसा कमिन्न सुरकतलेला म्हातारा ओरडला, "अरं, आता रात ढळली, निजा" तशी गोष्ट सरली. देऊळ गाढ झोपी गेलं.

पहाटे किनट्टचा आवाजाच्या सुरावटीनं जाग आली :–

**सकाळ उठूनी उघडिते कडा खोंडचा**
**कडी खोंड्या उघडिते खोंडचा**
**सई बाई ग बाई ग**
**देवू मारवती नदरं पडं लालतोंडचा**
**लालतोंडचा नदरं पडं लालतोंडचा**

**सई बाई ग बाई ग**
**देवू मारवती कसा येईना आजून**
**आजून कसा येईना आजून**
**दळान दळून ठचेवली परात भरून**
**भरुन ठचेवली परात भरून**
**सई बाई ग बाई ग . . .**

जात्याची घरघर या ओव्यांना संगीताची लय देत होती. आजच्या अणुयुगातही ह्या आदिवासी स्त्रिया जात्यावर दळण दळतात हे पाहून, ऐकून, मनाला आश्चर्य वाटले. ओव्या ऐकत गेलो. जात्याच्या घरघरी बरोबर घराघरातली घरघर, सुखदु:खाच्या जाणीवा ओवीतून स्फुट होत होत्या. मनात विचार आला, " भाव प्रगट करायला या स्त्रियांजवळ केव्हढे समर्थ माध्यम आहे ?" बहीणाबाईच्या ओव्यांचा आठव झाला. मन भरून आलं. त्यांचं जीवन जवळून पाहायचं असेल तर या लोकवाङमय धनाचा अभ्यास करायला पाहिजे असा विचार मनी आला. झपाटलो. आता या गोष्टीला पंधरा वर्षं उलटून गेली! तेव्हापासून झपाटलेपणाने मी लोकसाहित्याचा शोध बोध घेतोच आहे.

साने गुरूजींचं "स्त्री धन" वाचनात आले. डॉ. सरोजिनी बाबरांच्या "एक होता राजा" या लोकसाहित्याच्या संग्रहानी एक दृष्टी दिली. शालेय स्नेहसंमेलनातून त्यातली काही गीतं, नृत्यं सादर करण्याचा प्रयत्न केला. कुठेतरी माझ्या प्रयत्नात अपूर्णता जाणवत होती. शाहीर अमर शेख यांचं कलापथक पहाण्यात आलं. त्यातलं लोकसंगीत मनाला भुलावण घालून गेलं.

**" डोंगरी शेत माझं ग बेणु किती ?**
**आलं वरीस शबून " मी अरु किती ? "**

मी अकोले तालुक्याचा रहिवासी. आकोले तालुका आदिवासींचा. पश्चिम भागाला डांगाण म्हणतात. कळसुबाई, रतनगड, हरिश्चंद्रगड, पट्टागड, अळंगकवंग जोड किल्ले या व अशा सह्यगिरीच्या अत्युच्च शिखरांच्या कुशीत जगणारा वेगळेपणाने उठून दिसणारा. डोंगर उतरणीवर, दऱ्याखोऱ्यात, महादेव कोळी, ठाकर या आदिवासींची सलग गावं. दुर्गम प्रदेश. शिक्षणापासून वंचीत. १९५१ साली पहिली माध्यमिक शाळा " हिंद सेवा मंडळ नगर "ने काढली. अकोल्यात त्याच-बरोबर सर्वोदय योजनेतून वसतिगृहं सुरू झाली. आणि डोंगर दऱ्यातली पोरं गायखेपण टाकून " साळात " आली. माझ्या लहानपणापासून मला त्यांचा सहवास. पुढे १९६५ मध्ये मी शिक्षक झालो. विद्यार्थी जीवनातच आदिवासींमध्ये रमलो होतो. शिक्षक झाल्यावर त्या आदिवासी पोरां-बरोबर डोंगर दऱ्यातून बेहोशीनं भटकू लागलो. त्यांच्यात मिसळून गेलो. पुढे "पीएच.डी" साठी "चाळीसगाव डांगाण परिसर–सांस्कृतिक वाङमयीन व भाषिक अभ्यास" निवडला. लोकसाहित्यात हा माझ्या प्रबंधाचाच विषय बनल्यावर मग काय? "माझी भटकंती जाणीवपूर्वकच सुरू झाली. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा, दिवसरात्र, सणोत्सव, लग्न समारंभ, जत्रा, यात्रा, कृषीकर्मे, यावेळी, या प्रसंगी, मी जाणिवपूर्वक उपस्थित राहू लागलो. लोकसाहित्य संग्रह करताना लोकजीवनाचा विचार घडू लागला. माझ्या प्रबंधात म्हणूनच गायक, निवेदकाच्या पत्यामुद्यासह मी संग्रह करू शकलो.

संतत मुसळधार पाऊस पडत होता. खाचराखाचरातून गुडघागुडघा गाळ झाला होता. मी दशरथ पट्टेकर आणि संपत चव्हाण वारणघुशी काटचावरून रंध्याकडे चालत होतो. हीव भरलं होतं. दात थडथडत होते. घोंगडं अधिक लपेटावंसं वाटत होतं. तसेच आम्ही चालत होतो. रस्त्याबाजूच्या भात खाचरात इरणी लावली होती. पाचसात आवा (स्त्रिया) पाचसात पुरुष वाप्ये आवण्या (लावणी) करीत होते. त्यांच्या सामूहिक गाण्याने माझे लक्ष वेधून घेतले.

"भात आम्ह्या लावलं जपानी
नही लावलं मह्या बापानी
आम्ह्या कसा लावलं पारोंनी"

म्हातारा जोरजोरात रेकून रेकून गाणं म्हणत होता. लेकी, सुना, पोरं, वाप्ये, त्याच्या मागे म्हणत होती. पडत्या पावसात गुडघागुडघा चिखलात ते कभीन्न लोखंडी देह उत्साहाने आवण्या करीत होते. मधेच तो म्हातारा दोरी लावून रांगेत भात लावायला सांगत होता, म्हणत होता—

"उली उली भात लावा ग पोरी वो
उली भात लावा
पोरी वो नथीला जीव लावा"

मी त्या गीतानं बुचकाळ्यात पडलो. "जपानी भात शेती" चा संदर्भ येथे यांच्या गाण्यात कसा? मग कळले की, राजूर सर्वोदय योजनेमार्फत शिबीरे घेऊन भातशेतीची जपानी पद्धत शिकवली गेली होती. लोकसाहित्य कसे लवचिक असते आणि वर्तमानाचा समावेश लोकसाहित्यात कसा झटकन चपखलतेने होतो हे जाणवले. असे असेल तर मग हे लोकधन लोप पावण्याचा प्रश्नच उद्भवत नाही याचा अनुभव मला एका लग्न प्रसंगी आला. मी वऱ्हाडाबरोबर पायी चाललो होतो. तीन कोस नवरदेवाला घेऊन जायचे होते नवरीच्या गावाला. पायाची गाडी निघाली. कातळापुराहून थेट पिंपरकण्याला, डोंगर, टेकाडं, खंगळी, दरी, अगदी प्रवरा नदी ओलांडून आम्ही जात होतो. मी बरोबर टेपरेकॉर्डर मुद्दाम घेतला होता. वऱ्हवल्या सगळ्या रस्त्यानं गाणी म्हणत चालल्या होत्या. एका गाण्यांनी असेच माझे लक्ष वेधले.

लग्नाला लग्नाला गंगुबाईचे
लग्नाला लग्नाला गंगुबाईचे
टोपावाला नकु हिप्पीवाला नकु
मधम सायटीचा नवरा हिला पायजे
लग्नाला लग्नाला गंगुबाईचे . . .

आणि गीतातून अशी तुलना करीत आपल्या गंगुबाईला साधाभोळा मध्यम स्वरूपाचा नवरा कसा पाहिजे हे सांगितले जात होते. असेच आणखी एक गाणे :–

**"मांडवाच्या दारा जावय काय मांगतो**
**रेडू मांगतो रेडूऽऽ मांगतो**
**सोन्याचा आंगठी रुमाल मांगतो**
**घड्याऽऽ ळ मांगतो घड्याळ मांगतो**
**सोन्याचा आंगठी रुमाल मांगतो "**

बदलत्या जीवनाचे दर्शन घडविण्याचे सामर्थ्य असे प्रगट होत होते. त्यावेळी लोकसाहित्य अखंड वर्तमान असते हेच जाणवत गेले.

आदिवासींना डोंगर उतरणीवर एक पीक काढता येते. जेमतेम आठ महिने पुरते. मग चार महिने कंदमुळे, झाडपाले, रान प्राणी पाखरे यावर दिवस काढायचे. राबराब रावायचं, कष्टानं कमवायचं अन् तरी सुखानं खायचं. सारं दुःख सारं सुख गाण्यातून व्यक्त करायचं. कागाळी न होता अंतःकरण मोकळं करायचं. धरतीच्या या लेकरांनी अस्मानीच्या तालावर नाचायचं. आपलं जीवन नटविण्याचा प्रयत्न करायचा.

नवरात्राचे दिवस होते. चार महिन्यांचा संततधार पाऊस संपला होता. शेतंभातं पिकली होती. आता निदान आठ महिने चिंता नव्हती. कळसाईच्या ओटीतली ही लेकरं आनंदली होती. घाटवरची ही ठाकरं मंडळी. त्यांनी आपला आवडता "कांबडवणा" किंवा कोंबळ नाच मांडला.

(१)

**रंगाण रंगाणऽऽऽ हे**
**मातीचं रंगाणऽऽऽ हे**

ये ही रं रंगणात याऽऽऽ हा
आजूच पायी दिलाऽऽऽ हे
आजूच नाच केलाऽऽऽ हे

गाण्या मागोमाग दुसरे गाणे सुरू होते आणि एका पाठोपाठ गाणी चालूच राहतात.

(२)

डोंगरची कळसाई
बया दुधाना ना नलीऽऽ या ग
पितांबरी नटली ..... बया
दागाना फुलली बया

(३)

असा नाचू ग निंगाला
असा टेंभा ना पेटला
असा ढोलक वाजला
समंदा ठाकर नाचला

ढोलावरील थाप ऐकताच ठाकर पुरुष मंडळीत एक नवे चैतन्य निर्माण होते आणि ढोलिया भोवतीने विजेच्या चापल्याने रात्र रात्र ही मंडळी नाचतात. रात्र रात्र चालणाऱ्या या नृत्यात क्षणभरही थकवा वाटत नाही. एरवी ओबडधोबड वाटणारे हे लोक आणि त्यांची गाणी त्यावेळी मशालीच्या टेंभ्याच्या प्रकाशात आणि ढोलियांच्या थापेच्या नादात मात्र स्वर्गीय आनंद निर्माण करून देतात. कधी रानातल्या वादळाप्रमाणे त्यांची हेलकावे घेऊन पळण्याची घाई असते तर कधी विजेच्या चपळाईने ते गिरकी घेतात. पावसाच्या सरसर येणाऱ्या सरीसारखे त्यांचे एका पाठोपाठ अंगविक्षेप नव्यानव्या आवृत्तीतून व्यक्त होत असतात.

निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्यांना जीवनानंद मिळवून देणाऱ्या त्यांच्या या गाण्यांना निसर्गातूनच स्फुरण मिळत असल्याचे जाणवते आणि वेदवाङ्मयाचाही अन्वयार्थ लागतो.

या अदिवासी लोकांनी आपल्या धर्म श्रद्धा जपताना देवांना आणि संतानाही आपल्या कौटुंबिक आणि निसर्गाश्रम जीवनात केव्हढं तरी स्थान दिलं आहे. अभंग आणि ओवी यांना अक्षर छंद असं आपण म्हणतो. परंतु येथील लोकसाहित्यातील संदर्भ पाहून ताल, ठेका, लय, यातील नैसर्गिक मेळणी पाहून मनात 'लोकछंद' असा शब्द आपोआप जाणवतो. उदाहरणेच द्यावयाची म्हटली तर–

(१)

**जनी जाते ओ शेनाला**
**उभा पाठीमागे काना**
**"जनी येऊं दे ग मला**
**शान येचून देईन तुला"**
**घालून पीतांबराची काच**
**शान येचू चहू बाजं**
**शान येचून बांधली म्वाट**
**काना देतो मोटंला गाठ**

(२)

**जनाबाई साळी सडी**
**नामदेव मुसाळ धरी**
**"नामदेवा मुसाळ सोड**
**तुह्या हाता येत्याल प्वाड"**
**"प्वाड आल्या तर येऊं द्या**
**साळी कांडून घेऊं द्या"**

(३)

तुकाराम बोलं, "जीजा कुकू लाव उभा
आले विमाईन बसून जाऊ दोघा"
तुकाराम बोलं, "कुकू लाव तू टिकला
आलं विमाईन कसा जाऊ मी एकला"
तुकाराम बोलं, "जीजा कुरळ्या केसांची
जीजाला फणी आणा हात्तीच्या दातांची"

लोकसाहित्याचा अभ्यास करताना मला नेहमी प्रश्न पडत असे तो असा की, 'लोकसाहित्याचे भाषा सौंदर्य, रससौंदर्य, अभ्यासावयाचे की, भावजीवनाचे सौंदर्य अभ्यासावयाचे?' परंतु लोकजीवनाच्या एकेका अंगाचा जेव्हा मी अभ्यास करू लागलो तेव्हा मला प्रकर्षाने जर कोणती गोष्ट ध्यानात आली असेल तर लोकजीवनाचा आरसा म्हणजे लोक-साहित्य नव्हे तर लोकजीवनाचा आविष्कार म्हणजे लोकसाहित्य. लोक-साहित्याचा आविष्कार हा लोकजीवनातील जाणीवांचा आविष्कार असला तरी तो जाणीवपूर्वक केलेला आविष्कार नसतो. म्हणूनच येथे भाव-जीवनाच्या सौंदर्याला सर्वाधिक महत्त्व आहे. या जाणीवा लोकसाहित्या-तून प्रगट केलेल्या असतात आणि या सर्व जाणीवा प्रत्यक्ष जीवन जगताना म्हणजे कृती करीत असताना सहजस्फूर्त झालेल्या असतात. त्या दृष्टीने लोकसाहित्य ही लोकजीवनातील 'जाणीवांची प्रयोग सिद्ध वाङमय कला' असते. या कलेचे प्रगटीकरण होत असते आणि त्यातून आत्मगत स्वरूपाचा, समूहगत स्वरूपाचा, आनंद मिळत असतो. उदाहरण म्हणून मला आढळलेली काही गीते घेऊ या–

(१) ही कृष्ण जन्म कथा कोणाही मुलाच्या पाचवीची पूजा करते वेळी जमलेल्या बायका म्हणताना मला आढळल्या...

देवयबाई बाळवंतीण वल्या ईच्या कुशी
जल्मला किसन देवू गोकुळ अष्टमीच्या दिशी
देवयबाई बाळवंतीण पिवळ्या ईच्या टाचा
इच्या आईना पाहील्या न्हानीव जाताना
देवईबाई बाळवंतीण रक्ता भरली पायरी
नऊ लाख सोना इना देवाला वायलो
देवयबाई बाळवंतीण इला पाचवा लोटला
इच्या न्हानीवरी बाई इला पान्हा दाटला

(२) भाताच्या आवण्या करतानाचे स्त्री पुरुषांनी गाईलेले हे गीत पहा ...

राम राम म्हणू आवण्या करताना
राम राम म्हणू भाता रोपा धरीताना
राम राम म्हणू राम कौसल्या बाईचा
याच्या बरुबरी झाला निर्भाव देहीचा
मुठी मुठी रोप जसा कानायाचा नाव
यकाच रोपाचा व्हतेस पोताभरी भात
भात ना भात खाला, खाला जानकी रामानं
रामाच्या नावानं आलं वरच येंगून

(३) भात कांडतानाचे हे गीत पहा –

राम राम म्हनू संगतीचं सजन
माझ्या हृदयात कसं मांडलं भजन
राम राम म्हनू माझं गुरु भाऊ
सोन्याचा मुसाळ देते तांदळाला घाऊ
चालणं चंचल तुझं बोलणं मंजुळ
मुखातील दात जिसा साळीचं तांदूळ

**तांदळाला घाऊ देती दणा दणा**
**तांदूळ तांदूळ कसा निघतो दाणा दाणा**
**तांदळाचा दाणा ना कसा निघतो राशी राशी**
**तांदळाला घाऊ देती किती बाया घशी घशी**

(४) वाघराजाची वाघबारस (यात्रा) करताना वाघुवाच्या नावानं लोकछंदातलं हे स्तोत्र पहा –

**देव वाघराज नवसाला पावत**
**शंबर शेरडा त्येच्या नवसाला लागत**
**देव वाघराज पायली पायरी नेमाची**
**यंगून देईना डोंगर गविया मानली**
**देवू वाघराज आमच्या ऐशीत नकु येऊ**
**आमची गुराढोरा नकु वायाला जाऊ देऊ**

या सगळ्या गाण्यांतून भाषेचा, कल्पनांचा, शब्दांचा, अक्षरांचा, स्वैरपणा आपल्याला आढळतो. पण या सर्व गोष्टींना लोकजीवनातील सहज कृत्तींची लय आणि संगीत लाभलेले असते. त्यातून जीवनाचे भाव प्रगटीकरण होत असते.

लोककथांच्या बाबतीत काहीशा फरकानं ही जाणीव होतेच. तेथे एक गोष्ट मला जाणवते ती अशी : कथा निवेदनाचे जे कार्य चालते ते दोन प्रकारचे असते. (१) जाणीवपूर्वक कथा सांगणे (२) सहज जाता जाता, अनुभव, व्यवहार, स्पष्टीकरणार्थ, पुष्टीकरणार्थ, सहजपणे कथा सांगणे. खरं तर अशावेळी या सर्व कथा दृष्टान्त स्वरूपात असतात आणि हे दृष्टांतही त्यांच्या लोकजीवनातील सर्वमान्यतेसाठी पोहचलेले असतात. हीच गोष्ट मला म्हणी, वाक्प्रचार, आहाणे यांच्या बाबतीत आढळली.

परंतु हे दोन्ही प्रकारचे निवेदन स्वैर असते असे वरवर पाहता जाणवले तरी माझ्या असे लक्षात आले की, स्थल, काल, प्रसंग या सगळ्यांशी

सापेक्षतेची सुसंगती त्यात आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर शिकार कथांचे देता येईल. आदिवासी जीवनात सर्वांत रोमांचकारी अनुभव म्हणजे शिकार. मग ती सश्याची असो की वाघराची, सरड्याची असो की सर्पाची; ती करण्यापूर्वी, करताना, केल्यानंतर, कथांची मालिका स्फुट होते आणि आपण एका वेगळ्या विश्वाचा अनुभव घेऊ लागतो. मी माझ्या 'चाळीसगाव डांगाण परिसर ... सांस्कृतिक वाङ्मयीन व भाषिक अभ्यास' या प्रबंधात प्रतिनिधीकत्वाने अशा कथा दिल्या आहेत.

आदिवासी जीवनाचे डोंगर दऱ्यातील सणोत्सव म्हणजे आनंदाचा महापूर. दिवाळी, शिमगा, नागपंचमी असे काही महत्त्वाचे सण त्यांच्या जीवनाला लालित्य प्राप्त करून देतात. जीवनातील सुखाचा अनुभव घडवतात. त्यांच्या जत्रा यात्रा म्हणजे त्यांचे जीवन दर्शन. ह्या सर्वप्रसंगी गीते, कथा, आहाणे, म्हणी या स्वरूपात त्यांच्या आनंदाला, श्रद्धेला, उधाण येते. जीवनाला विनोदाची झालर लागते. अर्थातच या सर्व गोष्टींचे माध्यम लोकसाहित्य असते. मी अशी विपुल उदाहरणे प्रबंधात दिली आहेत.

लोककलांनी विशेषत: तमाशा, भारूड यांनी या आदिवासींच्या जीवनाला साज चढविला आहे. या लोककलांमधूनही हे लोकजीवन प्रतिबिंबित झालेले आहे.

लोकसाहित्याचा अभ्यास करताना आणि विशेषत: एका विशिष्ट परिसरातील लोकसाहित्याचा विचार करताना एक महत्त्वाची गोष्ट माझ्या ध्यानात आली ती अशी.... भूगोल, इतिहास, संस्कृती आणि वर्तमान लोकजीवन या सर्वच गोष्टी स्पष्ट करण्याचे सामर्थ्य लोक-साहित्यात आहे. परंतु सभोवतालच्या परिसरात व इतरत्र गीतांचे व कथांचे पर्यायच सापडतात. लोकजीवन आणि भाषा यामुळे त्यांचे स्वरूप काहीसे बदललेले दिसते, परंतु कल्पनाबीजे तीच आढळतात. त्यामुळेच लोकसाहित्यात मानवी जीवनातील एकात्मता स्पष्ट करण्याचे

सामर्थ्य प्राप्त झालेले असते. मात्र एखाद्या परिसरातील लोकसाहित्याचा अभ्यास पूर्णपणे करावयाचा असेल, त्याचा आस्वाद घ्यायचा असेल, तर भौगोलिक परिस्थिती, ऐतिहासिक घटना संदर्भ, सांस्कृतिक परंपरा, यांची जाण लोकसाहित्याच्या अभ्यासकाला असणे आवश्यक आहे. त्याखेरीज तो आस्वाद घेऊ शकणार नाही, आस्वादक टीका करू शकणार नाही व इतरांना (नवख्यांना) आस्वादनाच्या पातळीवर आणू शकणार नाही. म्हणूनच मी माझ्या प्रबंधात तशाच पद्धतीने अभ्यास केला आहे हे मला मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

लोकसाहित्याचा अभ्यास करताना लोकसाहित्याविषयीचे अनंत प्रश्न मनात उत्पन्न होत असतात आणि लोकसाहित्याचे नवे नवे सामर्थ्य मनात प्रगट होत जाते.

माझ्या अन्य शोध निबंधांतून मी त्या प्रश्नांची मांडणी आणि उकल करण्याचा प्रयत्न केला आहे.

"लोकसाहित्य आणि मी" या निबंधाच्या मिषाने मी लोकसाहित्याकडे कसा ओढला गेलो आणि स्वतः प्रबंधाचा विषय निवडून लोकसाहित्याचा अभ्यास करताना मला काय गवसले ते खरोखरी स्वैरपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तो माझा मुक्त संवाद आहे.

# हस्तकला

## *श्रीमती कमल काळे*

माझे लहानपण माझ्या आजोळी अगदी एका छोटया खेडेगावात गेले. त्यामुळे साहजिकच मला खेडयाचे आकर्षण जास्त. मला लहानपणी आपण खूप खूप शिकावे, वेगवेगळया पारंपारिक हस्तकला लक्षात घ्याव्यात असे मनोमनी वाटत असे. मला गाणे म्हणायला शिकण्याची, पेटी, तबला, सतार ही वाद्ये वाजवायला शिकण्याची, तसेच भरतकाम, शिवणकाम इत्यादी शिकण्याची जबरदस्त इच्छा होती. परंतु त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीत 'मुलींनी, काय करायचे या कला शिकून ?' अशा लोकमतामुळे अशा कला शिकविणारी शिक्षण केंद्रे पण फारशी नव्हती. परंतु या माझ्या सुप्त इच्छा अलिकडे माझ्या मुलींनी व मुलाने पूर्ण करून दाखविल्या म्हणून मला फार आनंद होतो.

स्त्रियांना जात्याच कोणत्या ना कोणत्या कलेची आवड असते. आपले घर शेणाने सारवून त्याला रंग देणे, अंगणात सडा टाकून त्यावर रांगोळी काढणे हे त्यांच्या रोजच्या परिचयाचे असते. खेडयात मला अशा अनेक कलांचे दर्शन झाले. चांभार कला, कुंभार कला, सोनार

कला, वेत कला, लोहार कला, सुतार कला, अशा अनेक कला वंशपरंपरागत चालत आलेल्या आहेत. वडिलांच्या हाताखाली लहानपणापासून मुलाने तेच काम केल्याने त्याला मोठेपणी दुसरे काम शोधायचे कारणही नसे. परंतु बदलत्या काळामुळे मुले शाळेत जाऊन शिक्षण घेऊ लागली. बाहेर नोकऱ्या करू लागली, त्यामुळे त्यांना हे पारंपारिक काम कमीपणाचे वाटू लागले! त्यामुळेच दिवसेंदिवस उत्तम कारागीर निर्माण होणे कमी होऊ लागले.

नोकरीच्या मागे लागून तरुण मुले आता आपले खेडे सोडून शहराकडे धाव घेऊ लागली असून आज उद्योगाचा फार मोठा प्रश्न उत्पन्न झाला आहे.

महाराष्ट्राची पैठणी आजही परदेशापर्यंत प्रसिद्ध आहे पण इतके सुबक काम करणारे कारागीर आता अगदी म्हातारे झाले आहेत. त्यांना डोळ्यांना दिसत नाही. नवीन कारागीर इतकी मेहनत घ्यायला तयार नाहीत! शेवटी या संदर्भात खादी ग्रामोद्योग मंडळाने ही कला जिवंत ठेवण्यासाठी स्पेशल स्टायपेंड देऊन तरुण कारागीरांना जुन्या कारागिरांकडून शिक्षण घ्यायला लावले आहे! भारतातील लोककला, हस्तकला, पुरातन काळापासून आजपर्यंत तशी उज्वल आहे. परंतु बदलत्या काळाच्या ओघाप्रमाणे त्यातही बदल होणे साहजिकच आहे.

भारतीय संस्कृती व लोककला, हस्तकला, यांची जपणूक आजपर्यंत प्रामुख्याने स्त्रियांनीच केलेली आहे. आपण जरा मागच्या काळात डोकावून पाहिले तर त्या काळातल्या राजेराजवाड्यांनी उत्तम कारागीरांना हाताशी धरून आपापल्या राज्यात कोरीव काम, चित्रकला, दगडाच्या मूर्तीतून निर्माण केल्या असे आपणास पहायला मिळते. ताजमहाल हे त्याचेच उदाहरण आहे. विजापूरचा गोल घुमट आजही अभिमानाने उभा राहून आपल्याला हेच सांगतो आहे.

आपल्या भारतीय सणांमध्ये सुद्धा हस्तकला गुंफलेली आहे. चैत्र महिन्यात एक महिना सकाळी अंगणात सडा घालून चैत्रांगण घालण्याची पद्धत आहे. त्यात गौरीचा पाळणा, वारे घालणाऱ्या दोन बायका याशिवाय ठिपक्यांची रांगोळी, गोपूर यांचा सवावेश होतो. रोज प्रत्ये-कीचे नवे नवे पाहून घराघरातून जोपासली जाणारी ही कला अधिका-धिक विकसित होते आहे. अशी हे चैत्रांगण पहाणारांना जाणीव होते. माझ्या लहानपणी आमच्या घराजवळ एक कुंभार राहत होता. तो रोज मातीच्या चुली, मडकी, बैल, नाग इ. बनवत असे. मी रोज तिथे बसून त्याचे काम पहात असे. मी पण एके दिवशी भातुकलीसाठी मातीची चूल बनवली. चूल फार छान झाली. घरची माणसे त्याचे कौतुक करू लागली. माझा आनंद गगनात मावेना. नंतर मी बेंदराला मातीचे दोन बैल बनविले. त्यांची पूजा केली. शिंगात कडबोळी घातली. नागपंचमीला मी एक नाग व नागीण बनवली. त्यांची पूजा केली. अशा रीतीने माझ्या मनात कलेची, निर्मितीची हौस निर्माण झाली.

आम्ही एकदा बाहुला-बाहुलीचे लग्न करायचे ठरविले. ही कल्पना मी आईजवळ मांडली. लगेच आईने घरातल्या जुन्या पान्या चिंध्या जमवून बाहुलीचे अंग, हातपाय तयार केले. शाईने त्याला नाक, डोळे काढले. माझ्या मैत्रीणीने काचेचे मणी आणले. त्यांचे आम्ही दागिने बनविले. झाली लग्नाची तयारी! उत्तम प्रकारे हा लग्न समारंभ पार पडला.

जगात एकूण ६४ कला आहेत असे मी कुठेतरी वाचले होते. आमच्या शेजारी एक दुर्गामावशी रहात असत. त्यांच्या नातवाचे बारसे होते. त्यांनी मला बोलवून पाळण्यावर बांधायला एक चांदवा करून द्यायला सांगितला. भरपूर रंगीबेरंगी चिंध्या मला दिल्या. मी पूर्वी कधीच चांदवा केला नव्हता. तेव्हा मी आईकडून चांदवा कसा असतो ते समजावून घेतले. आईने मला सर्व कल्पना दिली. एक चिमणी करून दाखविली.

मी व माझ्या मैत्रीणीने कापडाच्या तशा चिमण्या केल्या. चंद्र-सूर्य केले. मग आम्हाला दुर्गामावशीने रंगीबेरंगी काचेचे गोळे आणून दिले. मग काय? चांदव्याला खूपच शोभा आली. तो चांदवा मग आम्ही पाळण्यावर टांगला. शेजारीपाजारी तो चांदवा बघून खूप खूष झाले व त्याचे कौतुक करू लागले! कोणतीही गोष्ट असो अगर कला असो, त्यात तुम्ही पूर्णपणे समरस झाल्याशिवाय त्याला पूर्णत्व येत नाही असा माझा आजपर्यंतचा अनुभव आहे. पूर्वीच्या स्त्रिया शाळेत जाऊन जरी शिकलेल्या नसल्या, तरी त्यांनी मण्यांची केलेली तबके वाटलीतल्या मण्यांच्या वस्तू, मण्यांचे पोपट, खरोखरीच आकर्षक असत. तुळशीबागेत मिळणारे चुंबळीवर बसलेले राजाराणी, त्यांचे पितळी दागिने खरोखरीच आकर्षक असत. तिथेच मिळणारी त्रिकोणी लाकडाची बनविलेली ठकी परदेशापर्यंत आजही लोकप्रिय आहे!

आमच्या शेजारी एक कानडी बाई रहात होत्या. त्यांना कामातून थोडा जरी वेळ मिळाला तरी त्या धारवाडी कशीदा काढत असत. मी एक दिवस त्यांच्याकडे जाऊन त्यांना कशीदा काढताना पाहिले. ते नाजूक टाके पाहून आपणही हा कशीदा काढावा म्हणून मी त्यांना 'मला हा शिकवाल का?' असे विचारले. त्यांनी मला तो आनंदाने शिकविला. मग काय? घरच्या व मैत्रीणींच्या पोलक्याच्या बाहीवर धारवाडी कशीदा काढून झाला देखील!

त्याचप्रमाणे कागदाचा चेंडू, पोपट, कुत्रा, ससा ही खेळणी मी इतरांची पाहूनच करू लागले. किंबहुना मला तो एक नादच लागला. वारली लोक आपल्या झोपडीवर नुसत्या रेघांचे डिझाईन काढतात. ते किती छान आणि सारखे दिसते. ते थोडेच ड्रॉइंग शिकलेले असतात? बाटीक कला, काचेची खेळणी बनवणे, बिद्री काम म्हणजे लोखंडाला पॉलिश करून त्याच्या वस्तू बनवायच्या. पोपट बनवून व त्यांचे खेळ करून

 काही लोक त्यावर आपली उपजीविका करीत आहेत. महाराष्ट्रातल्या

प्रत्येक सणाच्यावेळी आपणास नवनवीन हस्तकलेचे दर्शन होते. दरवर्षी तेच सण पण नवीन रूप धारण करून येतात. पण त्याचा कंटाळा येत नाही. अशा कलाविष्कारामुळे मनाचे समाधान होते. डोळ्यांचे पारणे फिटते व एक प्रकारचा नवा उत्साह मनात निर्माण होतो. प्रत्येक माणसाच्या मनात कशा एकाबद्दल जी तळमळीची इच्छा असते ती कधीतरी पूर्ण झाल्याशिवाय रहात नाही.

गेल्या १५–२० वर्षांत भारताचे परदेशाशी दळणवळण वाढल्याने आपल्या लोककलांमध्ये खूप सुधारणा झाली आहे. शंख, शिंपले, कवड्या इत्यादी नुसत्या खेळण्यांच्या वस्तूंपासून विविध कला निर्माण होऊ लागल्या. त्याही पुढे जाऊन आपल्या घरातल्या टाकावू वस्तू, ज्यांना कचरापेटीची वाट दाखविली जायची, त्या आता हॉलमधल्या शोकेसेस-मधून दिसू लागल्या! छोटे मोठे डबे, वादल्या, टूथपेस्टची बुचे, गळणारे केस, नारळाची शेंडी, सिगारेटच्या पाकिटातला सोनेरी कागद, या वस्तूंपासून कलात्मक वस्तू निर्माण होऊ लागल्या व लोकही त्याकडे आकर्षित होऊ लागले. याशिवाय निरनिराळ्या वस्तूंनी आपले घर सज-विण्याकडे लोकांचा कल वाढू लागला, काळाच्या प्रगतीबरोबर यापेक्षाही नवे शोध लागतील असे निश्चित वाटते. दर दहा वर्षांनी आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात खूप बदल झालेला दिसून येतो. मग हस्तकला यापासून वेगळी कशी राहील? माणसाच्या कलेबद्दलच्या चवीसुद्धा सारख्या बदलत असतात. पृथ्वी ज्याप्रमाणे गोल आहे, त्याचप्रमाणे पुरातन काळातल्या अशा कलाही पुन्हा नवे रूप घेऊन आपणासमोर येतात ही वस्तुस्थिती आहे व त्यालाच आपण सुधारणा झाली असे म्हणतो. असो.

पूर्वीच्या काळी हस्तकलेचे रूप जरा वेगळे होते. मला आठवते आहे की, दिवाळीच्या सुमारास पांडव पंचमीपर्यंत अंगणामध्ये रोज एक महाभारतातील व रामायणातील देखावा शेणाने करायचा. त्यामुळे बुद्धीची पण कसोटी लागायची. शेण आणून त्याचे पाच पांडव उभे

करायचे, त्यांना शेणाचेच डोके, हात करायचे, त्यांच्यापुढे शेणाचीच ताटे, वाट्या करून द्रौपदी त्यांना वाढते आहे असे दाखवायचे. त्यावेळचा बाजार, भाजीवाले, सर्व शेणाचेच करायचे! रंगीत कागदाची भाजी करून डोक्यावरील बुट्टीत ठेवायची. टोपलीत फुले ठेवायची व संध्याकाळी शिंपामध्ये वात व तेल घालून दिवे लावायचे. प्रत्येक घरी नवीन देखावा करायचा. तो रोज पाहून यायचा व दुसरे दिवशी आपण तसा करायचा, म्हणजे त्यावेळी सुद्धा बाहुल्या होत्या पण शेणाच्या!

त्याप्रमाणेच गणपतीच्यावेळी आरास करायची, नंतर गौरायचे मुखवटे बसवून बऱ्याच जणांच्या घरी गौरी बसायच्या. त्यावेळी एक उभी काठी व एक आडवी काठी उभी करून त्या उभ्या काठीवर मुखवटा बसवायचा. आडव्या काठीला एखादी चोळी घालून साडी नेसवायची व दागिने घालायचे व पुढे दोन डबे ठेवून त्यावर धान्य मापायचे मापटे ठेवायचे. नंतर त्यावर कुंची घालायची की, झाली तयार बाळं! मी खडकवासल्याला असताना या गौरी पाहिल्या व नंतर मला विचार आला की, कापडाचे हात व मधला भाग करून तो त्या स्टॅन्डमध्ये खोवायचा, खणाची चोळी त्याला घालायची, वर मुखवटा ठेवायचा की, झाली खरी गौराई. आम्हाला त्यावेळी अशा खूप ऑर्डर्स आल्या. आता बदलत्या काळात या गौरी फार प्रसिद्ध झाल्या. खेडोपाडी माझ्या विद्यार्थिनी या गौरी फार उत्तम बनवून देऊ लागल्या, ते पाहून मी शिकवलेली कला विद्यार्थिनी उपयोगात आणताहेत याचे मला समाधान वाटले. आपल्या प्रत्येक सणामध्ये त्या काळच्या दृष्टीने काही तरी कलात्मक गुंफण आढळून येते. त्यावेळी जरी आपणाला त्याचे महत्त्व कळले नसले तरी आज या विचाराने मन भारावून जाते. माझा आपला हा नाद.

माझा हा लहानपणीचा नाद परमेश्वराने माझ्या ३६ व्या वर्षी पूर्ण केला. ऑल इंडिया हॅंडिक्राफ्ट बोर्डातर्फे मुंबईत बांद्र्याला चाललेल्या डॉल ट्रेनिंग सेंटरमध्ये एक वर्षाच्या कोर्ससाठी कोल्हापूर जिल्ह्यातर्फे

माझी निवड झाली. ४० विद्यार्थिनींमध्ये तेथे मी पहिली आले हे सांगायला आनंद वाटतो. पुढे पुण्यापासून १० मैल दूर असलेल्या खडकवासला या खेडेगावात सरकारने एक प्रयोग म्हणून बाहुल्यांचे शिक्षणवर्ग सुरू केले. त्याचा मुख्य उद्देश हा होता की, खेडेगावातील शेतकरी महिला कलेचे शिक्षण घेऊ शकतील का हे 'पडताळून पहाणे', सुदैवाने माझी या शिक्षणवर्गावर शिक्षिका म्हणून नेमणूक झाली.

शिक्षण वर्गाचा पहिलाच दिवस. एका पेटाऱ्यात मी स्वत: केलेल्या खूप बाहुल्या भरून घेतल्या. मी व हवेलीचे प्रोजेक्ट ऑफिसर सर्व सामान ट्रकमध्ये भरून खडकवासल्यास गेलो. एका मातीच्या घरात सोप्यावर खुर्च्या मांडल्या होत्या. पन्नाशीचे वय उलटून गेलेल्या १५ विद्यार्थिनी आपल्या समोर डोक्यावरून पदर घेऊन खाली मान घालून दोन पायांवर बसल्या होत्या. शिपायांनी जणु काही चोर धरून आणले आहेत अशी त्यांची मुद्रा होती. मी त्यांच्या समोर त्या पेटाऱ्यातल्या सर्व बाहुल्या, गौरी, सारख्या मांडल्या. प्रोजेक्ट ऑफिसरनी त्यांना सांगितले की, 'या काळेबाई कोल्हापूरहून तुम्हाला बाहुल्या शिकविण्यासाठी आल्या आहेत.' असे म्हटल्यावर सर्व विद्यार्थिनी आपापसात हसायला लागल्या. ते पाहून मलाही मनातून जरा भीती वाटली !... तरी पण उसने आवसान आणून मी त्यांना म्हटले, 'तुम्ही का हसता ? माझं काही चुकलं का ?' तेव्हा एक म्हातारी बाई उठून हात जोडून साहेबांना म्हणाली, 'साहेब, मी एक बोलू का ? हे सरकार आहे हे मूर्खच आहे, इकास इकास म्हणून काही तरी आमच्या गावाला आणतंच. ह्या बाहुल्या आमच्या आईवडिलांनी कधी आम्हाला डोळ्यांनी दाखवल्या नाहीत आणि ही काळीबाई आम्हाला काय शिकीवणार ? त्यांना द्या परत पाठवून ! ... ' विचार करा तुम्हाला शिक्षक म्हणून शाळेवर नेमले आणि पहिल्याच दिवशी आम्हाला हे शिक्षक नकोत असे जर विद्यार्थी म्हणू लागले तर तुमची काय स्थिती होईल? अगदी तशी माझी झाली. पण उसने अवसान आणून मी त्यांना

म्हटले की, 'मी इतक्या लांबून आले आहे आपण आठ दिवस पाहू नाही तर मी परत जाईन, पण मला तुमचा गाव दाखवा, तुमची घरं दाखवा.' मग त्या म्हणाल्या, 'नुसत्या तुम्ही रहा ना? आमच्या घरी जेवायला या. चहा प्यायला या. पण या बाहुल्या आम्ही शिकणार नाही.' हे ऐकून प्रोजेक्ट ऑफीसरही फार नाराज झाले व म्हणाले, 'पंधरा दिवस आपण पाहू व मग काय ते ठरवू.'

दुसरे दिवसापासून आम्ही सर्व सामान त्या मातीच्या घरात लावले व एक सतरंजी घेऊन एका कोपऱ्यात १५ विद्यार्थिनी व मी बसू लागलो.

काही जणींना शिलाई मशीन कसे चालवायचे ते शिकवण्यासाठी खुर्चीवर बसविले व आपल्या बाजूने चाक फिरले पाहिजे याची प्रॅक्टीस करा असे सांगितले. एक बाई खुर्चीवर बसल्या व मला म्हणाल्या, 'बाई मी खुर्चीवर बसले आता तुम्ही माझे पाय कसे हलवायचे ते हलवा.' त्यांनी शिलाई मशीन कधीच पाहिले नव्हते! म्हणून त्यांना जरा गम्मत वाटली. दुसऱ्या एका बाईंना पाय मारता येऊ लागले. म्हणून एक कापड व दोरा लावून दिला. प्रथम मी शिवून दाखवले व त्यांना पाय मारायला सांगितले. त्यांनी पाय मारल्यावर आपोआप कापड पुढे जाते हे पाहिल्या-वर त्यांनी मशीनला घट्ट मिठी मारली व म्हणाल्या, 'कापडाबरोबर जर मशीन पुढे जायला लागले तर काय करायचे? म्हणून मी त्याला घट्ट मिठी मारून धरून ठेवले आहे!' अशा एक ना अनेक गमती मला सुरवातीला पहावयास मिळाल्या.

दोन तीन दिवस गेल्यानंतर मी त्यांना म्हटले, 'आपण रोज जर नुसत्या गप्पा गोष्टीत दिवस घालवला तर ऑफीस मला विचारील व पगार देणार नाही. तेव्हा माझ्या बाहुल्या राहू देत पण तुम्हाला स्वतःला तरी काय काय येते सांगा.' त्या म्हणाल्या, 'आम्ही जुन्या कापडाच्या पांघरण्यासाठी गोधड्या शिवतो.' मी म्हटले, 'मग त्या तरी घेऊन या, म्हणजे आपल्याला साहेबांना दाखवता येतील.' असे म्हटल्या बरोबर

तीन चार जणी उठल्या व मुसळाला गुंडाळलेल्या गोधड्या घेऊन आल्या! आम्ही पाच जणींचा ग्रुप केला व तीन गोधड्या शिवायला लागलो. तोंडाने गाणी भजन म्हणत आमच्या आठ गोधड्या पुऱ्या झाल्या. गोधड्या शिवताना त्यावर रंगीबेरंगी कापडाच्या चिंध्या लावतात. सहज मनात विचार आला, 'या तुकड्यांवर एखादे फूल काढायला शिकवले. तर गोधडी यापेक्षा छान दिसेल' म्हणून मी त्यांना रेशीम आणि सुई दिली. एकक छोटा कापडाचा तुकडा दिला व त्यावर टाके घालायला शिकवले. एका बाईने काहीतरी टाके घालून मला दाखवले. मी त्यांना उत्तेजन देण्यासाठी म्हटले, 'अहो कृष्णाबाई, तुम्ही फार छान टाके घातले आहेत. मी जेव्हा मुंबईला शिकायला गेले तेव्हा मला सुद्धा पहिले दिवशी इतके छान टाके घालता आले नाहीत?' माझ्या या वाक्याने त्या बाईंना इतका आनंद झाला की, त्या एवढ्या म्हाताऱ्याबाई पण सर्व क्लासभर 'मला आलं, मला आलं' म्हणून नाचत सुटल्या व मला म्हणाल्या, 'बाई, तुम्ही मला शिकवा! मी सर्वांना शिकवते.' या दिवसापासून आमचा बाहुल्यांचा शिक्षण वर्ग व्यवस्थित सुरू झाला. यावरून असे दिसून येते की, माणूस सुशिक्षित असो अगर अशिक्षित असो परमेश्वराने सर्वांना वेगवेगळी बुद्धी दिली आहे. या महिलांनी कधीच हे काम पाहिले नसल्याने सुरवातीस त्यांना ते येणार नाही असे वाटले. मी त्यांच्यामध्ये फक्त आत्मविश्वास निर्माण केला. आज त्यांचे नाव आपल्या देशातच नव्हे तर खडकवासल्याची त्यांची बाहुली अमेरिकेत सुद्धा सर्वांच्या तोंडी झाली आहे! शिवाय म्हातारपणाची मला हा विरंगुळा मिळाल्याने मी स्वत: फार समाधानी आहे.

त्यांना महिन्याला २० रुपये शिष्यवृत्ती मिळत होती. पहिल्या दोन तीन महिने त्या अंगठा उठवूनच पैसे घेत असत. मग मी त्याना सांगितले की, 'तुम्हाला सही करता आली तरच यापुढे पैसे मिळणार म्हणून तुम्ही आपले नाव लिहायला शिका.' अशा तऱ्हेने साक्षरता वर्ग सुरू झाले. आज त्या मोठ्या अक्षरांची पुस्तकेही वाचू लागल्या आहेत. मी

त्यांच्या सहवासात बारा वर्षे त्या खेड्यात राहिले. चीनच्या लढाईच्या वेळी त्याचे ४० महिलांचे होमगार्ड पथक सुरू झाले. त्यांना कुकर कसा लावावा, वेगवेगळ्या भाज्या कशा कराव्या, लोणची, मुरंबे कसे घालावे हे सर्व शिक्षण मी दिले आहे. थोडक्यात म्हणजे त्यांची सर्वांगीण उन्नती झाली आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

# लोककला

**अ. दि. कोकड**

आकार आणि घाटांचे सुलभीकरण करून त्यात आशय अथवा नेमके वैशिष्टय व्यक्त करण्याच्या वृत्तीला लोककला म्हणावयास हरकत नाही. किचकट बारकावे टाळून, ढोवळपणाने गोड आकार निर्माण करून, त्यात भोळेभावडे भाव उतरविण्याची क्रिया हे लोककलाकार करीत असतात. आपल्या महाराष्ट्रात आणि भारत देशात लोककलांचे कितीतरी प्रकार आहेत. त्यापैकी काही कलाप्रकार अथवा कलाकुसर ५०–६० वर्षांपूर्वी घरोघरी चालत होती. विशेष करून महिलांनी या लोककला जतन केल्या होत्या. पणजीपासून आजी आणि आजीपासून आई ह्या मार्गाने त्या लोककला शेकडो वर्षे जपल्या गेल्या होत्या. अलिकडच्या काळात मात्र कारखानदारी वाढून शहरे प्रचंड प्रमाणात वाढू लागली. जागेची टंचाई, धावपळ आणि गडबड या नागरी संस्कृतीच्या अटळ बाबी ठरू लागल्या. त्यामुळे लोककलांकडे दुर्लक्ष होऊन त्यांची गळचेपी होऊ लागली. त्याच बरोबर नव्या पिढीवर पाश्चात्त्य संस्कृतीचे आणि तथाकथित आधुनिकतेच्या लाटांचे प्रचंड आघात होऊ लागल्याने जुन्या चालीरीती व रिवाज यावरील विश्वास उडत चालला. जुने ते सर्व

टाकाऊ अशी विचारसरणी पुढे येऊ लागली आणि लोककलांच्या संवर्धनाऐवजी त्या कला नष्टप्राय होत चालल्या. डॉ. कमलादेवी चटोपाध्याय, पपुल जयकर आणि आपल्या महाराष्ट्रात डॉ. सरोजिनी बावर यांच्या प्रयत्नांनी लोककलांना थोडेतरी जीवदान मिळू लागले. जुन्या नमुन्यांचे जतन होऊ लागले. लोककलांच्या निर्मितीसाठी प्रोत्साहन मिळू लागले. लोककला वस्तूंच्या संग्रहालयांना महत्त्व येऊ लागले. त्यामुळे मरणोन्मुख झालेल्या लोककलांना तरतरी आणण्याचे प्रयत्न सुरू झाले असे म्हणता येईल.

### लोककलांचा प्रथम परिचय

लोककलांच्या परिचयासाठी मला खेड्यात अथवा ग्रामीण भागात जाण्याचा फारसा प्रसंग आला नाही. परंतु घराघरातून लोककलांचे प्रचलन असे आणि तेथे त्यांचे संवर्धनही होत असे. पंढरपूरसारख्या छोट्या शहरात माझे बालपण गेले आणि सुरुवातीचे शिक्षणही तेथेच झाले. माझी आजी म्हणजे लोककलांचे निर्मितीस्थान होते. उजाडण्यापूर्वी उठून ती सडासंमार्जन करी आणि त्यावर सुरेख शुभ्र रांगोळ्या काढी. देवापुढची जागा सारवली जाई व त्यावर शंख, चक्र, गदा, पद्म, गोपद्म, स्वस्तिक अशा रेखीव आकृत्या रेखाटल्या जात. त्या मी तासन् तास पहात असे. दोन बोटांच्या चिमटीतून रांगोळीच्या रेषा निघतात काय आणि बघता बघता त्यातून मनमोहक आकृतीबंध निर्माण होतात काय, सारेच चकित करणारे वाटे! एकदा तर चिमटीत मी रांगोळी घेऊन पाहिली. पण रेषा काही ओढता आली नाही.

त्यावेळी पिठाच्या मोजक्याच गिरण्या निघाल्या होत्या. तरीसुद्धा माझी आजी विशिष्ट दळण घरीच दळी. एखादे वेळी माझ्या आईलाही ती मदतीला घेई. पहाटेच्या अर्धवट झोपेत असताना त्या दोघींच्या जात्यावरच्या ओव्या कानावर येत. कधी त्या ओव्यात माझ्या भावंडांच्या नावांचाही उल्लेख होई. ओव्यांचे ते मंजुळ स्वर सतत ऐकावेसे

वाटत. ते शब्द आज विसरले असले तरी ते स्वर अजूनही कानात घुट-मळत आहेत. तेच स्वर पुन्हा ऐकावयास मिळावेत म्हणून माझे कान आसुसलेले आहेत.

दुपारच्या रिकामपणाच्या वेळी ती मण्यांची आणि काचेच्या नळ्यांची तोरणे तयार करत वसे. साध्यासुध्या आकारातील, साध्याच रंगसंगतीतील वेगवेगळी तोरणे घरातल्या प्रत्येक दरवाज्यांना लावलेली असत. पांढऱ्या शुभ्र मण्यांची षट्कोनी, अष्टकोनी अष्टदळाप्रमाणे आकृत्या मण्यांनी विणून त्यांना दुसऱ्या रंगाच्या मण्यांनी किनार काढून तबके तयार होत. माझे वडील आणि आजोबा आमच्या दुकानातील जमा-खर्चाच्या लांबलांब वह्या काळ्यासभोर शाईने लिहीत बसत. त्यावेळी वापरण्यात येणाऱ्या पितळेच्या दौती आणि लेखण्यादेखील पांढऱ्या सफेत मण्यांनी आच्छादून गेलेल्या असत. त्यात कधी प्राण्यापक्ष्यांचे सुलभ आकारातले सुरेख नमुने पहावयास मिळत. हे पक्ष्यांचे, प्राण्यांचे आकार मण्यात कसे बसविता येतात याचेही मला नवल वाटे. त्या साध्या परंतु मोहक आकारांची तेव्हापासून माझ्या मनावर मोहिनी पडली आहे.

कोणत्यातरी निमित्ताने घराच्या भिंती सारवून झाल्यावर, तुळशीच्या लग्नाच्यावेळी तुळशीवृंदावन रंगवून झाल्यावर, त्याच्यावर काडीला चिंधीचा बारीक बोळा बांधून तो चुन्यात अथवा गेरूत बुडवून मनात किंचितही धागधूग न आणता किंवा क्षणाचाही विचार न करता आमची आजी राधाकृष्ण काढी. तुळशीवृंदावनावर खालीवर गोलाकार आकारांची किंवा त्रिकोणांची नक्षी होई. त्या जागीही मग स्वस्तिक, गोपद्म वगैरे येत. घराच्या भिंतीवर दुहेरी त्रिकोण काढून त्यावर तरारलेले झाड बाहेर येई. त्यात वास्तवता किती होती याचे मोजमाप कोणी केले नसले तरी ते झाड नाही हेही कोणाला सिद्ध करून देता आले नाही! देवादिकांच्या आकृत्या ठराविक साध्या आकारांच्या मानवाकृतीतूनच साकार होत. नक्षीच्या किनारी म्हणजे आमच्या आजीच्या हातचा मळ,

ती सरसर कितीतरी प्रकारच्या किनारी सहज काढून जाई. मग त्यात किती गती आहे, लय आहे, हे कोणी पाहो अथवा न पाहो. त्या किनारी, त्यांच्यातली सफाई आणि त्यांच्यातला ऱ्हिदम माझ्या मनावर मात्र पक्का ठसला.

हे जसे भिंतीवरचे नक्षीकाम त्याप्रमाणेच सणासमारंभाच्या निमित्ताने सारवलेल्या जमिनीवरही चुन्याच्या गोलगोल चक्राकार आकृत्या काढल्या जात. दिवाळीच्यावेळी चुलाणे सारवून त्यावरही नक्षीकाम होई. पाणी तापवावयास ठेवावयाचे हंडे देखील लख्ख घासून त्यावर चुना फासून गेरूने नक्षीकाम होई. आंघोळीच्या आधी मी ते निरखून पाही. एखादेवेळी माझ्या हट्टापायी ते नक्षीकाम मी करी पण आजीच्या सफाईची त्याला सर येत नसे. पाटावरही तसेच नक्षीकाम होई. पण स्नानाचे पाणी पडताच ते धुवून जाई. आणि हे सर्व माहीत असूनही आजीची कारागीरी चालूच राही. हे झाले चित्रकलेचे काम. पण शिल्पकलेतही आमची आजी मागे नव्हती. दिवाळी जवळ येताच शेणाच्या गवळणी, शेणाचाच कृष्ण, पेंद्या, ती झटक्यात बनवून टाकी. डोक्यासाठी एक गोल आणि बाकीच्या शरीरासाठी दुसरा लांबट गोल केला की, झाली गवळण! तिच्या डोक्यावर खोलगट भांड्यासारखा आकार करून त्यात मात्र खरोखरीचे थोडे दूध दही घालायचे. पेंद्या मात्र जमिनीवर आडवा पडलेला आणि त्यालाच फक्त हात पाय काढावयाचे (तसा आकार तयार करावयाचा). आजीची शिल्पकला एवढ्यावर थांबत नसे. काही मुखवटे ती तयार करी. पोळा आला की, घट्ट चिखल गोल फिरवून फिरवून (लोटून) लांबट सुरळ्या तयार करावयाच्या. त्या एकत्र जोडून बैलांचे चार पाय व शरीर तयार होई. त्याला तोंड, शिंगे व शेपूट जोडले की, झाला बैल तयार. डोळ्यांसाठी दोन छोट्या गोळ्या करून डोळ्याच्या जागी चिकटवून टाकावयाच्या. या बैलांच्या घोळक्यात एक गाय वासरू पण तयार व्हायचे आणि त्याचबरोबर एक गुराखी सुद्धा! तसेच त्याच्या

हातात काडीरूपी काठी द्यावयास ती विसरायची नाही. मुलींना खेळण्यासाठी चिखलाच्याच बाहुल्या, चिमणी, राघू, हत्ती, घोडा पण ती तयार करून देई. त्यांच्या घरात चिमणी व पोपटाची सारी वैशिष्टचे सामावलेली असत.

रथसप्तमीच्या वेळेला पाटावर ती हळदी कुंकवाचे गोल रेषांचे चंद्र-सूर्य काढी. दोघांच्या मध्ये त्यांचा रथ, रथाला चाके आणि सारथी पण असायचा. चैत्रांगणाच्यावेळी राधाकृष्णांसह किती तरी आकृत्या त्यात रेखाटल्या जात.

घरात बालकाचा जन्म झाला की, चांदवा तयार करण्याची घाई होई. कापूस भरलेल्या त्या गुबगुबीत चिमुकल्या चिमण्या डोळ्यांसाठी त्यांना काळे मणी जोडले जात. त्यात काही पोपटही असत. रंगीबेरंगी सतत हालणारा हा पक्ष्यांचा मेळा पाळण्यावर टांगला जाई. त्यात काही रंगीबेरंगी काचेचे गोल व इतरही बरीच कलाकुसर असे. आता ते चांदवे, कुंच्या टोपडी कोठे गेली कोणास ठाऊक! आजच्या मुलांना दाखवावयालाही ती शिल्लक नाहीत. याशिवाय तिचा कशिदा 'पॅचवर्क' व त्यातून भूमिती तसेच प्राणी व पक्षांच्या आकृत्या तयार होत. लहानपणी माझी त्यातून खरोखरच करमणूक होई. या सर्वांमुळे लोककलांविषयीचे माझे प्रेम वाढीला लागले. लोककलांबद्दल मला उत्सुकता वाटू लागली.

सायंकाळी आम्ही स्टेशनरोडला फिरायला जात असू. वाटेत बुरुडाची, कुंभाराची घरे लागत. एक सुतारही बाहुल्या, पाळणे आणि एखादेवेळी कोरीव काम करत बसे. कुंभाराचे चाक अन् त्यावर भराभर तयार होणाऱ्या वस्तू, बुरुडांच्या टोपल्या, दुरडचा, परडचा आणि सुताराचे शिल्पकाम पाहण्यात माझे तासच्या तास जात. कधीकधी माझे मित्र माझा वेडेपणा पाहून मला सोडून पुढे निघून जात. पण मी मात्र त्या आकार

घाटात आणि त्यावर तयार होणाऱ्या पोतात तसाच घुटमळे, त्यामुळेच मोठेपणी लोककलांचा अधिक अभ्यास करावा असे मला वाटू लागले.

**रांगोळी**

लोककलांबद्दलची माझी उत्सुकता वाढत असतानाच ड्रॉइंग अँड पेंटिंगचा पाच वर्षांचा अभ्यासक्रम मी पूर्ण केला. त्यातच कै. प्रा. पी. के. गोडे यांचा रांगोळीवरचा पेपर माझ्या वाचण्यात आला. त्याच पेपरात कलेच्या विद्यार्थ्यांने याविषयात अधिक काम करावे अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. त्यांच्या अवाढव्य ज्ञानाचा मला थोडा लाभही झाला होता. हे ऋण अल्प प्रमाणात तरी फेडण्यासाठी मी प्रांतोप्रांतीच्या रांगोळ्यांचा इतिहास, आख्यायिका, प्रथा वगैरे जमविण्यास सुरुवात केली. आठ वर्षांनी 'रंगावलीची विविध रूपे' हे पुस्तक तयार झाले.

हेच काम करीत असताना मला बंगालचे 'काजळरेखा' हे लोकगीत मिळाले. त्या गीताप्रमाणे अज्ञ अडाणी ग्रामीण महिला त्यांच्या 'अल्पने'त किती नानाविध आकृत्या काढीत हे ध्यानात आले. त्या खेड्यातल्या मुलीने साळी पाण्यात भिजवून त्या वाटून त्याचा पातळसा पांढरा द्रव तयार केला. कापडाची चिंधी बोटात धरून तिने प्रथम मातापित्याचे चरण काढले. धान्याच्या लोंब्या, देवतेची पावले, शिवाचा राजवाडा, कैलासातील पार्वती काढून मध्यभागी कमळाच्या पाकळ्यावर बसलेली लक्ष्मी व विष्णू, रथ ओढणारा राजहंस, मनसादेवी, चेटकीण, सिद्ध, स्वर्गातील उद्याने, वाणदेवी, रक्षाकली, कार्तिकेय, गणेश, त्यांची वाहने, पुष्पक विमान, राम लक्ष्मण, शेवटी यम, इंद्र, चंद्रसूर्य, देऊळ, जंगलात मेलेला राजपुत्र, इत्यादी काढून तिने त्यापुढे लोण्याचा दिवा लावला नि नमस्कार केला. या व्रताच्या निमित्ताने अल्पनेत इतक्या भिन्न भिन्न आकृत्या काढल्या गेल्या.

यारू जमात ही जवळ जवळ आदिवासी जमात आहे म्हटले तरी चालेल. त्यांच्यातील स्त्रिया भोळ्या भावड्या पण भाविक आहेत.

जीवनात गतिमानता निर्माण व्हावी यासाठी त्या माशाच्या आकृत्या काढतात. त्यात एक वैशिष्टयपूर्ण आकृती माझ्या पाहण्यात आली. माशाचे एक साधे त्रिकोणी तोंड, त्या तोंडाच्या तिन्ही बाजूंला त्या तीन मासे काढतात. म्हणजे तीन माशांचे मिळून तोंड मात्र एकच असते ! ही आकृती दिसावयास सुरेख असते.

आपल्याकडे अष्टदळाची रांगोळी अष्टदिशात्मक विश्वाचे प्रतीक मानली जाते. तसेच तिच्याभोवती एक प्रकारचे अदृश्य वर्तुळ असल्याने ते विष्णूचे कमळ व लक्ष्मीचेही प्रतीक मानले जाते. आपल्याप्रमाणेच बंगालमध्येही अष्टदळाची आकृती शुभ मानली जाते. या आकृतीचा उपयोग लग्नाच्यावेळी करतात. वराच्या घरात वधू जेथे पाटावर बसवितात त्या पाटाखाली ही आकृती रेखाटतात. गृहप्रवेशाच्यावेळी वधूचे प्रथम पाऊल तेथे पडते तेथेही ही अल्पना चितारली जाते. पूजेचा मंगलघट ठेवण्यासाठी देखील याच शुभ आकृतीचा उपयोग केला जातो.

आंध्रमधील रांगोळयांचा (मुग्गुलूचा) खरा बहर संक्रांतीच्यावेळी येतो. संक्रांतीला ते लोक पोंगल म्हणतात. त्या दिवशी उजाडण्यापूर्वीच दारापुढे मुग्गुलू काढण्यास सुरुवात होते. आकृती काढून तिची रेषा साधारण २०० फुटांपर्यंत दूर नेतात. पुढच्या घरातील गृहिणी त्या रेषेला जोडून आपली रांगोळी काढते आणि तीही आकृतीची रेषा पुढे नेते. या पद्धतीने सर्व गावातील मुग्गुलू एकमेकींना जोडून भली मोठी अखंड मुग्गुलू तयार होते.

भाद्रपद, आश्विन, कार्तिक या महिन्यात केरळात रामायण महाभारत बऱ्याच ठिकाणी वाचण्याचा प्रघात आहे. त्यावेळी आणि ओणम् सणाच्यावेळी अंगण स्वच्छ करून रंगीबेरंगी फुलांच्या आकर्षक रचना करतात. शिवाय इतर सणांच्यावेळी दरवाजे व भिंतीही निरनिराळ्या फुलांनी भूषित करण्याची तिकडे प्रथा आहे. यात फुलांच्या (पाकळयांच्या) वेलबुट्टया व नक्षा आपोआप तयार होतात.

राजस्थानी रांगोळीची वैशिष्टयेही पाहण्यासारखी आहेत. लग्नाच्या चौथ्या दिवशी बिकानेर येथे गोस्वामी जाह्नण 'नागवल्ली' समारंभ साजरा करतात. यावेळी सर्वतोभद्रासह चार दिशांनी चार हत्ती काढतात. एक हत्ती तांदळाच्या रंगीत पिठाने रंगवितात. दुसरा गव्हाच्या रंगीत पिठाने, तिसरा मिठाच्या चूर्णाने व चौथा हत्ती बारीक साखरेने भरतात.

वाढदिवसाच्या दिवशी सुवासिनी आरतीच्या ताम्हणात रांगोळी काढतात. मूल जन्मल्यानंतर सहाव्या दिवशी पिवळ्या व तांबड्या रंगांनी अथवा हळदी कुंकवाने भिंतीवर कुलदेवता चितारतात.

नागपंचमीच्या दिवशी तेथील बायका हळद मिश्रित रांगोळीने सात सर्प रेखाटतात. श्रावण शुद्ध पौर्णिमेला कावड घेतलेला श्रावणकुमार, राखी पौर्णिमेला दोन्ही बाजूंच्या भिंतीवर 'सूण मांडला' काढून त्याची पूजा करतात. ही सर्व चित्रणे लोककलातच मोडतात.

वारली लोकांच्या भिंती चित्रांचे शासनाने कॅलेंडर काढल्यामुळे अनेकांच्या पाहण्यात ती लोककला आलेली आहे. सांझी, कजली आदी भिंती चित्रणाचे प्रकार लोकगीते व लोकरीतीरिवाज यांच्याशी निगडित आहेत. लोककथांचाही त्यातून उगम झालेला आहे. मिथिला नगरीत मधुबन्त चित्रकलेवर आधारित अशी लोकचित्र शैली प्रचारात असून अनेक मंगल प्रसंगी पशुपक्षी, झाडे, झुडपे, जलचर आणि मानवाकृती भिंतीवर, भांड्यावर आणि डब्यावर काढण्यात येतात. ही चित्रकारी इतकी सुरेख असते की, परदेशी पर्यटक तावडतोब त्या वस्तू खरेदी करतात. राजस्थानातील भिंतीवर हत्ती स्वारांच्या मिरवणुकांची काढलेली मोठाली चित्रे लोकांना आकर्षून घेतात.

**मृत्तिकापात्रे, मृत्तिकाशिल्प व खेळणी**

सिंधु संस्कृतीपासून किंबहुना त्याहीपूर्वीपासून मातीपासून घट आणि इतर भांडी तयार करण्याचे काम चालू आहे. काही ठिकाणी या घटावर नक्षीकाम होते तर काही ठिकाणी लोककलाधिष्ठित चित्रकाम होते.

जम्मूच्या पर्वतराजीत ६,४०० फूट उंचीवर 'घोडागली' आहे. कित्येक वर्षे या गावाची लोकांना कल्पना नव्हती. तेथे घोड्यांची लहान मोठी अशी किती तरी प्राचीन शिल्पे आहेत. घोड्याबरोबरच इतर प्राणी, मानव, चक्र, सर्प आदींचीही शिल्पे पहावयास मिळतात.

कुंभारकामात फक्त भांडीच बनतात असे नव्हे तर हत्ती, घोडे, उंट यासारखे प्राणी, निरनिराळ्या व्यवसायातील माणसे, पक्षी आणि नानाविध खेळणीही पहावयास मिळतात. पुण्यात दिवाळीच्या दिवसात किल्ल्यात ठेवण्यासाठी किती तरी प्रकारची मातीची खेळणी तुळशीबागेजवळ विकावयास येतात. त्यातील काही चिमुकल्या शिल्पावर छानदार रंगकाम असते. एखाद्या वर्षीची ही शिल्पे लोककलेचे उत्तम नमुने म्हणून संग्रह करण्यासारखी असतात.

ओरिसा बिहारमध्ये मातीची उत्कृष्ट कलाकुसर केलेली तुळशीवृंदावने तयार होत असत. हे शिल्पकाम मातीत झाले आहे. यावर विश्वास बसू नये इतके ते शिल्पकाम आकर्षक आहे. ही तुळशीवृंदावने पुण्याच्या केळकर संग्रहालयामध्ये पहावयास मिळतात.

गुजरातमध्ये कितीतरी आदिवासी आहेत. चौधरी, रथवा, भिल्ल, गरसिया, मोची वगैरे हे लोक त्यांच्या श्रद्धा आणि पारंपारिक समजुतीप्रमाणे चित्रकाम आणि शिल्पकाम करीतच असतात. त्यातील मातीची भांडी आणि घोड्यासारख्या प्राण्यांचे आकार मृत्तिका शिल्पात आणि लोककला प्रकारात नोंद करण्यासारखे आहेत.

सिंधू संस्कृतीच्या काळातील मातीची खेळणी प्रगत अवस्थेतील असली तरी वैदिक काळातील खेळण्यासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही. इसवी सनापूर्वी ६५० ते ३०० या काळात मातीची खेळणी विपुल प्रमाणात होती. त्यानंतरच्या हजार वर्षाच्या काळात धार्मिक भावनांबरोबर लोकजीवनाचे प्रतिबिंबही खेळण्यात उतरलेले दिसते. मौर्य काळातील खेळणी बरीच आकर्षक व सुबक होती.

कुशाणयुगात मातीची खेळणी करण्याची कला लोप पावू लागली. परंतु त्याचवेळी भारतात आलेले शक व इतर परदेशी लोकांपासून मातीची चित्रे रंगविण्याची प्रथा रूढ झाली. दक्षिणेत सातवाहन काळात तयार झालेली खेळणी सादृश्य आणि सुंदरता यासाठी प्रसिद्ध ठरली.

गुप्तकाल म्हणजे मातीच्या खेळण्यांचा सुवर्णकाल. या काळात खेळण्यात सजीवता सादृश्य व रसात्मक भाव निर्माण करण्यासाठी कारागिरात चढाओढ लागे. पुढे खेळण्यांची माध्यमे बदलू लागली.

पश्चिम बंगालमधील काचनगरच्या कुंभारांची मातीची खेळणी नाजुकपणा, सुंदरता व रंगवैशिष्टय यावद्दल ख्यातनाम आहेत. बंगालमधील कृष्णनगर येथे उत्तम प्रकारची माती मिळते. त्यापासून सुरेख खेळणी येथे बनवली जातात.

आसामातील खेड्यातून अजूनही भारतीय भूमीला साजेसी तसेच पारंपारिक सौंदर्याने नटलेली मातीची खेळणी तयार होतात. कित्येक वर्षांची ही लोककला त्यांनी अजून जिवंत ठेवली आहे. तेथे मातीकाम करणाऱ्या दोन जमाती आहेत. हिरा आणि कुंभार. त्या जमातीतील बायकाच प्रामुख्याने मातीची खेळणी बनवितात. आसामच्या खालच्या भागातील कामरूप, गोलमाडा, नौगांग आणि दारांग जिल्ह्यात हिरा जमात आहे. तर कुंभार जमात संपूर्ण ब्रह्मपुत्रेच्या परिसरात वसलेली आहे. कामरूप मधील कुंभारांची खेळणी अधिक कलात्मक असतात.

ही खेळणी हातांनीच बनवतात. त्यासाठी कसलाही साचा वापरत नाहीत. ओल्या मातीची ही खेळणी उन्हात सुकल्यावर त्यांना चुन्याचा हात दिला जातो. नंतर काही भागावर गेरूने रंगविले जाते. त्यांची उंची साधारणपणे नऊ इंचांपर्यंत असते. भट्टीत भाजून त्यांना नैसर्गिक रंग प्राप्त करून दिला जातो. काही वेळा विविध रंगात ही खेळणी रंगविलेली आढळतात. ही खेळणी साधी पण परिणामकारक असतात. कधी कधी त्यावर ठिपके देतात अथवा रेषा ओढल्या जातात.

या खेळण्यात नवरा-नवरी, हत्ती, घोडे, म्हशी, हरणे आणि पक्षीही असतात. त्यांना अधिकाधिक नैसर्गिकता प्राप्त करून देण्याचा प्रयत्न असतो. काही वेळा त्यांना खाली चाकेही लावलेली असतात. त्यामुळे दोरी बांधून मुले तो ओढू शकतात. याशिवाय होड्या, गाड्या अशीही पारंपारिक खेळणी ते बनवतात. डौलदार, ऐटबाज, तरीही पारंपारिक असलेली खेळणी मुलांनाही मनापासून आवडतात. गुजरातमधील मातीची खेळणी मणी, आरशांचे तुकडे, तारा वगैरे लावून अधिक आकर्षक बनविली जातात. त्यात काही मृत्तिका पात्रेही असतात.

**लाकडावरील कोरीव काम, शिल्प, लाखेचे काम व धातूवरील कोरीव काम**

लाकडावरील कोरीव कामाची आसामात दीर्घ परंपरा आहे. मठ आणि आश्रम यांच्यामुळे ही लोककला वाढीला लागली. प्रार्थनागृहे, द्वारपाल, दैवी पक्षी, गरूड, मुखवटे, ग्रंथाचे आधार आणि नक्षांच्या पट्ट्या यामधून ही लोककला पहावयास मिळते. काही ठिकाणी बांबूवरील कोरीव कामही होते. परंतु ते तितकेसे लोकप्रिय झाले नाही.

काश्मिरातील अक्रोडच्या लाकडावरचे कोरीव काम व फर्निचर जगप्रसिद्ध आहे. हे लाकूड रेषांचा ओघ कायम ठेवण्यासाठी तितकेसे योग्य नाही परंतु काश्मिरी कारागीर लाकडाला सफाईने आकार देतात. हत्यारे साधी असली तरी बोटे व हात तरबेज असतात. सोसन, चिनार, बदाम, डाची, कमळ, गुलाब वगैरे नक्षीकाम नमुने आकर्षक असतात. गुलाब लाकडावरील काश्मिरी नक्षीकाम सुरेख असते. काही उठावाच्या नक्ष्या चटकन डोळ्यात भरतात.

अठराव्या शतकात महाराष्ट्रात मराठी राज्याचा पाया मजबूत झाल्याने मुसलमानी विलासी राहणीचा परिणाम होऊन पेशव्यांनी राजस्थान, गुजरात येथून कारागीर बोलावून देवळे, वाडे व किल्ले बांधले. पुण्यात विश्रामबागवाड्यात त्यावेळचे कोरीव काम पहावयास मिळते.

प्रवेशद्वारावरील गणेशपट्टी कोरीव कामासाठी प्रसिद्धच आहे. या काळात काही लाकडी शिल्पे, खेळणी, बाहुल्या वगैरे वस्तू तयार झाल्या.

केरळमधील लाकडी व शिंगावरील कोरीव काम वैशिष्टयपूर्ण आहे. प्राणी, पक्षी आणि माणसांच्या आकारांची लाकडी शिल्पे बनविण्यात केरळीय कारागीर प्रवीण आहेत. लाकडात कथाकली नृत्यमुद्रा कोरून पद्मनाभत आचार्य यांनी १९६५ मध्ये राष्ट्रीय पारितोषिक मिळविले. या कारागिरांना कोरीव कामासाठी लाकूड मिळावे म्हणून राज्यभर चंदन, गुलाब व काळचा लाकडाची झाडे शासनाने लावली असून कारागिरांच्या कल्पनाशक्तीला व कौशल्याला भरपूर लाकूड पुरविण्याची व्यवस्था केली आहे. शिंगाच्या कलावस्तूही तेवढयाच लोकप्रिय आहेत.

भारताच्या निरनिराळचा भागातील आदिवासी सुरेख लाकडी शिल्पकाम करतात. बस्तरमधील माडिया मृत व्यक्तींचे लाकडी कोरीव कामाचे स्तंभ उभारतात. चिलिमीवर बसवलेली माणसे व प्राणी मौजेखातर ते कोरतात. भांडणाऱ्या मानवाकृती, हत्तीवर बसलेला माणूस, नेपाळमध्ये तयार झालेला आहे. मध्य भारतातील बैगा जमातीच्या कोरीव कामाचा दरवाजा कलापूर्ण आहे. नेफामधील खंमा जमातीच्या लोकांनी बुद्धमूर्ती खरोखरीच फार चांगल्या बनविल्या आहेत. स्तनपान करणारे बालक व माता हा इथल्या शिल्पकामाचा उत्तम नमुना आहे.

हिमाचल प्रदेशात लाहौल, कुलू, चंबा, मंडी इत्यादी ठिकाणी दरवाज्यावर व खिडक्यांवर पशुपक्षी व मानवांच्या लाकडी आकृत्या दिसतात. भितीवर व लाकडी छतावर रामायण, महाभारत व पुराणे यातील निवडक प्रसंग लोककलाकारांनी कोरून ठेवले असून लोककलांचे ते उल्लेख करण्यासारखे नमुने आहेत. जुबल येथील पिरीदेवीच्या देवळाच्या दारातील लाकडी द्वारपाल आदिवासी कलेच्या प्रभेचा प्रभाव दिसतो.

मी जसजसा मोठा होऊ लागलो तसतशी लोककला विषयीची माझी आवड वाढतच चालली. त्यासाठी मी कर्नाटक, आंध्रचा काही भाग, गुजरात, राजस्थान, पंजाब, हिमाचल प्रदेश, हिमालयाच्या परिसरातील काही भाग, बनारस, पैठण आदी भागांचा प्रवास केला. कारागिरांच्या मुलाखती घेतल्या. मागावरचे विणकाम, कलाकुसर कशी होते ते प्रत्यक्ष पाहिले. केळकर संग्रहालयात पस्तीस वर्षे हेलपाटे मारले. प्रदर्शित न झालेल्या वस्तूही कपाटातून काढून गाठोडी सोडून पाहिल्या. लोककलांवरील काही पुस्तके जमविली आणि हाती लागले ते छापलेले साहित्य मग ते कोणत्या का भाषेतले असेना मी जमा केले. वाण्याकडून पदार्थांबरोबर आलेले कागदही यात आहेत. लहानपणापासून ४५ वर्षांहून अधिक काळ अव्याहतपणे असे संदर्भसाहित्य जमा झाले आणि लोककला, हस्तकला आणि घराघरातून निर्माण होणाऱ्या कलाकुसरी विषयी अकराहून अधिक लेख लिहिले. मीच निर्माण केलेल्या संदर्भ साहित्याचा अनेकजण उपयोग करून घेतात याचाही आनंद काही निराळाच आहे.

### लाखेचे सुशोभन

लाखेचे लाकडावर दोन प्रकारांनी सुशोभन होते. एक कातरकाम आणि दुसरे चितरकाम. लाकडीदांडी दोन लोखंडी पकडीत धरून ती गरगर फिरवितात. फिरताना त्यावर लाखेच्या रंगीत कांड्या लावतात. घर्षणाने लाख वितळून ती लाकडास चिकटते. नंतर केतकीच्या पानाने घासून त्याला चकाकी आणतात. हे काम कित्येक वर्षे टिकते. पंजाब, म्हैसूर, बनारस व संखेडा येथे हे काम मोठ्या प्रमाणावर होते.

चितरकामात लाकडावर प्रथम चित्रे काढतात. ते गरम करून त्यावर लाखेचे पातळ पाणी देतात. यामुळे रंग पक्के होतात व त्यांना चकाकी येते. अशा कामाच्या पेट्या, गंजिफा, खेळणी फळे इत्यादी सावंतवाडी, गोवक, संखेडा, जयपूर, बनारस वगैरे ठिकाणी होतात. जयपूरला लाखेत काचेचे तुकडे, मणी लावून वस्तू जडावकाम करून सुशोभित करतात.

चुडे, पेटचा, भांडी, बाहुल्या इत्यादींवर असे जडावकाम राजस्थानात मोठ्या प्रमाणावर होते.

इतर

काळ्या धातूच्या भांड्यावर चांदीच्या तारांची नक्षी कोरून बनविण्याच्या लोककलेला बिदरी काम म्हणतात. बिदरमध्ये फार पूर्वीपासून हे काम होत असल्याने या कारागीरीला हे नाव पडले. विरोधी रंगामुळे नक्षीकाम उठून दिसते. पानदान, तबके, पिकदाण्या, लोटे, अडकित्ते, शामदान अशा वस्तू बिदरीतून बनवतात. त्यावरील नक्षीकाम पारंपारिक पद्धतीचे सुरेख असते.

जयपूर, मुरादाबाद, बनारस वगैरे ठिकाणी पितळेची नक्षीची भांडी तयार होतात. त्या नक्षीत पशुपक्षी पानेफुले असतात. काही ठिकाणी त्यात रंगभरणीही होते. दक्षिण भारतात धातूच्या मूर्ती बनवितात. त्या रेखीव, प्रमाणबद्ध व आकर्षक असतात.

भरतकलेचे तर भारतात नाना प्रकार आहेत. आसाम, नेपाळ, नागालँड मधील आदिवासी भरतकाम, बंगालचे कथाक्रम, पंजाबची फुलकरी, लखनौची चिकनकाठी, गुजरात, कच्छ काठेवाडचे मणी व आरसा काम, काश्मीरच्या शाली व गालिचे, कर्नाटकच्या कशीदा, सोन्या रुप्याची भरतकला, ओरिसाची चांदवा कला अशा किती तरी लोककलांवर सांगण्यासारखे आहे.

# संस्कार

सौ. पुष्पा जोशी

माझ्या मते लोकांनी लोकांसाठी सांगितलेले, लोकांना ऐकावेसे वाटणारे आणि म्हणून लयबद्ध, रचना शैली सोपी असणारे, असे साहित्य म्हणजे खरे लोकसाहित्य.

हे लोकसाहित्य म्हणजे लोककथा, कहाण्या, झिम्मा फुगडी सारखे निरनिराळे खेळ खेळताना उत्स्फूर्तपणे प्रगटणारी गाणी, उखाणे इत्यादि.

प्रत्येक व्यक्तीशी या लोकसाहित्याचा संबंध अगदी न कळत्या वयापासून म्हणजे अंगाई गीतापासून येतो. आईच्या मांडीवर लोळत पहुडत आईच्या तोंडून येणाऱ्या गीतांचा अर्थ कळला नाही तरी त्याची लय, मांडीची वा हाताची हालचाल यांचा परिणाम होऊन मूल झोपून जाते. नंतर बोलता येऊ लागते. थोडी समज येते तेव्हा बडबड गीते, 'चांदोबा चांदोबा भागलास का' यासारख्या गाण्यातील मनोरम चांदोबा, मामाचा वाडा माहीत नसला तरी मामा, मामी माहीत असतात. अशा प्रत्यक्ष दिसणाऱ्या गोष्टींशी त्याचा संबंध येतो. जुन्या अंगाई गीताच्या लयीबरोबर नवीन कल्पना साकार होत असतात.

कावळा चिमणींच्या गोष्टीतून चिमणीचा शहाणपणा, स्वच्छता, बाळाला न्हाऊ माखू घालण्यासारख्या रोजच्या जीवनातील गोष्टींबरोबर कावळ्याच्या शेणाच्या घराचा तकलादूपणा, अस्वच्छता, त्याचा स्वभाव यांच्या द्वारा न कळत बऱ्या वाईटाची जाण निर्माण होते. तर इतर गोष्टींतून सभोवतालच्या प्राणी जीवनाची, सृष्टी सौंदर्याची, प्राण्यांच्या प्रेम, राग आदि भावना जाणवतात. अशा तऱ्हेने लोकसाहित्याचा मनावर सुसंस्कार करण्याचे दृष्टीने अगदी न कळतच उपयोग होतो.

रोजच्या जीवनातूनही या लोकसाहित्याद्वारा सुसंस्कार हा शब्दोच्चार न करताही कसे संस्कार होतात पहा :– "लवकर निजे लवकर उठे, तया ज्ञान, आरोग्य संपत्ती भेटे" असे म्हटले जाते. लवकर निजल्यावर मनुष्याची विश्रांती पूर्ण होऊन तो उल्हासाने पहाटे उठतो, ते वातावरणही उल्हसित करणारे असते. चांगल्या स्वच्छ हवेने आरोग्य चांगले रहाते. ते आरोग्य चांगले असले की, तो ज्ञान मिळवितो. सकाळच्या शांतवेळी अभ्यास चांगला होतो. याचाच पुढे संपत्ती मिळविण्यासाठी उपयोग होतो व मानवाचे सुखी समाधानी जीवनाचे ध्येय आपोआप साध्य होते. या सकाळच्या सुप्रसन्नवेळी घरादाराचे केरवारे होऊन अंगणात सडा घालून तेथे व देवघरात सुद्धा रांगोळी काढली जाते. या कृतीत स्वच्छतेबरोबरच अंगी असणाऱ्या कला कौशल्यास वाव मिळतो. त्याचा अभ्यास होतो. नवनवीन कल्पना सुचतात. त्यासाठीच चैत्रांगणाची कल्पना असावी. संपूर्ण चैत्र महिन्यात मुलींनी आपापल्या अंगणात आपापला कोपरा स्वच्छ झाडून सारवून महिनाभर रोज चंद्र सूर्यासह रांगोळी काढावयाची. त्या द्वारा चढाओढ चाले. नवनवीन शिकता येई.

नंतर स्नान, पूजा याद्वारा पुन्हा शारीरिक स्वच्छता, विनम्रता यांचा संस्कार. 'देव' माना वा न माना या विश्वामागे अनाकलनीय असली तरी काही शक्ती जरूर आहे. ती सर्वश्रेष्ठ आहे. त्यापुढे आपण विनम्र असावे. मानवी मन चंचल असते. मानसपूजा सर्वश्रेष्ठ पण ती सामान्यांच्या

आवाक्यातली नव्हे म्हणून प्रतीक स्वरूप देवपूजा-मूर्तीपूजा. आपल्या चालीरीती, आपले कुळाचार, यांना केवळ नावे ठेवण्यापेक्षा त्यामागील कल्पना, भावना, समजावून घेऊन त्यात स्थल कालानुसार जरूर ते बदल करावेत. रोजचे भोजनाचे वेळी काक वळी देताना असलेला पाहुणा पंक्तीला घेऊन भोजन करावे, अन्नदान पण ते सत्पात्री करावे. विद्यार्थी वारावर का होईना पण जेवावयास घालावा, त्याचा विद्या खर्च करावा. इत्यादी आचारांमागील समाजसेवा, त्याग बुद्धीने उपभोग घेण्याची वृत्ती जाणावी. सणावारांमागेही अशाच प्रकारे मनाची शुचिता संपादणे, उपवासाद्वारा मनावर तावा मिळवणे, निसर्ग सान्निध्य उपभोगणे आदि संस्कार सहजतेने व्हावेत, ही अपेक्षा असावी. त्या दृष्टीने विचार करता नागपंचमी, मंगळागौरी सारख्या सणात माहेरी अधिक प्रेमाच्या माणसात वावरणे, मैत्रीणींमध्ये निसर्ग सान्निध्यात रमणे आदि गोष्टींचे द्वारा करमणूक, व्यायाम व सहजीवनही साध्य होते. मनोमालिन्य नाहीसे होऊन पुढील जीवन जगण्यास उत्साह, चैतन्य, प्राप्त होते. ऋषि पंचमी सारख्या सणातील 'मासिकधर्म' ही नैसर्गिक बाब आहे, त्याबद्दलच्या फालतू कल्पना सोडल्या तरी त्यातील श्रमप्रतिष्ठा शिकण्याजोगी आहे. स्वतः कष्ट करून तयार केलेले धान्य. अन्न, खाण्याचाही एक आगळा आनंद येथे मिळतो. तर संक्रान्ती द्वारा एक तीळ सात जणांनी वाटून खावा याची शिकवण मिळते. कोणत्याही वस्तूचा उपभोग एकट्याने घेण्यापेक्षा भोवतालच्यांना त्याचा वानोळा देण्यातले सुख, समाधान माणसाने का घेऊ नये ?

या सर्व सणवारात कहाणी वाचणे, ऐकवणे, हाही एक चांगला आचार आहे. प्रत्येक कहाणीत काही घेण्यासारखा भाग आहे तो हंसाच्या निरक्षीर विवेक बुद्धीने घ्यावा. बाकी सोडून द्यावे. सोमवारच्या कहाणी-तील खुलभर दुधाने कोठे गाभारा भरतो का? या विचाराऐवजी त्या म्हातारीचा मुलावाळांना तृप्त करून दिलेले देवाला आवडते. मुला-बाळांच्या तोंडचा घास काढून दिलेला नव्हे, तर त्यामागील श्रद्धा महत्त्वाची.

देव भावाचा भुकेलेला असतो. गणपतीच्या कहाणीतील नैवेद्याचे तीन भागांची विभागणी विचार करण्याजोगी आहे. सहा देवाला, सहा ब्राह्मणाला व सहाच सहकुटुंबी भोजनाला यात सर्व समाजसेवा आली आहे. शनिवारच्या कहाणीतील अस्पृश्य अपंगांची सेवा ध्यानी घ्यावी, त्यांचा तिरस्कार करू नये हे तत्त्व लक्षात घ्यावे. लोकांना जे द्यायचे ते आपण होऊन सन्मानाने चांगले द्यावे. उष्टे माष्टे देऊ नये. यासारखा योग्य भाग घ्यावा. आवडती नावडती सारख्या कल्पना सोडून द्याव्यात. तळ्यावर पाणी भरण्यासाठी सर्वच माणसे येतात. कोणालाही "पाणी वाढा वो माय" असे मागावे लागत नसे हाच भाग लक्षात घेऊन आचरणात आणावा हे शिकवता येईल.

अशा तऱ्हेने कहाण्या, लोककथा यातून पुष्कळ घेण्यासारखे आहे. आचरणात आणण्याजोगेही पुष्कळ आहे की, ज्या आचाराद्वारा माणूस माणसाशी शहाण्यासारखा वागून आपले व आपल्या भोवतालच्यांचे पर्यायाने साऱ्या समाजाचे जीवन सुखी समाधानी करू शकेल. हे विद्यार्थी दशेपासून शिकवले व मनावर बिंबविले गेले, तर तसे आचरण सहजच घडू शकते. नाहीतरी मानवी जीवनाचे ध्येय सुखी व समाधानी जीवन हेच आहे ना? गोष्ट सखू, बकू व गुंड्याची असो की, अटू, बटू, मनीची असो ती लोककथा हेच सांगते की, विचारी माणूस मोठ्या माणसाचे ऐकणारा, काम करणारा, सुखी होतो. या लोककथांची रचना सोपी तशीच लवचिकही असते. कोणताही काल, गाव, नाव तेथे चपखल बसतात. ते आटपाट नगरच असते. यातून सांगितले तत्त्वज्ञान साध्या सोप्या बोली भाषेत असते. छोटे छोटेच शब्द पण मोठा आशय सांगून जातात. भोंडल्याच्या वगैरे गाण्यातील शब्दात क्वचित अर्थहीनता असली तरी त्यातून खेळाचा सहजीवनाचा आनंद मिळतो. "अस्सं सासर द्वाड बाई" यातील "द्वाड" सारखे छोटे शब्द मोठा आशय व्यक्त करणारे असे मिळतात. ते जणू काही शब्दसंपत्ती वाढवितात. आजोळ, माहेर, सासर याबद्दलच्या त्याकाळातील कल्पना, भलीबुरी नाती या झिम्मा

फुगडी वगैरे गाण्यातून व्यक्त होतात. "सरसर जातो साप नव्हे, गळ्यात जानवे ब्राह्मण नव्हे" यासारखी कोडी, पतिराजांचे लाजत लाजत नाव गुंफून घेतलेले उखाणे यातही भरपूर कल्पकता, अर्थवाही शब्दयोजना दिसते. "सूपभर लाह्या मधी योकच रुपाया" हेही याच प्रकारचे उदाहरण म्हणता येईल.

बहुसंख्य लोकसाहित्याची भाषा, बोली भाषा, म्हणून साधी सोपी, रोजच्या जीवनातले पटणारे अनुभव संकल्पना सांगणारी असते. पुनरुक्ती हे या साहित्याचे वैशिष्टयच आहे. त्याचा उपयोग ती भाषा, संकल्पना मनावर ठसण्यास होतो. छोटे छोटे पण अर्थवाही शब्द आपली शब्दसंपत्ती वाढवितात. त्यांचे उच्चार सौंदर्य परंपरागत असल्याने मनाला एक प्रकारची ओढ लावतात.

लोककाव्याप्रमाणेच लोकनृत्यही असेच मनाला ओढ लावणारे असते. त्यातही शब्दांची, हालचालींची पुनरावृत्ती असतेच. लोकनृत्याची व्याख्याच अशी लोकसाहित्यासारखीच आहे, की ज्या नृत्यात केव्हाही, कोणालाही, अर्थात त्याची लय पकडूनच पण सामील होता आले पाहिजे. त्यामुळे त्याच्या हालचालीत जशी पुनरावृत्ती अटळ तसाच कथकादि नृत्यापेक्षा पदन्यासही अतिशय सोपा असणे जरूर असते

लोकसाहित्यात येणारा आणखी एक छोटासा भाग म्हणजे झाड-पाल्यांच्या औषधांच्या उपयोगाच्या कथा व अनुभव यांचेही अधिक डोळस संशोधन होऊन पुनरुत्थापन व्हावयास हवे. त्यात असणारा श्रद्धेचा भाग नष्ट होण्याची गरज नाही. फक्त ती जरा डोळस असावी. लक्ष्मणाला शक्ती लाभल्यावर हनुमंताने मेरू पर्वतावरून कोणती वन-स्पती आणली? ती ओळखून तिच्यातील घटकांचा आढळ तिच्या पृथक्करणाद्वारा झाला पाहिजे. तिचे गुणधर्म समजले पाहिजेत, वाढ करता आली पाहिजे. म्हणजेच त्या त्या औषधी वनस्पतीचा उपयोग ग्रामीण भागापुरता न राहता सार्वत्रिक झाला पाहिजे. विज्ञानी,

बुद्धिवाद्यांकडेही त्याचा ओघ वळला पाहिजे म्हणजे काही अमोघ औषधांचा शोध लागून सर्व समाजाला त्याचा उपयोग होईल. अर्थात हे काम थोड्या मोठ्या वयाच्या विद्यार्थ्यांना करता येईल.

वरील सर्व दृष्टिकोनातून पाहता शेवटी मी असे म्हणेन की, विद्यार्थ्यांपुढे निवडक असे लोकाहित्य अवश्य यावे. देशकालपरिस्थितीप्रमाणे शिकविताना त्याच्याशी मेळ घालावा. स्थल, कालानुरूप त्या त्या विशिष्ट म्हणी, समजुती, रूढी, वाक्प्रचार आदि आल्यास त्यांचा योग्य तो खुलासा द्यावा म्हणजे झाले. अन्यथा लोकसाहित्यातील विचारधन हे कालातीत असते. सार्वकालीन असते. त्याचा लेखक, कवि सहसा अज्ञात असतो... त्याची शैली साधी सोपी पण लयबद्ध आणि छोटी छोटी वाक्ये व शब्दांनी युक्त अशी असल्याने लोकांना ऐकावीशी वाटतात. पुनरुक्तीमुळे ही एक मनोरमता येते. याचा उपयोग विद्यार्थ्याला आपले विचार पाल्हाळ न लावता थोडक्यात, नेमक्या, नेटक्या, शब्दात कसे सांगावे यासाठीही होईल. या कथा, काव्यातून बुद्धीला अनाकलनीय, विज्ञानाला अविश्वसनीय, अशा भागांमुळे आज लोकसाहित्याची काही अंशी होणारी अवहेलनाही टळेल! मात्र त्यासाठी पाठ्यपुस्तकात त्याचा समावेश करतांना त्या त्या वयोगटानुरूप योग्य असा भाग घ्यावा.

शिक्षक या नात्याने लोकसाहित्याशी मी साधलेली जवळीक ही अशी आहे.

# लोकसंगीत

डॉ. विमल चोरघडे (केळकर)

आकोल्याला मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर कॉलेजात शिकण्यासाठी मी नागपूरला गेले. सुरवातीला माझ्या काकांच्या घरी माझा मुक्काम होता. काकांचे घर गावात होते. त्या घराजवळ सुमारे १५० मीटर्स अंतरावर 'मातामाय' या देवतेचे मंदिर होते. मातामाय ही व्याधीची देवता. घरात एखादी व्यक्ति आजारी असली तर अशा कुटुंबाला मानसिक आधार देणारा स्तंभ. त्याला अंधश्रद्धेचा पायादेखील मजबूत. या देवळात जाण्यासाठी महिलांची अहोरात्र ये जा असे. बहुजन समाजातील स्त्रिया घरकामातून ज्या ज्या वेळी फुरसत मिळेल त्या त्या वेळी पूजेचे साहित्य घेऊन या रस्त्याने मातामायची गाणी गात जात येत असत. त्यामुळे तिन्ही त्रिकाळ, वेळी अवेळी, ही गाणी कानावर पडत. त्या गीतांचे शब्दरचनेत फारसे आकर्षक असे काही दिसत नसे.

**माता माय आली नं तशी गेली**
**माझ्या बाळावर कृपा केली वं मातामाय**
**मातेच्या मंडपी सोन्याच्या मयाली**

**वर लिंबाची सावली मातामाय**
**मातेच्या वाडीमध्ये हळद देठोदेठी**
**माता पिवळी नखपोटी मातामाय**

या गाण्याची चाल अशी --

ग ग म ग रे ग रे सा – –
**मा ता नं मा य आ ऽ ली ऽ ऽ**
ग ग म ग रे ग रे सा – –
**आ ली नं त शी गे ऽ ली ऽ ऽ**
ध सा – ग ग मम ग रे
**मा झ्या ऽ बा ळा वर कृ पा**
रे सा नि ध नि सा – सा सा
**के ऽ ली वं मा ता ऽ ऽ मा य**
ग ग म ग रे ग रे सा – –
**आ नं दा जा नु बा ऽ ई ऽ ऽ**
ग ग म ग रे ग रे सा – –
**आ नं द क र मा ऽ झा ऽ ऽ**
ध सा – ग ग म ग रे रे ग रे सा नि
**बा ई ऽ मं ड प झा डी न तु ऽ झा वं**
नि सा – – सा सा
**मां ता ऽ ऽ मा य**

देवी आलेल्या रुग्ण वालकावर कृपा करण्याची देवतेला विनंती करण्यासाठीच ही गाणी आहेत. देवी येणे याला माता येणे म्हणतात. देवीचे फोड पिवळे होतात म्हणून या फोडांना फुले येणे, बाग फुलणे, असे शब्दप्रयोग आहेत. देवीला प्रसन्न करून या भयंकर व्याधीपासून

मुक्तता मिळविण्यासाठी ही पूजा आणि आळवणी. या स्त्रियांचे मिळून मिळून देवीला जाण्यात कधी दृश्य प्रसंग असत. एखाद्या बाईच्या अंगात यायचे. मोठा मळवट भरून ती रस्त्यावर गडबडा लोळत तर कधी कडू लिंबाची डहाळी स्वतःच्या अंगाभोवती फिरवत तर कधी त्या फांदीने रस्ता झाडत तर कधी झिंगल्याप्रमाणे अडखळत हेलकावे घेत चालायची. या पुढे वाजंत्रींचा कर्कश स्वर ध सा रे ग रे सा रे ऽऽऽ ही एकच ओळ वारंवार वाजवत जायचा. वाजंत्रीचा आवाज आला की, काही तरी पाहायला मिळतंय काय म्हणून मी घरातून धावत अंगणात यायची. मला हे प्रथम अपरूप वाटायचे. पण त्यातला निरर्थकपणा जाणवायचा.

एक दिवस अचानक वेगळे घडले. महाशिवरात्रीचे नवरात्राचे दिवस होते. सकाळसकाळ दुसऱ्याच प्रकारचे गाण्याचे स्वर कानी पडले. आणि त्या गाण्याच्या चालीनी मला असे काही झपाटले की, मी ताड्कन अंथरूणातून उठून अंगणात पळतच आले.

**महादेवा जाता गा — जाणं नव्हतं मनी**
**सपनी येऊनी — टाकली मोहिनी**
**चला भक्त चला — मिळल्या मिळल्या जाऊ**
**कैलासीचा राजा — आपल्या दृष्टिमध्ये पाहू**
**सोडल्या सोडल्या — महाल माड्या**
**पापी नाही सोडे — तनाच्या झोपड्या**
**मार देवा तार — घे माहा परान (प्राण)**
**मी तर चवऱ्या करीन — हर बोला ऽऽ हर हर महा ऽऽ देव**

या गाण्याची सरगम अशी —

ध सा रे ग प प पग — — रे सा ध — — — —

**म हा दे वा ऽ जा ता ऽ ऽ गा ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ**

ध सा रे गरे –– रे रे – – साध – – –
सं ऽ भा ऽ ऽऽ माझ्या ऽऽ ऽऽ ऽ ऽ ऽ
प प प प प –– म गरे रे – – –
जा णं न व्ह तं ऽऽ म नीऽ ऽ गा ऽ ऽ
सासा सा रे ग रे सा सा रेग – – –
अन् स प नी ये ऊ नी ऽऽ ऽ ऽ ऽ

ग ग ग – रे – सा सा – – –
टा क ली ऽ मो ऽ हि नी ऽ ऽ ऽ

सर्वांनी एकसाथ म्हणायचे ––

**हर बोला हर हर महादेव**

ही गाणी होती महादेवाची. संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्यापूर्वीच्या सी. पी. अॅन्ड बेरारमध्ये पंचमढी हे थंड हवेचे ठिकाण होते. आता ते मध्य प्रदेशात आहे. येथून सुमारे पंधरा सोळा किलोमीटर्सवर चवऱ्याचा गड नावाचे डोंगर आहेत. त्यातला एक महादेवाच्या पिंडीसारखा दिसतो म्हणून त्याला महादेवाचा डोंगर असेही म्हणतात. या डोंगरावर शिवरात्रीच्या नवरात्राची यात्रा भरते. या यात्रेला जाण्यासाठी तयारी करायची म्हणजे प्रवासात उपयोगी पडणारी सामुग्री, पूजेचे साहित्य इत्यादी गोळा करून ते खाव्या नामक झोळीसारख्या पिशवीत ठेवायचे. ही व्यावहारिक धडपड तर भक्त करतोच पण यापेक्षा त्याला आपल्या मनाची तयारी अगोदर करावी लागते. महादेवाच्या डोंगराची वाट अत्यंत अवघड. एकीकडे खोल दरी. दुसरीकडे उंच कडा. ही पायवाट अरुंद, घसरडी आणि त्यात पावसामुळे निसरडी झालेली ! चालणे म्हणजे तारेवरची कसरत. सुखरूपपणे यात्रेला जाऊन घरी परत आलो

तर शिवाची कृपा. नाहीपेक्षा आपुले मरण आपल्या डोळ्यांनी पहायचे. पण भक्ताचा निर्णय अढळ. अशा मनाच्या निश्चयी अवस्थेत पर्वताचा कडा चढायचा. नजर पाऊल वाटेवर हवी. इकडे तिकडे मान फिरवली तर पायाखालची वाट तुम्हाला सोडून जाणार ! भक्तांचा एकमेकांला 'चहाळ' तर लागायला हवा. हा कानोसा ध्वनीने म्हणजे आवाजाने द्यावा लागतो. म्हणून या गाण्यात चढे, आंदोलित आणि लांबवून हेलकावत स्वर लावण्याची लकब आली असावी. हे सर्व मी ऐकले आणि माझे भानच हरपले ! आपण काहीतरी अलौकिक ऐकत आहोत असा मला अनुभव आला आणि त्या स्वरावलीत मी गुरफटून गेले.

महादेवाच्या गाण्याची पार्श्वभूमी मी आधी सांगितली. पण प्रत्यक्षात झाले होते उलटेच. या गीतांनी प्रभावित झाल्यानंतर मला 'इसीमे भी कुछ है' असे वाटू लागले. या भूमिकेतून मग मी मातामायची गाणी लक्ष लावून ऐकू लागले आणि त्यातही मला काही गवसतंय असा अनुभव आला.

याच सुमारास माझ्या शास्त्रोक्त गायनाचे कार्यक्रम मुंबई आकाशवाणीवर होऊ लागले. त्यावेळी भारतात मुंबई, मद्रास, कलकत्ता व दिल्ली ही नभोवाणी केंद्रे होती. मुंबई केंद्रावरून गायचे म्हणजे कलावंत तावून सुलाखून नियुक्त केलेला आणि तेथील कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या कडक परीक्षेला उतरलेला असे समजले जात असे. अशाच एका रेडिओच्या कार्यक्रमाच्यावेळी तेथील संगीत कार्यक्रमनियोजकांबरोबर बोलता बोलता वरील गाण्यांचा उल्लेख मी केला आणि वऱ्हाड नागपूर कडील लोकगीतांचा कार्यक्रम मी ध्वनिक्षेपित करावा असे त्याच बैठकीत ठरले. मग काय ? झाली सुरुवात. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मी लोकगीते जमवायला सुरुवात केली आणि एक कार्यक्रम सादर केला. त्या कार्यक्रमाला अमाप प्रसिद्धी मिळाली. वऱ्हाड नागपूर विभागातील लोकगीते मुंबईपर्यंत पोहचविणे ही घटनाच श्रोत्यांना नाविन्यपूर्ण वाटली.

मी रस्त्याने जाताना 'ही चालली मातामाय' अशी वाक्ये मोठ्याने बोललेली माझ्या कानावर येत. ही कौतुकपूर्ण चेष्टा होती अशी आजही माझी समजूत आहे.

यानंतर मला लोकगीतं जमविण्याचा छंदच जडला. त्यावेळी ध्वनिमुद्रणाची सोय नसल्यामुळे गाणी लिहून घेऊन ती कंठगत करणे आणि त्याचे सरगम करून ठेवणे अशी व्यवस्था मी स्वत:साठी केली होती. लोकसाहित्याच्या विविध अंगांपैकी मला त्यातील संगीताचे विशेष आकर्षण आहे हे लक्षात आले असेलच. याचे मुख्य कारण असे की, मला स्वत:लाच या गीतांतील संगीताने वेधून टाकले. दुसरे असे की, साहित्यिकांचे अद्याप म्हणावे तसे लक्ष या संगीताकडे गेलेले नाही. साहित्यिक मूल्ये शोधण्यात त्यांनी परिश्रम घेतले आहेत ते काव्य, कल्पना, रचना, भाषा सौंदर्य इत्यादी शोधण्यात. लोकसाहित्यात सामान्य रचनांचे बाहुल्य आहे. या शंखशिंपल्यांच्या ढिगाऱ्यातून मौलिक रत्ने शोधून काढून ती जनतेसमोर ठेवण्यात त्यांचा फारच मोठा कार्यभाग आहे. लोकसंगीत ही अद्यापही दुर्लक्षित बाब आहे असे मला दिसले. संगीताच्या दृष्टीने लोकगीतांत स्वररचना अत्यंत मोजक्या आहेत. एकाच चालीवर विविध प्रकारची आणि वेगवेगळ्या प्रसंगावर किंवा विरुद्ध कल्पनांवर आधारित गीते सापडतात. तथापि या चालींपैकी काही अशा वेधक आणि रंजक आहेत की, त्या युगानुयुगे जपून ठेवाव्यात. त्यांनीच मला मोहिनी घातली म्हणून लोकगीतांतील संगीतात मी अधिक रस घेतला.

या गीतातील संगीतावर आधारित 'नागपूर विभागातील लोकगीतांचे संगीत' या विषयावरील मी एक प्रबंध अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयास सादर करून डॉक्टर ऑफ म्युझिक ही पदवी घेतली.

आकाशवाणीवर नोकरीत असताना मला ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कार्पोरेशन, लंडन, येथे जनरल ट्रेनिंग फॉर प्लॅनिंग अँड प्रोडक्शन ऑफ प्रोग्रॅमस्

या शिक्षणासाठी पाठविण्यात आले. बी. बी. सी. येथील संग्रहालयातील निरनिराळ्या देशातील लोकसंगीताच्या टेपस् मला ऐकायला मिळाल्या. त्याचा उपयोग येथील संगीताचे परीक्षण व निरीक्षण करण्यासाठी मी करून घेतला.

लोकगीते गोळा करण्यासाठी मी स्वतः खेडोपाडी प्रवास केला. शहरी संस्कृतीपासून दूर असलेल्या अशा खेड्यांची मी निवड केली. त्या संदर्भात मला आलेले अनुभव थोडक्यात पुढीलप्रमाणे :–

श्रोता आणि कलाकार हे लोकसंगीताच्या बाबतीत शास्त्रीय संगीतापेक्षा वेगळ्या भूमिकेतून वावरतात. लोकसंगीताच्या गायकांची बैठक अधिक स्पष्ट असते. केवळ गावेसे वाटते, तसे केल्याने आनंद होतो अशी हातातील काम हलके आणि अल्प वेळात झाल्यासारखे वाटते म्हणून ते गातात. आपला आवाज गोड आहे किंवा नाही, आपला गळा या गायनासाठी तयार अथवा संस्कारीत आहे किंवा नाही, आपला सूर बरोबर लागतो आहे का, आपला ठेका अथवा लय ठीकठाक आणि अचूक आहे काय, आपला आवाज अटकत किंवा चिरकत तर नाही? आपल्या गायनातील शब्द इतरांना कळतात का? थोडक्यात आपले गायन दुसऱ्यांना ऐकवते आहे का याची पर्वा त्यांना नसते ! गंमत म्हणजे इतर श्रोत्यांनाही ती नसते. लोकसंगीतात प्रत्येक व्यक्ती गायक आणि श्रोता या दोन्ही भूमिका स्वतःच बजावते. त्यामुळे कलेची बूज राखणे अथवा तिचे मूल्यमापन करणे एकाच्याच हातात असते आणि म्हणूनच एक प्रकारची बेफिकीरी निर्माण होते. परंतु यावरून लोकसंगीतामध्ये शब्दांना अथवा चालींना स्थैर्य नसते असा गैरसमज होण्याचा संभव असतो तो मात्र साफ चुकीचा आहे. गीतांचा सांभाळ करणाऱ्यांना गायनाच्या बाबतीत भरपूर स्वातंत्र्य असले तरी जुन्यास चिकटून राहण्याच्या सवयीमुळे या स्वातंत्र्याचा दुरुपयोग होत नाही. गीतातील साधी सोपी शब्दयोजना, चालींची व रचनेची पुनरावृत्ती, त्यातील लयबद्धतेमुळे निर्माण होणारी

मनाची तादात्म्य पावण्याची शक्ती, या गोष्टींमुळे गीते म्हणताना त्यात थोडा फार फरक होत गेला तरी स्वररचनेचा आराखडा (स्केलेटन) तसाच कायम राहतो. गद्यापेक्षा पद्य लवकर मुखोद्गत होते, तसेच पद्यापेक्षा एखादी स्वररचना म्हणजे चाल चटकन पाठ होते. पद्य आणि स्वररचना असे दोन्ही मिळून अधिक काळ जनतेच्या स्मरणात राहतात. म्हणून गीतामध्ये फेरवदल होण्यास बराच अवधी जावा लागतो. ही गीते वर्षानुवर्षे जनतेकडून गायिली जातात आणि ती टिकवून ठेवण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीचा हातभार लागलेला असतो.

काही गीते केवळ काम करीत असताना गावयाची असतात. अशावेळी कार्य आणि गीत गायन ही एकत्व पावतात. काम सुरू झाले की, गीताच्या ओळी मुखातून भराभर बाहेर पडतात. यापैकी एक थांबले की, दुसरे आपोआप बंद होते. जात्यात वैरण टाकले की, तोंड उघडते आणि जात्याचा घरघरीचा आवाज निघाला की, कंठातून अक्षरांचे मोती व चालीचा दोरा यांच्या माळा भराभरा ओवीच्या रूपाने गुंफल्या जातात.

लोकगीतांचे शब्द, स्वर यांचे पाठांतर समूहाने होत असते. गीतांचे शब्द, त्यांचे स्मरण, त्यांचे गायन हे जोडी जोडीने होत राहते. काहींना शब्दाचे पाठांतर विनासायास होते तर कुणाच्या गळ्यात स्वर घट्ट बसतात. गीतांचा संग्रह स्मरणात साठवून ठेवणारी व्यक्ती एखादा शब्द, एखादि कल्पना वा काव्यरचना जुन्यात भर म्हणून टाकण्यास कारणीभूत होऊ शकते. तर तिचा आधार घेऊन दुसरी व्यक्ती निराळी कल्पना सुचवू शकते. अशा प्रकारे भिन्न गायकांकडून एकत्रितपणे काव्य व संगीत यांची निर्मिती आणि जोपासना होते. म्हणून हे लोकांचे गीत होते. लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांकडून असे या गीताचे व संगीताचे जतन होते. या सर्व समुदायात एक म्होरक्या किंवा पुढारी म्हणा हवे तर, असा गायक असावा लागतो व त्याच्या गायनाच्या आधाराने, इषाऱ्याने, मार्गदर्शनाने व नेतृत्वाने बाकीचे गायक आपला सहभाग साधतात.

लोकगीते ही सर्वस्वी लोकाश्रयावरच अवलंबून असतात हे इथे अवश्य लक्षात घ्यायला हवे.

लोकगीतांना विशिष्ट संप्रदाय असा नसतो. शास्त्रीय संगीत किंवा चित्रकला यांच्या विशिष्ट अविष्कार पद्धतीमुळे जशी प्रणाली म्हणजे स्कूल प्रस्थापित होते तशी लोकगीतांच्या रचनेमुळे किंवा गायन विशेषां-मुळे परंपरा निर्माण झालेली दिसत नाही. गीतांच्या कर्त्याची वृत्ती प्रसिद्धी पराङमुख तर गायकांची भूमिका बेफिकिरीची. गीते व्यवस्थित पाठ करून ती म्हणण्याची निश्चिती, अचूक अशी ठराविक पद्धती नाही. ही गीते सामाजिक, राजकीय, औद्योगिक, आर्थिक, परिस्थितीप्रमाणे बदलत जातात. गीतांच्या उत्पत्तिकालापासून त्यावर निरनिराळे संस्कार होत होत ती कालक्रमणा करतात. त्यामुळे त्यात सांप्रदायिकता निर्माण होत नाही.

चढाओढीचा अभाव हेही लोकगीतांचे एक वैशिष्टच आहे. लोक-गीतांच्या चालींचा तोच-तो-पणा व गाण्यात होणारी पुनरावृत्ती ही आकर्षक खरी. पण कालांतराने याच कारणामुळे लोकगीते कंटाळवाणी वाटू लागतात. जीवनाशी एकजीव झालेल्या भावनादर्शक गीतबद्ध शब्दांना सुरेल, गोड मनाची पकड घेणारी अशी नवीन संगीताची जोड असावी असे वाटू लागते. अशा वेळी काही नवीन पाहिले किंवा ऐकले तर त्याकडे लोक आकृष्ट होतात व ते ग्रहण करण्याकडे त्यांची प्रवृत्ती होते. समाजाच्या मानसिक अवस्थेचा फायदा व्यापारी कला (कर्माशियल आर्ट) घेऊ पाहते. बाजारू, स्वस्त अशा खास तयार केलेल्या गीतांमुळे व त्यांच्या पुस्तिका व ध्वनिमुद्रिकांमुळे ही प्रचलित लोकगीते भराभर मागे पडतात. या गीतांच्या संगीताचा सुसंस्कृत अशा उच्च संगीतात अंतरभाव होत नसल्यामुळे लहान मोठ्या, सुसंस्कृत, असंस्कृत, ग्रामीण अथवा शहरी अशा निरनिराळ्या समाजाचे दुर्लक्ष होत जाते. त्यात भर

चढाओढीचा संपूर्ण अभाव. म्हणून ही गीते लोकांना फारशी आकृष्ट करू शकत नाहीत.

चित्रपटातील गाणी ही लोकगीतांवर बुलडोझर फिरवल्यागत आली आहेत. जुन्याचे आकर्षण तर आहे पण नव्याची ओढ आहे. दोन्हीही हवे आहे. अशा विचित्र परिस्थितीत सापडलेल्या एक महिलेकडून मला काही ओव्या मिळाल्या. जात्यावरची मूळ ओवी ही अशी होती –

**पंढरीची वाट          कशानं ओली झाली**
**सावळ्या सम्राटाची          रुक्मिणी पाणी न्हाली**

तिची चाल अशी –

सा रे ग – – प म – – ग रे गरे सा – –
**ए की पं ऽ ऽ ढ री ऽ ऽ ची वा ऽऽ ट ऽ ऽ**

प – सा – – सा सा रे सा रे ग म ग रे सा
**क ऽ शा ऽ ऽ नं ओ ऽ ऽ ली झा ऽऽ ली ऽ ऽ**

सा रे ग ऽऽ प म – – ग रे गरे सा – –
**क ऽ शा ऽऽ न ओ ऽ ऽ ली झा ऽऽ ली ऽ ऽ**

सा रे ग – – प म – – ग रे गरे सा
**ए की पं ऽ ऽ ढ री ऽ ऽ ची वा ऽऽ ट ऽ**

सा रे ग – – प म – – ग रे गरे सा – –
**सा ऽ व ऽ ऽ ळ्या स ऽ ऽऽ म्रा टा ऽऽ ची ऽ ऽ**

प – सा सासा सा सा रे सा रे ग म गरे सा

रु ऽ ख्मि ऽ ऽ णी पा ऽ ऽ णी न्हा ऽऽ ली ऽ ऽ

सा रे ग – – प म – – ग रे गरे सा

सा ऽ व ऽ ऽ ळ्या स ऽ ऽ म्रा टा ऽ ऽ ची

जात्यावरच्या ओवीला तिने नागिन सिनेमातील 'मन डोले मेरा तन डोले' या गाण्याची चाल कशी चपलख बसविली ते पाहण्यासारखे आहे. त्या काळात हे गाणे अत्यंत लोकप्रिय झाले होते.

सा सा रे – म – ग – रे सा रे – म – ग –
काई पं ऽ ढ ऽ वि ऽ ग ऽ पं ऽ ढ ऽ वि ऽ

रे सा रे ग रे सा रे – – रे सा रेसा नि ध

ग ऽ पं ऽ ढ वि री ऽ ऽ ची वा ऽऽ ट ऽ

सा – रे रे ग – रे सा सा – सा – –

क ऽ शा नं ओ ऽ ली ऽ झा ऽ ली ऽ ऽ

सा सा रे – म – ग – रे सा रे ग रे सा

वा ट क ऽ शा ऽ नं ऽ ग ऽ क ऽ शा नं

रे ग रे सा रे – – – सा रेसा नि ध

ओ ऽ ली ऽ झा ऽ ऽ ली ग ऽऽ वि ठू

सा – रे रे ग – रे सा सा – – – –

सा ऽ व ळ्या स ऽ म्रा ऽ टा ऽ ची ऽ ऽ

सा सा रे म म ग – रे सा रे ग रेसा

रा ई रू ऽ क् मि ऽ णी ऽ रु ऽ क् मि

रे – – रे सा रेसा नि ध़ सा सा रे रे

णी ऽ ऽ ग रा ऽऽ ई ऽ रू ऽ ख्मि णी

ग ग रे सा सा – सा – – –

पा ऽ णी ऽ न्हा ऽ ली ऽ ऽ ऽ

या 'तन डोले' च्या स्वररचनेत ओवीची अक्षरे फिट्ट बसविण्यासाठी इ कार आकाराव्यतिरिक्त सहावेळा पूरकांचा यथेच्छ वापर केलेला आहे. जुन्या नव्याचा समन्वय साधलेला आहे तो मजेदार आहे.

सामाजिक चालीरीतीत परिवर्तन होणे, काही प्रथा कायद्याने बंद पडणे, राहणीमानात फरक पडणे, शिक्षणाचा प्रसार होऊन शुद्ध भाषेचा वापर होणे, त्यामुळे प्रादेशिक भाषा दुर्लक्षित होणे, सुईणी जाऊन सुतिकागृहात बाळंतपण होणे; औद्योगिकीकरणामुळे जाते, उखळ, नांगर इत्यादी कुठे तरी कोपऱ्यात जाऊन पडणे; धर्मांतर, जातिभेदाची तीव्रता कमी होणे, लग्न मुंजी सारखे समारंभ दारी मांडव न घालता कार्यालयात होणे; पैठण्या, कशीदा काढलेल्या चोळया, काळया चंद्रकळा कपाटात जाऊन नायलॉन, पॉलिएस्टर सारखी वस्त्रे वापरात येणे, शिमग्यासारख्या सणातील विभत्सपणा जाऊन त्याऐवजी स्वच्छता सप्ताह संपन्न होणे, होळीच्या गर्जनांची जागा सामुदायिक प्रार्थनांनी होणे, शेवया, गहुले वळायचे मागे पडून तयार नुडल्स बाजारात उपलब्ध होणे, अशा असंख्य अदलाबदलीमुळे तद्विषयक गीते नष्ट झालेली आहेत. नवीन निर्माण होण्याची शक्यता जवळपास नाही!

करमणुकीच्या साधनांनी तर एवढे आक्रमण केले आहे की, आपण आज कोठे आहोत, उद्या कोठे असणार आहोत या संभ्रमात पडावे! सिनेमा, रेडिओ, दूरदर्शन, व्हिडीओ कॅसेट्स, इलेक्ट्रॉनिक उपकरणे यामुळे आमच्या बालमित्रांची आणि मैत्रिणींची भोंडला, भुलाबाई, भराडी गौर, झोपाळ्यावरची गाणी, खेळांची गाणी, शंकराची गाणी थेट कैलासावर उडून जाऊन तेथेच स्थायिक झालेली आहेत! ....

दळणवळणांच्या साधनांचा प्रसार आणि ग्रामीण लोकांची शहराकडे येणारी गर्दी यात बिचारी लोकगीते हरवून गेली आहेत! .....

लोकगीते ही आता एक ऐतिहासिक घटना होऊ पहाते आहे. आपल्या कडेच नाही तर सर्व जगातच. इंग्लंड, अमेरिका इत्यादी देशात आज जुनी पुराणी लोकगीते लुप्त झालेली आहेत. पण आपल्यात आणि त्या देशात फरक एवढाच की, त्यांनी सरकारच्या आश्रयावर अवलंबून न राहता स्वत: वेगवेगळ्या योजना आखून आपली गीते गोळा करून जतन करून ठेवली आहेत. त्यांची संग्राहालये स्थापन केली आहेत. हे कार्य करण्यासाठी खरे तर आपल्याला उशीरच झालेला आहे. पण आजही वेळ गेलेली नाही. ज्या ज्या प्रकारे जमेल त्या त्या मार्गाचा अवलंब करून खेडोपाडी जाऊन लोकसाहित्य व लोकसंगीत एकत्रित करणे ही आजची खरी गरज आहे.

# मेरी शोध कहानी

सौ. मालती शर्मा

यह जानकर शायद आपको आश्चर्य हो कि इन्टर पास करने तक मैं कभी स्कूल ही नहीं गई। पर यह 'स्कूल न जाने' जैसा मन को कभी लगा ही नहीं। जन्म ग्वालियर में हुआ। वहीं शिवराम कोली के बाड़ेवाली पुराने घर की एक मीठी सी याद है। एक दृश्य जो आज भी भूलता नहीं है। क्वार का महीना, हमारी साँझी सजी है। फूलपाँखुरियों और पन्नी से जगर मगर कोट, पूरे जोश से चलते गीत। बैठक में पिताजी के पास शिरढोणकरजी आयें हैं, ग्वालियर के प्रसिद्ध संगीतज्ञ। पूछते हैं 'मास्टर साहब यह घर में खमाज कौन छेड़ रहा है, क्या कोई मेहमान आये हैं?' पिताजी ध्यान से सुनते हैं। फिर जोर का ठहाका लगाते हैं। 'अण्णा साहेब कहाँ का खमाज, ब्रिटियाँ साँझी गा खेल रही हैं'। उत्सुकता भरे वे हमारे पास चले आये तो मैं लाजकर चुप हो गईं।' 'स्कूल नहीं जाती' साँझी देखते हुए वे पूछते हैं। 'जाती तो हूँ' में बड़ी ठसक से कहती हूँ देखिये ना मेरा कार्य और मैं मोटे मोटे अक्षरों से भरी कई कापियाँ उन्हें पकड़ा देती हूँ जिसमें प्रभाती, संझवाती, साँझी, नौरता के गीत कसमें खाने उतारनें की प्रतिज्ञा, पहेली,

छन्द-खेल न जाने क्या क्या लिखा है। वे कापियाँ उलटते पलटते है।' भई तुम्हारा होमवर्क तो बहुत बढ़िया है' और स्नेह से पीठ थपथपा चले जाते हैं।

पर यह भी बाद की याद है। इससे पूर्व पाँचवी वर्ष में वसंतपंचमी को फूफाजी ने पट्टी पूजन करा के मेरा हाथ पकड़कर 'ओऽम् नमः सिद्धम्' लिखवाया था। लेकिन बाराखड़ी पूरी होने पर अपने मन से जो पहली इबारत मैंने लिखी वह बुआ से सुना पट्टी चमकाने का गीत था–

**"सूख सूख पट्टी चंदन गट्टी**
**राजा आये महल चिनाये**
**मैहल के ऊपर छप्पर छाये**
**छप्पर गया उड़ पट्टी गई सूख"**

यह दूसरी बात है कि फूफाजी उसे पढ़कर खूब बिगड़े थे।

सच पूछा जाये तो तब किसी और स्कूल में जाने की मुझे फुर्सत ही कहाँ थी? मैं तो दिन रात लोकसाहित्य की पाठशाला में ही रहती थी। बिना किसी छुट्टी के, ३६५ दिन चलती थी यह शाला। मुँह अँधेरे दादी से प्रभाती, माँ चाची से चक्की के गीत, साँझ को बुआ से संझवाती सुनना और रात को बाबा से कहानियाँ। साँझी नौरता बनाना, सावन में राखी बनाना और झूला झूलाना पूरे वर्षभर चलता तीज त्यौहारों का चक्र। धीरे धीरे बात यहाँ तक पहुँची कि बाड़े के किसी भी घर में मेरे बिना कोई उत्सव न जमता और मेरा भी कुछ वहाँ बिना पहुँचे न सरता। मार्च अप्रैल में बोर्ड की परीक्षा होतीं। पर मैं देवी-दर्शन और जवारों की यात्रा में पीछे के दरवाजे से लाँगुरिया गाने चुपचाप खिसक जाती। घर लौटने पर कापी में पहले नये लाँगुरिया गीत लिखती, पेपर की पढ़ाई होती बाद में।

प्राइवेट भी इन्टर में, बोर्ड में नवाँ स्थान मिला। सबके जोर देने पर डिग्री कालेज में प्रवेश लिया। कालेज में पहुँचने पर मुझे लगा अरे यह क्या कैसी पढ़ाई है यह ?' यह, इससे तो लाख गुना बेहतर थी अपनी वो पाठशाला। स्वर, लय, ताल, छन्दखेलों से भरपूर। गीत, संगीत, गणित, ज्योतिष, चित्रकला, मूर्तिकला, धर्मनीति, सामाजिक ज्ञान सारे विषयों की पढ़ाई और वह भी खेल खेल में। मुझे आज नई पीढ़ी की शिक्षा पर तरस आता है। तभी से मन में बात जम गई "अब तो आगे लोकसाहित्य की यह अक्षयनिधी ही समेटनी-उलीचनी है।"

लोक परम्परा, सहज ज्ञान और अर्जित विद्या मानव चेतना के ये तीन प्रमुख स्त्रोत हैं और ये ही मनुष्य के अनुभूत ज्ञान के तीन स्तर भी हैं। इन्हीं से निर्मित मेरे पूरे होशो हवास के विगत ४० वर्ष आज आँखों के सामने खड़े हैं। इस कालखंड का मुझे वह क्षण याद नहीं पड़ता जब लोकसाहित्य कहीं मुझसे छूटा हो। लोकसाहित्य से मेरे इतने लम्बे सरोकारों की यह धरती मेरे लोक-बोध की धरती रही। जिसने भीतर बाहर से मुझे रचा सँवारा। लोकसाहित्य मेरे लिये माँस से जुड़ी त्वचा की तरह अविच्छिन्न, भूख प्यास नींद के समान सहज नैसर्गिक और ऋतचक्र के सदृश्य आवर्तमान उल्लासप्रद उत्साह पूर्ण रहा। 'भातुकली' के मेरे इस सम्पूर्ण खेल में भी।

लोकसाहित्य की शोध से मेरा परिचय तो बाद में हुआ और उसकी तरफ मुझे प्रेरित किया स्व. डॉ. सत्येन्द्र, देवीलाल सामर, श्याम परमार, डॉ. महेन्द्र आनावत और पूना आने पर पू. अक्का डॉ. सरोजिनी बाबर ने। ये सब पत्र पत्रिकाओं में मेरे लेख-देख पढ़कर दंग थे। और तब शुरू हुई शोध यात्राएँ। इन शोध यात्राओं के खट्टे-मीठे अनुभव प्रसंगों का एक अविस्मरणीय सिलसिला है। कई तो आज भी रोयें कँपा देते हैं।

१९६१ में पी. एच्.डी. हेतु मैं शिवपरिकर का लोकसाहित्य एकत्र कर रही थी। पता लगा कि अछनेरा गाँव मे कैलादेवी के मंदिर के भगत

जी के पास ऐसा प्रचुर साहित्य है तो आगरा से एक दिन पहुँच गई उनके पास। मेरा परिचय और प्रयोजन सुन वे भीतर मंदिर में जाते हैं। और मैं 'पांडुलिपियों' की आशा से उनके पीछे पीछे। कुछ गणना सी कर भगत जी आदेश देते हैं–लाली! पहले अपना दाहिना हाथ इस सिद्ध शिला पर रखो, ऐसे नहीं, वरदमुद्रा में'। मैं कुछ भयभीतसी वैसा ही करती हूँ। 'वस ठीक अब देखना तुम'। सिन्दूर से हाथ पर स्वस्तिक वनाते टिपकी लगाते भगत जी कहते हैं, 'देवी मैया' की किरपा से उनकी भेंटे (पूजा गीत) और अर्थ सव कुछ तुम्हारे मूँह से बोलेंगे बस थोड़ी सी देर है'। भगत जी गर्भगृह से लगी अपनी कोठरी में गये और मेरी छठी इन्द्रिय जाग्रत हो उठी। अपने कापी, पैन, झोला सब वहीं छोड़ जो मैं सिर पर पाँव रख कर भागी तो एक घर की पौरी में ही आकर दम ली।

वरसों तक यह याद हृदय कँपाती रही। आज सोचती हूँ यदि मेरी छठी इन्द्रिय उस क्षण न जागती तो क्या आज यह संस्मरण मैं ने लिख पाया होता? नहीं! किन्तु तब भगत जी का अनुष्ठान पूरा हुआ होता। अनुष्ठान से जो शक्ति उन्होंने पाई होती उससे न जाने कितने आस्थावानों के संताप हरे होते, भला किया होता। पहली दृष्टि में ऊपर से अनिष्टकर और ऊलजलूल लगते लोक साहित्य के समस्त रुपों में परिव्याप्त यही लोक कल्याण की कामना, शिवत्व का भाव ही लोक-साहित्य की आत्मा है। यहाँ तक कि नृशंस और क्रूर मानी जाती बलि में भी जीवन के उद्रेक, विकास और रक्षा की ही धरती है जो इस अणुसभ्यता के पीछे नहीं।

लोकसाहित्य के किसी भी रिचुअल में बुरी दृष्टि मुझे नहीं मिली। नजर लगाने में भी नहीं और नजर लगाने वाली आँखे फोड़ने की इच्छा में भी नहीं। चम्पी दादी से नजर का यह मंत्र लिखते समय मैं सोच में पड़ गई थी –

'आँखू माखूँ दिया चाखूँ सांझ बराखूँ
दीपक द्योता राखूँ
जो मोर बच्चा के नजर लगावे
ऊकी फोड़ूँ मा दूनी आँखूँ '

वाद में समझा आँखे नहीं 'बुरी नजर' फोड़ने की वात है। जिन्दगी की बिकट से विकट स्थितियों में इसी समष्टिहित भाव की खोज करना और पाना मेरी लोकसाहित्यिक शोध की चरम उपलब्धि रही है। एक और प्रसंग है उसी वर्ष का।

दिन के धूल धूसर गाँवको किसी स्वर्गीय जादू नगरी में बदलनेवाली ओसारों से झरती क्वार की दूधिया चांदनी में बाहर चबूतरे पर बैठी मैं दिन भर में नदी, तालाव, मढ़, खेतों से वटोरे गीत दुहरा, गुनगुना रही हूँ कि चूल्हे पर रोटी सेंकती भाभी भरे गले से कहती हैं—'सुना बीबीजी! सुमित्रा लल्ली नहीं रहीं, आज दोपहर कोना फटी चिठ्ठी आई है'।

सुमित्रा यानी मेरे वड़े मामा की बेटी। अव जब उसके गाँव के इतना पास हूँ तो जाना ही चाहिये। फिर शायद वहाँ भी कुछ साहित्य मिले ऐसा सोच तड़के की बस लेती हूँ। गाँव में घुसती हूँ तो कुएँ से पानीभर कर लौटती सुमित्रा को सामने आते देख आँखे विश्वास नहीं कर पातीं। मुझसे पहले सुमित्रा घर में घुसती है। पानी के घड़े रखवह मुझसे गले मिलने बढ़ती है तो मैं अचकचा कर एकदम पीछे हट जाती हूँ। "सुमित्रा तू तू तो. . . वह . . . चिठ्ठी . . . मेरी जवान लड़खड़ाती है" "हाँ जीजी, मेरे सिर पै कऊआ बैठ गया था न इसलिये सबको चिठ्ठी दो।" तभी खेत से लौटी उसकी सास बात की पुष्टि करती है। मेरे मूँह से अनायास निकलता है 'धत् तेरे की' उस रात सुमित्रा के घर मरने की खवर पाकर आये रिश्तेदारों का जमघट था। इस अंचल में

किसी के सिर पर कौवे का बैठना आसन्न मृत्यु का सूचक है। अगर उस व्यक्ति के मरने की झूँठी खबर रिश्तेदारों को दे दी जाय तो मौत टल जाती है ऐसा लोक विश्वास है। अब कितनी झंझटों और कष्ट भरा है यह विश्वास। झूँठी खबर देने से कुछ भी अघट घट सकता है। लेकिन खबर फैलाने के पीछे उद्देश्य क्या है? वही शिव दृष्टि, जीवन की रक्षा और किसी भी तरह मौत को टालना।

परन्तु बीते वक्त के साथ लोकसाहित्य के ऐसे बाह्य रूप निरर्थक हो जाते हैं। इनमें जो असंगति और अनिष्ट दिखता है वह असंगत हुआ समयतत्व है। लेकिन कालान्तर में भी लोकसाहित्य के रूप अपने मूल अभिप्राय में बुरे नहीं, अप्रासंगिक ही होते हैं। उसका वह पक्ष जिन्हें लोक की इतिहास गंगा अपने साथ वहाकर नहीं चलती अपने वक्त की जरूरतों की यादगारें, बीते युग के जीवश्म (फॉसिल) बन रह जाते हैं। आज उत्तर भारत के गालीगीत, महाराष्ट्र में पति का नाम लेने के बहाने उखाणे, देवशयनी के बाद विवाह न होना व्रत तोड़ने के लिये चन्द्र दर्शन आदि ऐसे ही पक्ष हैं।

न जाने कितनी बार लोकसाहित्य से प्राप्त इस समष्टिहित भाव के साथ मनुष्य मात्र के मन के भीतर भीतर बहती मूल संवेदनों (नैचुरल इन्स्टिक्न्ट) की अन्त:सलिला में डुबकियाँ मार मैं इकाई से दहाई, दहाई से सैकड़ा और हजार हुई हूँ। लोकसाहित्य में व्यक्ति और समष्टिगत संवेदनाओं का यह खेल बड़ा अद्भुत होता है। नितान्त अपरिचित हृदय भी लोकसाहित्य की अश्रुहास्य की भाषा से एकदम जुड़ जाते हैं। यह घटना है नाथ पंथी जोगियों की बस्ती आगरा जिला के गाँव मिढ़ाकुर की।

मुझे पता लगा कि मिढ़ाकुर के पंचम नाथ के पास जोगियों का लोक-महाकाव्य 'महादेव विवाह' पूरा है पर उसका हत्थे चढ़ना कठिन है। 'चलो देखते तो हैं' ऐसा सोच शुरू नवम्बर की एक ठंडी सुबह ५ मास का शिशु गोद में और आशा निराशा की डोली पर सवार हम दम्पति पंचम

की तलाश में मिढ़ाकुर के लिये निकल पड़े। पहले सामना हुआ उसकी 'उग्रतारा' पत्नी से। रोटी बनाते से जैसे वह हमारी अगवानी आरती में, चूल्हे की जलती लकड़ी ही ले दौड़ी—लौट जाओ उल्टे पैरों। नहीं आता यहाँ किसी को ब्याह, चले आते है 'रेडुआवाले हमारी रोटी ही छीन लेगें।' उस की तेज आवाज से बच्चा रोने लगा, हम हतबुद्धि रह गये, एक क्षण सोच मैं ने ब्रज में कहा भैना री। चले तो हम जाइंगे ई परि रेडुआ कूँ नायँ हमनु जा बेटा के लएँ शंकर जी को पूरी ब्याह सुनबे की मनौती मानी ऐ, 'जि लाला दूखारी ऐरी मेरी भैना'। बस वह पिघल गई, 'जै बात ऐ' अपनी लड़की से उसने खाट बिछवाई, बच्चे को मैंने उस पर लिटा दिया और फिर पंचमनाथ को उस दिन अपना पूरा भ्रमण छोड़ हमे "महादेव विवाह" सुनाना लिखाना पड़ा, सुबह से शाम ढले तक।

लोकसाहित्य ने मुझे इकाई से हजार ही नहीं बनाया यह मेरे लिये सांसारिक चिन्ताओं तनावों से मुक्त कर शक्ति स्फूर्ति और आंनद के नंदनवन में ले जानेवाला अदभुत स्वर भी रहा है। एक ऐसा टानिक जो थकान से चुआ और जिसने थकान ही मिटाई, आँसुओं से बहा और मेरे आँसू पोछें। अपनी शोध यात्रा में मुझे ऐसे भी लोक गायक मिले जो मृत बेटे की लाश कोठरी में रखे घर पर जुडें हुए समाजों में होली, जिकडी, ख्याल गाते रहे। यह ऐसी 'जाग्रत समाधि' है जिसमें जाने पर उतनी देर के लिये निजी दुख, भूख, नींद, थकान जैसे रह ही नहीं जाते। ऐसी समाधि की भी एक अविस्मरणीय रात है घूरेलाल जी कोरी से 'जगतदेव का पँवारा' लिखने की।

संत कबीर की परम्परा के घूरेलाल जी अपने दिन के काम की क्षति पूर्ति के मेरे किसी भी आग्रह पर जब राजी न हुए तो जल्दी खा पी कर हम रात को बैठे। आटा भरने के मटके की दीवट, लालटेन की टिम-टिमाती रोशनी कनस्तर की चौकी और बोरी की व्यास गद्दी ७८ वर्ष

 के घूरेलाल जी ने दिनभर ताना बुना, सूत अटेरा था। मेरे शहरी शरीर

ने भी पूरा दिन शोध की भटकन को चढ़ाया था। लेकिन दोनों में से किसी को जमुहाॅइयाँ नहीं आई। बहन के पास सोया मेरा तीन माह का शिशु या तो रोया नहीं, या फिर उसका रोना हमें सुनाई नहीं पड़ा। हमें तो होश तब आया जब घूरेलाल जी का लड़का पौ फटने पर पिता को अपनी खाट पर न पाकर उन्हें ढूँढता हुआ आया। उसी दिन मैं यह रहस्य जान सकी कि दिनभर का थका माँदा लोक आठ आठ और चार चार प्रहर के रतजगे कैसे कर लेता है। रात रात भर रासलीला, रामलीला, नौटंकियाँ, गूगा तेजा रामदेव के भारत गायन, पड़ वाचन कैसे चलते रहते हैं। इस लोक की शक्ति और स्फूर्ति का स्त्रोत कहाँ है। यही लोकसाहित्य जो मेरी आस्था और दृढता की वज्रशिला बना रहा हैं। यहाँ मात्र 'मेरी' कहना भी गलत होगा। मेरा यह लम्बा अनुभव रहा है कि, लोकसाहित्य तो मनुष्य मात्र के मन में और बाह्य परिवेश में व्याप्त किन्हीं परा प्राकृतिक शक्तियों की रहस्यमय संवेदना, नियमों, घटनाओं का संसार हैं, किन्हीं अद्‌भुत शक्तियों का पुंज है, जिसे अन्तरिक्ष युग की वैज्ञानिक तार्किकता भी चुनौती देने में समर्थ नहीं। आज का अन्तरिक्ष यात्री पूरी वैज्ञानिक तैयारी के बाद यात्रा पर जाते हुये शकुन विचार, टोने टोटके की उसी लोक मनोभूमि से गुजरता है जिससे कभी आदिम युग का मल्लाह नदी समुद्र में अपनी नाव छोड़ने से पहले गुंजरता था। अन्तरिक्ष नगर में पेड़ रोपना, प्रथम सफल अन्तरिक्ष यात्री के गलियारे से गुजरना उस जगह थोड़ी देर बैठना जहाँ वह बैठा था अन्तरिक्ष यात्री के ये सारे रिचुअल लोकवार्ता की चिरपरिचित भाव भूमि है।

परम्परित लोक आस्था की यह जमीन मेरे पैरों तले तब तब आई हैं जब विकट परिस्थितियों में पड़कर सारे सुसंस्कृत और परिष्कृत आधार खत्म हो गये थे। कभी यह धरती चिरंतन सत्य का दर्शन कराने-वाले लोकोक्ति मुहावरों के रूप में आई, कभी किसी गीत की कड़ी बनकर मुझे दिलासा दी और कभी लोक औषधियों की संजीवनी बनकर

असाध्य दशा में अनेक बार प्राण बचाये। उन प्रसंगों में से दो चमत्कारिक अनुभव यहाँ प्रस्तुत करती हूँ। घटना सन १९५५-५६ की है। मेरे तयेरे भाई की पिंडली की हड्डी पर एक फोड़ा हुआ। फोड़े के मुँह नहीं था। डाक्टरों ने मथुरा अस्पताल में चीरा लगा कर फोड़ा फोड़ तो दिया लेकिन वह फोड़ा भरिया फूटा हो गया। कितनेही इलाज कराये लेकिन हड्डी में हुए छेद से मवाद आना बंद न हुआ। भाई ग्वालियर अस्पताल में भर्ती हुआ। एक्सरे से ज्ञात हुआ कि हड्डी भीतर से गलने लगी है। भाई के सामने वाले पलंग पर एक अधेड़ व्यक्ति भर्ती हुआ। उसने कहा, तुम इस नासूर पर अरहर की पत्तियोंको स्वयं के मूत्र में पीसकर गरम करके बाँधो। लगभग २०–२५ दिन तक हमने तदनुसार किया उसका नासूर ठीक हो गया। पैर बिलकुल चंगा।

सन १९६२ में मेरी सत्तर वर्षीया दादी सीढ़ियों से गिरी और उनकी रीढ़की हड्डी में दरार पड़ गई। उनकी दुर्बल स्थिती देख डाक्टरों ने भगवान–भरोसे छोड़ देने की सलाह दी। मगर थी तो हड्डी की वात। हमारी बुआ की जिठानी के गाँव सोंख में एक सूँत मलकर मोच और उतरी हड्डियों का इलाज करनेवाला था। उसने एक लकड़ी सी दी और कहा कि इसे घिसकर भेड़ के दूध का मावा बना उसमें मिलाकर बाँधो। हड्डी जुड़ जायेगी। तीन सप्ताह में चमत्कार ही हो गया। दादी ठीक हो गई। हमारे बहुत पूछने पर भी उस महापुरुष ने उस लकड़ी का नाम पता बता कर नहीं दिया। बात आई गई हो गई। पर घटना मेरे मन में बस गई।

वर्षो बाद ६ एवं ७ मार्च १९८३ को बम्बई में बिरला मातुश्री सभागार में एशिया की पारम्परिक चिकित्सा पद्धतियों पर एक बहूत बड़ी संगोष्ठी हुई। लोक औषधियों की शोधक और जिज्ञासु के रूप में मैंने उसमें भाग लिया। उपस्थित विशेषज्ञ विद्वानों के समक्ष मैंने दादी वाली घटना बयान की और उस लकड़ी पर शोध करने के लिये कहा।

हमारे पूना के ही डॉ. एस्. एन्. भावसार ने बताया कि यह 'अस्थि-संहार' नामक जड़ी है। सुश्रुत के समय से ही वैद्यलोग इससे परिचित हैं। गाँवो में तो यह अभी भी शेष है। लेकिन नगरों मे ऐलोपैथी के आधुनिक प्रसार ने इसे विस्मृति की पर्तो से ढँक दिया है।

एक और घटना है १९७१ की। मेरे पतिदेव की दाहिनी बाँह में कम्पाउन्ड ह्यूमस फ्रैक्चर हुआ। बड़ा ही कठिन समय था वह। ससून हॉस्पिटल में ट्रैक्शन में २५ दिन रखी रही बाँह। आपरेशन हुआ जोकि डॉ. संचेती के सफलतम आपरेशनों में से एक था। स्लिग में हाथ लटकाए हम अस्पताल जाने के लिये रिक्शे की प्रतिक्षा में थे कि एक अनजान व्यक्ति हमारे पास आया बोला 'भाई सा. आप माँसाहारी नहीं है। पर इस हड्डी के शीघ्र जुड़ने के लिये आप सुबह सुबह अधपके टमाटर और मूली के सिर्फ पत्ते खायें फिर देखे कितनी जल्दी कैलस फॉरमेशन होता है। हमने तदनुसार किया और डॉ. संचेती जो कैलस फॉरमेशन की अत्यंत धीमी गति से परेशान थे उसमें आई तेजी देखकर दंग थे। अस्तु, लोकऔषधियों से होतें चमत्कारों की मेरी शोध कहानी बहुत लम्बी है। अभी तो अपनी शोध यात्रा की इस लोक रामायण को 'एक राम हते एक रामन्ना शैलीं' में यहीं समाप्त कर मैं विद्वतवर्ग से विदा लेती हूँ।

राष्ट्रीय ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. 3208
20/12
215106
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# शासकीय मुद्रणालये व लोकसाहित्य समितीची देखणी प्रकाशने

श्री. स. आ. सप्रे

**शासकीय मुद्रणाचे बदलते स्वरूप**

शासकीय मुद्रणालयात छापलेली लोकसाहित्य समितीची सर्व प्रकाशने हमखास देखणी असतात याचे अनेकांना आश्चर्य वाटते. पण हे काही सहजासहजी झालेले नाही. त्याच्यामागे शासकीय मुद्रणाबद्दल काही नवीन विचार आहेत, ते येथे थोडक्यात मांडले आहेत.

शासकीय मुद्रण हे बदामी कागदावर छापलेल्या गॅझेटप्रमाणे बेंगरूळ असणार असा एक समज आहे. तसेच त्यात कलात्मकतेला जागा नाही हा विचारही आता मागे पडला आहे. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे राज्यकारभाराची उद्दिष्टेच बदलली आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात करवसुली, कायद्याची अंमलबजावणी, देशाचे परचक्रापासून संरक्षण अशी राज्यकारभाराची माफक उद्दिष्टे होती. आता राज्यकारभाराचे उद्दिष्ट म्हणजे राष्ट्राचा सर्वांगीण विकास. या विकासाला अनेक पैलू आहेत. आर्थिक, सामाजिक, शास्त्रीय व तांत्रिक, सांस्कृतिक व

कलात्मक. या बदलत्या उद्दिष्टांबरोबर शासकीय मुद्रणाचीही उद्दिष्टे बदलली आहेत.

**शासकीय मुद्रणाची नवी उद्दिष्टे**

मार्शल मॅकलुहन या प्रकांड पंडिताने मुद्रणामुळे मानवी संस्कृतीच कशी बदलली याचे अत्यंत मूलगामी विवेचन केलेले आहे. मुद्रणामुळे राष्ट्रवाद, औद्योगिकीकरण, जागतिक बाजारपेठा, साक्षरता, शिक्षण आणि संशोधन अशा अनेक गोष्टी शक्य झाल्या. खरीखुरी लोकशाही अस्तित्वात आली. मुद्रणामुळे भाषेवर, व्याकरणावर व लेखन शैली-वरही फार मोठा परिणाम झाला आहे. शुद्धलेखनात एकसूत्रता व नियमबद्धता आली.

आज आपण ज्ञान युगात आहोत. राष्ट्राची खरी शक्ती ज्ञान साधना हीच आहे. ज्ञान निर्मितीच्या आणि ज्ञानप्रसाराच्या कार्यात शासनाला महत्त्वाची भूमिका बठवावी लागते. माणसाच्या जिव्हाळ्याच्या जवळ जवळ सर्व विषयांवर अमेरिकन सरकारने वाङमय प्रसिद्ध केले आहे. इंग्लंडमध्ये हीच परिस्थिती आहे. तेथील शासकीय प्रकाशनांबद्दल जर एखाद्या व्यक्तीला काही ओढ नसेल तर ती व्यक्ती महान पंडित तरी असली पाहिजे किंवा अगदीच निर्बुद्ध असली पाहिजे असे एका विदुषीने म्हटले आहे.

शासकीय मुद्रण हे राज्यकारभाराचे अत्यावश्यक असे साधन तर आहेच परंतु सर्वांगीण राष्ट्रीय विकासाचे ते एक प्रभावी माध्यम आहे. शासकीय मुद्रणाचा दर्जा हा त्या देशाच्या तांत्रिक, शैक्षणिक, कलात्मक व व्यवस्थापकीय कार्यक्षमतेचा एक निकष समजला जातो. याकरता शासकीय मुद्रणाचा एक नवीन आदर्श आपण निर्माण करावा ही महाराष्ट्रातील शासकीय मुद्रणालयांची भूमिका आहे.

श्रीज्ञानेश्वरानी मराठी भाषा अमृतासारखी मधुर आहे असे म्हटले आहे. त्यानी शारदेचे वाग्वविलासिनी, कलाकामिनी, विश्वमोहिनी असे

अनुपम वर्णन केले आहे. शारदेच्या लावण्यकलाभांडारास अनुरूप असेच मराठीतील मुद्रण सुलभ, देखणे व विलोभनीय असले पाहिजे. संत एकनाथानी आपल्या एकनाथी भागवत या ग्रंथास 'महाराष्ट्र ग्रंथ' म्हटले आहे. 'माझी मराठी भाषा चोखडी। परब्रह्मी फळाली गाढी' असा मराठीबद्दलचा आपला गाढ अभिमान व्यक्त केला आहे. मुद्रणाचे एक महत्त्वाचे कार्य म्हणजे कलांचे संरक्षण व संवर्धन. मुद्रणातच कलात्मकता नसेल तर ते मुद्रण इतर कलांची जोपासना कसे करणार? मराठी वाङमयाच्या थोर परंपरेला शोभेल असेच मराठी मुद्रण असले पाहिजे.

**लोकसाहित्य समितीचे व्रत**

ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर आदि थोर संतकवींनी मोठ्या तळमळीने मराठी शब्दसंपत्ती गोळा केली, ती अधिक समृद्ध केली व तिला नवीन वैभव दिले. मराठी भाषा नादमधुर, लालित्यपूर्ण व अर्थ-वाहक झाली. लोकजीवनाचे या कवींनी उभे केलेले चित्र प्रत्ययकारी आहे. लोकसाहित्य जणु त्यांनी संपन्न केले. हेच व्रत गेली कित्येक वर्षे लोकसाहित्य समितीने डॉ. सरोजिनी बाबर यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या जिद्दीने चालविले आहे.

लोकसाहित्य हा कोणत्याही राष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा एक महत्त्वाचा पण थोडाफार दुर्लक्षिलेला भाग आहे. या साहित्यात सहजता आहे. कारण ते स्वयंस्फूर्त आहे, निरागस आहे. प्रसिद्धी हा त्याचा हेतू नसतो. लोकसाहित्य समितीच्या प्रकाशनांमुळे या सांस्कृतिक परंपरेचे आपल्याला दर्शन होते. ग्रामीण जीवनातील मांगल्याचा व सहजसौंदर्याचा आपल्याला प्रत्यय येतो.

**शासकीय मुद्रणालयांचा निर्धार**

लोकसाहित्य समितीने ज्या निष्ठेने लोकसाहित्य जमा केले त्याच निष्ठेने व जिद्दीने शासकीय मुद्रणालयांनी त्याचे कलात्मक मुद्रण केले.

त्यामुळे शासकीय मुद्रणालयांत छापलेली समितीची प्रकाशने सर्वांगसुंदर असणार असा विश्वास आता निर्माण झाला आहे. प्रकाशन समारंभही वैशिष्ठ्यपूर्ण, वैभवशाली व कलात्मक असावेत याकरता मुद्रणालये दक्ष असतात.

सुदैवाने या प्रयत्नांचे आंतरराष्ट्रीय पातळीवरही चांगले चीज झाले आहे. उदाहरणार्थ लोकसाहित्य समितीचा 'नंदादीप' हा ग्रंथ बगदाद, तेहरान आणि बुखारेस्ट येथील ग्रंथप्रदर्शनांत ठेवण्यात आला होता. त्यानंतर मॉस्को येथील पहिल्या आंतरराष्ट्रीय ग्रंथजत्रेमध्येही त्याचा समावेश होता.

**शासकीय मुद्रणालयांतील वाघ**

९ नोव्हेंबर १९७० ह्या नामदेवांच्या सप्तजन्म शताब्दीच्या दिवशी शासनातर्फे नामदेव गाथा मोठ्या समारंभाने प्रसिद्ध करण्यात आली. या गाथेच्या मुद्रणाचा इतिहास हा एक मुद्रण विक्रमच समजला पाहिजे. ९ जुलै १९७० रोजी नामदेव गाथा समितीने गाथेचे हस्तलिखित शासनाला सादर केले. यावेळी समितीच्या अध्यक्षा डॉ. सरोजिनी बाबर होत्या. तर चिटणीस प्रा. (कै.) ल. ग. जोग होते. सुमारे १,२०० पृष्ठांचा हा ग्रंथ केवळ चार महिन्यात छापणे अशक्य आहे अशी जोगांची ठाम समजूत होती. पण पुढे पुढे मुद्रणालयातून येणारे प्रुफांचे ढीग तपासताना त्यांची दमछाट झाली. त्यावेळी शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयात ते वारंवार येत असत. एकदा ते सहज म्हणाले की, ते जेव्हा इतर (खासगी) मुद्रणालयांत जातात तेव्हा सगळ्यांच्या ठप्प चेहऱ्यावर आठ्याच आढळतात ! आणि हे शासकीय मुद्रणालय असूनही येथे आपले नेहमीच आपुलकीने स्वागत होते ! नामदेव गाथा वेळेवर प्रसिद्ध झाली ती सर्वांच्या अविरत परिश्रमामुळे व सहकार्यामुळे; नंतर प्रा. जोग यांनी एक दिलखुलास लेख लिहिला–शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयातील वाघ. या मुद्रणालयातील माणसे वाघाप्रमाणे कामाचा फडशा पाडतात.

असा त्यांचा अभिप्राय होता. या जिद्दीतूनच समितीच्या ग्रंथांना राजबिंडे स्वरूप प्राप्त झाले.

आपल्या लेखकांना आदराने वागविणे, त्यांना सर्व तऱ्हेने साहाय्य देणे अशी प्रथा शासकीय मुद्रणालयांनी पाडली आहे. त्यामुळे डॉ. सरोजिनी वाबर व मुद्रणालयांमध्ये एक जिव्हाळ्याचा, अतूट, असा कार्याधिष्टित ऋणानुबंध निर्माण झाला आहे.

या मागचा विचार असा की ऑलिव्हर सायमन या मुद्रणतज्ज्ञाने म्हटल्याप्रमाणे मुद्रण ही एक जीवनपद्धती आहे. (Printing is a way of life.) मुद्रणालय म्हणजे काही पुस्तके छापण्याचा कारखाना नाही. बीएट्रीस वार्ड या आद्य मुद्रणपंडितेने म्हटल्याप्रमाणे मुद्रणालय ही एक पवित्र भूमी आहे. (Friend, you stand on sacred ground.) तरुणपणी बीएट्रीस एक लावण्यवती म्हणून प्रसिद्ध होती, तर प्रौढपणी प्रतिभाशाली मुद्रणकला समीक्षक म्हणून तिने जागतिक लौकिक संपादन केला. मुद्रण व्यवस्थापनाला सांस्कृतिक आणि कलात्मक अधिष्ठान लागते. यामुळेच ऑक्सफर्ड व केंब्रिज विश्वविद्यालयांच्या मुद्रणालयांना सर्व जगभर मान आहे. निदान महाराष्ट्रात तरी आपण असा आदर्श निर्माण करावा ही प्रेरणा शासकीय मुद्रणालयांना चालना देते.

**ग्रामीण जनता व लोकसाहित्य प्रकाशने**

ग्रामीण विभागातील अशिक्षित लोकांना ही प्रकाशने पाहून काय वाटेल असा विचार मनात येतो. मार्गारेट मीडने आपला एक मजेशीर अनुभव सांगितला आहे. मागासलेल्या जमातीतील लोकांना छापलेल्या पुस्तकाच्या अनेक प्रती तिने दाखविल्या तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले की, सगळ्या प्रती सारख्या कशा? हस्तलिखित पुस्तके त्यांनी पाहिली होती पण हा प्रकार त्यांना सर्वस्वी नवीनच होता!

लोकसाहित्य प्रकाशनांचे एक वैशिष्टय म्हणजे त्यातील सुंदर चित्रे, साधी व रंगीत आणि त्यांचे बहारदार जॅकेट. अशा चित्रांचा कसा परिणाम होतो याचे एक उदाहरण आढळते. काही वर्षांपूर्वी कोल्हापूर जवळच्या ज्योतिबाच्या डोंगरावर यात्रेच्या निमित्ताने भरविलेल्या शासकीय ग्रंथ प्रदर्शनात शाहू महाराजांचे एक रंगीत चित्र होते. हे चित्र पाहून औरंगाबादहून आलेल्या एका वृद्ध व अशिक्षित महिलेस गहिवरून आले. तिला ते चित्र पाहिजे होते. आपल्या मरणोन्मुख पतीस भेट देण्याकरता. तो फार वर्षांपूर्वी शाहू महाराजांच्या तैनातीत होता आणि मृत्यूसमयी त्याला त्यांची सारखी आठवण येत होती.

लोकसाहित्य प्रकाशनांमध्ये तर रंगीत नयनरम्य चित्रांची खैरात आहे. त्यातील सण, उत्सव, महोत्सव, देवळे, हळदीकुंकवासारखे समारंभ यांचे चित्रण मनोज्ञ आहे. साध्यासुध्या अशिक्षित व्यक्तीसही ग्रामीण जीवनाचा हा रंगीत चित्रपट आवडल्याशिवाय राहाणार नाही.

एका अर्थाने महाराष्ट्रातील शासकीय मुद्रणालये जनतेचीच आहेत. जनतेला आपल्या मुद्रणकौशल्याचा अभिमान वाटावा ही मुद्रणालयांची आकांक्षा आहे, लोकसाहित्य समितीच्या प्रकाशनांमुळे शासकीय मुद्रणालयांच्या कार्याची ग्रामीण जनतेसही कल्पना यावी. मुद्रणालयांचे एक स्वप्न असे की, शासकीय मुद्रणालयांत छापलेल्या अनेक लोकसाहित्य प्रकाशनांपैकी एकाची तरी प्रत प्रत्येक खेडयात व प्रत्येक महत्त्वाच्या वाचनालयात असावी.

ग्रंथसंग्रहालय ठाणे
3208
ग्र. क्र. 20212

REFBK-0020282

□ □ □

अनुभवाची अभिव्यक्ति हे लोकसाहित्याचे महत्त्वाचे कार्य आहे आणि हे कार्य करण्यात लोकवाङ्मयासारखे दुसरे प्रभावी साधन नाही. निर्मळ मनाच्या परंपरेचा लोकसाहित्याचा हा धागा मानवी जीवनाचे दर्शन व प्रगति घडविणारा आहे. सहनशील कौटुंबिक जीवनाच्या मनोवृत्तीचे चित्रण या साहित्यात होत असल्याने सामर्थ्यशाली राष्ट्रीय जीवन घडविण्यास त्याचा खात्रीने उपयोग होऊ शकेल.

लोकसाहित्याला देण्यात येणारी "अमृतकुंभाची" उपमा अगदी सार्थ अशीच आहे. हे कुंभ मातीचे असले तरी त्यात माणुसकीचे अमृत शिगोशीग भरलेले आहे. लोकवाङ्मयात आढळून येणारा कौटुंबिक जीवनातील जिव्हाळा, सहनशीलता इत्यादि भावभावनांचे मनावर होणारे संस्कार आणि त्यातून तयार होणारा विशिष्ट दृष्टिकोन महाराष्ट्राचे भावनात्मक ऐक्य साधण्याच्या कामीच नव्हे तर राष्ट्रापुढील अनेक प्रश्न सोडविण्याच्या कामी मार्गदर्शक ठरू शकेल.

आमचे लोकसाहित्य हे ओवीपुरतेच मर्यादित नाही. कहाण्या, कोडी, उखाणे, पोवाडे, लावण्या इत्यादि विविध क्षेत्रात त्याचा संचार आहे. मराठी जीवनाचा तो एक प्रमुख भाग आहे. आमचे लोकजीवन सुसंस्कृत, सहजस्फूर्त व भरभराटीचे आहे, याची प्रचीति लोकवाङ्मयाने येते.

*— ना. यशवंतराव चव्हाण*